म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. १२१०



# गांधी विचार दर्शन

## जीवन-साधना

### आश्रम व व्रतें

३

REFBK-0010238

गांधी वाङ्मय प्रकाशन समिति

गांधी-विचार-दर्शन : खंड तिसरा

# जीवन-साधना

आश्रम व व्रतें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ना. क्र. 90230

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३०८ वि: निबंध
क्रमांक 1290 नोंः दिः २२/३/६०

REFBK-0010238

गांधी-वाङ्मय-प्रकाशन समिति, महाराष्ट्र

© नवजीवन ट्रस्ट अहमदाबाद १४
यांच्या सौजन्यानें

प्रथमावृत्ति : १७ डिसेंबर १९५९

मूल्य : रु. २=५०

मुद्रक : दा. त्र्यं. जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें २.
प्रकाशक : शंकरराव देव, अध्यक्ष, गांधी–वाङ्मय–प्रकाशन समिति ( महाराष्ट्र ), १२४२, सदाशिव पेठ, विद्यापीठ वाडा, पुणें २.

# निवेदन

गांधीजींचे जीवनविचार भारतीय आणि अखिल मानवीय जीवन समृद्ध करणारे आहेत अशी आमची श्रद्धा आहे. कारण त्या विचारांना सत्याच्या वा सद्वस्तूच्या शोधांतून प्रेरणा मिळालेली आहे. याच कारणानें हे जीवनविषयक विचार ज्या शब्दांत मांडले गेले आहेत, तें 'अक्षर-वाङ्मय' आहे.

गांधीजींचे लेख व भाषणें यांच्यामागें ही सत्यशोधनाची प्रेरक शक्ति असल्यामुळें त्यांच्यांत आणखी असा एक गुण आहे कीं, त्यांचा संसारी, सेवक व साधक अशा सर्वांना सर्वकाळीं स्वतःच्या जीवनांत मार्गदर्शन होण्यासाठीं उपयोग आहे. गांधीजींच्या जीवन-विचारांत संसार, समाजसेवा आणि आध्यात्मिक साधना यांच्यामध्यें वेगळेपणा किंवा विरोध नव्हता, कारण त्यांच्या जीवनांत या तिहींचा पवित्र संगम झालेला होता. सत्य, अहिंसा, अस्तेय आदि पांच यम वा महान् तत्त्वें आणि इतर लहानसान नियम अथवा व्रतें यांची व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीं जरूरी आहे, अशी या देशांत प्राचीन काळापासून समजूत आहे. परंतु व्यवहार अथवा समाज-सेवा मोक्षदायी करण्यासाठीं सुद्धां यम-नियमांची जरूरी आहे ही गोष्ट प्रथम गांधीजींनी लोकांपुढें मांडली व आचरून दाखविली. याचा परिणाम असा झाला आहे कीं, व्याख्यानें, पत्रें व लेख यांच्या रूपानें गांधीजींच्या हातून जें उदंड वाङमय निर्माण झालें आहे, त्याचा सर्व क्षेत्रांतील आणि वर्गांतील अगदीं सामान्यापासून असामान्यापर्यंत सर्वांना प्रत्यक्ष आचरणाला मार्गदर्शक या दृष्टीनें उपयोग होत आहे. वाल्या कोळ्याचा जसा वाल्मीकि ऋषि झाला, तसें या यम–नियमांच्या अखंड व जागरूक पालनानें एकाच जन्मांत 'मोहनदास करमचंद गांधी' हे 'महात्मा' झाले, हा अद्भुत पुरुषार्थ साऱ्या जगानें पाहिला आहे.

गांधीजींचें जीवनकार्य पुढें चालविण्यासाठीं १९४९ सालीं 'गांधी स्मारक निधीची' स्थापना झालेली आहे. त्या निधीच्या उद्दिष्टांत गांधीजींच्या विचाराचा प्रचार देशांतील सर्व भाषांत व देशाबाहेरहि करणें हें

एक उद्दिष्ट आहे. त्याच्या सिद्धीसाठीं निरनिराळ्या भाषिक प्रदेशांकरितां निधीनें वाङ्मय–प्रकाशन–समित्या स्थापन करण्याचा उपक्रम केला आहे. आतांपर्यंत कानडी, तामीळ, मल्याळम् या भाषांच्या प्रदेशांकरितां अशा समित्या स्थापन झाल्या आहेत व त्यांच्यातर्फें क्रमशः खंडरूपानें गांधी–वाङ्मय प्रसिद्ध होत आहे. याचप्रमाणें मराठी भाषिक प्रदेशाकरितांहि निधीनें १९५८ सालच्या जुलै महिन्यांत 'गांधी–वाङ्मय–प्रकाशन–समिति' स्थापन केली. या समितीच्या कामाला रीतसर सुरुवात १९५९ च्या जानेवारी महिन्यापासून झाली आहे.

समितीनें 'गांधी-विचार-दर्शन' या नांवानें गांधीजींचें निवडक वाङ्मय विषयवारीनें वीस ते पंचवीस खंडांत प्रसिद्ध करण्याची योजना तयार केली आहे. या विषयांची जी वर्गवारी करण्यांत आली आहे, त्यांत (१) सत्य आणि सत्याग्रह (२) धर्म (३) जीवनसाधना (४) स्त्री-जीवन इत्यादि विषय येतील. गांधीजींची जीवननिष्ठा व जीवनमूल्यें ज्यांत नमूद झालीं आहेत असे तीन खंड प्रथम प्रसिद्ध करणें हें समितीनें उचित मानलें आहे. यांपैकीं पहिले दोन खंड, गांधीजींनी स्वतःच त्या विषयासंबंधीं लिहिलेल्या कांहीं पुस्तकांच्या अनुवादांचे आहेत. त्यांना गांधीजींच्या 'जीवनमूल्यांची संहिता' म्हणतां येईल. तिसऱ्या खंडांत गांधीजींनीं या जीवनमूल्यांचीं साधना करण्याकरितां स्थापन केलेले आश्रम आणि त्या आश्रमांतील व्रती जीवन यांचा परिचय करून दिला आहे.

हें वाङ्मय महाराष्ट्रांत घरोघर जावें, त्याचें वाचन व अध्ययन व्हावें आणि गांधीजींचां हीं जीवनमूल्यें व निष्ठा महाराष्ट्राच्या जीवनांत उतरावींत अशी आमची इच्छा आहे. म्हणून प्रत्येक खंड सामान्यतः २०० ते २५० पृष्ठांचा होईल याची किंमत २ रुपये ५० न. पै. राहील. महाराष्ट्रीय जनता या उपक्रमाचें सक्रिय स्वागत करील अशी मला आशा आहे.

पुणें, ता. ५ डिसेंबर, १९५९. शंकरराव देव



# गांधीजींची विज्ञापना

माझ्या लिखाणाच्या साक्षेपी अभ्यासकास त्याचप्रमाणें त्यांत रस घेणाऱ्या इतरांनाहि मी सांगूं इच्छितों कीं, सर्व काळीं जगाला मीं एकरूपच दिसलें पाहिजे याची मला मुळींच पर्वा नाहीं. सत्याच्या माझ्या शोधांत मी किती तरी विचारांचा त्याग केला आहे आणि किती तरी नव्या गोष्टी शिकलों आहें. वयानें मी भलें वृद्ध झालों असेन, परंतु माझा आंतरिक विकास कुंठित झाला आहे किंवा देह पडल्यानंतर माझा विकास कुंठित होईल, असें मला वाटत नाहीं. मला एकाच गोष्टीची तळमळ आहे आणि ती गोष्ट म्हणजे प्रतिक्षणीं सत्यनारायणाच्या आदेशाचें अनुसरण करण्याची तत्परता. आणि म्हणून कोणाला माझ्या दोन वचनांत विरोध भासल्यास त्यानें, त्याचा माझ्या शहाणपणावर विश्वास असेल तर, एकाच विषयावरील त्या दोन वचनांपैकीं मागाहूनचें वचन प्रमाण मानावें.

मी ‘ महात्मा ’ म्हटला गेलों म्हणून माझें वचन प्रमाण आहे असें समजून कोणी चालूं नये. ‘ महात्मा ’ कोण हें आपल्याला माहीत नाहीं. म्हणून चांगला मार्ग हा कीं ‘ महात्म्या ’चें वचन देखील बुद्धीच्या कसोटीवर घासून घ्यावें आणि तें कसास न उतरल्यास त्याया त्याग करावा.

जसजसा मी विचार करतों, जसजसा आपल्या गतकाळच्या जीवनावर दृष्टि टाकतों, तसतसें माझें अल्पत्व मला स्वच्छ दिसूं लागतें. मला जें साधावयाचें आहे, ज्याची मला कैक वर्षें आस लागून राहिली आहे, तें म्हणजे आत्मदर्शन होय, ईश्वराचा साक्षात्कार होय, मोक्ष होय. माझी हालचाल सगळी त्याच दृष्टीनें होते. माझें लिहिणें–करणें सर्व याच दृष्टीनें आहे आणि माझें राजकारणाच्या क्षेत्रांत उडी घेणेंहि त्याच्याचकरितां आहे.

माझ्या प्रयोगांत आध्यात्मिक म्हणजे नैतिक समजावें. धर्म म्हणजे नीति. आत्म्याच्या दृष्टीनें आचरलेली नीति तोच धर्म. वैज्ञानिक ज्याप्रमाणें आपले प्रयोग अगदीं नियमांना धरून, विचारपूर्वक आणि

बारकाव्यानें करतो, तथापि त्यांतून निघालेले निष्कर्ष तो शेवटचे म्हणून मांडीत नाहीं, किंवा हे निष्कर्ष त्या प्रयोगांचे बिनचूक असेच निष्कर्ष आहेत याविषयींहि तो, साशंक नाहीं तरी, तटस्थ राहतो, तसाच माझ्या प्रयोगांबाबतहि माझा दावा आहे. मीं खूप आत्मनिरीक्षण केलें आहे, एकूण एक मनोवृत्ति तपासली आहे, तिचें विश्लेषण केलें आहे. पण त्यांतून निघालेले निष्कर्ष हे सर्वांच्याच बाबतींत अंतिम आहेत, ते खरेच आहेत वा तेच खरे आहेत, असा दावा मी केव्हांहि करूं इच्छित नाहीं.

पण एक दावा मात्र मी अवश्य करूं इच्छितों, आणि तो हा कीं, माझ्या दृष्टीनें ते खरे आहेत आणि तूर्त तरी ते मला स्वतःला अंतिम असे वाटतात.

माझ्या मतें, सत्यच सर्वश्रेष्ठ आहे आणि त्यांत असंख्य वस्तूंचा अंतर्भाव होऊन जातो. हें सत्य म्हणजे स्थूल-वाचिक-सत्य नव्हे. तें जसें वाचिक तसें वैचारिक देखील आहे. हें सत्य म्हणजे केवळ आपण कल्पिलेलेंच सत्य नव्हे, तर स्वतंत्र चिरंतन सत्य होय.—म्हणजे परमेश्वरच.

माझ्यासारख्या अनेकांचा भलें क्षय होवो, पण सत्याचा जय होवो. अल्पात्म्याला मापण्यासाठीं सत्याचा गज कधीं आंखूड न होवो.

• • •

# अनुक्रमणिका


| क्र. | विषयाचें नांव | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | जीवन-मूल्यें | ...... | १ |
| २. | आश्रमीय जीवन | ...... | २० |
| ३. | व्रत-विचार | ...... | २७ |
| ४. | व्रत-पालन | ...... | ९८ |
| ५. | आश्रमांचा परिचय | ...... | १०७ |
| ६. | विधायक कार्यक्रम | ...... | १३० |
| ७. | अंतिम साधना | ...... | १६६ |
| ८. | प्रेरक विचार | ... .. | १८१ |
| ९. | संदर्भ-संकेत | ...... | १८९ |
| १०. | संदर्भ-सूचि | ...... | १९१ |


* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २६३०८ वि: निबंध
क्रमांक १२१० नों: दि: २२।३।६०
90238

: १ : जीवन-मूल्यें

## ईश्वर-निष्ठा

माझ्यासभोंवतालची प्रत्येक वस्तु सतत बदलत आहे, नाश पावत आहे; पण त्या सर्व बदलाच्या बुडाशीं एक अविनाशी, सर्वाधार व चैतन्यपूर्ण अशी शक्ति आहे याची मला अस्पष्ट जाणीव आहे. ती शक्ति उत्पत्ति करते, लय करते व पुनः उत्पत्ति करते. ही प्रेरक शक्ति किंवा तत्त्व म्हणजेच परमेश्वर. केवळ इंद्रियांच्या द्वारां ज्यांचें मला आकलन होतें, तें शाश्वत राहूं शकत नाहीं—राहणार नाहीं. म्हणून परमेश्वरच काय तो सत्य आहे.

ही शक्ति दयाळु आहे कीं निर्घृण ? मला तर ती केवळ दयामय वाटते. कारण मला असें दिसून येतें कीं, विनाशामध्यें जीवन टिकून राहतें, असत्यामध्यें सत्य शिल्लक रहातें, अंधारामध्यें प्रकाश कायम राहतो. यावरून मी मानतों कीं, ईश्वर हा चैतन्यमय, सत्यमय, प्रकाशमय आहे. तो प्रेममय आहे; परमकल्याण आहे. १

माझ्या दृष्टीनें ईश्वर म्हणजे सत्य व प्रेम. ईश्वर म्हणजे नीतिशास्त्र व नीतिमत्ता. ईश्वर म्हणजे अभय. ज्ञान व चैतन्य यांचें तो उगमस्थान. तो या सर्वांच्या अतीत व श्रेष्ठ आहे. ईश्वर म्हणजे अंतरात्मा. नास्तिकाची नास्तिकताहि तोच आहे. तो वाचा–बुद्धीला अगोचर आहे. ज्यांना त्याचें सगुण स्वरूप हवें असेल, त्यांना तो सगुण स्वरूपांत दिसतो. ज्यांना त्याचा स्पर्श हवा असेल, त्यांच्या दृष्टीनें तो देहधारी असतो. तो सर्वांचें विशुद्ध सत्त्व आहे. ज्यांची त्यावर श्रद्धा आहे, त्यांना त्याचें अस्तित्व

जाणवतें. तो सर्वांसाठीं सर्व कांहीं आहे. तो आपल्यामध्यें आहे आणि आपल्यापलीकडे आहे–आपल्याहून श्रेष्ठ आहे. तो अत्यंत सहिष्णु आहे. तो दयाशील आहे आणि तरी भयावह आहे. तो अज्ञानाची क्षमा करीत नाहीं, तरी तो आपल्याला पश्चात्तापाची संधि नेहमीं देतो आणि त्या मार्गानें सदैव क्षमा करतो. त्याच्याइतका कट्टा लोकशाहीवादी दुसरा कोणी नसेल ! कारण पाप–पुण्यांतील निवड करण्याचें अनिर्बंध स्वातंत्र्य तो आपल्याला देतो. उलट साऱ्या जगांत दुसरा कोणी नसेल इतका तो कठोर आहे. कैक वेळां तो आपल्या ओठांशीं आलेला पेला, मानवाच्या इच्छा–स्वातंत्र्याच्या नांवाखालीं, भिरकावून देतो. पण मानवाला इतकें अल्प स्वातंत्र्य असतें कीं, त्यामुळें ही त्याची केवळ लीलाच वाटते. म्हणून हिंदुधर्मांत सारी सृष्टि म्हणजे त्याची 'लीला' मानली आहे. २

विद्युत् ही एक सामर्थ्यशाली शक्ति आहे. तिचा लाभ सर्वजण घेऊं शकत नाहींत. कांहीं नियम पाळले तरच वीज निर्माण करतां येते. ती एक अचेतन शक्ति आहे. तिच्या नियमांचें ज्ञान करून घेण्यासाठीं मानवानें खूप परिश्रम केले तर तिच्यापासून त्याला लाभ मिळवितां येईल. त्याचप्रमाणें सचेतन असलेल्या ईश्वरी शक्तीचें ज्ञान आपल्याला होऊं शकेल. त्यासाठीं आपल्या ठायीं वास करणाऱ्या त्या ईश्वराचे नियम आपण जाणले पाहिजेत व अनुसरले पाहिजेत.

ईश्वरावरील जिवंत श्रद्धेनें जीवनांतील पुष्कळ कोडीं उलगडतात. त्या श्रद्धेमुळें आपलें दुःख शमतें. ती श्रद्धा आपल्या जीवनाचा आधार आहे आणि अंतकालाची एकमेव शांति आहे. सत्याचा शोध म्हणजे ईश्वराचा शोध. सत्य म्हणजे ईश्वर. सत्य आहे, म्हणून ईश्वर आहे. ३

'ईश्वरानें माझें रक्षण केलें' असें मी पूर्वीं लौकिक अर्थानें समजलों पण मला पुढें विविध क्षेत्रांत तसेच अनुभव आले. 'ईश्वरानें रक्षण केलें.' या वचनाचा अर्थ आज मी बराच जाणूं लागलों आहें, असें मला वाटतें; पण त्याचा पुरता आशय मला अजून समजलेला नाहीं, ही जाणीवहि मला आहे. अनुभवानेंच तो मला समजेल. राजकारणांत, आध्यात्मिक साधनेंत, वकिली करतांना, संस्था चालवितांना, 'ईश्वरानें माझें रक्षण केलें' असें मी म्हणूं शकतों.

सारी आशा खुंटली आहे, हातपाय गळाले आहेत अशा प्रसंगीं कोठून ना कोठून मदत येऊन पोंचते, असें मीं अनुभविलें आहे. ईश्वराची स्तुति, प्रार्थना, उपासना हीं कांहीं वेडगळ समजूत नाहीं. आपण खातों-पितों, बसतों-उठतों हें जितकें सत्य त्याहून ही गोष्ट अधिक सत्य आहे. किंबहुना, तीच सत्य आहे बाकी सर्व झूट आहे, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं.

अशी उपासना, अशी प्रार्थना हा कांहीं वाणीचा विलास नाहीं. त्याचें मूळ कंठ नव्हे, हृदय होय. म्हणून जर आपण आपलें हृदय निर्मल ठेवूं व त्याच्या तारा सुसंवादी राखूं, तर त्यांतून जे सूर निघतील, ते गगनाला जाऊन भिडतील. त्यासाठीं जिभेची जरूरी नाहीं. प्रार्थना ही स्वभावतःच अद्‌भुत वस्तु आहे. विकाराच्या शुद्धीसाठीं अंतःकरणपूर्वक केलेली प्रार्थना ही दिव्य औषधी आहे, याविषयीं मला शंकाच नाहीं. पण या कृपा-प्रसादासाठीं आपल्या ठायीं संपूर्ण नम्रता असली पाहिजे. ४

ईश्वरावरील माझी श्रद्धा अढळ आहे, असें मी मानतों. 'मनुष्याच्या आयुष्यांत मृत्यु म्हणजे फक्त एक बदल आहे; आणि तो केव्हांहि येवो, तो स्वागतार्हच आहे,' असा माझ्या बुद्धीचा निश्चय कैक वर्षे झालेला आहे. मृत्यूचें—आणि इतर कशाचेंहि-भय माझ्या हृदयांतून काढून टाकण्याचा महाप्रयत्न मीं ज्ञानपूर्वक केलेला आहे. असें असलें तरी फार दिवसांनीं भेटणाऱ्या मित्राचा विचार मनांत येतांच जसें आपलें मन उचंबळून येतें, तसें मृत्यूच्या भेटीचा विचार मनांत येतांच माझें मन उचंबळून आलेलें नाहीं, असे माझ्या आयुष्यांतील कांहीं प्रसंग मला आठवतात. याप्रमाणें, समर्थ बनण्याचे महाप्रयत्न करूनहि माणूस पुष्कळ वेळां दुबळा रहातो; आणि केवळ बुद्धीला झालेलें ज्ञान प्रत्यक्ष अनुभवाच्या प्रसंगीं फारसें उपयोगीं पडत नाहीं. त्यांतहि पुनः मनुष्याला जेव्हां बाहेरचा आधार मिळतो व त्याचा तो स्वीकार करतो, तेव्हां तर तो आपल्या अंतरांतील सामर्थ्य बहुतांशीं गमावून बसतो. अशा भयापासून सत्याग्रहीनें सदैव अलिप्त राहिलें पाहिजे. ५

आपण सर्वजण एकच ईश्वर मानणारे आहोंत. मुसलमान त्याला 'खुदा' म्हणत असतील, हिंदु त्याला 'ईश्वर' म्हणून भजत असतील—

पण तें स्वरूप एकच आहे. त्याला साक्षी ठेवून, त्याला मध्यस्थ मानून आपण प्रतिज्ञा करणें किंवा शपथ घेणें ही कांहीं मामुली गोष्ट नाहीं. अशी शपथ घेतल्यानंतर जर आपण ती मोडली तर आपण समाजाचे, जगाचे आणि ईश्वराचे अपराधी ठरूं. मी तर असें मानतों कीं, जो माणूस शुद्ध बुद्धीनें व जागरूकपणें प्रतिज्ञा करतो आणि नंतर तिचा भंग करतो, तो आपली माणुसकीच गमावतो. पारा चढविलेलें तांब्याचें नाणें म्हणजे कांहीं रुपया नव्हे असें लक्षांत येतांच त्या नाण्याला जशी कांहींच किंमत राहात नाहीं; इतकेंच नव्हे तर, खोटें नाणें ज्याच्यापाशीं असेल तो शिक्षेला पात्र होतो, त्याप्रमाणें खोटी शपथ घेणाराची पण कांहींच किंमत रहात नाहीं; एवढेंच नव्हे तर, तो इहलोक व परलोक या दोन्हीमध्यें शिक्षेला पात्र ठरतो. ६

कवि (रवीन्द्रनाथ टागोर) हे आपल्या काव्यात्म प्रवृत्तीस अनुसरून ‘ उद्यां ’साठीं आपलें जीवन जगत आहेत आणि आपण सर्वांनींहि तसेंच वागावें असें इच्छीत आहेत. भल्या पहाटे, आकाशांत भराऱ्या मारून, परमेश्वराचीं स्तुति-स्तोत्रें गाणाऱ्या पांखरांचें मनोहर चित्र ते आपल्या डोळ्यांपुढें उभें करतात व आपल्याला चकित करतात. त्या पक्ष्यांना (आदले दिवशीं) दिवसभराचें अन्न मिळालेलें असतें, ते ताजेतवाने होऊन उंच भराऱ्या मारीत असतात आणि आदल्या रात्रीं त्यांच्या शरीरांत नवें रक्त खेळूं लागलेलें असतें.

पण ज्यांच्या पंखांत फडफड करण्याचीहि शक्ति उरलेली नाहीं, असे पक्षी मी पाहिले आहेत व त्यामुळें मी दुःखित झालेलों आहें. भारतीय आकाशांतील मानवपक्षी रात्रीं जो विसांवा घ्यायला जातो तो नांवाचाच असतो आणि सकाळीं तो पक्षी उठतो तों रात्रींपेक्षां दुबळा होऊन. भारतांतील करोडो लोकांच्या बाबतींत जीवन म्हणजे सदाची चिंता किंवा सदाची ग्लानि. या अवस्थेचें दुःख वर्णन करणें शक्य नाहीं. हें ‘ जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे. ’

यातना भोगणाऱ्या रोग्याला कबीराचें भजन म्हणून शांत करणें अशक्य असल्याचें मला आढळून आलें आहे. कोट्यवधि भुकेलेल्या लोकांना एकच काव्य पाहिजे असतें–तें म्हणजे जीवनदायी अन्न. तें त्यांना

कोणी देत नाहीं. तें त्यांनींच कमावलें पाहिजे—तें त्यांना निढळाच्या घामानें कमावतां येतें. ७

( देशांत ) तीस कोटी लोक बेकार आहेत. उद्योगधंद्यांच्या अभावीं क्रोडो लोकांचा रोज अधःपात होत आहे. ते स्वाभिमानाला मुकत आहेत-ईश्वरावरील श्रद्धा गमावीत आहेत, हा केवढा अनर्थ आहे याची कल्पना करा. अशा कोटयवधि क्षुधित लोकांच्या डोळयांत तेज नाहीं. अन्न हेंच त्यांना ब्रह्म! त्यांना ईश्वराचें पुराण मीं ऐकविणें म्हणजे पलीकडे बसलेल्या त्या कुत्र्यालाच तें सांगणें होय. उद्योगाच्या पवित्र संदेशाच्या रूपानेंच मी त्यांना ईश्वराचा संदेश देऊं शकेन...ज्यांना दिवसाकांठीं दोन वेळां जेवण मिळत नाहीं, त्यांना ईश्वर दर्शन देऊं शकेल तें भाकरीच्या रूपानेंच. उपाशी व आळशी लोकांना ईश्वराचा साक्षात्कार एकाच मार्गानें करून देतां येईल—श्रम व त्या श्रमांतून मिळणारें अन्न. ८

ईश्वर देतो त्याहून दुसरें कोणतेंहि सामर्थ्य मजजवळ नाहीं. माझ्याकडे पहा तर खरें; पंधरा वर्षांचा मुलगा एका बुक्कीसरशीं मला पाडू शकेल. मी कोणीच नव्हे. पण भीति व अभिलाष यांच्यापासून मी अलिप्त झालों आहें; म्हणून मला ईश्वरी सामर्थ्याची थोडीफार ओळख झाली आहे. साऱ्या जगानें जरी ईश्वराचें अस्तित्व नाकारलें तरी मी तुम्हांला सांगतों, मी ईश्वराचा एकटा एक साक्षीदार राहीन. ईश्वरी सत्ता हा मला निरंतरचा चमत्कार वाटतो. ९

सत्याहून भिन्न असा कोणी परमेश्वर आहे, असा माझा अनुभव नाहीं. सत्यमय होण्यासाठीं अहिंसा हाच एक मार्ग आहे. माझी अहिंसा सच्ची असली तरी कच्ची आहे—अपुरी आहे. मला सत्याचें जें कांहीं अल्पसें दर्शन झालें आहे, तें म्हणजे सत्याच्या फक्त एका किरणाचेंच दर्शन होय. सहस्त्र सूर्य एकवटले, तरी त्यांना सत्याच्या तेजाची सर येणार नाहीं. त्याचें संपूर्ण दर्शन संपूर्ण अहिंसेविना अशक्य आहे; एवढें मी, माझ्या आजपर्यंतच्या प्रयोगानंतर, निश्चित सांगू शकतों.

अशा सर्वव्यापी सत्यनारायणाच्या प्रत्यक्ष दर्शनासाठीं जीवमात्रावर आत्मवत् प्रेम करणें अत्यंत आवश्यक आहे. तसें प्रेम करूं इच्छिणारा माणूस जीवनाच्या एकाहि क्षेत्रापासून अलिप्त राहूं शकत नाहीं. म्हणून

माझ्या सत्याच्या उपासनेनें मला राजकारणांत खेचून आणलें. धर्माचा राजकारणाशीं संबंध नाहीं, असें म्हणणाऱ्या माणसाला धर्माचा अर्थ समजलेला नाहीं, असें म्हणण्यांत मला मुळींच संकोच वाटत नाहीं. मी हें अविनयानें बोलत नाहीं. आत्मशुद्धिविना प्राणिमात्रांशीं ऐक्य साधतां येणार नाहीं व आत्मशुद्धिविना अहिंसाधर्माचें पालन सर्वथा अशक्य आहे.

जो शुद्ध अंतःकरणाचा नसेल, त्याला ईश्वरी साक्षात्कार कदापि होणार नाहीं. आणि आत्मशुद्धीचा अर्थ जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील शुद्धि. शुद्धि ही अत्यंत सांसर्गिक असते. एकाची शुद्धि झाली कीं त्याच्या परिवाराची शुद्धि आपोआपच होते. १०

मी जर अन्यायाशीं झगडलों नाहीं-त्यासाठीं जरूर तर प्राणार्पणाची सिद्धता ठेवली नाहीं तर मला ईश्वराचा साक्षात्कार कधींच होणार नाहीं हें मी जाणतों. माझा स्वतःचा जो कांहीं अल्पस्वल्प व विनम्र अनुभव आहे, त्यामुळें माझी ही जाणीव पक्की झाली आहे. मी जितका जितका शुद्ध होण्याचा प्रयत्न करतों, तितका तितका मी ईश्वराच्या सन्निध गेल्याचा मला अनुभव येतो. आज माझी ईश्वरावरील श्रद्धा वरपांगी आहे. ती जर खरीखुरी बनली आणि हिमालयाप्रमाणें अचल व त्याच्या शिखरावरील बर्फाप्रमाणें धवल व कांतिमान बनली, तर ईश्वराची समीपता मला किती तरी लाभेल! ईश्वरावरील विश्वास श्रद्धेवर आधारलेला असतो आणि ती श्रद्धा तर्कातीत असते. ११

विश्वात्मक व सर्वव्यापी सत्यतत्त्व प्रत्यक्ष जाणण्यासाठीं आपण कनिष्ठांतील कनिष्ठ जीवमात्रावरहि स्वतःइतकेंच प्रेम करण्यास शिकलें पाहिजे. या ध्येयामागें जो मानव लागला, त्याला जीवनाच्या कोणत्याहि क्षेत्रांतून स्वतःस अलिप्त ठेवतां येत नाहीं. याच कारणानें माझ्या सत्यनिष्ठेनें मला राजकीय क्षेत्रांत ओढून नेलें. 'धर्माचा राजकारणाशीं कांहीं संबंध नाहीं' असें जे लोक म्हणतात, त्यांना धर्माचा अर्थच कळत नाहीं, असें मीं पूर्ण निःशंकपणें पण अत्यंत नम्रपणें म्हणू शकतों. १२

माझ्या अंतरात्म्यानें मला कधीं फसविलें नाहीं. तो आतां मला सांगत आहे, "साऱ्या दुनियेविरुद्ध तुला एकट्याला उभें राहावें लागेल—आणि तरीहि तूं तसा उभा रहा. सारी दुनिया रक्तानें लालबुंद झालेल्या

नजरेनें ( क्रोधानें ) तुझ्याकडे पाहील, तरीहि तूं त्या दुनियेकडे (शांतपणें) रोखून पाहिलें पाहिजेस. घाबरूं नकोस. आपल्या अंतर्यामीं वसणाऱ्या त्या सूक्ष्म वस्तूवर विश्वास ठेव. ती वस्तु तुला सांगेल; ' मित्राचा, पत्नीचा, सर्वांचा त्याग कर; आणि ज्यासाठीं आजवर तूं जगलास आणि ज्यासाठीं तुला पुढें मरावें लागेल त्याचा ( सत्याचा ) साक्षी तूं हो. " १३

भारताचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं मीं माझें सारें जीवन पणाला लावलें होतें. आतां त्या स्वातंत्र्याचा जो विध्वंस होत आहे, तो मी उघड्या डोळ्यांनीं कसा बघूं ? मी माझ्या प्रत्येक श्वासागणिक प्रभूची प्रार्थना करीत आहे कीं, या ज्वाला विझविण्याचें सामर्थ्य तरी त्यानें मला द्यावें किंवा मला पृथ्वीवरून घेऊन तरी जावें.

मला सर्व बाजूंनीं ज्वालांनीं घेरलें आहे. अशा प्रसंगीं तर ईश्वरावर श्रद्धा असण्याची अधिकच आवश्यकता आहे. ही आग विझवावयाची शक्ति ईश्वरच मानवांना देऊं शकेल. ईश्वराला माझ्यापासून अजून काम घ्यायचें असेल, तर तो मला जिवंत ठेवील, नाहीं तर तो मला घेऊन जाईल. १४

जेथें पाहावें तेथें आग आहे. ईश्वराची मोठी कृपा होय कीं, तो मला निभावून घेत आहे. मोती जोखण्याचा बारीक कांटा असतो; केसाचा शंभरावा भाग करून त्याचें वजन करायला त्याहूनहि सूक्ष्म कांटा पाहिजे. त्यापेक्षांहि सूक्ष्म कांट्यावर माझ्या सत्य-अहिंसेची परीक्षा चालली आहे. चारी बाजूला खोटेपणा आणि अतिशयोक्ति भरलेली आहे. सत्य शोधून सांपडत नाहीं. अहिंसेच्या नांवावर हिंसा होत आहे. धर्माच्या नांवानें अधर्म होत आहे. पण माझ्या सत्य-अहिंसेची परीक्षा या सगळ्यांच्या मध्येंच होणार आणि म्हणूनच ही परीक्षा द्यायला मी येथें बसलों आहें. १५

खरोखर माझ्या शरीराबरोबर माझ्या लेखांचें दहन केलें जावें. मी जें कांहीं केलें, तें टिकेल; मीं जें लिहिलें वा उच्चारलें, तें नव्हे.

अलीकडे मी असें वारंवार सांगत आलों आहें कीं, आपलीं सर्व धर्मशास्त्रें नष्ट झालीं, तरी ( 'ईशावास्यमिदं' हा ) ईशोपनिषदांतील एक मंत्र हिंदुधर्माचें सार प्रगट करण्यास पुरेसा आहे; पण त्या मंत्राप्रमाणें आचरण करणारा कोणी नसेल, तर तो एक श्लोकहि निरर्थक ठरेल.

तसेंच, सत्य-अहिंसेचीं महान् तत्त्वें आपल्या आचरणांत आणण्यास तुम्हांस माझ्या लेखन-भाषणांचा जितका उपयोग झाला असेल, तितक्याच

प्रमाणांत त्यांचें साफल्य समजावें. माझ्या नांवाला चिकटूं नका; माझ्या तत्त्वांवर निष्ठा ठेवा. त्या तत्त्वांच्या निकषावर तुमची प्रत्येक कृति घासून पहा आणि जी जी समस्या उभी राहील, तिला निर्भयतेनें तोंड द्या. १६

## सत्य

माझ्या देशासाठीं जिचा त्याग मी करणार नाहीं, अशी एकहि वस्तु या पृथ्वीतलावर नाहीं. मात्र याला दोन वस्तूंचा–आणि फक्त दोनच वस्तूंचा–अपवाद आहे. त्या म्हणजे सत्य व अहिंसा. या दोन तत्त्वांचा त्याग मी अखिल जगतासाठींहि करणार नाहीं. कारण माझ्या दृष्टीनें सत्य हाच ईश्वर आहे; आणि त्या सत्याची प्राप्ति करून घेण्यास अहिंसेविना अन्य मार्ग नाहीं. सत्याचा–म्हणजेच ईश्वराचा–त्याग करून हिंदुस्थानची सेवा करण्याची मला इच्छा नाहीं. कारण हें मी जाणून आहे कीं, जो माणूस सत्यावर पाणी सोडतो, तो स्वदेश सोडूं शकेल, आप्तेष्ट सोडूं शकेल. १७

मनुष्य व त्याचीं कृत्यें या दोन स्वतंत्र वस्तु आहेत. चांगल्या कृत्याबद्दल आदर आणि वाईटाबद्दल तिरस्कार अवश्य वाटला पाहिजे. बरीं वा वाईट कृत्यें करणाऱ्या माणसाबद्दल मात्र अनुक्रमें आदर किंवा दया वाटली पाहिजे. ही गोष्ट समजण्यास सोपी आहे. असें असून तिचा अंमल फारच थोडा होत असतो. त्यामुळेंच या जगांत जहर पसरत असतें.

अशा तऱ्हेची अहिंसा हें सत्याच्या शोधाचें मूळच आहे. तें हातीं आलें नाहीं तोंपर्यंत सत्य सांपडणें अशक्य आहे. या गोष्टीचा मला क्षणोक्षणीं अनुभव येत आहे. कृत्याविरुद्ध झगडा केलेला शोभेल, कर्त्याविरुद्ध झगडा करणें म्हणजे स्वतःशींच झगडण्याप्रमाणें आहे. आपण सर्व एकाच कुंचल्यानें रंगविलेलीं चित्रें आहों–एकाच ब्रह्मदेवाचीं प्रजा आहों. कर्त्यांच्या ठिकाणीं अनंत शक्ती सांठविलेल्या आहेत. कर्त्यांचा अनादर-तिरस्कार करावयाचा म्हणजे त्या शक्तीचा अनादर होतो, आणि तसें करण्यानें कर्ता व जग दोघांनाहि नुकसान पोंचतें. १८

दक्षिण आफ्रिकेंत मी जितकीं वर्षें काढिलीं, त्या काळांत मी कधीं कपटानें वागल्याचें मला आठवत नाहीं–नव्हे, याच्यापुढें जाऊन, माझ्या

साऱ्या आयुष्यांत मी कपटाचा उपयोगच मुळीं केलेला नाहीं, येथपर्यंतसुद्धां सांगायला मला मुळींच संकोच वाटत नाहीं. कपटाचा वापर हा नीतीच्या विरुद्ध आहे असें मीं मानतों; इतकेंच नव्हे तर, तो युक्तीलाहि न पटणारा आहे. व्यवहार-दृष्टीनें तो मीं निरंतर त्याज्यच मानलेला आहे. आफ्रिकेंतील हिंदी लोक नीतीच्या बिकट मार्गापासून रेसभरहि चळले असते, तर त्यांच्या चळवळीला धोका उत्पन्न होण्याची भीति होती. वीस फूट उंचीवर बांधलेल्या दोरावर चालणाऱ्या डोंबाऱ्याला एकाग्र दृष्टीनें चालावें लागतें; आणि त्याची नजर जराशी चळली, तरी त्यांचा कपाळमोक्ष होतो-मग तो कोणत्याहि बाजूस पडो. त्या डोंबाऱ्यापेक्षांहि सत्याग्रहीनें अधिक एकाग्रतेनें चालणें अवश्य आहे; असा अनुभव मी आफ्रिकेंतील आठ वर्षांच्या दीर्घकाळांत घेतलेला आहे.

माझ्या तेथील अनुभवावरून मी असेंहि शिकलों कीं, प्रत्येक शुद्ध लढ्याला गणितश्रेणीचा नियम लागू होतो, आणि सत्याग्रहाच्या बाबतींत तर ही गोष्ट मी सिद्धांतच मानतों. गंगा नदी जसजशी पुढें जाते, तसतशा तिला अनेक नद्या येऊन मिळतात आणि त्यामुळें मुखापाशीं तिचा विस्तार इतका होतो कीं, तिचा कोणताच कांठ दिसूं शकत नाहीं; आणि नावेंत बसलेल्या माणसाला विस्ताराच्या बाबतींत नदी व समुद्र यांत कांहींच तफावत आढळून येत नाहीं. त्याचप्रमाणें सत्याग्रहाचा लढा जसजसा पुढें पुढें जातो, तसतशा अनेक प्रवृत्ति त्याला येऊन मिळतात व त्यामुळें त्याच्या सामर्थ्यामध्यें वाढ होत जाते. सत्याग्रहाचा हा परिणाम अनिवार्य आहे असें मी समजतों. कारण सत्याग्रहांत जें किमान असतें तेंच कमाल असतें. त्याचें कारण त्याच्या मूळ तत्त्वांतच समाविष्ट आहे. म्हणून त्या किमानांतून कांहीं कमी करण्यासारखें उरतच नाहीं-त्याच्यापासून मागें हटतांच येत नाहीं. वृद्धि हीच एक त्याची स्वाभाविक क्रिया असते.

दुसरे लढे शुद्ध असले तरींहि त्यांची मागणी प्रथमच मोठी ठेविली जाते. हेतु हा कीं, अखेर ती कमी करतां यावी. म्हणून त्या सर्व लढ्यांना गणितश्रेणीचा नियम निरपवादपणें लागू पडेल कीं नाहीं याची मला शंका आहे. पण सत्याग्रहांत किमान मागणी हीच कमाल मागणी असते. त्यामुळें त्याला गणितश्रेणीचा नियम लागु होतो. गंगा आपल्या

विस्तारासाठीं आपला मार्ग सोडून कोठें जात नाहीं; तसेंच सत्याग्रहीहि आपला असिधारा-मार्ग कधीं सोडीत नाहीं. पण गंगेचा प्रवाह वहातां वहातां तिला जशा उपनद्या आपण होऊन येऊन मिळतात, तसेंच सत्याग्रह-सरितेच्या बाबतींतहि घडतें. १९

माझ्या देशाच्या लोकांना आफ्रिकेंतील माझ्या सत्याग्रही योद्धयांची ओळख करून देतांना मी सांगेन कीं, ' हे माझे योद्धे, ज्यांनीं देशाच्या सेवेप्रीत्यर्थ अनेक वेळां तुरुंगवास पत्करून तुरुंगाला महाल मानलें; हे माझे योद्धे, ज्यांनीं देशाची सेवा करतांना गरिबीचें व्रत घेऊन आपलें सारें जीवन अर्पण करण्याचा निश्चय केला आहे; हे माझे योद्धे, जे देशाच्या सेवेप्रीत्यर्थ वाटेल ती जोखीम पत्करायला तयार आहेत; जरूर पडली तर ते आजाऱ्यांची सेवाशुश्रूषा करूं शकतात, किंवा जरूर पडली तर आपल्या तोंडचा भाकरीचा घास, स्वतः उपाशी राहूनहि, ते दुसऱ्याच्या तोंडांत घालतात. लोकांचें मलमूत्र साफ करतांना रतीभरसुद्धां अंगचोरपणा हे करणार नाहींत, तसेंच, हिंदुस्थानासाठीं तुरुंगांत जायला किंवा फांशीच्या फळीवर चढायला जरासुद्धां कचरणार नाहींत. २० '

आमचा मार्ग सरळ आहे. यावरून आम्ही, डोळे मिटूनहि, जाऊं शकतों. सत्याग्रहाची तर हीच मौज आहे. सत्याग्रहांत असत्य, लबाडी किंवा ठकबाजी यांना स्थान नसतें. आजमित्तीला जगभर असत्य व लबाडी तोऱ्यानें मिरवीत आहेत. ही स्थिति मी मुकाट्यानें पाहूं शकत नाहीं. या कसोटीच्या क्षणीं मी स्वस्थ कसा बसूं शकेन आणि माझ्या ' अंतरींचा दिवा ' मी कसा झाकूं शकेन ? मी तसें केलें तर ईश्वर माझी हजेरी घेईल.

माझा शहाणपणा हा कांहीं असा मोलाचा ठेवा नाहीं कीं, जो मी गमावूं शकत नाहीं. पण माझा प्रामाणिकपणा मात्र तसा ठेवा आहे आणि तो मी मुळींच गमावूं शकत नाहीं. २१

## अहिंसा

माझ्याहून अधिक अर्ज दुसऱ्या कोणी क्वचितच लिहिले असतील, आणि माझ्याहून अधिक दुःसाध्य कार्यें फारच थोड्या लोकांनीं हातीं घेतलीं असतील. मी अशा मूलभूत निर्णयाला आलों आहें कीं, तुम्हांला खरोखर महत्त्वाचीं अशीं कांहीं कार्यें पार पाडावयाचीं असतील, तर तुम्ही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. अनुक्रम २६३०८ वि: निबंध ११ क्रमांक १२१० नों: दि: २२।३।६०

दुसऱ्याच्या केवळ बुद्धीचें समाधान करून भागणार नाहीं तर तुम्हीं त्याचें अंतःकरणहि हलविलें पाहिजे. बुद्धीचें आवाहन डोक्याला असतें, पण दुसऱ्याच्या अंतःकरणांत प्रवेश मिळतो आपण क्लेश भोगल्यानें. आत्मक्लेशानें मानवाच्या आंतरिक ज्ञानाचीं द्वारें उघडलीं जातात. आत्मक्लेश हा मानववंशाचा ताम्रपट आहे-खड्ग नव्हे.

आत्मक्लेशाचा सूर्य उदय पावतांच पाषाणहृदय व गाढ अज्ञान यांचा लोप अवश्य होतो. तें आत्मक्लेश क्रोध-मत्सर-रहित असावेत. २२

आपल्या आयुष्यांत असे कांहीं क्षण येतात कीं, जेव्हां आपल्याला सदसद्विवेकबुद्धीचा सर्वश्रेष्ठ आदेश ऐकावा लागतो. तो आदेश पालन केल्यानें कदाचित् आपल्याला अनेक वेळां दुःखाश्रु ढाळावे लागतात. फार काय, आपल्या मित्रांचा, आपल्या कुटुंबांचा, आपण राहतों त्या राज्याचा, प्राणप्रिय अशा सर्व वस्तूंचा विरह सहन करावा लागतो. पण तो आदेश पाळणें हा आपल्या जीवनाचा धर्म आहे. २३

जे आपल्यावर प्रेम करतात, त्यांच्यावरच आपण प्रेम करणें ही कांहीं अहिंसा नव्हे. जे आपला द्वेष करतात, त्यांच्यावरहि आपण प्रेम केलें, तर ती अहिंसा होईल. प्रेमाचा हा दिव्य नियम आचरणांत आणणें किती कठीण आहे, याची मला कल्पना आहे. पण सर्वच महान् व दिव्य गोष्टी करणें कठीण नसतें काय? द्वेष्टयावर प्रेम करणें महाकर्मकठीण आहे. पण, ईश्वराच्या कृपेनें ही अत्यंत कठीण गोष्टहि आपण करावयाची ठरविलें, तर ती सहज होऊन जाते. २३

अहिंसा धर्म हा केवळ ऋषिमुनीसाठीं नाहीं. सर्वसामान्य लोकांसाठींहि तो आहे. हिंसा हा जसा पशूंचा धर्म तसा अहिंसा हा मानवजातीचा धर्म. पशूमध्यें आत्मा सुप्त असतो आणि त्याला शारीरिक बळाशिवाय दुसरा कायदा माहीत नसतो. उच्च दर्जाचा कायदा आत्म्याचें बळ ओळखणें यांतच मानवाचें मोठेंपण आहे.........हिंसामय परिस्थितींतून अहिंसेचा धर्म ज्या ऋर्षींनीं शोधून काढला, ते न्यूटनपेक्षां अधिक प्रतिभाशाली होते, वेलिंग्टनपेक्षां अधिक शौर्यशाली होते. शस्त्रास्त्रांचा उपयोग त्यांना माहीत होता, पण तीं निरुपयोगीं आहेत हें जाणून त्यांनीं त्रस्त जगताला असा मार्ग दाखविला कीं, मानवाचा उद्धार अहिंसेनें होईल हिंसेनें नव्हे. २४

प्रियजनांना वाऱ्यावर सोडून भय-स्थानापासून पळ काढणें हें माझ्या अहिंसेंत बसत नाहीं. हिंसा कीं भीतीनें पलायन ? या दोहोंत मी हिंसाच पसंत करीन. निसर्ग-दृश्याचा आनंद लुटण्यास आंधळ्या माणसाचें मन मी जसा वळवूं शकणार नाहीं, तसाच भित्र्या माणसाला मी अहिंसेचा उपदेश करूं शकणार नाहीं. अहिंसा ही शौर्याची पराकाष्ठा आहे. हिंसेच्या तालमींत तयार झालेल्या लोकांना अहिंसेचें श्रेष्ठत्व सिद्ध करून दाखविण्यास मला कांहींच अडचण पडत नाहीं, असा माझा स्वतःचा अनुभव आहे. मी कैक वर्षें भित्रा होतों, तेव्हां माझ्या चित्तांत मी हिंसेला थारा दिला होता. पण जेव्हां मी भीरुता टाकून देऊं लागलों, तेव्हांच मी अहिंसेचें मोल समजूं लागलों. २५

मी १९२० सालीं जों होतों, तोच गांधी आजहि आहे. कोणत्याहि मूलभूत सिद्धांताच्या बाबतींत माझ्यामध्यें बदल झालेला नाहीं. त्यावेळीं अहिंसेला मी जितकें महत्त्व देत असें, तितकेंच आतां देत आहें. बदल असलाच तर, मी अहिंसेला पूर्वीपेक्षां अधिक महत्त्व देत आहे.

अहिंसेच्या शस्त्राच्या रूपानें ईश्वरानें मला एक अमूल्य देणगी दिली आहे. मी व माझी अहिंसा या दोघांची कसोटी लागण्याचा हा क्षण आहे. हिंसेच्या ज्वालांनीं सारें जग पेटलें आहे आणि मुक्ततेसाठीं टाहो फोडीत आहे. अशा आणीबाणीच्या वेळीं मी जर ईश्वर–दत्त बुद्धीचा उपयोग केला नाहीं, तर ईश्वर कांहीं मला क्षमा करणार नाहीं. त्या महान् देणगीला मी अपात्र आहें, असाच माझ्याविषयीं निर्वाळा दिला जाईल.

आमची अहिंसा किती अपुरी आहे आणि अहिंसेच्या ध्येयापासून अद्याप आम्ही किती दूर आहों, याची मला जाणीव आहे. परंतु अहिंसेमध्यें अंतिम अपयश किंवा पराभव असें कांहीं नसतें. म्हणून माझी अशी श्रद्धा आहे कीं, आमच्यांत कितीहि उणीवा असल्या तरी आपलें विशाल ध्येय हस्तगत होईल. तसें झालें तर त्याचा अर्थ असा कीं, गेल्या बावीस वर्षांत आपण जी मूक व अखंड साधना केली, तिला यश देऊन आपल्याला सहाय्य करण्याची ईश्वराची इच्छा आहे. २६

खुदा-ई-खिदमदगारांनीं अहिंसाव्रत स्वीकारलें असें मीं केव्हां समजेन ? आपल्या आसपास राहणाऱ्या प्रत्येक माणसाची मैत्री व विश्वास त्यांनीं

संपादन केला पाहिजे. एका माणसालासुद्धां जोंवर तुमची भीति वाटत आहे, तोंपर्यंत तुम्ही खरे खुदा-ई-खिदमदगार नव्हेत. खरा अहिंसक आपल्या वाणींत व वर्तनांत नम्र असतो–त्याच्या नेत्रांतून पावित्र्याची प्रभा पसरते. त्यामुळें एखादा नवखा माणूस, एखादी अबला किंवा एखादें मूलहि सहजप्रवृत्तीनें त्याला मित्र म्हणून ओळखतें. "हा देवमाणूस आहे त्याच्यावर आपण खुशाल विश्वास ठेवावा" अशी त्याची भावना होते. समाजांतील सर्व वर्गांचें सहकार्य अहिंसक सेवक मिळवूं शकतो. अर्थात् हिटलर-मुसोलिनीच्या पाशवी शक्तीचें अमर्याद बळ त्याच्या पाठीशीं नसतें; पण केवळ प्रेमाच्या बळावर लोकांचें सहकार्य त्याला खुशीनें लाभतें.

हें प्रेम–बळ कसें प्राप्त होतें ? केवळ प्रेमपूर्ण व अखंड सेवेनें आणि दृढ ईश्वर–निष्ठेनें. तुमच्या प्रभावामुळें, दारुडे दारूपासून हळू हळू मुक्त होत आहेत, लोक घाणेरड्या संवयी सोडीत आहेत आणि गुन्हेगार गुन्हे करण्याचें टाकीत आहेत आणि 'आपला वाली–आपला मित्र' म्हणून जनता तुमचें सर्वत्र स्वागत करीत आहे असें जेव्हां मला दिसेल, तेव्हां मी समजेन कीं, अहिंसेचें तत्त्व ज्यांच्या अंगीं मुरलें आहे असे हे लोक आहेत. २७

## ब्रह्मचर्य

ज्यानें सत्याचें व्रत घेतलें आहे आणि केवळ सत्याचीच अनन्य उपासना चालविली आहे तो जर आपली बुद्धि अन्य कार्यांत वेंचील, तर त्यानें सत्याशीं प्रतारणा केली असें होईल. सत्याचा पूजक इंद्रियांचा सेवक कसा बनेल ? सत्याच्या साक्षात्कारासाठीं ज्यानें आपल्या सर्व क्रिया समर्पित केल्या आहेत आणि त्यासाठीं निःशेष निःस्वार्थीपणा स्वीकारला आहे, त्याला प्रजोत्पादन व कुटुंब-भरण या स्वार्थी कार्यासाठीं वेळच मिळणार नाहीं. सत्य-शोधन व स्वार्थ–साधन, हे शब्दः परस्पर-विरोधी आहेत.

आतां अहिंसेच्या दृष्टीनें विचार केला तरी अहिंसेची सिद्धि निःशेष निःस्वार्थीपणाशिवाय अशक्य आहे. अहिंसा म्हणजे विश्व-प्रेम. पुरुषानें एका स्त्रीला अथवा स्त्रीनें एका पुरुषाला आपलें प्रेम अर्पण केलें, तर मग जगाला देण्यासाठीं काय उरलें ? त्याचा सरळ अर्थ हा कीं, "आम्ही दोघे

आपापल्यापुरते—इतरांची चिंता देवाला!" पतिव्रता स्त्रीनें पतीसाठीं आपल्या सर्वस्वाचा होम करण्यास सिद्ध असलें पाहिजे आणि एकनिष्ठ पतीनें आपल्या पत्नीसाठीं तसेंच वागलें पाहिजे हें खरें; पण अशीं माणसें विश्व-प्रेमाच्या पायरीपर्यंत पोंचूं शकत नाहींत किंवा समस्त मानवजात ही आपली सगीसोयरी आहे असें मानूं शकत नाहींत. कारण त्यांनीं आपल्या प्रेमाभोंवतीं तटबंदी उभारलेली असते. त्यांचें कुटुंब जितकें मोठें असतें तितके ते विश्व-प्रेमापासून दूर रहातात. म्हणून ज्याला अहिंसा-धर्म पाळावयाचा आहे, त्यानें विवाह करतां कामा नये. २८

स्त्रीला वा पुरुषाला आपल्या आयुष्यांत सर्वांत बिकट प्रयत्न काम-वासना जिंकण्यासाठीं करावा लागतो. ही वासना जिंकल्याशिवाय मानवाला स्वतःवर प्रभुत्व मिळविण्याची आशाच धरतां येत नाहीं. आणि अशा आत्म-राज्याखेरीज स्वराज्य नाहीं कीं रामराज्य नाहीं.

स्वतःवर प्रभुत्व असल्याशिवाय इतर सर्वांवर प्रभुत्व गाजविणें, हें भ्रमाचें व निराशेचें ठरणारें असतें. खेळांतील रंगीत आंबे दिसायला सुंदर असतात, पण आंतून पोकळ व निःसत्त्व असतात; तसेंच तें असतें. काम-वासनेवर ज्यानें विजय मिळविला नाहीं, असा कार्यकर्ता हरिजनांची, खादीची, जातीय ऐक्याची, गोरक्षणाची किंवा ग्राम-पुनर्घटनेची, अशा कोणाचीच खरीखुरी सेवा करण्याची आशा धरूं शकणार नाहीं.

अशीं थोर कार्यें पार पाडण्यासाठीं केवळ बौद्धिक सामुग्री पुरेशी पडत नाहीं त्यासाठीं आध्यात्मिक प्रयत्नाची किंवा आत्म-बलाची आवश्यकता असते.

आत्म-बलाची प्राप्ति केवळ ईश्वरी कृपेनें होते आणि जो काम-वासनेचा अंकित झाला, त्या माणसावर ईश्वर कधीं कृपा करीत नाहीं. २९

ईश्वर-दर्शन साधायचें तर ब्रह्मचर्य अनिवार्य वस्तु आहे, ही गोष्ट त्यावेळींहि माझ्या स्पष्टपणें लक्षांत आली नव्हती. पण समाजसेवेला ब्रह्मचर्याची आवश्यकता आहे हें मला स्पष्ट दिसूं लागलें. मला वाटूं लागलें कीं, अशा तऱ्हेची सेवा माझ्या वांट्याला अधिकाधिक येणार, आणि मी जर भोगविलासांमध्यें, प्रजोत्पत्तीमध्यें, बालसंगोपनामध्यें, गढून राहिलों, तर माझ्याकडून संपूर्ण सेवा घडणार नाहीं. ३०

आहार व उपवास यांचा ब्रह्मचर्याशीं निकट संबंध असला तरीहि ही गोष्ट स्पष्ट आहे कीं, त्याचा मुख्य आधार मनावरच आहे. मलिन मन उपवासानें शुद्ध होत नाहीं. आहाराचा त्याच्यावर कांहीं एक परिणाम होत नाहीं. मनाचा मळ हा विचारानें, ईश्वरचिंतनानें आणि अखेरीला ईश्वर-प्रसादानेंच निघून जातो. पण मनाचा शरीराशीं निकट संबंध आहे, आणि विकारी मन विकारी आहारच शोधीत असतें. विकारी मन अनेक प्रकारचे स्वाद व भोग शोधीत असतें; त्या आहाराचें नियमन करण्याची व निराहाराचीहि आवश्यकता उत्पन्न होते. विकारी मन शरीराला व इंद्रियांना कह्यांत वागविण्याच्या ऐवजीं स्वतःच इंद्रियांच्या व शरीराच्या ताब्यांत जातें. त्यामुळेंहि शरीराला शुद्ध व कमींत कमी विकारी अशा नियमित आहाराची व प्रसंगोपात्त निराहाराचीहि—उपवासाचीहि—जरूर पडते. ३१

पुष्कळांचा ब्रह्मचर्यपालनाचा प्रयत्न निष्फळ होतो. कारण कीं, खाणें-पिणें, ऐकणें-पहाणें इत्यादि बाबतींत ते अब्रह्मचाऱ्याप्रमाणेंच वागूं पाहतात, आणि तरीसुद्धां ब्रह्मचर्याचें पालन व्हावें अशी इच्छा धरतात. असला प्रयत्न म्हणजे ग्रीष्म ऋतुमध्यें शीतकालाचा अनुभव मिळवूं पाहण्याप्रमाणें आहे. संयमी व स्वच्छंदी, भोगी व त्यागी यांच्या एकंदर राहणीमध्येंच भेद असला पाहिजे. साम्य असलें तरी तें फक्त वरवर दिसणारें असेल. दोहोंतील भेद स्पष्टपणें दिसून आलाच पाहिजे.

डोळ्यांचा उपयोग दोघेहि करणार; पण ब्रह्मचारी देवदर्शन करील, भोगी नाटक-तमाशांत दंग राहील. दोघेहि कानांचा उपयोग करणार; पण एक ईश्वर-भजन ऐकेल, तर दुसऱ्याला शृंगारिक पदें गाण्यांत मौज वाटेल. दोघेहि जागरण करतील, पण एकजण जागेपणीं हृदयमंदिरामध्यें विराजमान असणाऱ्या रामाला आळवील, तर दुसऱ्याला नाच-तमाशाच्या दंगलींत झोपेचा विसर पडेल. दोघेहि जेवतील पण एकजण शरीररूपी तीर्थक्षेत्राच्या रक्षणापुरतें देहाला भाडें देईल, तर दुसरा जिभेचें कोड पुरविण्यासाठीं शरीरांत अनेक पदार्थ कोंबून त्याला घाणेरडे करून सोडील. अशा तऱ्हेनें दोघांच्याहि आचारविचारामध्यें हरएक बाबतींत फरक पडणार व तो फरक दिवसेंदिवस वाढत जाणार—कमी होणार नाहीं.

ब्रह्मचर्य म्हणजे कायावाचामनेंकरून सर्व इंद्रियांचा संयम. या संयमा-साठीं त्यागाची आवश्यकता आहे. त्यागाच्या क्षेत्राला सीमा नाहीं; तशी ब्रह्मचर्याच्या महिम्याला नाहीं. ३२

## सेवा

मला पुनर्जन्म नको आहे. पण तो येणारच असेल, तर मला अस्पृश्याचा जन्म मिळावा. तसें झालें म्हणजे त्यांचीं दु:खें, त्यांचे हाल, त्यांचे होणारे अपमान–या सर्वांचा मी अनुभव घेऊं शकेन; आणि मग त्यांच्या शोचनीय स्थितींतून त्यांची व माझी सुटका करण्याचा प्रयत्न मी करीन. म्हणून मी अशी प्रार्थना करतों कीं, मला जर पुनर्जन्म मिळावयाचा असेल तर तो ब्राह्मणाचा नको, क्षत्रियाचा नको, वैश्याचा नको किंवा शूद्राचा नको, तर अतिशूद्राचा असावा. ३३

पूर्णत्वासाठीं प्रयत्न करणें हें आयुष्याचें ध्येय होय. हें पूर्णत्व म्हणजे आत्म–साक्षात्कार. आपल्या दौर्बल्यामुळें किंवा वैगुण्यामुळें आपण आपला आदर्श खालीं आणतां कामा नये. ज्यानें आपलें भवितव्य अहिंसेशीं–प्रेमभावाशीं–निगडित केलें असेल, त्याच्या दैनंदिन जीवनांतील विनाशाचें क्षेत्र संकुचित होत जातें, आणि तितक्या प्रमाणांत प्रेम व चैतन्य वाढत जातें. हिंसेनें–द्वेषभावानें–ज्यांचें जीवन चाललें आहे, त्यांच्या जीवनांतील विनाशाचें क्षेत्र दिवसेंदिवस वाढत जातें, आणि त्या प्रमाणांत द्वेष व मृत्यु हेहि वाढत जातात. ३४

माझा आदर्श असा आहे कीं, पुरुषानें पुरुष राहून स्त्री बनावें आणि स्त्रीनें स्त्री राहून पुरुष बनावें. पुरुषानें स्त्री व्हावयाचें म्हणजे स्त्रीची नम्रता व शिष्टाचार शिकावा आणि स्त्रीनें पुरुष व्हावयाचें म्हणजे स्वत:चा भ्याडपणा सोडून देऊन हिंमतवान व बहादुर बनावें. ३५

आश्रमांत जर आपण आपलें स्वत:चें स्वराज्य प्राप्त केलें, तर सबंध हिंदुस्थानचें स्वराज्य हातीं येईल, म्हणजे सगळे सुतासारखे सरळ होतील. कोणाला कोणाविषयीं वहीम आला नाहीं–अविश्वास वाटला नाहीं; तर स्वराज्य आपल्या तळहातांत आहे. ३६

प्रत्येक मानवी प्राण्याला जगण्याचा हक्क आहे, आणि तसाच चरितार्थाचीं साधनें शोधण्याचा व जरूर तर वस्त्र-घर यांचा लाभ घेण्याचाहि हक्क आहे. पण या साऱ्या कार्यासाठीं आपल्याला अर्थशास्त्रज्ञांची किंवा त्यांच्या सिद्धांतांची मदत घेण्याची गरज नाहीं. ‘ उद्यांची चिंता करूं

नका.' असा आदेश जगांतील बहुतेक सर्व धर्म-ग्रंथांनीं दिलेला आहे. सुप्रतिष्ठित समाजांत माणसाला आपल्या उपजीविकेचें साधन मिळविणें, हीं जीवनांतील अत्यंत सोपी गोष्ट असली पाहिजे-आणि तशी ती असल्याचें आढळतेंहि. खरोखर, एकादा देश सुव्यवस्थित आहे कीं नाहीं याची कसोटी, त्यांत लक्षाधीश किती आहेत, ही नव्हे; तर त्या देशांतील बहुजनसमाजांत उपासमार किती आहे ही होय.

परमेश्वर व पैसा-या दोहोंची पूजा तुम्ही करूं शकत नाहीं, हा आर्थिक सिद्धांत फार महत्त्वाचा आहे. त्या दोहोंतून आपल्याला निवड करावयाची आहे. जडवादाच्या दैत्याच्या टाचेखालीं तुडविलीं जाणारीं पाश्चात्य राष्ट्रें आक्रंदन करीत आहेत. त्यांची नैतिक वाढ खुंटली आहे. ते आपली प्रगति पौंड-शिलिंग-पेन्स यांनीं मोजीत आहेत. अमेरिकेची श्रीमंती हा आमचा मान-दंड झाला आहे. अमेरिकेचा हेवा इतर देश करतात. आमचे पुष्कळ देशबांधव असें म्हणतांना मीं पाहिले आहेत कीं, आम्ही अमेरिकेसारखी दौलत मिळवूं; पण तिचीं साधनें न वापरतां. असा प्रयत्न, यदाकदाचित् कोणी केला तर-तो फसेलच, हें सांगण्याचें धाडस मी करतों. विवेकी, शांत व क्रुद्ध-अशा तिन्ही भूमिका आपण एकाच वेळीं घेऊं शकत नाहीं. माझी अशी इच्छा आहे कीं, आमच्या पुढाऱ्यांनीं आम्हांला, आम्ही साऱ्या जगांत नैतिक दृष्टया सर्वश्रेष्ठ कसे होऊं, हें शिकवावें. ३७

## साधन-शुचिता

साधनें हीं मला साध्याइतकींच महत्त्वाचीं वाटतात-किंबहुना, एका दृष्टीनें, अधिक महत्त्वाचीं वाटतात. कारण, आपली थोडीफार सत्ता त्यांच्यावरच चालते. ती जर आपण सोडली, तर साध्यावर आपली सत्ता अजीबात चालणार नाहीं. ३८

साधनांची काळजी आपण घेतली, तर साध्याची प्राप्ति हमखास होईल. साध्याच्या दिशेनें आपली जी प्रगति होते, ती साधनांच्या शुचितेच्या प्रमाणांतच. ३९

साध्य व साधन यांचा कांहीं संबंध नाहीं, ही समजूत अत्यंत चुकीची आहे. या चुकीमुळें, जे लोक धर्म-परायण मानले जातात, त्यांनीं घोर

कर्मे केलीं आहेत. विषारी झाडाझुडपांपासून गुलाबाच्या फुलाची इच्छा बाळगण्यासारखें हें आहे. मला जर समुद्र तरून जावयाचें असेल तर जहाजांतूनच मी गेलें पाहिजे. त्यासाठीं मी जर बैलगाडी पाण्यांत घातली, तर गाडी आणि मी–दोघेहि तळाला जाऊं. 'जसा देव, तशी पूजा' हें फार विचार करण्यासारखें वाक्य आहे. त्याचा चुकीचा अर्थ करून लोक भलत्या मार्गाला लागले आहेत. साधन हें बीज आहे आणि साध्य हें झाड आहे. वृक्ष व बीज यांचा जितका अभेद्य संबंध आहे, तितकाच साध्य–साधनांचाहि आहे. दैत्याला शरण जाऊन देव–भक्तीचें पुण्य जोडावें असें मीं म्हटलें, तर तें कसें साधेल ? 'मला ईश्वराची भक्ति करावयाची आहे, मग ती मीं आसुरी मार्गांनीं केली म्हणून काय बिघडलें ? ' असें जर कोणी म्हणेल, तर त्याचें तें म्हणणें अज्ञानाचें आणि मूर्खपणाचें मानलें जाईल. 'पेरावें तसें उगवावें'. हा सृष्टीचा क्रमच आहे. ४०

## नम्रता

माझ्या बाबतींत जें शक्य आहे; तें एखाद्या बालकाच्या बाबतींतहि शक्य आहे. हा माझा विश्वास उत्तरोत्तर वाढतच आला आहे. आणि तसें वाटण्यास माझ्यापाशीं सबळ कारणेंहि आहेत. सत्याच्या शोधाचीं साधनें जितकीं कठीण, तितकींच सोपींहि आहेत. तीं एखाद्या अभिमानी इसमाला अशक्यशीं वाटतील आणि एकाद्या निष्पाप बालकाला अगदीं सुकर वाटतील. सत्याच्या शोधकाला रज:कणापेक्षांहि तुच्छ बनावें लागतें. सर्व जग रज:कणाला चिरडीत असतें; परंतु रज:कणसुद्धां त्याला चिरडूं शकेल इतका नम्र सत्याचा पुजारी बनला पाहिजे. तसा तो बनेपर्यंत त्याला निरपेक्ष सत्याचें किंचिन्मात्र दर्शनहि दुर्लभ आहे. ४१

व्यक्ति व समष्टि यांच्यामध्यें इतका निकट संबंध आहे कीं, एका व्यक्तीची शुद्धि ही अनेकांच्या शुद्धीस कारण होते. आणि व्यक्तिगत प्रयत्न करण्याची शक्ति तर सत्यनारायणानें सर्वांनाच जन्मापासून दिलेली आहे. हा शुद्धीचा मार्ग घोर आहे, हें माझ्या क्षणोक्षणीं अनुभवास येत आहे. शुद्ध होणें म्हणजे कायावाचामनानें निर्विकार होणें–रागद्वेषरहित होणें. या निर्विकारतेप्रत पोंचण्याचा मी प्रतिक्षणीं प्रयत्न करीत असूनहि मी तिच्यापर्यंत पोंचलेलों नाहीं. त्या प्रयत्नामुळें लोकांनीं केलेली स्तुति मला फसवूं शकत नाहीं; ती स्तुति कित्येक वेळां तर मला अतिशय सलते.

शस्त्रयुद्धानें सारें जग जिकण्यापेक्षां मनाचे विकार जिकणें मला अधिक कठिण वाटतें. हिंदुस्थानांत आल्यानंतरसुद्धां माझ्यामध्यें दडून राहिलेले विकार माझ्या उघडकीस आले आहेत. याची मला शरम वाटत आहे, पण मी प्रयत्न मात्र सोडीत नाहीं.

सत्याचे प्रयोग करतांना मला आनंदाचे घुटके मिळाले आहेत—आजहि मिळत आहेत, पण मला माहीत आहे कीं, मला अजून घोर मार्ग कापावयाचा आहे. त्यासाठीं मला शून्यवत् बनलें पाहिजे. मनुष्य जोंपर्यंत आपण होऊन स्वत:ला सर्वांच्या शेवटीं नेऊन बसवीत नाहां, तोंपर्यंत त्याला सुटका नाहीं. अहिंसा ही नम्रतेची पराकाष्ठा होय; आणि या नम्रतेविना मुक्ति कधींच शक्य नाहीं, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. ४२

• • •

## : २ : आश्रमीय जीवन

*" आश्रम ही माझीच मूर्ति आहे. "* १

ईश्वराचा साक्षात्कार करून घेणें हें गांधीजींनीं आपलें ध्येय ठरविलें होतें. त्यासाठीं सत्य-अहिंसेच्या मार्गानें ते जन्मभर जनसेवा करीत राहिले. ती त्यांची परमार्थ-साधनाच होती. आफ्रिकेंत असोत वा हिंदुस्थानांत असोत, मजुरांचें दुःख निवारण्याचें कार्य असो कीं शेतकऱ्यांवरील जुलूम नष्ट करण्याचें कार्य असो, सर्व कामें ते धार्मिक बुद्धीनें, आध्यात्मिक दृष्टीनें, पार पाडीत. 'ज्या ज्या संस्थांना मी स्पर्श करतों, त्या आश्रमाचें रूप धारण करतात.' असें त्यांनीं स्वतःच म्हटलें आहे. त्या आश्रमाची व्याख्या त्यांनींच ' सामुदायिक धार्मिक जीवन ' अशी केली आहे; आणि ' असा आश्रम माझ्या स्वभावांत प्रथमपासून होता. ' अशी ग्वाहीहि दिली आहे.

गांधीजींनीं आपल्या सार्वजनिक जीवनाच्या जवळ जवळ प्रारंभापासून ते अखेरपर्यंत पांच आश्रम स्थापिले व चालविले. दक्षिण आफ्रिकेंतील फिनिक्स वसाहत व टॉलस्टॉय फार्म आणि हिंदुस्थानांतील कोचरब सत्याग्रहाश्रम, साबरमती सत्याग्रहाश्रम व सेवाग्राम सत्याग्रहाश्रम—या पांच आश्रमांचें बाह्य स्वरूप कसें होतें व त्यांच्या नियमांचें आंतर रूप कसें होतें—आणि त्यांच्या पालनांत अडचणी कोणत्या आल्या व त्या कशा निवारल्या गेल्या—यांचें संक्षिप्त वर्णन त्यांच्या शब्दांत पुढें दिलें आहे.

" आश्रम ' याचा शब्दशः अर्थ ' निवास. ' पण त्या शब्दाला आतां पुढील कल्पना चिकटलेल्या आहेतः—आश्रम साधा असला पाहिजे. तो केवळ ' शिकण्याची शाळा ' असतां कामा नये. आजन्म ब्रह्मचर्याचें व्रत घेतलेले

लोक आश्रमांत बहुसंख्य असले पाहिजेत. संन्यस्त वृत्तीनें आश्रम चालला पाहिजे. स्वेच्छेनें गरिबी पतकरणारी ती संस्था बनली पाहिजे. तिच्या प्रत्येक कार्यांत पूर्ण साधेपणा असला पाहिजे. आत्म-दर्शनासाठीं चारित्र्य–संवर्धन हाच एक आश्रमाचा उद्देश असला पाहिजे. आश्रमांतील सर्व स्त्री–पुरुषांनीं शरीर–श्रम केले पाहिजेत अशी अपेक्षा आहे. त्या सर्वांमध्यें समानता नांदत असली पाहिजे. उच्चनीचत्वाच्या भावनेला तेथें थारा नाहीं. आश्रमाचा प्रमुख हा पित्यासारखा असला पाहिजे. त्यानें सर्व आश्रमवासियांना आपलीं मुलें मानलें पाहिजे. २

आश्रम केवळ आपल्या देशाच्या सेवेसाठींच नाहीं, तर मानवजातीची सेवा व त्या सेवेच्या द्वारां आत्म-साक्षात्कार करून घेणें यासाठीं आहे. ३

आश्रम हा शांति, शुचिता व शक्ति यांचें धाम बनावा, यासाठीं मी तळमळत आहें. ४

ज्यानें आपल्या आईबापाशीं किंवा आप्तेष्टांशीं असलेले सर्व आर्थिक व भौतिक संबंध तोडून टाकले आहेत, ज्याला अन्नवस्त्राशिवाय दुसरी कसलीच गरज नाहीं आणि जो अहिंसादि अकरा व्रतांचें पालन सदैव करतो, तोच खरा आश्रमवासी म्हणतां येईल. ५

'आश्रम' या शब्दाचा अर्थ येथें "सामुदायिक धार्मिक जीवन" असा आहे. मी आजच्या नजरेनें मागील गोष्टी पाहूं लागलों, म्हणजे मला असें वाटतें कीं, अशा तऱ्हेचा आश्रम माझ्या स्वभावांतच होता. जेव्हां मी माझें स्वतंत्र घर थाटलें तेव्हांपासूनच, वरील व्याख्येंतील 'सामुदायिक' व 'धार्मिक' या दोन्ही अटींप्रमाणें तें 'आश्रम' बनलें. कारण, गृहस्थाश्रम भोगासाठीं नव्हे, तर धर्मासाठीं निर्माण केलेला आहे, असें म्हटलें जातें. शिवाय, माझ्या घरीं माझ्या कुटुंबियांशिवाय कोणीं ना कोणी मित्र येतच असत. ते धार्मिक संबंधांमुळें येत–किंवा आल्यानंतर त्यांच्याशीं धार्मिक संबंध जोडण्याची मी कोशीस करी. असा क्रम नकळत १९०८ सालापर्यंत चालू होता.

## फिनिक्स वसाहत

१९०४ सालीं मी रस्किनचें "सर्वोदय" हें पुस्तक वाचलें आणि त्याचा परिणाम मजवर विजेसारखा झाला. 'इंडियन ओपिनियन' या वृत्तपत्राचा

कारखाना जंगलांत नेऊन तेथें मजुरांबरोबर एकत्रित व कुटुंबासारखें जीवन घालवावें असा निश्चय मीं केला. १०० एकर जमीन घेऊन तीवर आश्रम ( फिनिक्स वसाहत ) वसविला. त्यावेळीं आमच्या या संस्थेच्या अंतर्बाह्य स्वरूपाकडे ' आश्रम ' म्हणून पहाण्यास मी शिकलों नव्हतों.

धर्म हें त्या संस्थेचें अवश्य अंग होतेंच, पण अंतर्बाह्य स्वच्छता आर्थिक समानता इत्यादि तिचे दृश्य हेतुहि होते. त्यावेळीं ब्रह्मचर्याची जरूरी मी मानली नव्हती–मला कळलीहि नव्हती; एवढेंच नव्हे तर याच्या उलट अशी समजूत होती कीं, सर्व सहकाऱ्यांनीं गृहस्थाश्रमी जीवन स्वीकारावें व प्रजा-वृद्धि करावी.

हें आमचें पहिलें पाऊल समजूं या.

दुसरें पाऊल १९०६ मध्यें उचलेलें गेलें असें म्हणतां येईल. सेवामय जीवन घालविण्यासाठीं ब्रह्मचर्याची जरूरी आहे, असें अनुभवानें सिद्ध झालें. तेव्हांपासून मी फिनिक्सला धार्मिक संस्थेच्या स्वरूपांत बुद्धया पाहूं लागलों; आणि माझ्या मनांत त्या वसाहतीचा धार्मिक सांचा तयार होऊं लागला. याच वर्षीं राजकीय सत्याग्रहाची सुरुवात झाली. त्याचा पाया अर्थात् धर्म हाच होता. त्या सत्याग्रहाचा आधार म्हणजे सत्य–स्वरूप परमात्म्यावर अचल श्रद्धा. येथें धर्माचा अर्थ संकुचित घ्यावयाचा नाहीं. धर्माचा अर्थ असा आहे कीं, भिन्न भिन्न नांवांनीं ओळखल्या जाणाऱ्या साऱ्या धर्मांना एकमेकांशीं जोडणारा व त्यांच्यांतील ऐक्य पाहणारा तो परम धर्म.

१९११ पर्यंत अशा प्रकारें काम चाललें. या काळांत, फिनिक्स वसाहतीची प्रगति, आश्रमाचें रूप न घेतां, आश्रमाच्या दिशेनें चालू होती.

## टॉलस्टॉय फार्म

१९११ मध्यें तिसरें पाऊल टाकलें गेलें तोंपर्यंत, छापखान्याच्या कामांत जे लोक होते, तेवढेच फिनिक्समध्यें कायमचे राहात असत. परंतु यावेळीं सत्याग्रहाच्या कामासाठीं अशा आश्रमाची जरूरी भासूं लागली कीं, जेथें सत्याग्रही कुटुंबें राहूं शकतील आणि धार्मिक जीवन घालवूं शकतील.

यावेळीं मी जर्मन मित्र कॅलनबॅक यांच्या सहवासांत आलों होतों. आम्ही दोघे एक प्रकारचें आश्रमीय जीवन व्यतीत करीत होतों. मी वकिली करीत होतों आणि कॅलनबॅक आपला स्थापत्याचा व्यवसाय करीत हो ते

तरीसुद्धां आम्ही एका दूर व विरळ वस्तींत जीवन जगत होतों आणि आमचें मन धर्मामध्यें गुंतून ठेवीत होतों. अज्ञानानें आमच्या हातून पुष्कळ चुका झाल्या असतील, पण पण प्रत्येक कार्याचें मूळ धर्मामध्यें शोधण्याचा आम्ही प्रयत्न करीत असूं.

नंतर त्या वसाहतींत सत्याग्रही कुटुंबांची गर्दी होऊं लागली. तेव्हां सर्वांना एकत्र ठेवण्याची जरूरी भासूं लागली. म्हणून कॅलनबॅकनीं ११०० एकर जमीन विकत घेतली. तेथें ( टॉलस्टॉय फार्मवर ) सत्याग्रही कुटुंबें राहूं लागलीं. तेथें पदोपदीं धार्मिक प्रश्न उभे राहिले आणि सारी संस्थाच धार्मिक दृष्टीनें चालविली जाऊं लागली. तिच्यामध्यें हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती व पारशी रहात होते. पण म्हणून कधीं झगडा किंवा त्रास झाला, असें घडल्याचें मला आठवत नाहीं. याचा अर्थ तेथें रहाणारे लोक आपल्या धर्माच्या बाबतींत शिथिल होते असा नाहीं. आम्ही एकमेकांच्या धर्माचा आदर राखीत असूं आणि आपापल्या धर्मानुसार वागण्याची व आत्म-विकास साधण्याची प्रेरणा एकमेकांना देत असूं.

तथापि या संस्थेला आम्ही ' सत्याग्रह-आश्रम ' म्हणून ओळखीत नव्हतों. तिचें नांव ' टॉलस्टॉय फार्म ' ठेवलेलें होतें. कॅलनबॅक व मी टॉलस्टॉयचे भक्त होतों आणि त्यांचे बहुतेक विचार अंमलांत आणण्याचा प्रयत्न आम्ही करीत असूं.

## साबरमती सत्याग्रहाश्रम

१९१४ मध्यें लढा संपला व मी जुलै महिन्यांत दक्षिण आफ्रिका सोडली. हिंदुस्थानला जाण्याची ज्या ज्या लोकांना इच्छा होती, त्या बहुतेक सर्वांनीं हिंदुस्थानला जाण्याचें ठरविलें. मला विलायतेला जाऊन गोखले यांना भेटावयाचें होतें, हिंदुस्थानांत स्वतंत्र संस्था स्थापून सर्वांना एकत्र ठेवावयाचें होतें आणि दक्षिण आफ्रिकेंत मीं ज्या सांघिक जीवनाला आरंभ केला होता, तें तेथें चालू करावयाचें होतें. म्हणून, आश्रमाच्या नांवाशिवाय आश्रम स्थापन करण्याचा निश्चय करून मी १९१४ च्या अखेरीस हिंदुस्थानास येऊन पोंचलों.

तेथील संस्थेचें नांव ' सत्याग्रह–आश्रम ' असें ठेवलें. संस्थेचा माझा उद्देश ध्यानांत घेतां हें नांव ठीक होतें असें वाटतें. मीं माझें आयुष्य

सत्याच्या शोधाला अर्पण केलेलें आहे. सत्याच्या शोधासाठींच जगण्याचा आणि जरूर तर मरण्याचाहि माझा आग्रह आहे.

अहमदाबादजवळ कोचरब येथें ता. २२ मे १९१५ रोजीं भाड्याच्या जागेंत हा आश्रम उघडला. जेव्हां आश्रम सुरू झाला, तेव्हां जवळ जवळ २० माणसें त्यांत होतीं व त्यांतील बहुतेक दक्षिण आफ्रिकेंतून आलेलीं होतीं. आश्रमांतील लहानमोठ्या सर्व माणसांना संस्कृत, हिंदी व तामिळ शिकविणें हेंच त्या वेळीं मुख्य काम होतें. दुसरें सर्वसामान्य शिक्षण मुलांना दिलें जाई. हातमाग हा मुख्य उद्योग होता व त्याबरोबरच सुतारीचें कामहि चाले. नोकर ठेवावयाचे नाहींत असा कटाक्ष होता. त्यामुळें स्वयंपाक करणें, सफाई करणें, पाणी भरणें वगैरे सारीं कामें आश्रमवासीच करीत. ६

प्रातःकाळीं ४-१५ ते ४-४५ वाजतां आश्रमांतील सामूहिक (व्यक्तिगत नव्हे) कार्यक्रम दररोज सामुदायिक प्रार्थनेनें सुरू होतो व सायंकाळीं ७ ते ७-३० पर्यंत होणाऱ्या सायंप्रार्थनेनें समाप्त होतो. सर्व आश्रमवासियांनीं प्रार्थनेस उपस्थित असावें अशी अपेक्षा आहे. या प्रार्थनेचा उद्देश आत्म-शुद्धीचें साधन मिळावें व ईश्वराला सर्वस्वार्पण करावें हा आहे. ७

भंगीकाम हें एक आवश्यक व पवित्र असें कार्य आहे. तथापि समाजांत तें तुच्छ लेखिलें गेलें आहे. परिणामीं, सामान्यतः तिकडे लक्ष दिलें जात नाहीं. त्यांत पुष्कळच सुधारणा करण्याला वाव आहे. म्हणून आश्रमानें या कामासाठीं बाहेरचा भंगी न लावण्यावर कटाक्ष ठेवला आहे. आश्रमांतील सदस्यच आळीपाळीनें सफाईचें सारें काम पार पाडतात. आश्रमांत नव्यानेंच येणाऱ्या सभासदांना सामान्यतः हेंच काम प्रथम दिलें जातें. आश्रमांत नऊ इंच खोलीचें चर खणलेले आहेत. त्यामध्यें मळ पुरला जातो व त्याच्यावर माती टाकली जाते. त्यामुळें बहुमोल खत तयार होतें. राखून ठेवलेल्या जागींच शौचविधि केले जातात. रस्ते व वाटा थुंकीनें वा इतर घाणीनें खराब होणार नाहींत अशी दक्षता घेतली जाते." ८

प्रार्थनेच्या वेळीं बापूजी मध्यभागीं बसत. एकीकडे स्त्रिया-मुलें व दुसरीकडे आणि समोर पुरुष बसत. सर्वजण ताठ-निश्चल बसत. कोणी पेंगतांना आढळला, तर बापूजी तत्काळ त्याला उभे रहावयास सांगत.

प्रातःकालीं ४-२० प्रार्थना, सकाळीं ६ ते ७ न्याहारी, ११ वाजतां जेवण व संध्याकाळीं ५ वाजतां जेवण, ७ वाजतां सायंप्रार्थना व रात्रीं ९ वाजतां झोंप–असा तेथील दिनक्रम असे.

आश्रमांत नोकर नसत. त्यामुळें झाडलोट करणें, कपडे धुणें, अन्न शिजविणें, भांडीं घासणें, भाजी चिरणें–इत्यादि सारीं कामें आश्रमवासियांसच करावीं लागत. सूत–कताई प्रत्येकाला करावीच लागे. सायंप्रार्थनेनंतर सूत–कताईची नोंद घेतली जाई. गांधीजी कधीं प्रवचन करीत, कधीं आश्रमीयांच्या प्रश्नांचीं उत्तरें देत, तर कधीं तुलसीरामायण वाचीत.

पिंजण, विणाई, सुतारी, लोहारी, चांभारकाम–इत्यादि धंदे तेथें शिकविले जात. सहजमृत जनावरांचेंच कातडें चर्मालयांत वापरलें जाई; कारण त्यांत अहिंसा होती. आश्रमाची गोशाळा व शेती होती. एक कारखानाहि होता. आश्रमांत मुलांची एक शाळा चालू होती. स्त्रियांच्याहि शिक्षणाची पुरेशी सोय तेथें केलेली होती. स्त्रियांचे वर्ग बापूजी स्वतः घेत. स्त्रियांना संगीत शिकविण्यासाठीं एक पंडितजी होते.

आश्रमाची व्यवस्था पहाण्यासाठीं एक छोटेसें ‘ कारभारी मंडळ ’ असें. तें आश्रमाचे नियम तयार करी. प्रत्येक स्त्रीपुरुष आश्रमवासियाला त्या व्यवस्थेंत मताचा अधिकार असे. आश्रमाच्या नियमांत जेव्हां बदल करावयाचा असेल, तेव्हां आश्रमवासियांचा अभिप्राय समजावून घेतला जाई.

स्वयंपाकगृह सामुदायिक असे. ज्या कुटुंबांना स्वतंत्र स्वयंपाक हवा असेल, त्यांना तो करण्यास मुभा असे. बापूजींचा रसोडा स्वतंत्र होता. ‘ बा ’ च्या गृह–कृत्यांत बापूजी नेहमीं मदत करीत. ते रहात त्या झोपडीला ‘ हृदय–कुंज ’ असें नांव होतें. सामुदायिक रसोड्यांतील अन्न व वैयक्तिक स्वयंपाकघरांतील अन्न–यामध्यें कांहींहि फरक असूं नये अशी दक्षता ते घेत.

आश्रमांतील अन्न म्हणजे मसालाविरहित उकडलेल्या भाज्या, चपात्या, भात, डाळ, दूध, ताक, तूप ( किंवा तेल ) व गूळ. ज्यांना जरूर असेल, त्यांना फळें देत. बहुतेक साऱ्या भाज्या आश्रमाच्या शेतींतच होत. ९

जातपातीचा भेद मुळींच पाळला जात नव्हता. अस्पृश्यतेला आश्रमांत बिलकुल स्थान नव्हतें, एवढेंच नव्हे तर, हिंदु समाजांतून अस्पृश्यतेचें

उच्चाटन करण्याच्या कामाला आश्रमाच्या कार्यक्रमांत महत्त्वाचें स्थान दिलें गेलें होतें.

अस्पृश्यता-निवारणाप्रमाणेंच हिंदु समाजांतील स्त्रियांचीं किती तरी बंधनें तोडण्यावर आश्रमानें प्रथमपासून भर दिला आहे. म्हणून आश्रमांत स्त्रियांना संपूर्ण स्वतंत्रता दिलेली आहे. त्याचप्रमाणें हिंदु-मुसलमान वगैरे भिन्न भिन्न धर्मांच्या लोकांमध्यें, स्वधर्मियांशीं जितका भ्रातृभाव असूं शकतो, तितका आश्रमांत ठेवण्याचा नियम केला गेला.

प्रारंभापासूनच दोन सिद्धान्तांना अनुसरून आश्रमाचें कार्य चालू आहे. (१) अंथरूण पाहून पाय पसरावें-म्हणजे आश्रमाला मित्राकडून जितकी आर्थिक मदत सहज मिळेल, तेवढ्यांतच गुजारा करणें. (२) नव्या कार्याच्या मागें धांवत न जाणें, परंतु जें योग्य असें काम आपोआप येऊन पडेल, तें संकोच न करतां व जरूर तर जोखीम पतकरूनहि हातांत घेणें.

या दोन्ही सिद्धान्तांच्या बुडाशीं केवळ धार्मिक वृत्ति आहे. धार्मिक वृत्ति याचा अर्थ ईश्वरावर श्रद्धा. स्वत: ईश्वर कांहीं करतो, असें तर आम्ही पहात नाहीं कीं मानीत नाहीं. पण तो माणसाला प्रेरणा देऊन त्याच्याद्वारां आपलें काम करतो. १०

सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्वाद, अस्तेय, अपरिग्रह वगैरें व्रतें सर्व आश्रमवासियांना बंधनकारक होतीं.

• • •

## : ३ : व्रत–विचार

*माझें सारें जीवनच व्रतांवर आधारलेलें आहे. १*

**अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह ।**
**शरीर-श्रम अस्वाद सर्वत्र भय-वर्जन ॥**
**सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना ।**
**हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें ॥ २**

### व्रतांची आवश्यकता

असा एक पक्ष आहे, आणि तो प्रबळहि आहे, कीं जो म्हणतो : "अमुक नियमांचें पालन करणें उचित आहे हें म्हणणें ठीक, पण त्याबद्दल व्रत घेण्याची आवश्यकता नाहीं; एवढेंच नव्हे तर त्यामध्यें मनाची दुर्बलताच दिसून येते, व तसें करणें हानिकारकहि होण्याचा संभव आहे. शिवाय एकदां व्रत घेतल्यानंतर तो नियम जाचक होण्याचाहि संभव असतो; किंवा तो पापरूपहि वाटूं लागेल. असें असतांहि त्याला चिकटून रहाणें हें तर असह्य होय."

मला या युक्तिवादांत कांहीं तथ्य दिसत नाहीं. व्रत म्हणजे अढळ निश्चय. अडचणी ओलांडून जाण्यासाठीं तर व्रतांची जरूर असते. अडचणी सहन करील पण डळमळणार नाही, तोच अढळ निश्चय म्हणावयाचा. अशा निश्चयाखेरीज मनुष्य उत्तरोत्तर उन्नति साधूंच शकत नाहीं, असा सर्व जगाचा अनुभव साक्ष देत आहें. जें पापरूप असेल, त्यासंबंधींच्या निश्चयाला व्रत म्हणतांच येणार नाही.

जो सर्वमान्य धर्म समजला जात आहे पण ज्याच्या आचरणाची आपल्याला संवय पडलेली नाहीं, त्याविषयींच व्रत घ्यावयाचें असतें. वरील

उदाहरणांत आपल्याला जें पाप वाटतें; तो केवळ भ्रम असेल. सत्य बोलल्यानें कोणाला हानि पोचली तर ?-असला विचार सत्यवादी करीत बसणारच नाहीं. सत्यापासून या जगांत कोणाची हानि झालेली नाहीं, कधींकाळीं व्हावयाची नाहीं, असा स्वतःच्या मनाशीं विश्वास धरावा. देह जावो अथवा राहो, धर्म हा आपल्याला पाळावयाचाच आहे, अशा तऱ्हेचा उदात्त निश्चय करणारांनाच कधींकाळीं ईश्वराचा साक्षात्कार होऊं शकेल. व्रत घेणें हें दुर्बलतेचें चिन्ह नव्हें तर खंबीरपणाचें द्योतक आहे. अमुक एक गोष्ट करणें उचित आहे, मग ती कांहीं झालें तरी करावयाचीच याचें नांव व्रत. यांत सामर्थ्य आहे. मग त्याला व्रत न म्हणतां दुसरें कसलें नांव द्यायचें असेल तर त्याला हरकत नाहीं. पण 'शक्य तोंवर करीन' म्हणणारा स्वतःच्या दुर्बलतेचें किंवा अभिमानाचेंच प्रदर्शन करीत असतो. 'शक्य तोंपर्यंत' हें वचन शुभ निश्चयांमध्यें विषवत् आहे, असें मी तरी, माझ्या स्वतःच्या जीवनामध्यें व इतरांच्याहि अनेकजणांच्या जीवनांमध्यें, पाहिलें आहे. शक्य तोंवर सत्य पाळणारांची हुंडी ईश्वराच्या पेढीवर पटविली जाणार नाहीं.

जेथें आपलें जीवनच बांधून काढण्याचा प्रश्न येतो, ईश्वरदर्शन करण्याचा प्रश्न येतो, तेथें व्रताखेरीज चालावें कसें ? म्हणून व्रतांच्या आवश्यकतेसंबंधीं आपल्या मनांत कधीं शंकाच न उद्भवो.

खोल विचार केल्यास आपल्या लक्ष्यांत येईल कीं, सर्व व्रतें सत्य व अहिंसा यामध्यें–किंवा सत्यामध्येंच–अंतर्भूत आहेत. तें अशा तऱ्हेनें दाखवितां येईल:—



सत्यांतून अहिंसा काढावी अथवा सत्य-अहिंसा ही जोडी समजावी. दोन्ही एकच; तरी पण माझ्या मनाचा कल पहिल्या गोष्टीकडे आहे. शिवाय अखेरची स्थिति तर जोडीच्या, द्वंद्वाच्या पलीकडची आहे. परम सत्य दुसऱ्या कशाच्या आश्रयाखेरीज उभें राहूं शकतें. सत्य साध्य आहे, अहिंसा साधन आहे.

आपण कोणतेंहि एक व्रत घेतलें म्हणजे त्या वेळेपासूनच त्याचें संपूर्णपणें पालन करूं लागलों असा अर्थ नव्हे. व्रत घेणें म्हणजे त्याचें संपूर्ण पालन करण्याचा प्रामाणिक, दृढ प्रयत्न कायावाचामनेंकरून मरेपर्यंत करणें. अमुक एक व्रत कठिण आहे म्हणून त्याची व्याख्याच ढिली करूं नये; कारण तसें करण्यामध्यें आत्मवंचना आहे. आपल्या सोईखातर आदर्शालाच खालीं ओढण्यामध्यें आपलें पतन आहे. आदर्श स्वतंत्रपणें नक्की करावा. मग तो कितीहि कठीण असला तरी त्याच्या-पर्यंत पोंचण्याचा, प्राण गेला तरी बेहेत्तर पण, प्रयत्न करीत रहावें हाच परम अर्थ होय-पुरुषार्थ होय.

जो पुरुष महाव्रतांचें संपूर्णपणें व तिन्ही काळीं पालन करण्यास समर्थ आहे त्याला इहलोकीं कांहीं करावयाचें रहात नाहीं; तो भगवान होय; तो मुक्त होय.

आपण तर अल्प, मुमुक्षु, जिज्ञासु, सत्याचा आग्रह धरणारे, त्याचा शोध करीत असलेले प्राणी आहों. म्हणून आपलें काम, गीता म्हणते त्याप्रमाणें, धिमेधिमे, पण अतंद्रित राहून, प्रयत्न करीत जाणें हेंच होय. असें करीत गेल्यास कधींकाळीं आपण ईश्वराच्या कृपेला पात्र बनूं. त्यावेळीं आपले सर्व रस जळून जातील. ३

## बोधक प्रसंग

**आचार्य कालेलकरः—**

सन १९२६ ची गोष्ट असेल. बापूजी दक्षिणेकडे खादीसाठीं दौरा करीत होते. तामिलनाडचा दौरा संपला होता. आंध्रमधून मोटारनें प्रवास चालला होता. आम्ही चिकाकोलला पोंचलों. रात्रीचे दहा वाजले असतील. तेथें पोंचल्यावर पाहतों तों उत्तमोत्तम कातणाऱ्या बायांच्या

चढाओढीचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. तिकडे बापूजी गेले, आम्ही निवासस्थानीं गेलों.

पहाटें ४ वाजतां आम्ही प्रार्थनेसाठीं उठलों. हात तोंड धुऊन प्रार्थना सुरू करतों आहोंत, इतक्यांत बापूंनीं विचारलें, " रात्रीं निजण्याच्या पूर्वीं तुम्ही प्रार्थना केली कां ?"

मी म्हणालों, " आपण आलों तेव्हां मी इतका थकून गेलों होतों कीं, आल्याबरोबरच मी झोपीं गेलों. प्रार्थनेचें स्मरणच राहिलें नाहीं. आतां आपण विचारलें तेव्हां लक्षांत आलें कीं, रात्रींची प्रार्थना राहून गेली. "

महादेवभाईंनीं सांगितलें, " मीहि असाच झोपायला गेलों, पण डोळा लागण्यापूर्वीं आठवण झाली. म्हणून बिछान्यावर बसूनच प्रार्थना करून घेतली. काकांना उठवलें नाहीं. "

नंतर बापूंनीं आपली हकिकत सांगितली. ते म्हणाले, "मी तास दीड तास कार्यक्रमाचे जागीं बसलों. तेथून इतका थकून आलों कीं, मीहि प्रार्थना करण्याचें विसरून गेलों आणि तसाच झोपीं गेलों. मग जेव्हां दोन–अडीच वाजतां डोळा उघडला, तेव्हां रात्रींची प्रार्थना केली नाहीं, याची आठवण झाली. मला असा धक्का बसला कीं सारें शरीर कांपूं लागलें. मी घामानें अगदीं डबडबून गेलों. मी उठून बसलों, खूप पश्चात्ताप केला. ज्याच्या कृपेनें मी जगतों आहें, आपल्या जीवनाची साधना करीत आहें, त्या परमेश्वरालाच मी विसरून गेलों ! केवढी मोठी चूक झाली ही ! मी परमेश्वराची क्षमा मागितली. पण तेव्हांपासून झोंप आलीच नाहीं, मी तसाच बसून राहिलों. " ४

**म. गांधीः—**

ता. २८ एप्रिल १९३३ रोजीं रात्रीं मी जेव्हां झोपीं गेलों, तेव्हां मला अणुमात्रहि कल्पना नव्हती कीं, दुसरें दिवशीं सकाळीं मला उपवास जाहीर करावा लागेल. पण रात्रीं १२ च्या सुमारास मला कोणी तरी अकस्मात् खडबडून उठविलें. नंतर एक ध्वनि माझें कानीं आला. तो आंतला होता कीं बाहेरचा हें मी सांगूं शकत नाहीं. पण तो आवाज मला म्हणाला, " तूं उपवास सुरूं केलाच पाहिजेस. "

" किती दिवसांचा उपवास ? " मीं विचारलें.

" एकवीस दिवसांचा. " आवाज स्पष्ट ऐकूं आला.

" केव्हां सुरू व्हावा तो उपवास ? " मीं प्रश्न केला.

" उद्यांच. " आवाज म्हणाला.

लगेच माझा निर्णय झाला आणि मी पुन: झोपीं गेलों. या " आंतल्या आवाजाचा " वृत्तान्त मी दुसरे दिवशीं प्रात:कालची प्रार्थना आटोपेपर्यंत कोणालाहि निवेदन केला नाहीं.

गेले कांहीं दिवस माझ्या अंत:करणांत एक वादळ माजलें होतें. त्याच्याशीं मी झुंजत होतों. अखेर मला आदेश मिळाला. ५

**महादेव देसाई:—**

ता. ८ मे रोजीं प्रात:कालची प्रार्थना आटोपली. नंतर गांधीजींनीं सरदार वल्लभभाई पटेल यांच्या हातीं एक चिठ्ठी दिली. तींत गांधीजींनीं आपला उपोषणाचा निर्धार कळवून एवढेंच लिहिलें होतें कीं, " वल्लभभाई, चर्चेला जागा नाहीं. तुम्हीं चर्चा करणार नाहीं अशी आशा मी बाळगतों. त्याचें कारण माझ्या पत्रकावरून आपल्या ध्यानीं येईल. "

गांधीजींचें पत्र सरदारांनीं एकदां वाचलें; दोनदां वाचलें आणि त्यांचें मन सुन्न झालें. त्यांनीं मौनच धारण केलें. कांहीं काळानंतर ते मला इतकेंच म्हणाले; " नायगाराच्या धबधब्याला बांध घालण्याचा खटाटोप करून काय उपयोग ? त्यांच्यापेक्षां अधिक पवित्र माणूस कोण आहे तें मला दाखवा. जर कोणी असेल तर त्यानें गांधीजींचें मन वळविण्याचा प्रयत्न करावा. मी तो नाहीं. " ६

**प्यारेलाल:—**

'एकला चलो रे' अशा स्वरूपांतील गांधीजींची नौखाली–यात्रा चालू होती. ता. ३० जानेवारी १९४७ रोजीं गांधीजींचा मुक्काम आमकी गांवीं होता. तेथें शेळीचें दूध मिळत नव्हतें. 'नारळाचें दूध मिळालें तरी चालेल.' गांधीजींनीं तोड काढली. त्यांनीं दिवसांतून ८ औंस आपरस ( नारळाचें दूध ) घेतला. त्यामुळें त्यांना संग्रहणीचा विकार झाला. संध्याकाळीं तर ते अगदीं गळून गेले.

संध्याकाळीं शौचविधि आटोपून ते बाहेर आले, तर घामानें डबडबलेले. जांभयाहि ते वारंवार देऊं लागले. तें पाहून, ते आतां मूर्च्छित पडणार असें मनु गांधींना वाटलें. तिनें त्यांचें डोकें उचलून धरलें, त्यांच्या कपाळावरील घाम पुसला व प्रो. निर्मलकुमार बोस यांना हाक मारली. ते आल्यावर दोघांनीं गांधीजींना उचलून आंत नेलें व अंथरूणावर निजविलें.

मनूनें डॉ. सुशीला नायर यांना एक पत्र लिहिलें. तें ती प्रोफेसरांना देणार, तोंच गांधीजींनीं डोळे उघडले. ते मनूला म्हणाले, "तूं निर्मलबाबूंना बोलावलेंस हें मला आवडलें नाहीं. पण तू अजून लहान आहेस. म्हणून मीं तुला क्षमा करतों. अशा वेळीं पूर्ण भक्तीनें राम–नाम घेत असावें. मी सारखा रामाचें नांव घेत होतों. आतां ही हकीकत कोणाला कळवूं नकोस–सुशीलेलासुद्धां. माझा खरा वैद्य राम हाच आहे. माझ्याकडून त्याला जोंवर काम करवून घ्यावयाचें आहे, तोंवर तो मला जीवंत ठेवील; नाहीं तर येथून घेऊन जाईल."

मनु चपापली. भराभर त्या पत्राचे तुकडे ती करूं लागली. गांधीजींनीं सारा प्रकार ओळखला. 'तूं तर पत्र लिहूनहि टाकलेंस ?' त्यांनीं विचारलें. मनूनें अपराध कबूल केला. गांधीजी म्हणाले, "आज देवानें तुला व मला वांचविलें. सुशीला खेड्यांतील काम टाकून येथें धांवत आली असती. त्यामुळें मी माझ्यावर व तुझ्यावर रागावलों असतों. आज माझी परीक्षाच झाली." ७

## सत्य

"आपल्या संस्थेचें मूळच सत्याच्या आग्रहामध्यें राहिलेलें आहे.

'सत्य' शब्द सत्‌वरून आलेला आहे. सत् म्हणजे असणें. सत्य म्हणजे असण्याचा भाव. सत्याव्यतिरिक्त इतर कोणत्याहि वस्तूला अस्तित्वच नाहीं. परमेश्वराचें खरें नांवच 'सत्' म्हणजे 'सत्य' आहे. म्हणून 'परमेश्वर सत्य आहे' असें म्हणण्यापेक्षां 'सत्य म्हणजेच परमेश्वर' असें म्हणणें अधिक उचित होय. राज्यकर्त्याखेरीज, सरदाराखेरीज आपलें चालत नाहीं. त्यामुळें परमेश्वर हें नांव अधिक प्रचलित आहे व रहाणारहि. पण

अनुक्रम २६३०८ वि: निबंध
क्रमांक १३१० नों: दि: २२।३।६०

विचार केला असतां 'सत्' किंवा 'सत्य' हेंच खरें नांव होय व हेंच पूर्ण अर्थ सूचित करते, आणि जेथें सत्य आहे तेथें ज्ञान–शुद्ध ज्ञान–आहेच आहे. जेथें सत्य नाहीं, तेथें शुद्ध ज्ञान शक्यच नाहीं.

या सत्याच्या आराधनेसाठींच आपलें जीवित. तत्प्रीत्यर्थंच आपली प्रत्येक हालचाल. त्यासाठींच आपण प्रत्येक श्वासोच्छ्वास घ्यावयाचा. असें करण्यास शिकलों तर इतर सर्व नियम आपल्या हातीं सहजीं येतील व त्यांचें पालन सुलभ होऊन जाईल. सत्याविना कोणत्याहि नियमांचें शुद्ध पालन अशक्य आहे.

सामान्यत: सत्य याचा 'खरें बोलणें' एवढाच अर्थ आपण करीत असतों. परंतु येथें सत्य शब्द आपण व्यापक अर्थानें योजलेला आहे. विचारांत, वाणींत व आचरणांत सत्याचें पालन हेंच खरें सत्य. या सत्याचें ज्यानें संपूर्णपणें आकलन केलें, त्याला जगांत आणखी कांहीं जाणावयाचें रहात नाहीं. कारण आपण वर पाहिलेंच कीं, ज्ञानमात्र त्याच्यामध्यें सांठविलेलें आहे. त्यांत ज्याचा समावेश नसेल तें सत्य नव्हे, ज्ञान नव्हे; एवढी ही कसोटी लावून पहाण्याचें आपण शिकून घेतलें कीं, मग कोणतें कार्य करण्याजोगें आहे व कोणतें त्याज्य आहे, काय पहावें व काय पाहूं नये, काय वाचावें व काय वाचूं नये, हें आपल्या चटकन् लक्ष्यांत येत जाईल. पण परिसासारखें असलेलें व कामधेनुसारखें असें हें सत्य आपल्या हातीं कसें लागावें ?

भगवंतांनीं याचें उत्तर दिलें आहे–'अभ्यासानें व वैराग्यानें.'

सत्याविषयींची तळमळ म्हणजेच अभ्यास; सत्याखेरीजच्या इतर सर्व वस्तूंबद्दल आत्यंतिक उदासीनता म्हणजेच वैराग्य.

असें असतांहि एकाचें सत्य तेंच दुसऱ्याच्या दृष्टीनें असत्य, असें आपल्याला पदोपदीं आढळेल. परमेश्वरसुद्धां प्रत्येक मनुष्याला निरनिराळा दिसत नाहीं का ? तरी पण तो एकच आहे असें आपल्याला माहीत आहे. पण सत्य हा शब्दच परमेश्वरवाचक आहे. म्हणून ज्याला जें सत्य वाटतें, तदनुसार त्यानें वागावें यांत दोष नाहीं, एवढेंच नव्हे तर तेंच कर्तव्य होय. मग तसें करण्यांत चूक होत असली तरी ती सुधारली जावयाचीच आहे. कारण कीं, सत्य–शोधनाच्या पाठीशीं तपश्चर्या असणार–म्हणजेच स्वत:

दुःख सहन करावयाचें असणार–त्याच्याखातर मरायचें असणार,–अर्थात् त्यामध्यें स्वार्थाचा किंचित् वाससुद्धां नसणार. अशा तऱ्हेनें निःस्वार्थ शोध करीत असतां शेवटपर्यंत कोणी आडमार्गानें गेला, असें आजमितीपर्यंत घडलेलें नाहीं.

म्हणूनच सत्याची आराधना हीच भक्ति; आणि भक्ति म्हणजे तर सुळावरची पोळी आहे. तो 'हरीचा मार्ग' असल्यामुळें त्यामध्यें भित्रेपणाला जागाच नाहीं. त्यांत अपयश म्हणून कांहीं वस्तुच नाहीं. हा 'मरून अमर होण्याचा' मंत्र आहे." ८

## बोधक प्रसंग

**म. गांधीः––**

बालपणीं विडयांचीं थोटकें चोरणें व त्यासाठीं चाकरांचें पैसे चोरणें, असे गुन्हे माझ्या हातून घडले. पण या गुन्ह्यांपेक्षांहि दुसरा एक चोरीचा गुन्हा जो माझ्या हातून घडला, तो मी जास्त भयंकर समजतों. विडीचा गुन्हा घडला तेव्हांचें वय बारा–तेरा वर्षांचें असेल; कदाचित् त्याहूनहि कमी. दुसऱ्या चोरीच्या वेळीं वय पंधरा वर्षांचें असावें. ही चोरी माझ्या मांसाहारी बंधूच्या सोन्याच्या कडयाच्या तुकडयाची होय. त्यांना थोडेसें–म्हणजे पंचवीस एक रुपयांचें–कर्ज झालें होतें. तें फेडावें कसें याचा आम्ही उभयतां बंधु विचार करीत होतों. माझ्या बंधूंच्या हातांत सोन्याचें भरीव कडें होतें. त्यांतून एक तोळा सोनें कापून काढणें कठीण नव्हतें. आम्ही कडें कापलें–आमचें कर्ज फिटलें. परंतु मला ही गोष्ट असह्य झाली. इतःपर चोरी म्हणून करावयाची नाहीं, असा मी तत्काळ निश्चय केला. वडिलांपाशीं तशी कबुलीहि देऊन टाकली पाहिजे, असें मला वाटूं लागलें. पण जीभ चालेना. वडील मला मारतील अशी भीति वाटत नव्हती. त्यांनीं उभ्या जन्मांत आम्हां भावांना कधीं मारलें असें आठवत नाहीं. परंतु त्यांना दुःख होईल. आणि त्यांनीं डोकें आपटून घेतलें तर ?

हा धोका सहन करूनहि आपण गुन्हा कबूल केलाच पाहिजे, त्याखेरीज आपल्या दोषाचें क्षालन होणार नाहीं असें माझ्या मनानें घेतलें.

अखेरीस मी निश्चय केला कीं, वडिलांना चिठी लिहून आपण गुन्हा कबूल करावा आणि माफी मागावी. मी चिठी लिहिली आणि स्वत: त्यांच्या हातीं नेऊन दिली. चिठीमध्यें मी सर्व गुन्हा कबूल करून शिक्षा मागितली होती. त्यांनीं स्वत:वर कांहीं दु:ख ओढवून घेऊं नये अशी विनवणी केली होती; व इत:पर अशा तऱ्हेचा गुन्हा न करण्याची प्रतिज्ञा केली होती.

मीं कांपऱ्या हातानें ती चिठी वडिलांच्या हातांत दिली. मी त्यांच्या उच्चासनासमोर बसून राहिलों. त्यावेळीं त्यांना भगंदराची व्यथा होती. त्यामुळें ते अंथरुणाला खिळलेले होते. खाटेऐवजीं लाकडी उच्चासन ते वापरीत.

त्यांनीं चिठी वाचली. डोळ्यांतून मोत्याचे बिंदु गळाले. चिठ्ठी भिजली. त्यांनीं क्षणमात्र डोळे मिटून धरले. ती चिठी फाडून टाकली आणि वाचण्यासाठीं बसते झाले होते, ते परत आडवे झाले.

मी पण रडलों. वडिलांचें दु:ख मी समजूं शकलों. मी चित्रकार असतों तर आजहि तें चित्र पूर्णपणें रेखाटूं शकलों असतों, इतक्या स्पष्ट रीतीनें तें माझ्या डोळ्यांसमोर उभें आहे.

त्या मौक्तिक बिंदूच्या प्रेमबाणानें माझें हृदय भेदून टाकलें. मी शुद्ध झालों. ज्याला अनुभव असेल तोच हें प्रेम समजूं शकेल. "रामबाण वाग्या रे होय ते जाणें."

माझ्या दृष्टीनें हा अहिंसेचा वस्तुपाठ होता. त्यावेळीं त्यांत मला पितृप्रेमापलीकडे कांहीं दिसलें नव्हतें. परंतु आज मी त्याला शुद्ध अहिंसा या रूपानें ओळखूं शकतों. अशा तऱ्हेच्या अहिंसेनें व्यापक स्वरूप धारण केलें, म्हणजे तिच्या स्पर्शापासून कोण अलिप्त राहणार? अशा व्यापक अहिंसेच्या शक्तीचें मोजमाप करणें अशक्य आहे.

अशा तऱ्हेनें शांतपणें क्षमा करणें हें वडिलांच्या स्वभावाविरुद्ध होतें. ते संतापतील, टाकून बोलतील, कदाचित् डोकेंहि आपटून घेतील असें मला वाटलें होतें. परंतु त्यांनीं इतकी अपार शांति राखली, याचें कारण गुन्ह्याची निखालस कबुली हेंच होय, असें मला वाटतें. जो मनुष्य अधिकारी

मनुष्यापाशीं स्वतःचा गुन्हा खुल्या दिलानें कबूल करतों व तो पुनः न करण्याची प्रतिज्ञा करतो, तो सर्वोत्कृष्ट प्रायश्चित्त घेतो. मला माहीत आहे कीं, माझ्या कबुलीमुळें वडील माझ्याविषयीं निश्चित झाले आणि त्यांच्या मजवरील अगाध प्रेमांत भरच पडली. ९

## ( २ )

मी डरबनहून रवाना झालों. माझ्यासाठीं पहिल्या वर्गाचें तिकीट काढविलें. तेथें झोंपण्याचा बिछाना पाहिजे असेल, तर पांच शिलिंगांचें स्वतंत्र तिकीट काढावें लागे. अबदुल्लाशेठांनीं तें काढण्याबद्दल आग्रह केला; पण मीं हट्टानें, तोऱ्यानें आणि पांच शिलिंग वांचविण्यासाठीं, बिछान्याचें तिकीट काढण्याचें नाकारलें.

अबदुल्लाशेठनीं मला बजावलें, "पहा हो; हा मुलूख निराळा आहे, हिंदुस्थान नव्हे. खुदाची मेहरबानी आहे, तुम्ही पैशाचा कंजूषपणा करूं नका. जरूर ती सोय करून घ्या."

मी त्यांचे आभार मानलें आणि त्यांना 'काळजी करूं नका' म्हणून सांगितलें. नाताळची राजधानी मेरित्सबर्ग येथें गाडी नऊ वाजतां पोंचली. येथें बिछानें पुरविण्यांत येत होते. एका रेल्वे-नोकरानें येऊन विचारलें, "तुम्हांला बिछाना पाहिजे ?"

मी म्हटलें, "माझ्यापाशीं माझा बिछाना आहे."

तो निघून गेला. इतक्यांत एक उतारू आला. त्यानें माझ्याकडे पाहिलें. मी गौरेतर आहें असें पाहून त्याचें पित्त खवळलें. तो बाहेर पडला व एक-दोन रेल्वे-अंमलदारांना घेऊन आला. कोणी कांहीं बोललें नाहीं. शेवटीं एक अंमलदार आला. तो म्हणाला, "असे इकडे या, तुम्ही शेवटल्या डब्यांत बसा."

मी म्हटलें, "माझ्याजवळ पहिल्या वर्गाचें तिकीट आहे."

तो म्हणाला, "त्याची पर्वा नाहीं. मी सांगतों कीं, तुम्ही शेवटल्या डब्यांत जा."

"मीहि सांगतों कीं, मला या डब्यांत डरबनहून बसविण्यांत आलेलें आहे, आणि त्यांतूनच प्रवास करण्याचा माझा इरादा आहे."

अंमलदार म्हणाला, " तें कांहीं चालायचें नाहीं. तुम्हांला उतरावेंच लागेल. तुम्ही उतरलां नाहीं, तर शिपाई तुम्हांला खालीं काढील."

मी म्हटलें, " तर मग शिपाई खुशाल मला खालीं काढूं द्या. मी आपण होऊन नाहीं उतरणार."

शिपाई आला. त्यानें माझा हात पकडला आणि मला धक्का मारून खालीं काढलें. त्यानें माझें सामान उतरून घेतलें. मी दुसऱ्या डब्यांत जाण्याचें नाकारलें. गाडी निघून गेली.

मी वेटिंग रूममध्यें शिरलों. माझ्या हातांतलें पाकीट तेवढें बरोबर ठेवलें. बाकीच्या सामानाला मीं हात लावला नाहीं. रेल्वेच्या नोकरांनीं तें सामान कोठें तरी ठेवलें.

हिंवाळ्याचे दिवस होते. दक्षिण आफ्रिकेचा हिंवाळा उंच विभागामध्यें कडाक्याचा असतो. मॅरित्सबर्ग उंच भागामध्यें आहे. त्यामुळें थंडी खूप वाजली. माझा ओव्हरकोट सामानांत होता. सामान मागण्याची मला हिंमत होईना. ' फिरून अपमान झाला तर ? ' मी थंडीनें कुडकुडलों.

मला हें जें दुःख सोसावें लागलें, तें वरवरचें होतें–आंत खोलांत असलेल्या एका महारोगाचें तें बाह्य लक्षण होतें. हा महारोग म्हणजे वर्ण–द्वेष. " हा दृढमूल रोग निर्मूल करण्याची शक्ति माझ्या अंगीं असेल, तर मीं तिचा उपयोग केला पाहिजे–व तो करतांना स्वतःवर येतील तीं दुःखें सहन केलीं पाहिजेत. वर्ण–द्वेष काढून टाकण्यासाठीं अवश्य असेल, तेवढेंच स्वतःच्या दुःखाचें परिमार्जन करण्याचा प्रयत्न मीं करावा." असा निर्णय करून, आपण कांहींहि करून दुसऱ्या गाडीनें पुढें जायचेंच, असा निश्चय मीं केला. १०

**बाळकोबा भावेः––**

गांधीजींच्या सहवासांत दीर्घ काल राहिलेले आश्रमाचे एक अधिकारी व अगदीं विश्वासार्ह कार्यकर्ते आश्रमाचा बाजार करीत असत. त्याचा हिशबदेखील ते ठेवीत असत. मगनलालभाईनंतर श्री. छगनलाल जोशी कांहीं महिने व्यवस्थापक होते. त्यांना अशी शंका आली कीं, दोन आण्यांच्या वस्तूंचा भाव अडीच आणे लावून अर्धा आण्याची चोरी ते अधिकारी करीत असावेत.

अशा प्रकारच्या चोरीची त्यांना दीर्घ कालापासून संवय लागली होती, असें आढळून आलें. त्यांची शंका खरी ठरली, चोरी पकडली गेली.

गांधीजींनीं त्यांना बोलावलें. ते प्रथम कबूल होईनात, पुढें कबूल झाले. गांधीजींना आंतून मोठाच धक्का बसला, कारण आफ्रिकेंत गांधीजींच्या निकट सहकाऱ्यापैकीं ते एक होते. आश्रमांत ते मूळपासूनच होते. गांधीजींच्या नातलगांपैकींच ते एक होते. बापूजींचा मनांत निर्णय झाला कीं, 'सत्याग्रहाश्रम' नांव धारण करायला हा आश्रम लायक नाहीं. माझ्यामध्यें कुठें तरी असत्य लपलेलें आहे. तें मी अद्याप हुडकून काढूं शकलों नाहीं.'

त्यांचा स्वतःचा निर्णय झाला असला; तरी सर्वांच्या संमतिशिवाय तो त्यांना अंमलांत आणयचा नव्हता. ते संस्थेचे सर्वाधिकारी असले, तरी कोणताहि महत्त्वाचा निर्णय, ते प्रमुख व्यक्तींच्या संमतीशिवाय घेत नसत.

त्यांनीं विनोबाजींना वर्ध्याहून बोलावलें. ते आल्यानंतर आ. काकासाहेब कालेलकर, श्री. किशोरलाल मशरुवाला वगैरे प्रमुख मंडळींसमवेत सभा घेतली गेली. एक तासभर सर्वांना त्यांनीं समजावून सांगितलें.

मी त्या सभेला हजर होतों. त्यांचें भाषण ऐकत असतांना माझ्यावर त्यांच्या प्रखर सत्य–निष्ठेचीच छाप पडत होती. सत्यापुढें त्यांना सर्व तुच्छ वाटत असे. सत्यासमोर प्रतिष्ठेची कांहीं किंमत नव्हती. 'सत्याग्रहाश्रम' नांव सोडून "उद्योग–मंदिर" नांव धारण करण्यांत आश्रमाची प्रतिष्ठा कमी होईल वगैरे विचार त्यांच्या मनाला शिवले नाहींत. त्यांच्या म्हणण्यावर साधकबाधक चर्चा होऊन शेवटीं त्यांच्या म्हणण्याला सर्वांनीं मान्यता दिली. ज्या जागीं प्रार्थना होत असें, तो 'सत्याग्रहाश्रम' व बाकी सर्व संस्थेला 'उद्योग–मंदिर' असें नांव दिलें गेलें, व पुनः योग्यता प्राप्त केल्यावर, 'सत्याग्रहाश्रम' नांव धारण करायचें, असें ठरलें.

**लुई फिशरः—**

१९१६ सालची गोष्ट. आश्रमांतील शेंकडों रुपयांची रक्कम मणिलाल (गांधीजींचा दुसरा मुलगा) याचेजवळ होती. त्यावेळीं त्याचे ज्येष्ठ बंधु हरिलाल हे कलकत्ता येथें व्यापारांत डोकें वर काढण्यासाठीं धडपडत होते. त्यासाठीं त्यांना पैशाची गरज होती. ती भागविण्यासाठीं मणिलालांनीं

आपल्याजवळील रक्कम कर्जाऊ म्हणून हरिलालांना पाठविली. तिची पावती हरिलालांकडून आली; पण ती पडली--

महात्माजींचे हातीं! त्यांच्या दृष्टीनें, आश्रमांतील पैसा असा खाजगी कामासाठीं वापरणें हा गुन्हाच होता. त्याला शिक्षा कोणती? हद्दपारी.

दुसरेच दिवशीं, गांधीजींनीं मणिलालांना आश्रमांतून घालवून दिलें. 'कोठेंहि जा आणि सूत-कताई व सूत-विणाई करून पोट भर. मात्र तसें करतांना माझें नांव कोठेंहि वापरूं नकोस.'

एवढ्या शिक्षेनेंहि बापूजींचें समाधान झालें नाहीं. मुलाच्या पापाच्या क्षालनासाठीं आपण स्वत: उपोषण केलें पाहिजे, असें त्यांना वाटूं लागलें. त्यांनीं उपोषण करूं नये अशी विनवणी मणिलालांनीं केली-सारी रात्र त्यांच्याजवळ बसून त्यांनीं बापूजींची करुणा भाकली.

अखेर बापूजींनीं मणिलालांची विनंति मान्य केली. उपोषणाचा संकल्प टाकला. मणिलाल आश्रमांतून निघाले. कस्तुरबा व देवदास हुंदके देऊन रडूं लागले. पण गांधीजींचा निश्चय कायम. ११

**कन्हय्यालाल मुनशी:--**

१९१९ साल होतें. रौलट बिलाविरुद्ध सत्याग्रह करण्याचें गांधीजींनीं योजिलें होतें. त्यासाठीं मुंबई येथें एक समिति स्थापन झाली होती. तिचें चिटणीस श्री. शंकरलाल बँकर व उमर सोभानी हे दोघे होते. सोभानी हें मोठे मातबर, बाणेदार व सामर्थ्यवान् पुढारी होते. त्यांनीं एक पत्रक छापून घेतलें. त्याच्या जितक्या प्रति खरोखर काढल्या होत्या, त्यापेक्षां कमी प्रतींची संख्या त्या पत्रकांवर छापलेली होती. हें असत्याचरण गांधीजींच्या नजरेस आलें तर त्याचा काय परिणाम होईल? अशी शंका एकानें काढली. त्याबरोबर सोभानी यांनीं लगेच जादा प्रति रातोरात शिबरी येथें नेऊन जाळून टाकल्या.

पण होऊं नये तें झालेंच. असत्याला वाचा फुटली आणि गांधीजींच्या कानीं ही वार्ता गेली. गांधीजींनीं लगेच निर्णय दिला, "हा गुन्हा आहे, आणि त्याची वर्दी पोलिस कमिशनरास दिली पाहिजे- तीसुद्धां सोभानी यांनीच." बाणेदार सोभानी यांना ही अपराधाची कबुली देणें जीवावर

आलें. पण करणार काय ? गांधीजींचा सत्याचा आग्रह. "तो मानला नाहीं, तर मी समितीचा राजीनामा देईन." असा धाक गांधीजींनीं घातला. नाइलाजानें सोभानी कबूल झाले आणि पोलीस कमिशनरकडे जाऊन त्यांनीं आपल्या 'गुन्ह्याची' कबुली दिली.

ती ऐकतांना पोलीस कमिशनर नुसतें स्मित करीत होते. १२

**आगाथा हॅरिसनः--**

ओरिसामध्यें गांधीजींनीं हरिजनांसाठीं दौरा काढला होता. त्यांच्या पथकामध्यें १८ वर्षांचा एक धट्टाकट्टा जर्मन तरुण सामील झालेला होता. गांधीजींनीं या दौऱ्यांत आपल्यावर स्वतःच एक बंधन असें घालून घेतलें होतें कीं, राजकीय विषयावर भाषण करावयाचें नाहीं. अर्थात् हें बंधन त्यांच्या बरोबरीच्या मंडळींनाहि लागू होते.

एका गांवीं आमचा मुक्काम बरेच दिवस पडला. त्या अवधींत या जर्मन तरुणानें, आम्हां कोणाला, दाद लागूं न देतां, विद्यार्थ्यांच्या एका मोठ्या मेळाव्यापुढें भाषण केलें. त्यांत त्यानें ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानामध्यें जे जुलूम व अन्याय चालविले होते, त्यांचें वर्णन केलें.

दुसरेच दिवशीं ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून त्याला सूचना मिळाली. "यापुढें अशा सभांमध्यें तुम्ही भाग घेणार असाल, तर तुम्हांला हा प्रांत सोडून जावें लागेल." ही सूचना म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या जुलमाचाच पुरावा, असें त्या तरुणाला वाटलें व तो आनंदानें गांधीजींना तें पत्र दाखविण्यास गेला. गांधीजी सहसा कधींहि रागावत नाहींत. पण त्यावेळीं इतके रागावले आणि त्या तरुणाला म्हणाले, "तुम्ही हा गुन्हा केला आहे. माझें बंधन तुम्हांस ठाऊक होतें आणि तरी तुम्ही अशी गोष्ट केली ! आतां तुम्ही त्या ब्रिटिश अधिकाऱ्याला माफीचें पत्र पाठवा आणि तें पाठविण्यापूर्वी मला दाखवा."

"पण गांधीजी, भाषण मीं केलें आहे; आपण नव्हे. आणि मी जें जें बोललों, तें तें सारेंच सत्य आहे." तो तरुण जोरजोरानें युक्तिवाद करूं लागला.

"पण सरकारी अधिकाऱ्याला काय वाटेल ? मी विश्वासघात केला असेंच तो समजणार नाहीं कां ? तुम्ही जर माफी-पत्र लिहूं शकत नसाल, तर आमच्या मंडळींतून ताबडतोब निघून जा."

माफीपत्र कसें असावें, तें गांधीजींनीं लिहूनच दिलें. त्यावर सही करण्यास तो जर्मन तयार होईना. पण कांहीं तास विचार केल्यावर त्यानें माफीपत्र लिहिलें आणि तें स्वत: ब्रिटिश अधिकाऱ्यास पोहोंचतें केलें. तेव्हांपासून तो जर्मन तरुण अत्यंत शांत स्वभावाचा बनला. १३

## अहिंसा

सत्याचा, अहिंसेचा मार्ग जितका सरळ तितकाच बिकट आहे; तरवारीच्या धारेवर चालण्यासारखा आहे. प्रतिक्षणीं साधना केल्यानेंच त्याचें दर्शन घडणार. पण सत्याचें संपूर्ण दर्शन तर या देहीं अशक्य आहे. त्याची फक्त कल्पनाच करतां येणार. अखेरीस श्रद्धेचा आश्रय हा करावाच लागतो.

'माझ्या मार्गांत ज्या अडचणी येतील त्या मी सहन कराव्या कीं त्यांच्या निमित्तानें जे जे नाश करावे लागतील, ते करीत जावे व आपला मार्ग कापीत जावे?' असा प्रश्न जिज्ञासूच्या पुढें उभा राहिला. नाश करीत गेल्यास आपण मार्ग कापीत नाहीं, तर होतों तेथेंच राहतों असें त्याला कळून आलें. संकटें सहन करीत गेला तर त्याची प्रगति होते. पहिलाच नाश करतांक्षणीं त्याला आढळून आलें कीं, आपण ज्या सत्याचा शोध करीत आहों, तें सत्य बाहेर नसून अंतरांतच आहे.

आपल्याला चोर उपद्रव देतात. त्यांचें निवारण करण्यासाठीं त्यांचें पारिपत्य केलें. तेवढ्या क्षणापुरतें ते पळून तर गेले खरे, पण दुसऱ्या ठिकाणीं जाऊन त्यांनीं दरोडा घातला. पण तें दुसरे ठिकाण झालें तरी आपलेंच. याचा अर्थ असा कीं आपण अंधाऱ्या गल्लींत येऊन सांपडलों, चोरांचा उपद्रव वाढतच चालला. कारण तो तर चोरी हा आपला धंदाच करून बसला. आपल्या लक्षांत आलें कीं, यापेक्षां चोराचा उपद्रव सहन करून घ्यावा तें बरें; तसें केल्यानें चोराला समज येईल. एवढें सहन केल्यानें आपल्या लक्ष्यांत आलें कीं, चोर झाले तरी आपल्याहून निराळे नाहींत. आपले तर सर्वच आप्तेष्ट आहेत, मित्र आहेत; त्यांचें पारिपत्य कसलें करावयाचें?

पण उपद्रव सहन करीत गेलें म्हणजे भागलें असेंहि नाहीं. त्यांपासून भ्याडपणा उद्भवण्याचा संभव आहे. यावरून आपलें आणखी विशेष कर्तव्य

आपल्याला दिसून आलें. चोर हे जर आपलीं भावंडें, तर त्यांच्याहि मनामध्यें तशी भावना उत्पन्न केली पाहिजे, म्हणजेच आपण त्यांना आपलेसे करण्याचे उपाय शोधून काढण्याची तसदी घेतल्याखेरीज गत्यंतर नाहीं. हाच अहिंसेचा मार्ग. यामध्यें उत्तरोत्तर दुःख ओढवून घेण्याचाच प्रश्न असतो; अमर्याद सहनशीलता शिकावयाची असते. जर तेवढें साधलें तर अखेरीस चोर साव बनतो; व आपल्याला सत्याचें अधिक स्पष्ट दर्शन होतें. ईश्वराचा, सत्याचा महिमा आपल्याला अधिक चांगल्या तऱ्हेनें कळून येतो. संकटाचा भार उचलावा लागत असला, तरीहि शांतिसुख वाढतच जातें. आपल्यामध्यें साहस किंवा हिंमत वाढतें; शाश्वत-अशाश्वतामधील भेद आपल्याला अधिक चांगल्या तऱ्हेनें कळतो; कर्तव्या-कर्तव्याचा विवेक कळूं लागतो; अभिमान गळतो; नम्रता वाढते; परिग्रह आपोआपच झडून जातो; आणि देहामध्यें सांठून राहिलेला मळ प्रत्यहीं कमी कमी होत जातो.

ही अहिंसा म्हणजे आज आपण जी स्थूल अहिंसा पहातों ती नव्हे. कोणालाहि मारावयाचें नाहीं हें झालेंच; परंतु प्रत्येक कुविचार म्हणजे हिंसा होय. उतावळेपणा म्हणजे हिंसा; मिथ्या भाषण म्हणजे हिंसा, द्वेष म्हणजे हिंसा. कोणाचें वाईट चिंतणें म्हणजेसुद्धां हिंसाच. ज्याची लोकांना जरूर आहे तें आपल्या ताब्यांत ठेवणें हीसुद्धां हिंसाच आहे. कारण, आपण खातों तें जगाला पाहिजेच असतें. आपण उभें राहावें तेथें शेंकडों सूक्ष्म जंतु असतात व ते चिरडले जातात. ही जागा त्यांची आहे. तर मग काय आत्महत्या करावयाची ? तिकडूनहि पार पडतां येत नाहीं. देहाला कवटाळण्याची वासना मनानें निःशेष सोडावी; तेव्हांच देह शेवटीं आपल्याला सोडील. ही निर्मोह अवस्था म्हणजेच सत्यनारायण. त्याचा साक्षात्कार अधीर बनून साधतां यावयाचा नाहीं. देह हा आपला नव्हे, आपल्या हातीं मिळालेली ती ठेव आहे, असें मानून त्याचा होईल तो उपयोग आपण करावा आणि आपला मार्ग कापीत जावें.

अहिंसेविना सत्याचा शोध अशक्य आहे. अहिंसा व सत्य हीं एकमेकांशीं इतकीं जखडलेलीं आहेत कीं, जशा कांहीं नाण्याच्या दोन बाजू; किंवा गुळगुळीत चकतीच्या दोन बाजू; त्यांपैकीं सुलटी कोणती आणि उलटी कोणती ? तरी पण अहिंसेला आपण साधन म्हणावें व सत्याला

साध्य. साधन आपल्या हातांतील गोष्ट आहे. म्हणून अहिंसा परम-धर्म झाली. सत्य म्हणजे तर परमेश्वर.

सत्य आहे, तेंच एक आहे. तेंच परमेश्वर. त्याचा साक्षात्कार करण्याचा एकच मार्ग, एकच साधन म्हणजे अहिंसा. त्याच्याकडे मी कालत्रयीं पाठ फिरविणार नाहीं. १४

## बोधक प्रसंग

**प्यारेलालः—**

म. गांधी व खान अब्दुल गफार खान या उभयतांचा संयुक्त दौरा १९३८ सालीं सीमा-प्रांतांत झाला. एक लाख 'खुदा-ई-खिदमदगारां'ना अहिंसेचा संदेश गांवोगांवीं जाऊन गांधीजींनीं दिला. त्यांची व्यवस्था खान अबदुल गफार खानांनीं मोठ्या भक्ति-भावानें ठेवली होती. तो देश टोळीवाल्यांचा व हल्लेखोरांचा, तेव्हां त्यांच्यापासून गांधीजींना सुरक्षित ठेवण्यासाठीं गफारखान डोळ्यांत तेल घालून जपत.

उत्मन झाई या गांवची गोष्ट. तेथें गांधीजी गेले, तेव्हां सरहद्द गांधींनीं त्यांना विचारलें, "महात्माजी, आपल्या संरक्षणासाठीं येथें पहाऱ्याची व्यवस्था ठेवली पाहिजे असें मला वाटतें. याला आपली हरकत नाहीं ना?"

गांधीजींचें मौन चालू होतें. त्यांनीं फक्त मान हलविली. त्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन सरहद्द गांधींनीं रात्रींच्या वेळीं गांधीजींच्या निवासस्थानाभोंवतीं, सशस्त्र पहारेकरी उभे केले; एवढेंच नव्हे तर, त्या घराच्या छपरावरहि कांहीं रखवालदार बसविले.

हा बंदोबस्त गांधीजींच्या कानीं गेला. तेव्हां त्यांनीं त्याला हरकत घेतली. ते सरहद्द गांधींना म्हणाले, 'दुसऱ्या माणसांच्या संरक्षणासाठीं तुम्ही अशी योजना केली तर मी सहन करीन. पण माझ्या स्वतःच्या बचावासाठीं सशस्त्र पहारेकरी असणें मला सहन होणार नाहीं. माझ्या जन्मभरच्या व्रतनाशीं तें विसंगत होईल."

"महात्माजी, या पहारेकऱ्यांच्या हातांत जीं शस्त्रें दिलेलीं आहेत, तीं हल्लेखोरांना ठार करण्यासाठीं नाहींत-त्यांना केवळ भिवविण्यासाठीं

आहेत." सरहद्द गांधींनीं आपली कैफियत दिली. पण ती गांधीजींना मान्य कशी होणार ? उलट, त्यांनीं एक कथा सांगितली. ती अशी–

एकदां देवानें सापाला बोलावलें आणि म्हटलें, "तुझा विषारी दांत तूं काढून टाक."

"पण, देवा, फूत्कार करण्याची मुभा मला राहील ना ?" सापानें विचारलें.

देवानें होकार दिला, पण बजावलें, "तूं फुस्‌फुस् केलेंस तरी माणसें तुला आणि तुझ्या पोराबाळांना ठार मारतील."

असा दाखला देऊन गांधीजी म्हणाले, "या कथेचा तात्पर्यार्थ असा कीं, शक्तीचें प्रदर्शन हीहि एक प्रकारची हिंसाच होय. तें प्रदर्शन करणाऱ्याला हिंसेचे परिणाम अधिकच प्रमाणांत भोगावे लागतात."

सरहद्द गांधींना आपली चूक कळून आली आणि त्यांनीं सशस्त्र पहारा उठविला. तरी निःशस्त्र रखवालदार रात्रीच्या वेळीं ठेवण्यास त्यांनीं गांधीजींची संमति मागितली. ती तेवढी गांधीजींनीं दिली, पण अगदीं नाखुशीनें. १५

**महादेव देसाईः—**

१९३८ सालच्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस शेगांव येथें एक विलक्षण सत्याग्रह झाला. गांधीजींविरुद्ध तो सत्याग्रह होता, हें विशेष.

नागपूरहून कांहीं हरिजन तरुण शेगांव येथें गांधीजींकडे गेले आणि म्हणाले, "कॉंग्रेसनें आपल्या मंत्रिमंडळांत एक तरी हरिजन घेतलाच पाहिजे. नाहीं तर आम्ही सत्याग्रह करूं. तशी सूचना आम्ही आपल्याला पूर्वींच दिली आहे."

"पण या सत्याग्रहाचा अर्थ काय ?" गांधीजींनीं त्यांना लिहून प्रश्न विचारला. कारण त्यावेळीं त्यांचें मौन होतें.

"मध्यप्रदेशच्या मंत्रिमंडळांत मुसलमानांसाठीं जशी एक जागा राखून ठेवलेली असते, तशी हरिजनांसाठीं ठेवा."

"पण तें माझ्या हातांत नाहीं."

"आहे–तें तुमच्या हातांत आहे. येरवड्यांत तुम्ही हरिजनांसाठीं

आपले प्राण देण्यास तयार झाला आणि 'येरवडा करार' घडवून आणला. तुम्हीं हरिजनांसाठीं काय वाटेल तें करूं शकाल."

" मला शक्य तें सारें कांहीं मी करीत आहें; पण तें असू दे. सत्याग्रहाचा अर्थ तुम्ही काय करतां ? "

" आम्हीं येथें अन्नत्याग करून राहूं. नागपूरहून दुसरी तुकडी आली म्हणजे आम्ही जाऊं ? "

" ठीक आहे. तुम्हांला खोली पाहिजे असेल. पण तुम्ही पहा, येथें जागेची किती टंचाई आहे. तरीसुद्धां तुम्ही कोठें बसाल तें मला सांगा, म्हणजे मी ती खोली रिकामी करून देईन. "

" आम्ही उपोषण करूं त्यावेळीं आमच्या गरजा भागविण्यासाठीं पांच–सहा माणसें येथें राहतील."

" त्याच्याशीं माझा कांहीं संबंध नाहीं. तुम्ही खोली निवडा म्हणजे आम्ही ती रिकामी करून देतों. "

त्या तरुणांनीं जी खोली निवडली, ती कस्तुरबांच्या स्नानाची. तिच्यापुढील ओसरीहि त्यांना हवी होती.

एका आश्रमवासियानें ती अडचण त्यांना सांगितली. पण ते ऐकेनात. तेव्हां गांधीजी म्हणाले, " त्यांना पाहिजे असेल ती खोली रिकामी करून द्या. बा माझ्या खोलींत येऊन राहू द्यात. मी दुसरीकडे रहावयास जाईन. "

इतक्यांत आल्या कस्तुरबा. त्या गांधीजींना म्हणाल्या, " आपण कांहीं चिंता करूं नका. आम्ही बायका एका खोलीत कसें तरी राहूं आणि ओसरीमध्यें तट्टयाची पडदी लावूं. " असें म्हणून कस्तुरबा हसल्या.

गांधीजींनीं एका चिठ्ठीवर लिहिलें, " त्यांचें स्वागत स्मितपूर्वक करा. आणि त्यांना सांगा, 'तुम्ही माझ्या मुलासारखेच प्रिय आहांत.–तुमचें स्वागत आम्ही करतों. "

कस्तुरबा म्हणाल्या, " मी त्यांचें स्वागत हसत हसत करीन, पण 'तुम्ही माझीं मुलें आहांत.' हें सांगणें माझ्यानें होणार नाहीं, तें तुम्हीं सांगा. "

तो सत्याग्रह सुरू झाला. एक सत्याग्रही आजारी पडला. तेव्हां

त्याची शुश्रूषा आश्रमवासियांनीं केली. त्यांच्या सुखसोयीकडेहि सर्वांनीं लक्ष दिलें. याचा परिणाम असा झाला कीं, ते विरोधक गांधीजींचे मित्र बनले. १६

**प्यारेलाल:—**

गांधीजींच्या जीवाला अपाय होण्याचा धोका आहे, असा इषारा १९४८ सालीं सरदार पटेल यांना मुंबईहून मिळाला. त्याबरोबर त्यांनीं गांधीजींच्या संरक्षणाचा बंदोबस्त कडक करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं गांधीजींना सांगितलें, ‘ आपल्या प्रार्थना-सभेला येणाऱ्या प्रत्येक माणसाची झडती पोलिसांनीं घ्यावी असें मला वाटतें. ”

पण गांधीजींनीं साफ नकार दिला. एवढेंच नव्हे तर ते म्हणाले, “ प्रार्थना–सभेंत पोलिसांनीं हजर असावें हेंहि मीं मान्य करूं शकत नाहीं. प्रार्थनेच्या वेळीं मी माझें रक्षण कोणत्याहि मानवी उपायांनीं करावें हें माझ्या श्रद्धेशीं विसंगत आहे. त्यावेळीं मी एका ईश्वराच्याच आसऱ्याखालीं असतों. तुम्ही सुचवितां तसलें मानवी संरक्षण मी स्वीकारणें म्हणजे मी स्वतःच्या ईश्वर–श्रद्धेची स्वतःच विटंबना करण्यासारखें आहे.”

गांधीजींचा दृढ निश्चय पाहून सरदार ‘ देवावर भार ’ घालून स्वस्थ राहिले. १७

## ब्रह्मचर्य

जो मनुष्य सत्यालाच वाहिलेला आहे, त्याचीच उपासना करीत आहे, त्यानें दुसऱ्या कोणत्याहि वस्तूची आराधना केल्यास तो व्यभिचारी ठरणार; तर मग विकाराची आराधना त्याला शक्यच कशी असणार ? ज्याच्या एकूणएक हालचाली सत्याच्या दर्शनासाठीं योजिलेल्या आहेत, तो प्रजोत्पत्तीच्या किंवा गृहप्रपंच चालविणाच्या कार्यामध्यें पडूं शकेल तरी कसा ? भोगविलासांनीं कोणाला सत्याची प्राप्ति झाल्याचा आजमितीपर्यंत आपल्यापाशीं एकहि दाखला नाहीं.

अहिंसेच्या पालनाची गोष्ट घेतली तरी तिचेंहि पूर्ण पालन ब्रह्मचर्याखेरीज अशक्य आहे. अहिंसा म्हणजे सर्वव्यापी प्रेम. पुरुषानें एका स्त्रीला किंवा स्त्रीनें एका पुरुषाला आपलें प्रेम देऊन टाकलें कीं मग इतरां-

साठीं त्यांच्यापाशीं काय उरणार ? त्याचा अर्थ असाच कीं "आपण दोघे प्रथम, बाकीचीं सर्व मागाहून," पतिव्रता स्त्री पतीसाठीं आणि पत्नीव्रत पुरुष पत्नीसाठीं सर्वस्वाचा होम करण्यास तयार असणार, अर्थात् त्यांच्याकडून सर्वव्यापी प्रेमाचें पालन होणें शक्यच नाहीं हें स्पष्ट आहे. अखिल सृष्टीला आपलें कुटुंब बनविणें हें त्यांच्याकडून घडण्यासारखेंच नाहीं. कारण, त्यांच्यापाशीं 'स्वत:चें' मानलेलें असें एक कुटुंब हजर आहे किंवा होऊं घातलेलें आहे. या संकुचित कुटुंबाची वाढ होईल त्या मानानें सर्वव्यापी प्रेमामध्यें विक्षेप होणार. असें प्रत्यक्ष घडत असलेलें आपल्याला सर्व जगभर दिसतच आहे. म्हणून अहिंसाव्रताचें पालन करणाराला विवाह शक्य नाहीं; विवाह-बाह्य विकाराविषयीं तर बोलायचेंच काय ?

मग जीं विवाह करून चुकलीं आहेत त्यांचें काय ? त्यांना सत्य कधींकाळीं सांपडावयाचेंच नाहीं कीं काय ? तीं कधींच सर्वार्पण करूं शकणार नाहींत काय ? विवाहितांनीं अविवाहितांसारखें बनून जावें. या बाबतींत याच्यासारखी सुंदर स्थिति मी दुसरी कोणतीहि अनुभवलेली नाहीं. विवाहित पतिपत्नी एकमेकांना भाऊबहिणीप्रमाणें मानूं लागलीं कीं सर्व तऱ्हेच्या तापत्रयांतून तीं मुक्त झालीं. जगांतील प्रत्येक स्त्री आपली भगिनी आहे, आई आहे, कन्या आहे, हा विचारच माणसाला एकदम उच्च स्थितिप्रत नेणारा, बंधनांतून मुक्ति देणारा होऊन जातो. विकाररूपी मळ काढून टाकल्यानें प्रेमाचीहि वाढच होते.

वरील मुख्य विचार केला व तो हृदयामध्यें ठसला, कीं मग ब्रह्मचर्यापासून होणाऱ्या शारीरिक लाभांचें, वीर्यलाभ इत्यादींचें, महत्त्व त्या मानानें फारच अल्प वाटूं लागतें. जाणूनबुजून भोगविलासाखातर वीर्यहानि करणें व शरीराला खंगवून टाकणें हा केवढा मूर्खपणा म्हटला पाहिजे ? वीर्याचा उपयोग उभयतांची शारीरिक व मानसिक शक्ति वाढविण्यासाठीं आहे. त्याचा विषयभोगार्थ उपयोग करणें हा त्याचा अत्यंत दुरुपयोग होय.

असलें ब्रह्मचर्य कायावाचामनेंकरून पाळावयाचें असतें. जो शरीर तेवढें ताब्यांत ठेवतो, पण मनानें विकारांचें पोषण करीतच रहातो तो मूढ, मिथ्याचारी होय. मात्र मनाला विकारवश होऊं देणें निराळें आणि मन आपण होऊन, आपल्या इच्छेविरुद्ध, बलात्कारानें विकारी होणें, किंवा वारंवार होत रहाणें, हें निराळें. मनाच्या या विकारवशतेला आपण

सहायभूत होत नसलों म्हणजे अखेरीस आपला विजयच आहे. शरीर आपल्या ताब्यांत रहातें, मन रहात नाहीं, असा आपल्याला क्षणोक्षणीं अनुभव येतो. म्हणून शरीराला तरी चटकन् कह्यांत आणून, मनाला कह्यांत आणण्याचा नित्य प्रयत्न करीत असावें, म्हणजे आपण आपलें कर्तव्य केल्याप्रमाणें होईल. परंतु आपण मनाचे ताबेदार झालों कीं शरीर आणि मन यांचा बेबनाव झाला व मिथ्याचाराला सुरुवात झाली. जोंपर्यंत आपण मनोविकार दाबण्याचा प्रयत्न करीत आहों, तोंपर्यंत शरीर व मन दोन्ही एकाच दिशेकडे वळलेलीं आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या ब्रह्मचर्याचें पालन फार बिकट, जवळ जवळ अशक्य आहे अशी सर्वसाधारण समजूत असते. याच्या कारणांचा शोध करतां असें दिसून येतें कीं ब्रह्मचर्याचा संकुचित अर्थ करण्यांत आला आहे. जननेंद्रियविकाराचा निरोध म्हणजेच ब्रह्मचर्याचें पालन, अशी समजूत होऊन बसली आहे. मला तर असें वाटतें कीं, ही व्याख्या चुकीची व अपूर्ण आहे. यच्चयावत् विषयांचा निरोध म्हणजेच ब्रह्मचर्य होय. जो इतर सर्व इंद्रियांना वाटेल तिकडे भटकूं देऊन एका इंद्रियाला तेवढें अडवून धरण्याचा प्रयत्न करतो तो निष्फळ प्रयत्न करीत आहे यांत संशय कसला ? कानांनीं विकारोत्तेजक गोष्टी ऐकावयाच्या, डोळ्यांनीं विकार उत्पन्न करणाऱ्या वस्तु पहावयाच्या, जिभेनें विकारोत्तेजक पदार्थ चाखावयाचे, हातानें विकारोत्पादक वस्तूंना स्पर्श करावयाचा, आणि इतकें करून जननेंद्रिय दाबून ठेवण्याचा प्रयत्न करावयाचा म्हणजे आगींत हात घालावयाचा, मात्र तो पोळूं नये अशी इच्छा करायची, अशांतला प्रकार झाला. म्हणून जो जननेंद्रियाचा संयम करण्याचा निश्चय करतो, त्यानें एकूणएक इंद्रियांचा, त्यांच्या त्यांच्या विकारांपासून, संयम करण्याचा निश्चय केलेला असलाच पाहिजे.

ब्रह्मचर्याचा मूळ अर्थ सर्वांनीं लक्ष्यांत ठेवावा : ब्रह्मचर्य म्हणजे ब्रह्माच्या-सत्याच्या-शोधार्थ चर्या म्हणजे तत्संबंधीं आचरण. या मूळ अर्थांतून सर्वेन्द्रिय-संयम हा विशेष अर्थ निघतो. १८

**म. गांधी:—**

माझ्या विलायतेंतील मुक्कामाच्या शेवटच्या वर्षी, म्हणजे सन १८९० सालीं, पोर्टस्मथ्मध्यें शाकाहारी मंडळींचें एक संमेलन झालें. त्याला येण्या-

बद्दल मला व एका हिंदी मित्राला निमंत्रण मिळालें होतें. आम्ही दोघेहि गेलों. आमची उतरण्याची सोय एका बाईकडे करण्यांत आली होती.

पोर्टस्मथ हें खलाशांचें बंदर म्हणून प्रसिद्ध आहे. तेथें पुष्कळ घरें दुराचरणी स्त्रियांचीं असतात. त्या स्त्रिया अगदीं वेश्याच नसल्या तरी निर्दोषहि नसतात. अशाच एका घरामध्यें आम्ही उतरलों होतों. स्वागत-मंडळानें असलीं घरें मुद्दाम शोधून काढलीं असें म्हणण्याचा माझा इरादा नाहीं. परंतु पोर्टस्मथसारख्या बंदरी प्रवाशांना उतरण्यासाठीं बिऱ्हाडें शोधावयास गेलें म्हणजे त्यांतलीं कोणतीं चांगलीं, कोणतीं खराब, हें सांगणें कठिणच पडणार.

रात्र झाली. आम्ही सभेंतून घरीं आलों, जेवून पत्ते खेळण्यास बसलों. विलायतेंत कुलीन घरामध्येंहि अशा तऱ्हेनें गृहिणी पाहुण्यांबरोबर पत्ते खेळण्यास बसते. खेळतांना निर्दोष विनोद कोणीहि करतो. येथें मात्र बीभत्स विनोद सुरू झाला. माझे जोडीदार त्या कामीं पटाईत होते, हें मला माहीत नव्हतें. मला त्या विनोदांत गोडी वाटूं लागली, मीहि त्यांत सामील झालों.

शब्दावरून कृतीवर यायला वेळ नव्हता. पत्ते बाजूला पडण्याच्या तयारींत होते परंतु माझ्या भल्या जोडीदाराच्या हृदयांत रामानें प्रवेश केला. तो म्हणाला, "अरे, तुझ्या अंगांत हा सैतान कसा काय संचारला ? तुझें हें काम नव्हे, येथून पळ काढ !"

मी शरमिंदा झालों-भानावर आलों. मीं मनांतून त्या मित्राचे उपकार मानले. आईपाशीं घेतलेली प्रतिज्ञा मला आठवली. मीं धूम ठोकली. कांपत कांपत मी आपल्या खोलींत जाऊन पोंचलों. छाती धडधडत होती. खाटकाच्या हातून जनावर निसटून जावें आणि त्याची जशी स्थिति व्हावी तशी माझी झाली. १९

(२)

झांजीबारला आठ दहा दिवस थांबायचें होतें. कप्तानाचा मजवर अमर्याद लोभ होता. या प्रेमानें माझ्या बाबतींत उलटें स्वरूप धारण केलें. त्यानें मला आपल्याबरोबर सहल करायला बोलाविलें. आम्ही तिघेहि कप्तानाच्या मचव्यांतून उतरलों. या सहलीचें मर्म मला मुळींच समजलें

नव्हतें. कप्तानाला काय माहीत कीं, मी असल्या बाबतींत पूर्ण अज्ञानी असेन !

आम्ही हबशी स्त्रियांच्या वाडींत जाऊन पोंचलों. एक दलाल आम्हांला तिकडे घेऊन गेला. दर एक जण एका एका खोलींत कोंडलें गेलों. माझी तर शरमेनें गठडी वळली. मी खोलींत जशाचा तसाच राहिलों.

त्या बिचाऱ्या बाईच्या मनांत काय विचार आले असतील, ईश्वर जाणे. कप्तानानें हांक मारली. मी जसा आंत गेलों, तसाच बाहेर पडलों.

माझा भोळेपणा कप्तानाच्या लक्षांत आला. प्रथम तर मला शरमल्यासारखें झालें; परंतु असली गोष्ट मला केव्हांहि पटण्यासारखी नव्हतीच.

त्यामुळें ओशाळपणा क्षणभरच टिकला. त्या बाईला पाहून माझ्या मनांत तिळमात्र विकार जागृत झाला नाहीं, याबद्दल मीं ईश्वराचे आभार मानले. २०

## अस्वाद

ब्रह्मचर्याशीं अगदीं निकटचा संबंध असलेलें असें हें व्रत आहे. माझा असा अनुभव आहे कीं, हें व्रत हस्तगत झालें तर ब्रह्मचर्य, म्हणजे जननेंद्रिय-संयम, अगदीं सुलभ होऊन जाईल. पण सामान्यपणें याची व्रतांमध्यें स्वतंत्रपणें गणना होत नसते. स्वादाला मोठमोठे मुनिवरहि जिंकू शकले नाहींत, म्हणूनच त्याला स्वतंत्र स्थान मिळालें नाहीं. हा केवळ माझा तर्क आहे. तो बरोबर असो किंवा चुकीचा असो; आपण तरी त्याला स्वतंत्र स्थान दिलेलें आहे.

अस्वाद म्हणजे स्वाद न घेणें. स्वाद म्हणजे रुचि. ज्याप्रमाणें औषध घेतेवेळीं आपण तें स्वादिष्ट आहे किंवा कसें, याचा विचार न करतां, शरीराला त्याची जरूर आहे असें समजून तें ठराविक प्रमाणांत खातों, त्याचप्रमाणें अन्नाविषयीं समजावें. अन्न म्हणजे एकूणएक खाद्य पदार्थ.

औषध ज्याप्रमाणें कमी प्रमाणांत घेतलें तर परिणाम करीत नाहीं, किंवा थोडा करतें, आणि प्रमाणाबाहेर घेतलें तर हानि करतें, तसेंच अन्नाचेंहि आहे. म्हणून कोणतीहि वस्तु तिची रुचि घेण्यासाठीं चाखणें हा या व्रताचा भंग होय. रुचकर वाटणारी वस्तु प्रमाणाबाहेर खाणें हा तर उघडच भंग आहे. शरीर-पोषणासाठीं आवश्यकता नसतांहि, मनाला

फसविण्यासाठीं आवश्यकतेचें आरोपण करून, विशिष्ट वस्तु अन्नांत घालणें म्हणजे तर मिथ्याचारच होतो म्हटलें पाहिजे.

एकत्र स्वयंपाक–मात्र तो अस्वादवृत्तीनें करण्यांत येत असला पाहिजे–हा फार उपयोगी होतो. जें तयार करण्यांत आलें असेल व जें आपल्याला त्याज्य नसेल, तें ईश्वराचा प्रसाद समजून, मनांतूनहि त्याचे दोष न काढतां, संतोषपूर्वक, शरीराला आवश्यक असेल तेवढें खाऊन उठावें. जो असें करतो त्याच्याकडून अस्वाद–व्रताचें पालन सहजींच घडतें. एकत्र स्वयंपाकाचे कर्ते आपला भार हलका करतात, आपल्या व्रतांचे ते रखवालदार बनतात. स्वयंपाक्यांनीं जेवणारांना चवदार जेवण घालण्याच्या दृष्टीनें कोणताहि पदार्थ बनवूं नये; केवळ संघाच्या घटकांच्या शरीरपोषणार्थच स्वयंपाकाची सिद्धता करावी. खरें पाहतां आदर्श स्थितीमध्यें विस्तवाची जरूरी कमींत कमी पडावी, किंवा मुळींच पडूं नये. सूर्यरूपी महान् अग्नि ज्या वस्तु पकवतो, त्यांतूनच आपल्या खाद्याची निवड व्हावी. या दृष्टीनें विचार केल्यास मनुष्यप्राणी केवळ फलाहारी आहे असें सिद्ध होतें. २१

९०२३८

## बोधक प्रसंग

**आचार्य कालेलकर:–**

गांधीजी एकदां कलकत्त्याला गेले होते. तेथें भूपेंद्रनाथ बसूंच्या येथें ते उतरले होते. बंगाली लोकांचें आदरातिथ्य सुप्रसिध्द आहे. जेवढे सुके आणि ताजे मेवे मिळूं शकले, तेवढे सगळे तेथें आणले होते. त्यांचे जितके विविध खाद्य प्रकार करतां येतील, तितके सर्व तयार करून गांधींच्या पुढें ठेवण्यांत आले. ते पाहूनच गांधीजी स्तिमित झाले व म्हणूं लागले, ‘ हें काय, साधेपणा पसंत करणाऱ्या माझ्यासारख्या माणसासाठीं केवढा हा खटाटोप तुम्हीं केला ! ’ आणि तेव्हांपासून त्यांनीं असें व्रत घेतलें कीं, ‘ मी अत:पर रोज नैसर्गिक पांच जिनसांपलीकडे एकहि जिन्नस खाणार नाहीं ’ २२

## अस्तेय

‘ अस्तेय ’ म्हणजे चोरी न करणें. जो चोरी करतो त्याला सत्य कळतें किंवा प्रेमधर्माचें त्याच्याकडून पालन होतें असें कोणीच म्हणूं

शकणार नाहीं. तरीहि असें खरें कीं, चोरीचा दोष आपण सर्वच थोड्या-बहुत अंशीं जाणतां–अजाणतां करीत असतों. परक्याची वस्तु त्याच्या परवानगीशिवाय घेणें ही तर चोरी खरीच. पण स्वत:ची समजली जाणारी वस्तुहि मनुष्य चोरूं शकतो:–जसें, बापानें आपल्या मुलांच्या नकळत, त्यांना कळूं नये अशा हेतूनें, गुपचूप कांहीं खावें. आश्रमाचें कोठार हें आपलें सर्वांचें आहे असें म्हणतां येईल. पण त्यांतून जो कोणी गुपचूप गुळाचा बारका खडाहि तोंडांत टाकील तो चोर होय. एक मुलगा दुसऱ्याची लेखणी घेतो म्हणजे चोरीच करतो. त्यानें ती घेतली हें त्या दुसऱ्या इसमाला माहीत असेना का, पण कसलीहि वस्तु त्याच्या परवानगीशिवाय घेणें म्हणजे-सुद्धां चोरीच होय. वस्तूला कोणी मालक नाहीं असें म्हणून ती घण्यामध्येंहि चोरी होते. म्हणजेच आपल्याला रस्त्यांत सांपडलेल्या वस्तूवर आपली मालकी नाहीं, तर त्या प्रदेशाचा जो राजा किंवा जें सरकार असेल त्याचीच ती होय.

कोणती एकादी वस्तु घेण्याची आपल्याला आवश्यकता नाहीं असें असतां, ती ज्याच्या ताब्यांत असेल त्याच्यापासून, त्याची परवानगी घेऊन का होईना, घेणें म्हणजे चोरी होय. अनावश्यक अशी एकहि वस्तु घेतां कामा नये. असली चोरी जगांत अधिकांत अधिक खाण्याच्या पदार्थांची घडत असते. मला अमुक प्रकारच्या फळांची जरूर नाहीं. तरीहि मी तीं खाल्लीं किंवा जरूरीहून अधिक खाल्लीं कीं ती चोरी झाली. खरोखरी आपली गरज केवढी आहे तें आपल्याला कळत नाहीं, किंवा आपण बहुतेक सर्वच जण आपली गरज असली पाहिजे त्याहून अधिक फुगवून ठेवितों, म्हणजेच आपण अजाणतां चोर बनत असतों. विचार केला असतां आपल्याला आढळून येईल कीं, आपल्या पुष्कळशा गरजांना आपण संक्षेप देऊं शकतों. जगांतील पुष्कळसें दारिद्र्य अस्तेयाच्या भंगामुळेंच उत्पन्न झालेलें आहे.

वर दर्शविलेल्या या सर्व बाह्य किंवा शारीरिक चोऱ्या म्हणतां येतील. याहून सूक्ष्म व आत्म्याला खालीं पाडणारी किंवा ठेवणारी चोरी म्हणजे मानसिक चोरी होय. मनानें आपण कोणाची वस्तु मिळविण्याची इच्छा केली किंवा नजरेनें जरी ती उष्टावली तरी ती चोरीच होय. मोठ्या माणसांना काय किंवा मुलांना काय, एखादी चांगली वस्तु पाहून ती हवीशी

वाटणें म्हणजे मानसिक चोरी होय. उपवास करणारा मनुष्य शरीरानें खात नाहीं खरा, पण दुसऱ्याला जेवतांना पाहून मनानें स्वादाचें सेवन करीत असेल, तर त्यानें चोरीच केली व आपला उपवास मोडला. जो मनुष्य उपवास चालू असल्या अवधींत, पारण्याच्या वेळीं काय काय खायचें याच्याच योजना करीत असतो, तो अस्तेय व्रताचा व उपवासाचाहि भंगच करीत असतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अस्तेय व्रताचें पालन करणारा इसम भविष्यकाळीं मिळवावयाच्या वस्तूंच्या चिंतनाच्या भोंवऱ्यांत पडणारच नाहीं. पुष्कळशा चोऱ्यांच्या मुळाशीं असली उष्टी वासनाच असल्याचें आढळून येईल. आजला ती फक्त विचारांतच राहिलेली असेल, पण ती तृप्त करण्यासाठीं उद्यां आपण भलेबुरे उपाय योजण्यांत गर्क होऊन जाणारच.

आणि जशी वस्तूंची चोरी होते तशीच विचारांचीहि चोरी होऊं शकते. अमुक एक चांगला विचार मुळांत स्वतःला सुचलेला नसतां आपल्यालाच तो सुचला असें जो प्रौढी मिरवून दर्शवितो, तो विचाराची चोरी करतो. असली चोरी पुष्कळ विद्वानांनींहि दुनियेच्या इतिहासांत केलेली आहे आणि आजमितीला चालत आहे.

म्हणून अस्तेय व्रताचें पालन करणाराला फारच नम्र, फारच विचारी, फारच सावध, फारच साधे व्हावें लागत असतें. २३

## बोधक प्रसंग

**प्यारेलाल :–**

लॉर्ड मौंटबॅटन यांनीं हिंदुस्थानांत पाऊल ठेवतांच पहिली गोष्ट केली, ती ही कीं, गांधीजी व जीना या दोघांना आपल्या भेटीस बोलाविलें. त्यावेळीं गांधीजी दंग्यामध्यें होरपळणाऱ्या बिहार प्रांतांत आपलें शांति-कार्य करीत होतें. ३० मार्च रोजीं ते पाटण्याहून निघाले.

नेहमींप्रमाणें रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून ते प्रवास करीत होते. मौंटबॅटन यांनीं त्यांना आपलें खासगी विमान पाठवितों म्हणून कळविलें होतें. पण गांधीजींनीं नकार दिला. तसेंच ‘ खास गाडी सोडतों ’ असेंहि लॉर्ड मौंटबॅटन यांनीं कळविलें होतें. पण त्यालाहि गांधीजींनीं नकार दला. त्यांनीं तिसऱ्या वर्गानेंच जाण्याचें मुक्रर केलें.

तिसऱ्या वर्गाचेच पण दोन डबे गांधीजींच्या एका सेविकेनें 'राखून' ठेवण्याची व्यवस्था केली. नेहमीं एकच डबा गांधीजींच्या मंडळीसाठीं 'राखून' ठेवला जात असे. पण त्यांना त्रास होऊं नये म्हणून या खेपेस दोन डबे 'राखून' ठेवले होते.

गाडींत बसल्यावर गांधीजींच्या हें लक्षांत आलें. ही चैन त्यांना रुतूं लागली. दुसरें स्टेशन येतांच, गाडी थांबली तेव्हां गांधीजींनीं तेथील स्टेशन मास्तरास पाचारलें. त्याला गांधीजी म्हणाले, "आमच्यासाठीं दोन डबे ठेवले गेले, यात्रबद्दल मला खेद वाटतो. यामुळें इतर उतारूंची केवढी गैरसोय झाली असेल! गाडींत गर्दी किती असेल!"

"होय, महात्माजी, गर्दी तर खूपच आहे. त्यासाठीं मी नवा डबा गाडीला जोडतों." स्टेशन–मास्तरनें उत्तर दिलें. पण त्याची योजना गांधीजींना मुळींच पसंत पडली नाहीं. त्यांनीं एक डबा उतारूंकरतां रिकामा करून दिला आणि आपण स्वतः गर्दीच्या डब्यांत बसले. २४

(२)

काश्मीरहून परत येऊन गांधीजी पाटण्यास चालले होते. प्रत्येक स्टेशनावर दर्शनेच्छु लोकांची झुंबड! त्यांतच रात्रीं मुसळधार पाऊस सुरू झाला. गांधी तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत होते. तो डबा गळूं लागला. साऱ्या डब्यांत पाणीच पाणी झालें. गार्ड त्यांच्याकडे गेला व म्हणाला, "आपण दुसऱ्या चांगल्या डब्यांत बसावयास चला."

"मग या डब्याचें तुम्ही काय कराल?" गांधीजींनीं विचारलें.

"दुसऱ्या डब्यांतील उतारू येथें बसतील."

"त्यांना जर हा डबा चालतो, तर मला कां नाहीं चालणार? दुसऱ्याचें सुख हिरावून स्वतःला सुखी करण्याचा विचार तरी मी कसा करीन?" २५

**मनु गांधी:—**

आगाखान महालांत असतांना, पूज्य बापूजी मला इतिहास, भूगोल, भूमिति व गुजराती व्याकरण हे विषय शिकवूं लागले. त्यासाठीं त्या विषयांचीं क्रमिक पुस्तकें ते स्वतः अभ्यासूं लागले. एके दिवशीं भूमितीचें

अनुक्रम २६३०८ वि: निबंध ५५
क्रमांक १२१० नों. दि: २२।३।६०

प्रश्न सोडविण्यास त्यांनीं मला दिले. पण माझ्यापाशीं त्यासाठीं वही नव्हती. म्हणून मी सुपरिंटेंडेंटसाहेबांकडे वहीची मागणी केली.

सुपरिंटेंडेंटांनीं वही पाठविली, ती दीड रुपये किंमतीची होती. ती घेऊन मीं सरळ बापूजींकडे गेलें आणि त्यांना ती दाखविली. त्यांनीं पहिलाच प्रश्न केला, "केवढ्यांत मिळाली ?"

'मला माहीत नाहीं.' मीं म्हटलें.

'जा, विचारून ये आणि वही केवढ्याला मिळाली हें मला सांग.' बापू म्हणाले.

मीं जाऊन विचारलें, तों सुपरिंटेंडेंट कटेलीसाहेब म्हणाले, "बापूजींना कांहीं सांगण्याची जरूरी नाहीं."

तेव्हां मी त्यांना सांगितलें, "एक तर, त्यांना न विचारतां मीं वही मागविली. आतां त्या वहींत उत्तर लिहिलें, तर बापू माझा खरपूस समाचार घेतील."

मग सुपरिंटेंडेंटांनीं मला बिल दिलें.

दीड रुपयाचें तें बिल पाहून बापू मला म्हणाले,

"तुला वाटत असेल, आपला पैसा खर्च होत नाहीं, इंग्रज सरकाराचा होत आहे. आणि आपल्याला इथें इतक्या सवलती मिळाल्या आहेत; तेव्हां वाटेल ती वस्तु मागविण्यास कांहीं हरकत नाहीं. पण हा तुझा मोठा भ्रम आहे. हा पैसा इंग्रज सरकारानें कोठून आणला ? खरोखर हा आपलाच पैसा खर्च होत आहे. अशी पक्या पुठ्ठ्याची वही भूमितीसाठीं तुला कशाला हवी ? आपल्याजवळ कॅलेंडरच्या तारखांचीं पानें पुष्कळ पडलीं आहेत. त्यांची पाठीमागची बाजू अगदीं कोरी आहे. त्यावर तूं उत्तरें लिही नि ही वही परत कर."

मीं वही परत केली. दुपारीं सुपरिंटेंडेंट टपाल देण्यास बापूजींकडे गेले. तेव्हां त्यांनाहि बापूजींनीं वही परत करण्यास सांगितलें. संध्याकाळीं जमादारानें वही परत करून दीड रुपया परत आणल्याची खूषखबर बापूजींना दिली, तेव्हां हें वही–प्रकरण मिटलें. २६

## अपरिग्रह

परिग्रह म्हणजे संचय किंवा एकत्र करणें. सत्यशोधक–अहिंसक माणूस परिग्रह करूं शकत नाहीं. परमात्मा परिग्रह करीत नाहीं. त्याला

हव्या वाटणाऱ्या वस्तु तो रोजच्या रोज निर्माण करतो. म्हणून आपला जर परमात्म्यावर विश्वास असेल तर आपण समजून असावें कीं, आपल्याला लागणाऱ्या वस्तु तो रोजच्या रोज देत असतो, देत जाईलहि. अवलियांचा, भक्तांचा, असा अनुभव आहे. रोजच्यापुरतेंच निर्माण करण्याचा हा ईश्वरी नियम आपल्याला माहीत नसतो, अथवा माहीत होऊनहि आपण त्यांचें पालन करीत नाहीं. त्यामुळें जगामध्यें विषमता व विषमतेपासून उद्भणारीं दु:खें, आपल्याला अनुमवावीं लागतात. धनाढ्य इसमाच्या घरीं त्याला जरूर नाहीं अशा वस्तु सांठलेल्या असतात, अस्ताव्यस्त पडलेल्या असतात, कुजत असतात, तर इकडे त्यांच्या अभावीं करोडों गोरगरिबें रडत असतात, भुकीं मरत असतात, थंडीनें गारठत असतात. सर्वांनीं आपल्यास जरूर तेवढाच संग्रह केला, तर कोणालाच वाण पडणार नाहीं व सर्वांनांच संतोष लाभेल. आज तरी दोघांच्याहि मागें भीक लागलेली आहे. कोटचधीश असतो तो अब्जाधीश होऊं पाहतो, आणि तेवढ्यावरहि त्याला संतोष होत नाहीं. कंगाल असतो तो कोटचधीश होण्याची इच्छा करतो. कंगाल इसमाला पोटापुरतें मिळालें तर तेवढ्यानें त्याला संतोष झाला, असेंहि दिसत नाहीं.

पण कंगालाला पोटापुरतें मिळणें हा त्याचा हक्क आहे, आणि त्याला तेवढें मिळेलसें करून देणें समाजाचें कर्तव्य आहे. म्हणून त्याला संतोष व्हावा व आपल्यालाहि व्हावा, यासाठीं धनाढ्य लोकांनीं पुढें सरलें पाहिजे. त्यानें आपला फाजील परिग्रह सोडून दिला तर कंगालाला स्वत:पुरतें सहजीं मिळून जाईल व दोन्ही पक्ष संतोषाचा धडा शिकतील.

आदर्शभूत नि:सीम अपरिग्रह तर, जो मनानें व कर्मानें दिगंबर आहे त्याचाच होय. म्हणजे तो पक्ष्याप्रमाणें घराशिवाय, वस्त्राशिवाय व अन्नाशिवाय फिरत राहील. अन्न महणाल तर त्याला लागेल तेवढें रोजच्या रोज भगवान पुरवीत जाईल. असल्या अवधूत स्थितीला क्वचितच कोणी पोंचणार. आपण पडलों सामान्य दर्जाचे सत्याग्रही, जिज्ञासु. आपण आदर्शावर नजर ठेवून आपला परिग्रह नित्य तपासीत जावें व होईल तोंपर्यंत कमी कमी करीत जावें. खऱ्या सुधारणेचें, खऱ्या संस्कृतीचें लक्षण परिग्रहाचीं वाढ नसून त्याचें विचारपूर्वक व हेतुपूर्वक आकुंचन करणें हेंच होय. आपण

जसजसे परिग्रह कमी करीत जातों; तसतसें खरें सुख व खरा संतोष हीं वाढत जातात, सेवाशक्ति वाढते.

अनावश्यक परिग्रहामुळें आपण शेजाऱ्याला चोरी करण्याच्या मोहांत पाडीत असतों. अभ्यासानें मनुष्य आपल्या गरजा कमी करूं शकतो; आणि जसजसा तो त्या कमी करीत जातो; तसतसा तो सुखी, शांत व सर्व दृष्टींनीं आरोग्यवान बनत असतो. केवळ सत्याच्या, आत्म्याच्या दृष्टीनें विचार केल्यास शरीरसुद्धां परिग्रहच आहे. भोग-लालसेपायीं आपण शरीराचें आवरण उभें केलें आहे व तें टिकवून धरीत आहों. भोगेच्छा पार क्षीण झाली कीं मग शरीराची आवश्यकता रहात नाहीं, म्हणजे मनुष्याला नवीन देह धारण करावयाचा रहात नाहीं. आत्मा सर्वव्यापी आहे; मग त्यानें शरीररूपी पिंजऱ्यामध्यें स्वतःला कां कोंडून घ्यावें? हा पिंजरा टिकवून धरण्यासाठीं नाहीं नाहीं त्या गोष्टी कां कराव्या? दुसऱ्यांना कां मारावें? या दिशेनें विचार केला असतां आपण आत्यंतिक त्यागाशीं येऊन पोचतों, आणि असा धडा शिकतों कीं, शरीर असेल तोंपर्यंत त्याचा उपयोग केवळ सेवेसाठीं करावा आणि तो येथपर्यंत कीं सेवा हाच त्याचा खराखुरा आहार होऊन रहावा. शरीरानें खायचें, प्यायचें, पडायचें, बसायचें, जागायचें, झोंपायचे, तें सर्व कांहीं सेवेसाठींच. यापासून उद्भवणारें सुख हेंच खरें सुखहोय. असें करणाऱ्या मनुष्याला अखेरीस सत्याचें दर्शन होणारच.

एवढेंहि ध्यानांत बाळगणें योग्य आहे कीं, ज्याप्रमाणें वस्तूंचा त्याप्रमाणेंच विचारांचाहि अपरिग्रह घडला पाहिजे. जो मनुष्य आपल्या मेंदूमध्यें निरर्थक ज्ञान सांठवून ठेवतो तो परिग्रही होय. जे विचार आपल्याला ईश्वरापासून विन्मुख ठेवितात, किंवा जे आपल्याला ईश्वरासन्निध घेऊन जात नाहींत, त्यांची परिग्रहामध्येंच गणना होते; अर्थात् ते त्याज्य आहेत. ज्ञानाची अशा तऱ्हेचीं व्याख्या भगवंतांनीं तेराव्या अध्यायांत दिली आहे; तिचा या ठिकाणीं विचार करणें उचित आहे. अमानित्व इत्याहि गुणांची यादी देऊन भगवान् म्हणतात कीं, त्याव्यतिरिक्त तें सर्व अज्ञान होय. हें वचन खरें असेल-आणि खरें तर आहेच-तर मग आज आपण ज्ञानाच्या नांवाखालीं सांठवून धरतों असें पुष्कळसें खरोखरी अज्ञानच आहे. त्यापासून लाभ होण्याऐवजीं हानिच होत असते. यावरून कोणी मंदतेचें मात्र समर्थन करूं नये. प्रत्येक क्षण कामांतच गेला

पाहिजे. एवढेंच कीं तें काम सात्त्विक असावें, सत्याकडे घेऊन जाणारें असावें. ज्यानें सेवाधर्म पत्करला त्याला एक क्षणसुद्धां आळसांत घालविण्याची मोकळीक नाहीं. सार व असार यांमधील भेद मात्र लक्षांत घेतला पाहिजे. सेवापरायण इसमाला हा विवेक सहजीं प्राप्त होतो. २७

## बोधक प्रसंग

**म. गांधी:—**

ज्या दिवशीं संध्याकाळीं मला नजराणे मिळाले, त्या दिवशींची रात्र मीं बावरलेल्या स्थितींत जागून कांढली. मी खोलींत येरझारा घालीत राहिलों. पण माझें कोडें काहीं सुटेना. शेंकडों रुपयांचे नजराणे सोडून देणें मनाला कठिण वाटे, पण ते ठेवून घेणें त्याहून कठिण वाटत होतें.

मी एक असले नजराणे पचवूं शकेन; पण माझ्या मुलांचें काय ? पत्नीचें काय ? त्यांना मी सेवेचें शिक्षण देत असे; सेवेबद्दल मोबदला घेणें योग्य नाहीं असें सांगत असे. घरामध्यें मी मौल्यवान् दागिने वगैरे ठेवीत नसे. राहाणी अधिकाधिक साधी होत होती. अशा स्थितींत सोन्याचीं घड्याळें वापरणार कोण ? सोन्याचे शेडे आणि हिरेजडित आंगठ्या कोणी वापराव्या ? त्या काळींसुद्धां मी इतरांना दागिन्यांची हौस सोडून देण्यास सांगत असे. मग मला या दागिन्यांचा आणि जवाहिरांचा उपयोग काय ?

मीं या वस्तु ठेवून घेतां कामा नये, अशा निर्णयावर मी आलों. पारशी रुस्तुमजी इत्यादिकांना त्या दागिन्यांचे ट्रस्टी नेमून त्यांच्या नांवें लिहून देण्याचा लेख मीं लिहून काढला, आणि सकाळीं स्त्री-पुत्रादिकांचा विचार घेऊन स्वत:वरील भार हलका करण्याचा निश्चय केला.

पत्नीची समजूत घालणें कठिण जाणार हें मी समजून होतों. मुलांची समजूत घालण्यांत बिलकूल अडचण येणार नाहीं, याबद्दल मला खात्रीच होती. त्यांनाच माझे वकिल करण्याचा मीं बेत केला.

मुलांची लगेच समजूत पटली. "आम्हांला या दागिन्यांची जरूर नाहीं. आपण ते सर्व परत करा. आणि त्यांतून आम्हांला असल्या वस्तु लागल्या, तर आमचे आम्हींच नाहीं कां घेऊं शकणार ?" असें ते म्हणाले.

मला आनंद वाटला. "तर मग आईची तुम्ही समजूत घालाल ना ? " मीं विचारलें.

" जरूर; जरूर. तें आमचें काम. तिला तरी हे दागिने थोडेच अंगावर घालायचे आहेत ? ती ठेवणार आमच्यासाठींच. आम्हांला तर त्यांची जरूर नाहीं. मग ती कशाला हट्ट करते ? "

पण वाटलें होतें त्याहून तें काम कठिण ठरलें. कस्तुरबाला मुलांनीं माझी सारी योजना समजावून सांगितली; तेव्हां ती म्हणाली, " तुम्हांला एक नसेल जरूर नजराण्यांची, तुमच्या मुलांनाहि नसेल. मुलांचें काय ? जशीं चढवावीं तशीं चढतात. दागिने मला नाहीं घालूं दिलेत तरी हरकत नाहीं; पण माझ्या सुनांचें काय ? ते त्यांच्या तर उपयोगीं पडतील ? आणि उद्यांचा दिवस कसा येईल हें कोणीं पाहिलें आहे ? इतक्या प्रेमानें दिलेल्या वस्तु परत करणें बरें नाहीं. " अशा तऱ्हेनें तिची वाग्धारा सुरू झाली आणि त्यांतच अश्रुधाराहि येऊन मिसळली. मुलें भक्कम राहिलीं; मला डगमगण्याचें कारणच नव्हतें.

मीं हळूंच म्हटलें, " मुलगे लग्न करतील तेव्हांची गोष्ट. आपल्याला कुठें बाल वयांत लग्नें करून द्यायचीं आहेत ? मोठे झाल्यावर स्वतःला वाटेल त्याप्रमाणें तीं करीनात कां ? आणि आपल्याला तरी दागिन्यांची हौस वाटणाऱ्या सुना थोडयाच शोधायच्या आहेत ? इतक्याउपर कांहीं दागिने लागलेच, तर मी कुठें गेलों नाहीं ना ? "

" तुमचे पराक्रम कळले ! माझे दागिनेहि काढून घेतले, तेच तुम्हीं कीं नाहीं ? मला धड घालूं दिले नाहींत, ते तुम्ही सुनांसाठीं काय घेणार ? मुलांना तर आजपासून बैरागी बनवतां आहां ! मला तें कांहीं कळत नाहीं. हे दागिने परत नाहीं करायचे. त्यांतून माझ्या हारावर तुमचा काय हक्क ? "

" पण तो हार तरी तुझ्या कामगिरीबद्दल मिळाला आहे, कीं माझ्या कामगिरीबद्दल ? " मीं विचारलें.

" त्याचें काय मोठेंसें ? तुमची कामगिरी ती माझी पण खरीच; मला रात्रंदिवस राबविलीत ही काय कामगिरी नव्हे ? मला रडवूनहि वाटेल त्याला घरांत ठेवलें, आणि माझ्याकडून त्याची चाकरी करविली, तें कुठें गेलें ? "

हे सर्व बाण तीक्ष्ण होते. त्यांतील कित्येक मला भेदूनहि जात होते.

पण दागिने तर मला परत करावयाचेच होते. पुष्कळशा गोष्टींबद्दल मी तिची जेमतेम कबुली मिळविली.

१८९६ सालीं मिळालेल्या आणि १९०१ सालीं मिळालेल्या भेटी परत दिल्या. त्यांचा ट्रस्ट केला आणि त्यांचा सार्वजनिक कार्यासाठीं, माझ्या किंवा ट्रस्टींच्या इच्छेनुरूप, उपयोग व्हावा अशी अट ठरवून त्या बँकेंत ठेविल्या. हे दागिने गहाण ठेवून मी पुष्कळदां पैसे काढूं शकलों आहें. आजमितीलाहि तो "आपत्ति-निधि" म्हणून शिल्लक आहे, व त्यांत भरहि पडत गेली आहे.

या कृत्यांबद्दल मला कधींहि पश्चात्ताप वाटलेला नाहीं. कालांतरानें कस्तुरबालाहि त्यांतील रास्तपणा समजून आला. आणि आम्ही पुष्कळ मोहांपासून बचावलों. २८

**जी. ए. नटेसन:—**

१९१५ सालचा एप्रिल महिना. एके दिवशीं संध्याकाळीं मद्रास स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर प्रमुख नागरिकांची गर्दी उसळली होती. त्यांच्या हातांत पुष्पहार होते. आणि स्टेशनबाहेर टाळ्यांचा गजर करीत उभे राहिलेल्या लोकांचा जमाव तर प्रचंड होता.

गाडी आली आणि तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून एक पुरुष व एक स्त्री खालीं उतरली. त्यांच्या हातांत कापडाचीं बोचकीं होतीं. तीं पाहून कोणालाहि असें वाटलें असतें कीं, मद्रास शहर पाहण्यासाठीं खेड्यांतून हें शेतकऱ्यांचें कुटुंब आलें आहे.

पण ते होते महात्माजी व कस्तुरबा. त्यावेळीं गांधीजींच्या डोक्यावर काठेवाडी रुमाल होता व अंगांत खादीचा गुजराती पद्धतीचा सदरा होता. दूर देशांत दिग्विजय गाजवून आलेल्या सेनापतीला शोभेसा तो वेष खासच नव्हता.

गांधीजी माझ्या घरीं उतरले होते. त्यांच्या रहाण्याची व्यवस्था कशी करावी, याविषयीं आम्ही खूप दिवस भवति-न-भवति केलेली होती. कमींत कमी वस्तूंनीं त्यांची रहाण्याची सोय साधावीं, असें धोरण आम्ही ठेवलें होतें. दोन खाटा, एक गादीची खुर्ची, एक टेबल व एक डेस्क—एवढेंच सामान आम्ही त्यांच्या खोलींत ठेवलें होतें.

ती खोली मी गांधीजींना जेव्हां दाखविली, तेव्हां ते क्षणभर आश्चर्यानें चकित होऊन मजकडे पहातच राहिले–आणि नंतर मोठमोठ्यानें हसूं लागले.

'त्या खाटा काढा, सारें फर्निचर हलवा, जमिनीवरील जाजमहि नको.' भराभर गांधीजी सांगूं लागले. त्यांना साधी रिकामी खोली हवी होती. तिच्यांतील तीं चैनीचीं चिन्हें दूर केल्याशिवाय, त्यांना चैन पडलें नाहीं. २९

**व्रिजकिशोर चांदीवालाः—**

बापूजी दिल्ली येथें ता. २९ डिसेंबर १९३४ रोजीं आले. 'हरिजन-निवासांत' ते राहिले. ते एक महिना तेथें रहाणार होते. 'निवास' नुकताच सुरू झाला होता. पक्कें घर असें एकच बांधून झालें होतें. तें बापूंसाठीं ठेवलें होतें व त्यांच्या सहकाऱ्यांसाठीं तंबू ठोकले होते. त्या सालीं थंडीचा कडाका इतका होता कीं, रात्रींच्या वेळीं पाणी गोठून बर्फ होई.

त्या वेळीं गांधीजी 'ग्रामोद्योग संघा'कडे विशेष लक्ष देत होते. त्यांनीं स्वत:साठीं झोपडी असावी अशी इच्छा प्रदर्शित केली होती. पण त्यांना दिसलें पक्कें घर. त्याबद्दल ते कार्यकर्त्यांना खूप बोलले. 'एक साधी झोपडी–वर गवताचें छप्पर–असें मला हवें होतें.' ते म्हणाले. खेडुतांच्या–हरिजनांच्या प्रतिनिधीला साजेशी झोपडीच मला योग्य झाली असती, असेंहि ते म्हणाले.

नवारीची खाट पाहून तर ते म्हणाले, "खाटेची कांहींच गरज नाहीं. चटईवर चादर अंथरली कीं झालें काम. आरोग्यासाठीं जरूरच असेल, तर खाट वापरण्यास माझी हरकत नाहीं. पण शक्य तोंवर खाटे-शिवाय निजण्याचा माझा प्रयत्न आहे."

"पण बापू, गरिबांतील गरीब खेडूतहि चारपाई वापरतो ना!" प्रो. मलकानींनीं कैफियत दिली.

"आहे–मला माहीत आहे तें. आपल्या पथ्यावर पडणाऱ्या गोष्टींत तेवढा त्यांचा दाखला घ्यावयाचा कां? इतर गोष्टींत त्यांच्यासारखें आपण

कोठें वागतों ? त्यांचेपेक्षां चांगलें अन्न, चांगले कपडे आपल्याला लागतात. निदान खाटेच्या बाबतींत तरी, त्यांचेपेक्षांहि साधेपणानें राहिल्याचें समाधान आम्हांला मिळूं द्या. " गांधीजींनीं उत्तर दिलें.

थुंकी टाकण्यासाठीं एक पिकदाणी आणण्यास बापूंनीं मला सांगितलें. तें काम मी माझ्या एका सहकाऱ्याला सांगितलें. त्यानें बाजारांतून एक नवी मुरादाबादी पिकदाणी दीड रुपयास आणली व ती त्यांच्या टेबलावर ठेवली. ती पाहतांच बापूजी भडकले. ' कोणी आणली ही पिकदाणी ? ' त्यांनीं विचारलें.

" उसनीच आणायला हवी होती. आणि विकत आणायचीच तर चार-सहा आण्यांची आणावयास हवी होती. " अशी सारवासारव मी करूं लागलों. पण व्यर्थ.

" म्हणजे,चार आणे खर्च करायला तुम्हांला कांहींच वाटलें नसतें ? आतांच्या आतां ही पिकदाणी परत करा. एक मातीचें भांडें-जवळजवळ फुकट मिळतें असें-त्यानें माझें काम भागेल. यापुढें माझ्या परवानगीशिवाय तुम्ही माझ्यासाठीं कांहीं खरेदी केलें, तर मला तुमच्याशीं असहकार करावा लागेल. " गांधीजींनीं बजावलें. ३०

**आर. के. प्रभुः—**

साबरमती आश्रमांत सायंप्रार्थना झाली. नंतर भाषण करतांना गांधीजी म्हणाले, "आज मी तुम्हांला एक मूर्खपणाची घटना सांगणार आहें. तींत आम्ही तिघे समान भागीदार आहों. कदाचित् माझीच भागी सर्वांत जास्त असेल. कारण मी आश्रमाचा प्रमुख आहें ना ! तेव्हां तुम्हां कोणापेक्षांहि मी अधिक जागरूक रहावयास हवें. "

सर्वांना आश्चर्य वाटलें. गांधीजींनीं जी घटना निरूपिली ती अशी होती :—

गांधीजींच्या खोलींत भिंत व छप्पर यांच्यामध्यें एक जाळी होती. ती हवा येण्यासाठीं ठेवलेली होती, पण तींतून सूर्याचे किरणहि येत-आणि सरळ गांधीजींच्या तोंडावर पडत. तेव्हां तेथें पडद्यासारखें लावण्यास त्यांनीं एका आश्रमवासियास सांगितलें.

त्या आश्रमवासियानें तें काम दुसऱ्यावर सोंपविलें. त्यानें एका सुताराला आणलें. सुतारानें गांधीजींना विचारलें, "फळी लावण्यापेक्षां चांगली झडप लावणेंच बरें नव्हे कां?"

गांधीजींना आपली चूक कळून आली. ती त्यांनीं त्या दोघां आश्रमवासियांना सांगितली. नंतर सकाळीं भेटीस आलेल्या स्त्रियांना सांगितली आणि शेवटीं प्रार्थना–सभेंत जाहीर केली. ते म्हणाले,

"आपण गरिबीचा वसा घेतलेला आहे. आपण करावी अशी ही गोष्ट नाहीं. ही झडप बसविण्यास सुताराचे तीन तास व आपले दोन रुपये खर्ची पडले असते. पण या झडपेचें काम कापडाच्या एका तुकड्यानेंहि केलें असतें, हें मला आधींच कळावयास हवें होतें. कापड किंवा पुठ्ठा यांना कांहींच खर्च आला नसता. आणि दोन खिळे घेऊन ते कोणीहि बसवूं शकला असता. अशा लहान लहान गोष्टींतूनच आपली सत्त्व–परीक्षा होत असते. जे गरिबीनें वागतात, त्यांनाच 'देवांचें राज्य' लाभतें. म्हणून, प्रत्येक बाबतींत, आपण आपल्या गरजा कमी करण्यास शिकूं या. गरिबांच्या इतक्याच गरजा आपण आपल्या ठेवूं या व खऱ्या अर्थानें गरिबी वृत्ति आपण धारण करूं या." ३१

### आचार्य कालेलकरः—

सरकारनें गांधीजींना, पुनः येरवड्यांत, १९३२ च्या जानेवारींत कोंडून ठेवलें. गोलमेज परिषदेस जाऊन आलेले व बकिंगहॅम राजवाड्यांत राजेसाहेबांना भेटलेले गांधीजी–म्हणून त्यांच्याकडे सरकारी अधिकारी जरा आदराच्या दृष्टीनें पाहूं लागले होते.

मुख्य तुरुंगाधिकारी मेजर मार्टिन हे होते. त्यांनीं गांधीजीच्या सुखसोयींसाठीं खुर्च्या–टेबलें वगैरे सामान आणविलें आणि कपबशाभांडीं इत्यादींचाहि भरपूर सांठा केला.

"हें सारें कोणासाठी आणलें आहे तुम्ही? कृपा करा आणि हें येथून घेऊन जा कसें." गांधीजीं उद्गारले.

मेजर मार्टिन यांनीं खुलासा केला, "मध्यवर्ती सरकारनें आपल्यासाठीं दरमहा किमान १५० रुपये खर्च करण्यास आम्हांस मुभा दिली आहे.

ही रक्कम ३०० रु. तरी असावी, अशी मागणी मीं केली आहे आणि ती मंजूर होईल अशी मला आशा आहे. "

" तें ठीक आहे. पण हा पैसा हिंदुस्थानाच्या तिजोरींतून येतो ना ! मला माझ्या देशावरील आर्थिक बोजा वाढवावयाचा नाहीं. माझा येथें रहाण्याचा खर्च महिन्याला ३५ रुपयांपेक्षां अधिक होणार नाहीं, अशी मी आशा करतों. "

सारें सामानसुमान परत नेण्यांत आलें. ३२

## अभय

सोळाव्या अध्यायांत दैवी संपत्तीचें वर्णन करतांना अभयाला सहजींच प्रथम स्थान मिळालें असलें, तरी तें यथायोग्यच आहे. अभयाच्या अभावीं इतर संपत्ति हातीं लागणारच नाहीं. अभयाखेरीज सत्याचा शोध व्हावाच कसा ? अभयाखेरीज अहिंसेचें पालन कसें होणार ? "हरिनो मारग छे शूरानो नहि कायरनुं काम जोने" सत्य म्हणजेच हरि, राम, नारायण, वासुदेव, कायर म्हणजे भयभीत, भ्याड, 'शूर' म्हणजे भयमुक्त; तरवारीचे हात वगैरे शिकलेला नव्हे. तरवार ही शूराचें चिन्ह नव्हे, भीतीची निशाणी आहे.

अभय म्हणजे सर्व तऱ्हेच्या बाह्य भयापासून मुक्ति. मृत्यूचें भय, धनदौलत चोरीस जाण्याचें भय, कुटुंबपरिवारासंबंधीचें भय, रोगाचें भय, शस्त्रप्रहाराचें भय, अब्रूचें भय, कोणी नाराज होईल याचें भय, अशा तऱ्हेनें भयांची वंशावळ वाटेल तेवढी लांबवितां येईल. केवळ एका मृत्यूचें भय जिकलें कीं सर्व भयें जिंकलीं असें सामान्यतः म्हटलें जातें; पण तें बरोबर दिसत नाहीं. पुष्कळ जणांनीं मृत्यूचें भय सोडलेलें असतें; पण तें इतर अनेक प्रकारच्या दुःखांपुढें पळ काढतात. ते जिवावर उदार असतात, पण सांठविलेलें धन सोडतांना त्याचा जीव कासावीस होईल. कोणी स्वतःची मानीव अब्रू किंवा प्रतिष्ठा संभाळून धरण्यासाठीं अनेक भलीबूरी कर्में करायला उद्युक्त होईल, व करीलहि. लोकनिंदेच्या भयानें, सरळ मार्ग दिसत असतांहि, कोणी तो सत्याचा शोध करणारानें या सर्व भयांना दूर केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. हरिश्चंद्राप्रमाणें सर्वस्वाची पायमल्ली करून घेण्याची त्यांची तयारी असली पाहिजे. हरिश्चंद्राची कथा काल्पनिक कां असेना, पण

प्रत्येक आत्मार्थी मानवाचा असाच अनुभव आहे; अर्थात् या कथेची किंमत कोणत्याहि ऐतिहासिक कथेपेक्षां अनंतपटीनें अधिक आहे. ही कथा आपण सर्वांनीं हृदयाशीं धरण्यासारखी, मनन करण्यासारखी आहे.

अभय-व्रताचें संपूर्ण पालन जवळ जवळ अशक्य आहे. सर्व तऱ्हेच्या भयांमधून मुक्तता एक त्यालाच लाभेल कीं, ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे. अभय ही निर्मोह स्थितीची पराकष्ठा होय. निश्चय केल्यानें, सतत प्रयत्न केल्यानें, आत्म्यावरील श्रद्धा वाढत गेल्यानें, अभयाचें प्रमाण वाढूं शकेल. आपल्याला बाह्य भयापासून मुक्तता मिळवावयाची आहे. अंतरांत वास करणारे जे शत्रु, त्यांना तर भिऊनच चाललें पाहिजे. कामक्रोधादिकांचें भय हेंच खरेंखुरें भय होय. त्यांना जिंकलें तर भीतिदायक बाह्य वस्तूंचा उपद्रव आपोआप नाहींसा होईल. सर्व भीति एका देहामुळें आहे. देहावरील ममता झडली; तर अभय सहजीं प्राप्त होईल. सर्व भयें आपल्या कल्पनेचे खेळ आहेत. पैशामधून, कुटुंबामधून, शरीरामधून 'माझे'पणा काढून टाकला कीं मग भय राहिलेंच कोठें? 'तेन त्यक्तेन भुञ्जीथाः' हें रामबाण वचन आहे. कुटुंब, पैसा, देह, आहेत तशींच राहणार. आमची त्यांच्याबद्दलची कल्पना बदलली म्हणजे झालें. तीं 'आपलीं' नव्हत, 'माझीं' नव्हत; तीं ईश्वराचीं आहेत; 'मी' सुद्धां त्याचाच आहें; माझें असें या जगांत कांहींच नाहीं. मग मला डर ती कसची? आपण त्याचे रखवालदार म्हणून रहावें. तो ईश्वरच आपल्याला त्यांचें रक्षण करण्यापुरती शक्ति व सामुग्री देईल. अशा तऱ्हेनें धनीपणा सोडून चाकर बनलों, शून्यवत् होऊन गेलों, तर सहजींच सर्व भयें जिंकूं, सहजींच शांति प्राप्त करूं, सत्य-नारायणाचें दर्शन करूं. ३३

## बोधक प्रसंग

**म. गांधीः--**

द. आफ्रिकेंत ता. १० फेब्रुवारी १९०८ रोजीं सकाळीं आम्ही परवाना घेण्यास निघालों. त्या पहिल्या दिवशीं, प्रथम पुढाऱ्यांनीं परवाना घ्यावा असें ठरलें. कारण, त्यामुळें इतर लोकांचा संकोच दूर होईल, अधिकारीवर्ग आपलें काम कसें बजावतो हें कळेल व एकंदर व्यवस्थेवर लक्ष ठेवतां येईल.

मी माझ्या ऑफिसांत गेलों. तेंच ‘ सत्याग्रह संघाचेंहि ’ ऑफिस होतें. तेथें मीं गेलों, तेव्हां मीर आलम व त्याचे दोस्त असे कांहीं पठाण आवाराच्या बाहेर उभे होते. मीर आलम हा माझा एक जुना अशील होता. तो आपल्या साऱ्या व्यवहारांत माझा सल्ला घेई. गवताच्या चटया करण्याचा धंदा तो करी.

मीर आलम शरीरानें धिप्पाड व सशक्त होता. त्याची उंची सहा फुटांपेक्षां अधिक होती. त्या दिवशीं प्रथमच मी त्याला ऑफिसांत न बसतां बाहेर उभा पाहिला. त्याच्या–माझ्या डोळ्यांची भेट झाली, पण त्यानें मला सलाम केला नाहीं. ही गोष्टसुद्धां प्रथमच घडली. मीं त्याला सलाम केला, तेव्हां त्यानेंहि मला उलट सलाम केला. नेहमींप्रमाणें मी त्याला विचारलें, “ कैसे हो ? ”

“ठीक आहे” असें त्यानें उत्तर दिल्याचें मला आठवतें. पण नेहमींचें हास्य त्या दिवशीं त्याच्या तोंडावर नव्हतें. त्याचे डोळे रागानें लाल झालेले आहेत, हें माझ्या लक्षांत आलें. ‘ आतां कांहीं तरी घडणार ’ असें मला वाटूं लागलें. मी माझ्या ऑफिसांत गेलों.

अध्यक्ष मि. युसफ मियाँ व इतर कांहीं मित्र आले. आम्ही सारेजण ‘ एशियाटिक ऑफिस ’ कडे निघालों. आमच्या पाठोपाठ मीर आलम व त्याचे दोस्त आले.

नोंदणीचें ऑफिस माझ्या ऑफिसपासून एक मैलाहून कमी अंतरावर होतें. नोंदणी ऑफिसपासून तीन मिनिटांच्या अंतरावर आम्ही आलों, तेव्हां मोठ्या रस्त्यावर, एका दुकानासमोर, मीर आलमनें मला हटकलें,

‘ कोठें चाललात ? ’

“ मी दहा बोटांचे ठसे देऊन परवाना आणायला जात आहें. तुम्ही मजबरोबर आला, तर आधीं तुमचा परवाना मी मिळवून देईन. तुम्ही फक्त दोन आंगठ्यांचे ठसे दिले, तरी चालेल. नंतर मी दहा बोटांचे ठसे देऊन माझा परवाना......

माझें शेवटचें वाक्य पूर्ण होण्याच्या आंतच, माझ्या डोक्यावर पाठी-मागून, एका जाड सोटयाचा तडाखा बसला. ‘ हे राम ’ हे शब्द माझ्या तोंडून निघाले व मी तत्काळ बेशुद्ध झालों व जमिनीवर पडलों. पुढें काय घडलें याचें मला भानच नव्हतें.

पण मीर आलम व त्याचे दोस्त यांनीं हातांनीं, बुक्क्यांनीं व पायांनीं मला मारलें. युसफ मियां व थंबी नायडू यांनीं त्यांचें निवारण करण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम म्हणजे, त्यांचेवरहि हल्ला सुरू झाला.

आरडाओरड ऐकून, रस्त्यानें जाणारे कांहीं युरोपियन तेथें आले. तेव्हां मीर आलमनें आपल्या दोस्तांसह पळ काढला. पण त्यांना त्या युरोपियनांनीं पकडलें. इतक्यांत पोलिसहि आले. त्यांनीं त्या पठाणांना आपल्या ताब्यांत घेतलें.

मला लोकांनीं उचललें व गिब्सनच्या खाजगी कचेरींत नेलें. मी शुद्धीवर आलों, तेव्हां मि. डोक वांकून मला विचारीत होते,

" कसं काय वाटतंय् आतां ? "

" बरं वाटतंय्, पण दांत व बरगड्या यांत मात्र वेदना होत आहेत. मीर आलम कोठें आहे ? "

" इतरांबरोबर त्यालाहि पकडण्यांत आलें आहे. "

" त्यांना मुक्त केलें पाहिजे. "

मि. डोकनीं मला आपल्या घरीं नेलें. तेथें जातांच पहिली गोष्ट मी केली, ती म्हणजे दहा बोटांचे ठसे देऊन परवाना सर्वांआधीं घेणें. आणि दुसरी गोष्ट मी केली, ती म्हणजे, अॅटर्नी जनरलास तार. त्या तारेंत मीं म्हटलें होतें, " माझ्यावरील हल्ल्याला मीर आलम व त्याचे दोस्त यांना मीं जबाबदार धरीत नाहीं. त्यांच्यावर मला खटले भरावयाचे नाहींत. त्यांची सुटका करण्यांत यावी. "

पण जोहान्सबर्गच्या युरोपियनांनीं अॅटर्नी जनरलला एक कडक पत्र लिहून कळविलें कीं, " गुन्हेगारांना शिक्षा देण्याबाबत गांधींचीं मतें कांहींहि असोत, त्यांची अंमलबजावणी दक्षिण आफ्रिकेंत होऊं शकणार नाहीं. गुन्हा सार्वजनिक रस्त्यावर झाला आहे, म्हणून तो सार्वजनिक स्वरूपाचा गुन्हा आहे. पुष्कळ इंग्रजहि साक्ष देण्यास तयार आहेत. गुन्हेगारावर खटला भरलाच पाहिजे. "

अॅटर्नी जनरलनें मीर आलमला व त्याच्या एका दोस्ताला पुनः पकडलें. त्यांना ३ महिने स. म. शिक्षा झाली. मला मात्र साक्षीस बोलावलें नव्हतें.

मला बोलण्यास बंदी होती, म्हणून मी आमच्या लोकांना उद्देशून एक छोटेसें पत्रक काढलें. त्यांत मी म्हटलें, " ज्यांनीं तें कृत्य केलें, त्यांना

आपण काय करीत आहों, हें माहीत नव्हतें. मी कांहीं चूक करीत आहें, असें त्यांना वाटलें. त्यावर त्यांना एकच उपाय माहीत होता व त्याचा त्यांनीं अवलंब केला. म्हणून त्यांना कांहींहि शासन होऊं नये अशी माझी विनंति आहे. आज हें जें रक्त सांडलें गेलें, त्यामुळें हिंदु-मुसलमानांचें ऐक्य दृढ होवो, अशी माझी हार्दिक प्रार्थना आहे. ती ईश्वर सफळ करो." ३४

**बा. द. कालेलकरः--**

राजकोट येथें १९३८ सालीं गांधीजींनीं आपलें उपोषण सुरू केलें; त्यावेळीं त्यांची सेवाशुश्रूषा करणारांपैकीं मी एक होतों. संस्थानांतील चळवळीला अखिल भारतीय स्वरूप आलें होतें. याचा राग कांहीं संस्थांनीं अधिकारी व कांहीं जमीनदार यांना आला होता. त्यांनीं असा व्यूह रचला कीं, गांधीजींच्या प्रार्थना-सभेंत दंगल उडवून द्यावी, म्हणजे जनता त्यांच्या-पासून दूर राहील.

त्यासाठीं त्यांनीं भाडोत्री गुंडांची टोळी मदतीस घेतली आणि त्या गुंडांना लाठ्या-काठ्या पुरविल्या. संध्याकाळची प्रार्थना सुरू झाली. तिला प्रचंड जनसमुदाय जमला होता. प्रार्थना संपल्यावर हे भाडोत्री गुंड जमावांत घुसले आणि गांधीजींकडे जाऊं लागले. कॉंग्रेसचे स्वयंसेवक होते, पण निःशस्त्र ! ते या गुंडांना कसे आवरणार ? काठ्या परजीत गुंड पुढें पुढें बापूजींकडे चालले. बापूजी मोटारींत बसून निवासस्थानीं जाणार होते. त्यांच्याभोंवतीं स्वयंसेवकांचें कडे होतें. तें मोडून ते भाडोत्री गुंड गांधीजींजवळ गेले व त्यांना चोहोंबाजूंनीं गराडा घालून उभे राहिले.

मी मोठ्या शर्थीनें त्या दंगलींतून बापूजींजवळ गेलों. जमावांत धक्काबुक्की सुरू झाली होती आणि मोठी मारामारी केव्हां होईल याचा नेम नव्हता. मी बापूजींकडे पाहिलें तों त्यांचें सर्व शरीर लटलटा कांपत होतें, तें भीतीनें नव्हे, त्यांच्या चर्येवर पूर्ण निर्भयता खेळत होती. तेथील हिंसेचें भीषण स्वरूप पाहून त्यांना जो तिटकारा वाटत होता, त्यामुळें त्यांचें शरीर कांपत होतें. मला वाटलें, हे कोणत्या क्षणीं खालीं पडतील !

एकदम गांधीजींनीं आपले डोळे मिटले व प्रार्थना सुरू केली. राम-नामाचा जप ते अत्यंत भक्तीनें करूं लागले. मीहि त्या रामधूनमध्यें सामील झालों आणि ताल देण्यासाठीं गांधीजींच्या पाठीवर हात ठेवूं

लागलों. आणि काय आश्चर्य ! प्रार्थनेचें फळ मिळालें. बापूजींनीं आपले डोळे उघडले; तेव्हां त्यांच्या मुद्रेवर एक नवेंच तेज झळाळूं लागलें. दृढ स्वरांत त्यांनीं सर्व स्वयंसेवकांना व आमच्यासारख्या आश्रमीय मुलांना एकदम दूर जाण्यास सांगितलें. "मला एकट्याला या गुंडांच्या हातीं सोपवा. मी नेहमींप्रमाणें मोटारींतून घरीं येणार नाहीं; पायीं चालत येईन." असें आम्हाला सांगून बापूजी त्या गुंडांच्या म्होरक्याकडे वळले. तो सभा उधळण्यांत व्यग्र होता. त्याला हाक मारून बापूजी म्हणाले, "मीं केवळ तुमच्या हातीं स्वतःला सोपविलें आहे. तुम्हांला कांहीं बोलावयाचें असल्यास बोला. नसल्यास पुढें काय करणार तें सांगा."

बापूजींचा असा सरळ सवाल ऐकतांच त्या म्होरक्याचे अत्याचार थांबले. प्रेम व अहिंसा यांच्या तेजानें हिंसेचें बर्फ वितळलें. तो म्होरक्या दोन्ही हात जोडून गांधीजींपुढें उभा राहिला आणि आर्जवी स्वरांत म्हणाला, "माझ्या एका खांद्यावर आधारासाठीं आपण हात ठेवा. आपल्याला जेथें जावयाचें असेल तेथें मी सुखरूप पोंचवितों."

त्याप्रमाणें त्या गुंडाच्या खांद्यावर हात ठेवून बापूजी आपल्या घरापर्यंत चालत गेले. ३५

## आचार्य कालेलकरः--

चम्पारणची गोष्ट आहे. बापूमार्फत होणाऱ्या अन्याय-अत्याचारांच्या चौकशीमुळें जनतेंत थोडासा जीव येऊं लागला होता. ठिकठिकाणीं बापूंनीं ज्या शाळा उघडल्या, त्यांचाहि लोकांवर परिणाम होऊं लागला होता. निळीचे मळेवाले मोठ्या पेचांत होते.

कोणीं तरी बापूंना म्हटलें, 'येथला निळीवाला सगळ्यांत दुष्ट आहे. आपणांला ठार मारण्याचा त्याचा बेत आहे. त्याच्यासाठीं त्यानें मारेकरी ठेवले आहेत.'

हें ऐकतांच, एक दिवस रात्रीं, बापू एकटेच त्याच्या बंगल्यावर गेले आणि म्हणाले, "मी ऐकतों कीं, आपण मला ठार मारण्यासाठीं मारेकरी ठेवले आहेत. म्हणून कोणाला सांगितल्याशिवाय एकटाच आलों आहें.'

बिचारा गोरा गार झाला. ३६

## अस्पृश्यता-निवारण

हें व्रतहि अस्वाद-व्रताप्रमाणें नवीन आहे, आणि कांहींसें विचित्रहि वाटेल. विचित्र आहे. त्याहून आवश्यक अधिक आहे. अस्पृश्यता म्हणजे शिवाशिव. ही धर्माच्या नांवाखालीं किंवा धर्माचें सोंग आणून उलट धर्मामध्येंच जेथेंतेथें विघ्न आणीत असतें, व धर्माला कलुषित करते. आत्मा जर एकच आहे, ईश्वर एकच आहे, तर अस्पृश्य कोणीच नाहीं. ज्याप्रमाणें धेडभंग्यांना अस्पृश्य लेखण्यांत येतें पण ते अस्पृश्य नाहींत, त्याचप्रमाणेंच मृत देहसुद्धां अस्पृश्य नाहीं, तो मान व करुणा यांस पात्र आहे. मृत देहाचा स्पर्श झाल्यानंतर, किंवा अंगाला तेल लावल्यानंतर, किंवा हजामत केल्यानंतर किंवा करविल्यानंतर, आपण स्नान करतों तें केवळ आरोग्याच्या दृष्टीनें. मृत देहाचा स्पर्श झाल्यास, किंवा तेल लावल्यास किंवा लावून घेतल्यावर कोणी स्नान करीत नसेल तर त्याला वाटल्यास घाणेरडा म्हणा; परंतु तो पापी किंवा पातकी नव्हे. एरवीं आईलासुद्धां मुलाचें हगमूत काढल्यानंतर ती स्नान करीपर्यंत किंवा हातपाय धुवीपर्यंत अस्पृश्य मानली तर त्यांत कांहीं वावगे नाहीं; पण मूल खेळतां खेळतां तिला शिवलें तर त्याला नाहीं होणार विटाळ, कीं नाहीं त्याचा आत्माहि मलिन व्हायचा.

ज्यांना आपण हलकेपणाच्या अर्थानें भंगीं, धेड, चांभार इत्यादि नांवांनीं संबोधितो त्यांना तर जन्मतःच अस्पृश्य लेखण्यांत येतें. मग ते शेंकडों साबण खर्चकरून वर्षानुवर्ष अंग चोळून कां काढीतना, वैष्णवासारखा पोषाख कां करीतना, गळ्यांत तुळशीची माळ कां घालीतना, रोज गीता-पाठ कां करीतना, आणि धंदा कारकुनाचा कां करीतना, ते अस्पृश्य ते अस्पृश्यच. अशा तऱ्हेनें जो धर्म समजला जातो किंवा, धर्म म्हणून आचरिला जातो, तो धर्म नव्हे, तर अधर्मच आहे व नाशाला लायक आहे. अस्पृश्यता-निवारणाला व्रताचें स्वरूप देण्यांत आपण असें मानतों कीं, अस्पृश्यता हें हिंदुधर्माचें अंग नाहीं, एवढेंच नव्हे तर ही हिंदुधर्मांत शिरलेली घाण आहे, हा भ्रम आहे, पाप आहे, व तिचें निवारण करणें प्रत्येक हिंदूचा धर्म आहे, त्याचें तें परमकर्तव्य आहे. म्हणून जो तें पाप आहे असें मानतो, त्यानें त्याबद्दल प्रायश्चित्त करावें; आणि समजूतदार हिंदूंनीं कांहीं नाहीं तरी प्रायश्चित्त म्हणून, धर्मकार्य समजून, अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या प्रत्येक बंधु-

भगिनीशीं आपलेपणा जोडावा, त्यांना मनोभावानें, सेवाभावानें स्पर्श करावा; त्या स्पर्शानें आपण पुनीत झालों असें मानावें. 'अस्पृश्यां 'च्या अडचणींचें निवारण करावें; आज अनेक वर्षे त्यांना चिरडून टाकण्यांत आल्यामुळें त्यांच्यामध्यें जे अज्ञानादि दोष शिरले आहेत; ते काढून टाकण्यास त्यांनीं त्यांना सोशीकपणें मदत करावी.

या दृष्टीनें अस्पृश्यतेकडे पाहिलें असतां, तिचें निवारण करण्यापासून जे ऐहिक किंवा राजकीय फायदे होणार, ते व्रतधाऱ्याच्या दृष्टीनें क्षुल्लक होत. हे किंवा यांसारखे फायदे होवोत वा न होवोत, व्रत म्हणून अस्पृश्यता-निवारणाचें आचरण करणाऱ्यानें अस्पृश्य लेखलें जाणारांना धर्मबुद्धीनें आपलेसें करावें. सत्य वगैरे व्रतांचें आचरण करतांना आपण ऐहिक परिणामांचा विचार करूंच नये. व्रतधारी इसमाच्या बाबतींत सत्याचरण हें कांहीं एक धोरण नव्हे, ती त्याच्या हाडींमाशीं खिळलेली वस्तु आहे, त्याचा स्वभाव आहे; अस्पृश्यता-निवारणसुद्धां व्रतधाऱ्याला त्याचप्रमाणें आहे.

अस्पृश्यता-निवारण करणाऱ्यानें महार-चांभारांना आपलेसें करणें, एवढ्यावरच संतोष मानून बसतां कामा नये. जोंपर्यंत त्याला जीवमात्रांमध्यें स्वतःची ओळख पटली नाहीं, आणि स्वतःला त्यानें जीवमात्रांमध्यें अर्पून टाकलें नाहीं, तोंपर्यंत तो स्वस्थ बसणार नाहीं. अस्पृश्यता निवारणें म्हणजे उभ्या जगाशीं मैत्री जोडणें—त्याचा सेवक बनणें.

जीवमात्राबरोबरचा भेद पुसून टाकणें म्हणजेच अस्पृश्यतानिवारण. आपण त्याचा हिंदुधर्मावरील कीड या दृष्टीनें विचार केला आहे. कारण हिंदुधर्मामध्यें त्यानें धर्माचें स्थान पटकावलें कारण आहे, आणि धर्माच्या नांवाखालीं लक्षावधि, किंबहुना कोट्यवधि लोकांची गुलामांसारखी दशा करून सोडली आहे. ३७

## बोधक प्रसंग

**म. गांधीः—**

आश्रम अस्तित्वांत येऊन थोडेसे महिनेहि लोटले नाहींत, इतक्यांतच अनपेक्षित रीतीनें आमची कसोटी झाली. भाई अमृतलाल ठक्कर यांच्याकडून पत्र आलें, " एक गरीब व प्रामाणिक अंत्यज कुटुंब आहे. त्यांची इच्छा तुमच्या आश्रमांत येऊन राहाण्याची आहे. त्यांना घ्याल कां ? "

मी चपापलों तर खराच. ठक्करबाप्पासारख्यांची शिफारस आणणारें अंत्यज कुटुंब इतक्या लौकर येईल, अशी अपेक्षा मी केली नव्हती. मी सोबत्यांना तें पत्र वाचून दाखविलें. त्यांनीं पत्राबद्दल समाधान व्यक्त केलें. तें कुटुंब आश्रमाचे नियम पाळण्यास तयार असलें, तर त्याला दाखल करण्याची तयारी भाई अमृतलाल ठक्कर यांस कळविली.

दूदाभाई, त्यांच्या पत्नी दानीबेन आणि रांगती अंगावरची लक्ष्मी अशीं तिघेंजण आश्रमांत रहाण्यास आलीं. दूदाभाई मुंबईमध्यें शिक्षकाचें काम करीत असत. ते नियमांचें पालन करण्यास तयार होते. त्यांना आश्रमांत घेतलें.

आमच्या मित्रमंडळीमध्यें खळबळ उडाली. विहिरीमध्यें बंगल्याच्या मालकाचा भाग होता; त्या विहिरींतून पाणी काढण्यास अडचण पडूं लागली. मोटवाल्याच्या अंगावर आमच्या पाण्याचे शितोडे उडाले, तरी तेवढयानें त्याला विटाळ होणार! त्यानें शिवीगाळ सुरू केली, दूदाभाईंना त्रास द्यायला सुरुवात केली. त्यांच्या शिव्यांना प्रत्युत्तर देऊं नये व दृढतापूर्वक पूर्वींप्रमाणेंच पाणी भरीत जावें असें मीं सर्वांस सांगितलें. आम्ही शिव्या गुपचूप ऐकून घेतों असें पाहून मोटवाला शरमला, व त्रास देईनासा झाला. पण पैशाची मदत बंद झाली.

अखेरीस एक दिवस मगनलालांनीं मला नोटीस दिली, 'येत्या महिन्याला आश्रमखर्च चालविण्यास आपल्यापाशीं पैसे शिल्लक नाहींत.'

मीं शांतपणें उत्तर दिलें, 'तर मग आपण महारवाडयांत रहायला जाऊं.'

अशा तऱ्हेचा अडचणीचा प्रसंग माझ्यावर हा पहिलाच होता असें नाहीं. प्रत्येक प्रसंगीं अखेरच्या घडीला भगवंतानें मदत धाडलेली आहे.

मगनलालांनीं नोटीस दिल्यानंतर लवकरच एके दिवशीं सकाळीं एका मुलानें बातमी आणली, 'बाहेर मोटार उभी आहे व एक शेठ तुम्हांला बोलावीत आहेत.'

मी मोटारपाशीं गेलों.

शेठनीं विचारलें, "आश्रमाला कांहीं मदत देण्याची माझी इच्छा आहे, तुम्ही घ्याल का?"

" तुम्ही द्याल तर मी अवश्य घेईन. मला कबूल केलें पाहिजे कीं, सध्यां मी अडचणींतहि आहें."

" मी उद्यां याचवेळीं येईन, तेव्हां तुम्ही आश्रमांत असाल ?"

मीं 'होय' म्हटलें व शेठजी निघून गेले. दुसऱ्या दिवशीं ठरलेल्या वेळीं मोटारीचें शिंग वाजलें. मुलांनीं मला येऊन सांगितलें. शेठ आंत आले नाहींत. मीच त्यांना भेटायला गेलों. ते माझ्या हातांत १३,००० रुपयांच्या नोटा ठेवून निघून गेले. ३८

**बाळकोबा भावेः—**

१९२० सालची गोष्ट आहे, डिसेंबर महिना असावा. त्यावेळीं मी पंडित खरेशास्त्र्यांजवळ सकाळीं ७ ते ८ संगीताचा अभ्यास करीत असें. अभ्यास करून मी परत खोलीवर आलों. माझ्या अगदीं शेजारीं पायखान्याच्या दोन खोल्या होत्या. त्या खोल्यांत बादल्यांचे पायखाने होते. एक लाकडी चौकट असावयाची व त्या चौकटींत पुढें एक बादली व मागे एक बादली, अशी ठेवलेली असे. पुढील बादलींत लघवी व मागील बादलींत शौच व त्या शौचावर दरेकानें शौच झाल्यानंतर माती टाकणें, अशी ती योजना होती. खोलीवर आल्यानंतर मी लघवी करायला म्हणून निघालों. लघवीचें स्थानदेखील त्या दोन पायखान्यांना लागूनच होतें.

मी लघवीला जात असतांना एका १०–११ वर्षं वयाच्या मुलाला रडतांना पाहिलें. मी जवळ गेलों व 'कां रडतोस ?' म्हणून विचारलें. तो म्हणाला,

" पहा, या पायखान्याच्या बादल्या किती मोठ्या, सबंध भरलेल्या व किती जड आहेत. या मला उचलतां उचलत नाहींत, फार जड असल्यामुळें उचलतांना माझ्या पायांना लागलें. पायांतून रक्त निघून राहिलें आहे. या बादल्या उचलून दूर खड्ड्यांत नेऊन टाकावयाच्या आहेत. या बादल्या माझ्यानें उचलवतच नाहींत. तेथें मी हें काम केव्हां व कसें पुरें करणार, हें समजत नाहीं."

" हें काम रोज तूंच करतोस कां ?" असें मी त्याला विचारलें असतां तो म्हणाला, " नाहीं, माझा बाप करतो. पण बाप बाहेरगांवीं गेल्यामुळें मला हें काम सोपवून गेला आहे."

लघवीला जात असतांना, ' माझें यावेळीं कर्तव्य काय ? ' याचा मी विचार करूं लागलों व लघवी करीत असतांना निर्णय झाला कीं, या मुलाला यावेळीं मदत करावयाची. त्याप्रमाणें त्या मुलाला मी सांगितलें कीं, " तूं घाबरूं नकोस. मी तुला पूर्ण मदत करीन. "

असें म्हणून मीं बादल्या उचलल्या व शेटपर्यंत त्याला मदत केली. आश्रमचे सर्व पायखाने व मुत्र्या साफ करण्यांत अडीच ते तीन तास गेले.

त्यावेळीं ' आश्रम-विभाग ' व राष्ट्रीय शाळेचा विभाग असे दोन विभाग होते. मी आश्रम-विभागांत असें. त्या मुलाला राष्ट्रीय शाळेचें पायखानेदेखील साफ करायचे असत. मी त्याला सांगितलें कीं, " उद्यांपासून तूं आश्रम-विभागांत सफाईसाठीं येऊं नकोस. मी एकटा सर्व करीन. तूं फक्त राष्ट्रीय शाळेचे पायखाने साफ करीत जा. " मी त्याला मदत केली व आश्रम-विभागांतील पायखाने साफ करण्याचें बंद केलें, त्यामुळें त्याला आनंद झाला. ही सर्व हकीकत मी पू. विनोबाजींना सांगितल्यावर ते म्हणाले, " फार चांगलें केलेंस. उद्यांपासून मी तुझ्याबरोबर सफाईंत भाग घेईन. "

त्यांनीं १५ दिवस भाग घेतला.

मी ब्राह्मण असून भंगी-काम करूं लागलों, हें पाहून आश्रमांतील स्त्रियांमध्यें खळबळाट झाला. विशेषतः बापूजींची वडील बहीण कस्तुरबांच्या रसोडचांत जेवीत असे. तेथील जेवण त्यांनीं बंद करून त्या स्वतंत्र स्वयंपाक करूं लागल्या. हा प्रसंग घडला त्यावेळीं गांधीजी आश्रमांत नव्हते, बाहेरगांवीं गेले होते. त्यांना ही सर्व हकीकत कळल्यानंतर आनंद वाटला. त्याविषयीं त्यांनीं प्रार्थनेनंतर सर्व मंडळींना समजावून सांगितलें. पण त्यांची बहीण स्वतंत्र स्वयंपाक करूं लागल्या आहेत, हें कळतांच तत्काळ ते उठले व बहिणीकडे जाऊन म्हणाले, "स्वतंत्र स्वयंपाक कां सुरूं केला ?"

बहीण म्हणाल्या, " इथें सर्व भ्रष्टाकार झाला आहे, ब्राह्मण असून भंग्याचें काम हा बाळकृष्ण करीत आहे. "

बापू म्हणाले, " तुमचें म्हणणें समजलें, पण इथें असें चालणार नाहीं. अस्पृश्यता मान्य असेल तर इथें आश्रमांत रहातां येणार नाहीं. "

माझ्यासमक्ष त्याच दिवशीं रात्रीच्या गाडीनें त्यांची रवानगी गांधीजींनीं केली.

भंगीं आश्रमांतून निघाल्यानंतर गांधीजींनीं पुढें असें ठरविलें कीं, आठवड्यांतून एक दिवस स्त्रियांनीं पायखाने साफ करावयाचें. पुढें १९२६ सालीं 'क्षेत्रसंन्यास' घेऊन गांधीजी आश्रमांत एक वर्ष राहिले होते. त्यावेळीं निरनिराळ्या प्रांतांतून पुष्कळ संन्यासी आश्रमांत गांधीजींच्या सहवासांत रहाण्यासाठीं येऊं लागले. गांधीजी त्यांना पहिल्याच दिवशीं मल-सफाईचें काम करावयाला लावीत असत. ३९

**महादेव देसाईः—**

"गांधी-सेवा-संघा"ची बैठक ओरिसामधील देलांग येथें १९३८ च्या मार्चमध्यें भरली. तेथून जवळच पुरी येथें जगन्नाथाचें मंदिर आहे. त्याच्या दर्शनासाठीं कस्तुरबा, माझ्या पत्नीसह, ता. २८ मार्च रोजीं संध्याकाळीं गेल्या. त्या दर्शन घेऊन परत आल्या. हें गांधींजीना कळलें तेव्हां त्यांना तीव्र दुःख झालें. कारण तें मंदिर हरिजनांना खुलें नव्हतें.

गांधीजींनीं त्या दोघींना आणि मलाहि बोलावलें. माझ्या पत्नीला तें मंदिर हरिजनांना बंद असल्याचें माहीत नव्हतें. तेव्हां गांधीजी मला म्हणाले, "तुम्ही तरी तिला सारा इतिहास समजावून सांगावयास हवा होता. तरी तिनें ऐकलें नसतें, तर माझी मदत घ्यायची आणि तरीहि तिनें मंदिरांत जाण्याचा आग्रह धरला असता तर, तिला तेथें जाण्यास मोकळीक मिळाली असती."

कस्तुरबांनीं आपला अपराध नम्रपणें कबूल केला आणि गांधीजींची क्षमा मागितली. तेव्हां गांधीजी इतकेंच म्हणाले, "मी तुला दोष कसा देऊं ? तुझ्या शिक्षणाचीहि जबाबदारी माझ्यावर आहे, ती मीं पार पाडली नाहीं, म्हणून या अपराधाला जबाबदार मी-तूं नव्हेस."

'गांधी-सेवा-संघा'च्या बैठकींतहि गांधीजींनीं या प्रकरणाचा उल्लेख केला आणि त्यामुळें आपणास अत्यंत मनस्ताप झाला, असेंहि बोलून दाखविलें.

त्यामुळें माझ्या चित्ताला रात्रभर तीव्र वेदना झाल्या. शेवटीं मीं गांधीजींना एक पत्र लिहून विनंति केली कीं, "आपण मला आपल्या सेवेंतून मुक्त करावें. कारण ती सेवा करण्यास मी पात्र नाहीं."

तें पत्र पाहून गांधीजी अधिकच दुःखी झाले. ते म्हणाले, "माझ्यावर प्रेम करणाऱ्या माणसाकडून मला मृत्यु आला तरी तो मी आनंदानें स्वीका-

रीन; पण माझ्यावर प्रेम नसणाऱ्याच्या संगतींत जीवंत राहणें नको. तूं असा त्रागा करण्याऐवजीं पुरीच्या मंदिरांत सत्याग्रही घेऊन जावयास हवे होते." गांधीजींनीं माझें त्यागपत्र फाडून टाकलें.

आतांपर्यंत गांधीजींनीं पुष्कळ लोकांवर आध्यात्मिक शस्त्रक्रिया केली आहे; पण त्यावेळीं त्यांनीं प्रेमाचा क्लोरोफॉर्म दिलेला असे. माझ्या बाबतींत मात्र भूल न देतांच शस्त्रक्रिया करण्यांत आली. "साधुपुरुषाचा सहवास स्वर्गलोकीं सुखाचा असेल, पण मृत्युलोकीं त्याचा अनुभव निराळा येतो." हें कवि-वचन खरें आहे. ४०

**म. गांधी:—**

ता. ११ डिसेंबर १९२७ सालची गोष्ट. मी दीनबंधु अँड्यूजबरोबर बोलत बसलों होतों. तोंच एक माणूस वाकत-वाकत आमच्याजवळ आला. त्याची पाठ अर्धी वांकलेली होती. त्याच्या अंगावरील कपडे म्हणजे त्यानें कमरेभोंवतीं गुंडाळलेलें एक घाणरेडें फडकें.

त्यानें आपल्या तोंडात गवताची एक काडी धरली आणि आमच्या पायाशीं लोटांगण घातलें. नंतर तो उठून उभा राहिला. त्यानें हात जोडले, मान लवविली आणि तोंडांतील काडी काढून ती आपल्या डोक्यावरील केसांत खोवली व तो परत जाऊं लागला.

तें दृश्य पाहत असतांना माझ्या जिवाची तडफड होत होती. एका दुभाष्याला बोलावून मीं त्या माणसाची विचारपूस केली. तेव्हां मला कळलें कीं, सहा मैल अंतरावरील एका खेड्यांत रहाणारा तो अस्पृश्य आहे. बोलगड येथें सरपण विकण्यासाठीं तो आला होता. तेथें माझी माहिती कळल्यावर तो मला भेटावयास आला.

"मग तोंडांत ही काडी कां धरली?"

"आपला मान करण्यासाठीं."

लज्जेनें माझें शिर खालीं लवलें. माझ्या मानाची ती किंमत मला असह्य झाली. माझी हिंदुधर्मभावना फार दुखावली गेली.

मी त्याच्याजवळ हरिजन-कार्यासाठीं देणगी मागितली. तो आपली कमर चाचपूं लागला-एकादें तांब्याचें नाणें निघतें कां पाहूं लागला.

 अनुक्रम २६३०८ वि: निबु... ७७
१२१० नों: दि: २२।३।६०

"मला पैसा नको तुझ्या-त्याहून मोलाची वस्तु मला पाहिजे आहे." मी म्हणालों.

"देतों-मागा." तो पुटपुटला.

जन-रूढीप्रमाणें, तो मांसाहार करीत होता-मद्यपानहि करीत होता, हें मला त्याच्याकडून कळलें. तेव्हां मीं त्याला म्हटलें,

"जगांतल्या कोणत्याहि माणसाकडे जातांना यापुढें तोंडांत काडी धरूं नकोस-माणुसकीला कमीपणा आणणारी ती गोष्ट आहे; यापुढें कधीं दारू पिऊं नकोस-कारण माणसाला पशूच्या अवस्थेला नेणारें तें व्यसन आहे; तसेंच कधींहि मुर्दाड मांस खाऊं नकोस,-कारण, तें हिंदुधर्माच्या विरुद्ध आहे. कोणताहि सुसंस्कृत मनुष्य मुर्दाड मांस खात नाहीं. या तीन गोष्टी सोडून दे-तीच मला मोठी देणगी.'

"माझे जातभाई मला वाळीत टाकतील, मी मद्य-मांस सोडलें तर." बिचारा कुरकुरला.

"तो बहिष्कार सहन कर-जरूर तर गांव सोड-पण हीं तीन व्यसनें सोड."

"सोडतों." असें अभिवचन त्या दलित मानवानें दिलें. तें त्यानें पाळलें, तर लक्ष्मीपुत्रांनीं मला दिलेल्या द्रव्य-राशीपेक्षां त्याची देणगी मी अधिक मोलाची मानीन. ही अस्पृश्यता आम्हांला लज्जास्पद आहे. ४१

## शरीर-श्रम

अंगमेहनत प्रत्येक माणसाला आवश्यक आहे, हा सिद्धांत टॉलस्टॉयच्या एका निबंधावरून प्रथम माझ्या मनांत भिनला. अंगमेहनत हें 'ब्रेड लेबर' या इंग्रजी शब्दाचें भाषांतर आहे. 'ब्रेड लेबर' चें शब्दशः भाषांतर रोटी-(साठीं) मेहनत. रोटीसाठीं प्रत्येक माणसानें मेहनत केलीच पाहिजे, शरीर वांकविलें पाहिजे, असा ईश्वरी नियम आहे. यज्ञ केल्याखेरीज जो खातो तो चोरीचें अन्न खातो. अशा तऱ्हेचा भयंकर शाप गीतेनें यज्ञ न करणाऱ्याला दिलेला आहे. या ठिकाणीं 'यज्ञ' याचा अर्थ अंगमेहनत किंवा रोटी-मेहनत हाच योग्य दिसतो; माझ्या मतें तर हाच एक अर्थ शक्य आहे. तें कसेंहि असो; हाच आपल्या या व्रताचा उगम होय. बुद्धिवादानेंहि आपण या सिद्धांताशीं येऊन पोचतों. मेहेनत करीत नाहीं, त्याला खाण्याचा हक्कच

काय ? बायबल सांगतें, ‘ तूं आपली भाकर स्वतःच्या अंगांतून घाम काढून कमव व खा. ’

या नाहीं तर त्या रूपानें शारीरिक व्यायाम राव व रंक सर्वांना करावाच लागतो, तर मग रोटी उत्पन्न करण्याचाच व्यायाम सर्वांनीं कां करूं नये, असा प्रश्न सहजींच उद्भवतो. अंगमेहनतीचा हा निरपवाद कायदा जर सर्वांनीं मान्य केला, तर उच्च व नीच हा भेदच उरणार नाहीं.

सर्व जगभर मालक व मजूर असे भेद पडून राहिले आहेत, आणि गरीब लोक श्रीमंतांचा हेवा करीत आहेत. सर्वांनींच जर आपापल्या पोटा-पुरतें काम केलें तर उच्चनीच भेदच निघून जाईल; इतक्याउपरहि धनिक-वर्ग राहील. त्यानें आपल्याला आपल्या मिळकतीचा मालक न समजतां केवळ रखवालदार किंवा पंच (ट्रस्टी) मानावें, व तिचा उपयोग मुख्यतः लोकसेवेसाठीं करावा. ज्याला अहिंसेचें पालन करावयाचें आहे, सत्याची आराधना करावयाची आहे, ब्रह्मचर्याला आपला जन्मस्वभाव बनवावयाचें आहे, त्याला तर अंगमेहनत ही रामबाणाप्रमाणें होते.

मुलें, म्हातारेकोतारे व व्याधिग्रस्त लोक यांनीं मेहनत केली नाहीं, तर तो नियमाला अपवाद समजावयाचा नव्हे. मुलाचा समावेश त्याच्या आईच्या कामांत होतो. निसर्गाच्या नियमांचा भंग न होईल तर म्हातारेहि पंगु बनणार नाहींत, आणि रोग जवळपास फिरकेल तरी कशाला ? ४२

## बोधक प्रसंग

प्यारेलालः—

पहाटेची वेळ होती. रस्ते दंवानें भिजले होते—निसरडे झाले होतें. आणि रस्ते होते तरी किती अरुंद ! एकेका माणसालाच जातां येणें शक्य होतें. तशा रीतीनें, गांधीजींचें शांति-पथक ता. १९ जानेवारी १९४७ रोजीं बादलकोटहून निघालें.

एकेक जणाची ती रांग चालली होती. पण मध्येंच तीं एकदम थबकली. कां ? तर त्या रस्त्यावर कोणी शौचविधि केलेला होता. म्हणून गांधीजींनीं वाळलेलीं पानें घेऊन ती विष्ठा काढण्यास सुरुवात केली. तें पाहून मनु म्हणाली, “आम्हाला कां नाहीं करूं देत हें काम? अशा रीतीनें तुम्ही आम्हांला कां लाजवितां ? ”

"अशा सफाई-कामांत मला किती आनंद वाटतो याची तुला कल्पना नाहीं." असें म्हणून गांधीजी हसूं लागले. शेंकडों खेडूत गांधीजींचें तें सफाईकाम पहात स्वस्थ उभे राहिले. मनु चुळबुळ करूं लागली. तें पाहून गांधीजी तिला म्हणाले, "उद्यांपासून हे लोक मला हें सफाईचें काम करूं देणार नाहींत. मी त्यांना सफाईचा वस्तुपाठ दिला आहे ना ? भंगीकाम हें कांहीं हलके नांहीं, हें त्यांना आतां कळून चुकलें आहे."

"उद्यां तसें होईलहि. पण तुमची पाठ फिरतांच हे लोक तें काम टाकून देतील, मग काय ?" मनूनें शंका काढली.

"मग मी तुला तपासणीसाठीं पाठवीन आणि तुला जर हा रस्ता घाणेरडाच आढळला, तर मी स्वतः रस्ता साफ करीन. व्यापक अर्थानें, सफाई हेंच माझें जीवितकार्य आहे." ४३

**मनु गांधीः—**

नोआखालींत नारायणपूर नांवाचें एक गांव आहे. तेथें रोजच्या-प्रमाणें बापू सात वाजतां पोंचले. एका गरीब विणकराकडे आमचा मुक्काम होता. गांवाला जाऊन पोहोंचतांक्षणीं बापूजी पहिल्यानें गरम पाण्यानें पाय धुऊन घेत, मग थोडें फार आपलें लिहिण्याचें वगैरे काम करीत. तेवढ्या वेळांत मी बापूजींचें मालीश व स्नानाची व्यवस्था करून ठेवीत असें. या क्रमानें मीं सर्व केलें. बापूजी नेहमीं आंघोळीच्या वेळीं साबण न वापरतां एक खडबडीत दगड वापरीत. हा दगड बापूजींना मीराबहेननीं अनेक वर्षां-पूर्वीं दिला होता. तो दगड मी अगोदरच्या गांवीं विसरून आलें. स्नानाच्या खोलींत मी बापूजींच्या सगळ्या वस्तु ठेवल्या, तेव्हां हें माझ्या लक्षांत आलें. मी बापूजींना म्हटलें, "बापूजी, मी अंग घासण्याचा दगड कोठें तरी विस-रून आलें; कदाचित् काल विणकराच्या घरीं राहून गेला असावा. आतां मी काय करूं ?"

बापूजींनीं थोडा वेळ विचार केला. मग मला म्हणाले, 'तूं चूक तर केलीसच. पण माझी तरी अशी इच्छा आहे कीं, तो दगड तूं स्वतः जाऊन शोधून आणावास. निर्मळबाबूंना सांग कीं, माझ्यासाठीं खायचें तयार करा. पण दगड शोधायला तूंच एकटी जा. आणि एकदां असें केलेंस म्हणजे दुसऱ्या वेळीं लक्षांत राहील."

मीं भीत भीत विचारलें, "या गांवांत एवढे स्वयंसेवक आहेत. त्यांपैकीं कोणाला बरोबर घेऊन जाऊं ?"

बापूंनीं विचारलें, "कां ?"

मी 'कां' चें उत्तर न देतांच थोडीशी चिडून चालूं लागलें. मनांत असेंहि येऊं लागलें कीं, कोठून कोणी गुंड आले नि त्रास देऊं लागले तर ? पण रामनाम घेत मी चालूं लागलें. ज्या रस्त्यानें आम्ही आलों, त्या रस्त्यावरील पावलें पहात पहात चाललें.

तें विणकराचें घर कसेंबसें सांपडलें तर खरें. विणकराच्या घरीं फक्त एक म्हातारी रहात असे. त्या म्हातारीला काय माहीत कीं हा दगड इतका मोलाचा असेल ? त्या बिचारीनें दगड फेकून दिला होता. तो मी कसाबसा शोधून काढला. तो दगड सांपडला, तेव्हां माझ्या आनंदाला सीमा राहिली नाहीं.

"हा दगड माझा पंचवीस वर्षांचा बाळगलेला मित्र आहे. तुरुंगांत गेलों किंवा महालांत गेलों तरी हा दगड बरोबरच फिरला आहे. जर तो मिळाला नसतां तर मला व मीराबहनला दुःख झालें असतें. शिवाय तुला एक धडा मिळाला कीं, दगड काय, असे किती तरी मिळतील, दुसरा शोधूं, अशी बेपर्वाई करूं नये; पण प्रत्येक उपयोगी वस्तूला जपायला शिकलें पाहिजे." बापूजींनीं मला म्हटलें. ४४

**प्यारेलालः—**

सेवाग्रामच्या आश्रमांत एक विधवा स्त्री दाखल झाली होती. तिला एक नऊ वर्षांचा मुलगा होता. मोठा चुणचुणींत. त्याला आश्रमांतील मूलोद्योगी शाळेच्या वसतिगृहांत दाखल करण्यांत आलें. त्या मुलानें एक विलक्षण अट घातली—"वसतिगृहांतील माझ्या खोलींत गांधीजी येतील, तर मी शाळेंत जाईन." अशी ती अट होती. ती गांधीजींनीं मान्य केली.

एके दिवशीं अकस्मात् गांधीजी त्या वसतिगृहांत गेले. त्या मुलाच्या खोलींत पाऊल टाकतांच त्यांना दिसलें—मध्यभागीं अंथरलेल्या चटईवर दौत-टाक पडलेले आहेत. ती दौतहि घाणरेडी होती आणि टाकाचें टोकहि खराब होतें. अंथरुणांतील दुलईतील कापूस गांठाळलेला होता. चादर फाटकी होती आणि ती कशी तरी शिवलेली होती. मुलांना थंडीच्या दिवसांत पुरेसे कपडे नव्हते.

गांधीजी फक्त पांच मिनिटांसाठीं आले होते, पण ती अवस्था पाहून सर्व वसतिगृहाची पहाणी करण्याचें त्यांनीं ठरविलें; आणि त्यासाठीं ४५ मिनिटें खर्च केलीं. तपासणीनंतर त्यांनीं एक सूचना-पत्र लिहिलें, तें असें—

फाटक्या चादरी नीट शिवावयास हव्या होत्या किंवा त्या दुहेरी करून गोधडीसारख्या वापरावयास हव्या होत्या. ट्रान्सवालच्या तुरुंगांत असतांना मी अशीं कामें केलीं आहेत. फाटके कपडेसुद्धां स्वच्छ धुऊन नीट-नेटकेपणानें ठेवले पाहिजेत. त्यांचा उपयोग दुसऱ्या फाटक्या कपड्यांना ठिगळें लावण्यासाठीं करतां येतो. या मुलांना थंडीच्या दिवसांत जरूर तितके कपडे नाहींत. त्यांना इतर मुलांनीं आपल्याजवळचे जादा कपडे कां देऊं नयेत ? परोपकाराचा तो सुंदर वस्तुपाठच होईल.

या साऱ्या गोष्टी क्षुद्र वाटतील, पण अशा क्षुद्र वस्तूंतूनच महान् वस्तु निर्माण होतात. माझें सर्व जीवित अशा क्षुद्र वस्तूंवरच उभारलें आहे. अशा बारीकसारीक गोष्टींत शिस्तीनें वागण्याची संवय मुलांना लावली नाहीं, तर सारें शिक्षण फोल ठरतें. स्वच्छता, नीटनेटकेपणा व सफाई हें तर ‘ नई तालीम ’ चें मुख्य सूत्र आहे. हा कांहीं खर्चाचा प्रश्न नाहीं. केवळ सूक्ष्म नजर व सौंदर्य-दृष्टि असली म्हणजे झालें.

यावर कोणी म्हणेल, मुलाकडे इतक्या बारकाईनें लक्ष पुरवावयाचें म्हटलें तर एक-दोन मुलांपेक्षां अधिक मुलांना शिकवितां येणार नाहीं. याला माझें उत्तर असें कीं, “ एक-दोन मुलांनाच असें शिकविलें तरी पुरें. आपणांस झेपणार नाहीं, असा भार घेतल्यानें आपला आत्मा असत्यानें विद्ध होतो. ”

या एकंदर प्रकरणासंबंधीं गांधीजी पुढें म्हणाले, “ स्वराज्याच्या मंदिरांत आज मी नवी वीट चढविली. ” ४५

## सर्व-धर्म-समभाव

आपल्या व्रतांमध्यें ज्या व्रताला आपण ‘ सहिष्णुता ’ या नांवानें ओळखतों त्यालाच मीं हें नवीन नांव दिलें आहे. सहिष्णुता हीं अहिंसेच्या दृष्टीनें पुरेशीं नाहीं. इतर धर्मांविषयीं समभाव राखण्याच्या मुळाशीं स्वतःच्या धर्माच्या अपूर्णतेची कबुली येऊनच जाते. सत्याची आराधना-

सुद्धां, अहिंसेची कसोटीसुद्धां, आपल्याला हेंच शिकविते. जर आपण स्वतः अपूर्ण, तर आपण कल्पिलेला धर्महि अपूर्ण. स्वतंत्र, म्हणजे मनुष्यबुद्धि-निरपेक्ष, धर्म संपूर्ण आहे, पण तो आपण पाहिलेला नाहीं–ज्याप्रमाणें ईश्वरहि आपण पाहिलेला नाहीं. आपण मानतों तो धर्म अपूर्ण आहे, आणि त्यामध्यें नित्य फेरफार होत असतात, व्हायचेच. असें झालें तरच आपण उत्तरोत्तर चढूं शकूं; सत्याकडे, ईश्वराकडे रोजच्या रोज जवळ जात जाऊं

आणि मनुष्यकल्पित सर्व धर्म अपूर्ण आहेत, असें एकदां कबूल केलें कीं, मग कोणत्याहि धर्माला उच्च किंवा नीच लेखण्याचा प्रश्नच उरत नाहीं. सर्वच धर्म खरे आहेत, पण सगळेच अपूर्णहि आहेत, अर्थात् दोषाला पात्र आहेत. समभाव वाटत असतांहि आपण त्यांच्यांतील दोष पाहूं शकूं, स्वतःच्यांतीलहि पाहूं शकूं. हे दोष त्याच्यामध्यें आहेत एवढ्यासाठीं त्याचा त्याग करणार नाहीं, तर दोष तेवढे टाळूं. अशा तऱ्हेनें समभाव राखला म्हणजे, इतर धर्मांमध्यें जें कांहीं ग्राह्य दिसेल, त्याला स्वतःच्या धर्मामध्यें स्थान देण्यास आपण अनमान करणार नाहीं. एवढेंच नव्हे तर तसें करणें आपलें कर्तव्य ठरेल.

आपण सर्व धर्मांबद्दल समभाव बाळगावा. यामध्यें स्वतःच्या धर्मा-बद्दल उदासीनता येत नाहीं, तर स्वतःच्या धर्माविषयींचें आपलें प्रेम आंधळें होतें, त्याऐवजीं ज्ञानमय बनतें–व त्यामुळें अधिक सात्त्विक, निर्मळहि बनतें. सर्व धर्मांविषयीं समभाव बाणेल तेव्हांच आपले दिव्यचक्षु उघडतील. धर्मज्ञान होतांच आडपडदे उडून जातात व समभाव उत्पन्न होतो. आपण जसजसा या समभावाचा अभ्यास करूं, तसतशी आपल्याला आपल्या स्वतःच्या धर्माचीहि अधिक चांगली ओळख होत जाईल.

सर्व धर्मांमध्यें मूळ सिद्धांत एकच आहेत. सर्व धर्मांमध्यें संत स्त्री–पुरुष होऊन गेले आहेत–आजहि हयात आहेत. म्हणून धर्मांबद्दलचा समभाव व धर्मीयांबद्दलचा–मनुष्यांबद्दलचा–समभाव यांमध्यें कांहींसा फरक आहे. मनुष्यमात्राबद्दल–दुष्टाबद्दल आणि श्रेष्ठाबद्दल, धर्मनिष्ठाबद्दल आणि धर्महीनाबद्दल–समभाव असावा असें आमचें म्हणणें; अधर्माबद्दल मात्र कालत्रयीं नाहीं.

समभावाचा अभ्यास केल्यानें कित्येक कोडीं आपल्या आपण उलगडून जातात; आणि कांहीं ठिकाणीं आपल्याला स्पष्ट दोषच दिसले तरी ते दाखवून देतांना आपल्यामध्यें जी नम्रता व जो विनय असतो, त्यामुळें ते दाखवून दिल्यानें कोणाला दुःखहि होत नाहीं. ४६

## बोधक प्रसंग

**प्यारेलालः—**

ते दिवस भयंकर होते—१९४७ सालीं हिंदु—मुसलमानांच्या द्वेषाचा कळस झाला होता. त्याची झळ गांधीजींच्या प्रार्थनेलाहि लागत होती. दिल्ली येथें एके दिवशीं संध्याकाळीं गांधीजींची सामुदायिक प्रार्थना चालू होती. त्यावेळीं प्रार्थना—सभांना लाख लाख लोक जमत. नित्याप्रमाणें कुराणांतील वचनें म्हटलीं जाऊं लागलीं. एक हिंदु तरुण उभा राहिला व ओरडला, " हें हिंदूंचें मंदिर आहे. येथें तुम्हांला मुसलमानांची प्रार्थना आम्ही म्हणूं देणार नाहीं. "

या विरोधकाला सभेंतून हुसकून काढण्यासाठीं कांहीं लोक उभे राहिले. पण गांधीजी म्हणाले, " एकाहि माणसाचा विरोध जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत मी प्रार्थना पुढें चालविणार नाहीं. "

तो तरुण विरोधक व्यासपीठाकडे जाऊं लागला. त्याला लोक अडवूं लागले. तेव्हां गांधीजीच पुढें झाले व त्या तरुणाकडे जाऊं लागले. जातां जातां ते म्हणाले, " मी व तो तरुण यामध्यें कोणीहि आड येऊं नये. "

पण लोक त्या तरुणावर क्रुद्ध झाले होते. त्यांनीं त्याला सभेबाहेर घालवून दिलें. गांधीजींना तें आवडलें नाहीं. " अविचाराला अविचारानें, क्रोधाला क्रोधानें उत्तर देणें शहाणपणाचें नव्हे. " गांधीजी म्हणाले.

दुसरे दिवशींहि प्रार्थनेसाठीं शेकडों लोक जमले होते. प्रार्थना सुरू करण्यापूर्वीं गांधीजींनीं विचारलें, " आज कुराणाला विरोध करणारा कोणी आहे ? "

एक तरुण उभा राहिला. " या मंदिरांत...........

" हें मंदिर भंगी लोकांचें आहे, त्यांचा विरोध नाहीं. " गांधीजींनीं खुलासा केला.

"पण हें सार्वजनिक पूजा-स्थान आहे ना? तुम्हांला कुराणच म्हणावयाचें असेल तर दुसरीकडे जा."

सभेंतील हजारों लोक ओरडूं लागले, "आम्हाला प्रार्थना पाहिजे. एकाच्या विरोधासाठीं सर्वांची हानि कां?"

गांधीजी त्या तरुणास म्हणाले, "या सर्वांना प्रार्थना हवी आहे. तुम्ही विरोध केला तर त्यांची तीव्र निराशा होईल. ती करणें तुम्हांला शोभते कां?"

गांधीजींच्या बोलण्यांत राग नव्हता, तर युक्तिवाद होता—आर्जवीपणा होता. त्यामुळें विरोधकाचा विरोध वितळला. तो खालीं बसला.

पण दुसरा जवान उभा राहिला व क्रोधानें म्हणाला, 'तुम्ही मशिदींत जाऊन गीतेचें पठण कां नाहीं करीत?"

गांधीजींनीं त्याला हिंदु धर्माची सहिष्णुता व उदारता समजावून सांगितली. पण तो ऐकेना. तेव्हां गांधीजींनीं सार्वजनिक प्रार्थना रद्द केली. आंत जाऊन त्यांनीं खाजगी प्रार्थना म्हटली.

तिसरे दिवशींहि तीन विरोधक उभे राहिले. गांधीजी सभेंतून परत गेले.

चौथे दिवशीं दोन विरोधक उठले, त्यांची समजूत इतर श्रोत्यांनीं घातली. कोणाचाच विरोध राहिला नाहीं. तेव्हां गांधीजींची प्रार्थना अविरोधानें पार पडली. ४७

(२)

ता. १३ सप्टेंबर १९४७ रोजीं गांधीजी दिल्लींतील 'पुराणा किल्या'ला भेट देण्यास गेले. तेथें सहा महिन्यापूर्वींच 'आशिया परिषद' भरली होती. पण या वेळीं तें निर्वासितांचें आश्रयस्थान झालें होतें. सुमारें पाऊण लाख मुसलमान निर्वासित तेथें राहिले होते. ते पाकिस्तानला जाणार होते. ते अत्यंत संतप्त मनःस्थितींत होते.

गांधीजींची मोटार 'पुराणा किल्ल्यांत' येतांच, त्या निर्वासितांनीं मोटारीभोंवतीं गर्दी केली. गांधी-विरोधी घोषणा करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. एकानें तर त्यांच्या मोटारीचें दार जोरानें उघडलें. तेव्हां त्यांच्या एका मित्रानें ड्रायव्हरला गाडी पुढें घेण्यास सांगितलें. गाडी सुरू झाली पण

गांधीजींनीं ती थांबविली. "मला या प्रक्षुब्ध जमावास तोंड दिलेंच पाहिजे." गांधीजी म्हणाले.

गांधीजी गाडींतून बाहेर आले. त्यांनीं त्या मुस्लीम निर्वासितांना सांगितलें, " शेजारच्या पटांगणांत चला-आपण तेथें बोलूं. "

कांहीं निर्वासित पटांगणांत बसले, पण बरेचसे रागानें ओरडत व हातवारे करीत उभे राहिले. तेथें ध्वनिक्षेपक नव्हते. गांधीजींचा आवाज सर्वांच्या कानापर्यंत जाऊन कसा पोचणार? तेव्हां गांधीजींनीं एका सहकाऱ्याला बोलाविलें आणि त्याच्या खांद्यावर हांत ठेवून ते बोलूं लागले. त्या सहकाऱ्याचा आवाज मोठा होता. तो गांधीजींचे शब्द मोठयानें उच्चारूं लागला. गांधीजी बोलूं लागले-

" सर्वांचा ईश्वर एकच आहे. हिंदु-मुसलमान, ख्रिस्ती-शीख,-हे भेदाभेद मी मानीत नाहीं. ते सारे मला सारखेच आहेत. "

पण गांधीजींचा हा वेदांत ऐकून घेतो कोण? ते निर्वासित निषेधाचे व क्रोधाचे उद्गार काढूं लागले. तरी गांधीजींचें भाषण चालूच राहिलें-

"तुम्हीं राग सोडा व शांत रहा. सर्वांचा शेवटचा आधार परमेश्वर हाच आहे. मानवानें जी चूक केली असेल ती दुरुस्त करणारा तोच आहे. 'करीन वा मरेन ' या निर्धारानेंच मी येथें आलों आहें. "

गांधीजींच्या या विचारांत नवीन काय होतें? पण त्या भाषेमध्यें जो जिवंतपणा होता आणि त्या स्वरामध्यें जी भावना ओथंबलेली होती, त्यांचा परिणाम त्या निर्वासितावर जादूसारखा झाला. आपल्याला आपलें धर सोडून दूर यावें लागलें व दुःख भोगावें लागलें; या सर्वांचें कारण गांधीजी होत; अशी त्यांची भावना होती. त्यांच्या त्या भाषणांतील कळकळ, त्यांच्या दृष्टींतील ती वेदना आणि त्यांच्या मुद्रेवरील ती चिंता-हें सर्व पाहून त्या संतप्त निर्वासितांचें मन निवळलें. आरडाओरड थांबली. क्रोध लोपला. करुणा पसरूं लागली. कांहीं निर्वासितांच्या डोळयांतून तर अश्रु ओघळूं लागले. ते आपल्या कहाण्या विश्वासानें व आशेनें सांगूं लागलें.

त्या सर्व दुःख-कथा गांधीजींनीं मोठ्या सहानुभूतीनें ऐकून घेतल्या. "तुमचें दुःख दूर करण्यासाठीं मी शक्य तों सर्व प्रयत्न करीन. " असें आश्वासन गांधीजींनीं दिलें. त्यांच्या जीवावर जे लोक उठले होते; तेच आतां त्यांचे दोस्त बनले. त्यांनींच गांधीजींना सुरक्षितपणें संभाळून त्यांच्या

मोटारीपाशीं नेऊन पोंचविलें. गांधीजींनीं हात जोडून सर्वांचा निरोप घेतला आणि त्या सर्वांनीं शांत राहून प्रेमानें त्यांना निरोप दिला. ४८

## नम्रता

व्रतांमध्यें नम्रतेला स्थान नसलें तरी ती व्रतांपेक्षांहि कदाचित् अधिक आवश्यक आहे. आवश्यक तर आहेच, पण अभ्यासानें कोणाच्या अंगीं नम्रता आल्याचें आपल्या माहितींत नाहीं. सत्य घटवितां येईल, दया घटवितां येईल, परंतु नम्रता घटविणें म्हणजे दंभ घटविणेंच होय असें म्हणतां येईल. थोरामोठ्यांमध्यें एकमेकांच्या सन्मानाची रीत म्हणून जी शिकविली जाते किंवा तोंडीं लागते ती ही नम्रता नव्हे. एकजण दुसऱ्याला साष्टांग नमस्कार घालीत असेल, पण मनांत तर त्याच्याविषयीं तिरस्कार भरला असेल. ही नम्रता नव्हे, लुच्चेगिरी आहे. कोणी रामनामाचा जप करीत असेल, माळा फिरवीत असेल, लोकांसमक्ष महामुनिसारखा बसत असेल, पण आंत स्वार्थ भरलेला असेल, तर तो नम्र नव्हे, तर पाखंडी होय. नम्र माणसाला आपण नम्रपणें केव्हां वागलों याची खबरच नसते. सत्य इत्यादींचें आपण आपल्यापाशीं मोजमाप ठेवूं शकतों, नम्रतेला मोजमापच नाहीं. स्वभावसिद्ध नम्रता लपून राहील असें नव्हे. पण नम्र माणसाला स्वतःला ती दिसत नसते. आपली नम्रता शून्यत्वापर्यंत जाऊन पोंचली पाहिजे. आपण कोणी तरी आहों हें भूत मनांत भरलें कीं नम्रभाव तेथून उडून गेला आणि आपलीं सर्व व्रतें धुळीस मिळालीं. व्रतपालनाबद्दल जो गर्व करील, तो आपल्या साऱ्या व्रतांची किंमत घालवून बसेल व समाजामध्यें विषरूप बनून राहील.

नम्रता म्हणजे मीपणाचा आत्यंतिक क्षय. विचार केल्यास लक्षांत येण्याजोगें आहे कीं, या विश्वामध्यें कोणताहि जीव एका रजःकणाहूनहि क्षुल्लक आहे. देहाच्या दृष्टीनें पाहिलें असतां आपण क्षणभंगुर आहों. कालाच्या अनंत चक्रामध्यें आयुष्याच्या शंभर वर्षांचा पत्ताहि लागणार नाहीं. परंतु जर का आपण या भोंवऱ्यामधून निसटलों, म्हणजे कोणी नव्हेसें होऊन गेलों, तर मग सर्व कांहीं आपणच आहों. आपण कांहीं तरी, कोणी तरी असणें म्हणजे ईश्वरापासून, परमात्म्यापासून, सत्यापासून वेगळें पडणें. नाहीसें होणें म्हणजेच परमात्म्यांत विलीन होऊन जाणें. समुद्रांत

असलेला छोटा बिंदुहि समुद्राच्या थोरवीचा धनी असतो. पण त्याला त्याची जाणीव नसते. समुद्रापासून वेगळा होऊन मीपणाचा टेंभा मिरवूं लागला कीं त्याक्षणींच तो सुकून गेला. आपल्या या जीवनाला पाण्याच्या बुडबुड्याची उपमा देण्यांत आली आहे. त्यांत मला बिलकुल अतिशयोक्ति वाटत नाहीं. असली नम्रता किंवा शून्यता ओढूनताणून थोडीच येणार ? पण व्रतांचें यथायोग्य आकलन केल्यानें नम्रता आपोआप अंगीं बाणत जाते. सत्याचें पालन करूं इच्छिणाराला अहंकारी होऊन कसें चालेल ? इतरांसाठीं प्राण सांडूं इच्छिणारा स्वतःसाठीं जागा अडवीत कोठून बसणार ? त्यानें स्वतःचे प्राण अर्पिण्याचा निश्चय केला; त्याच वेळीं स्वतःचा देह फेकून दिला.

नम्रता म्हणजे तीव्रतम पुरुषार्थ. मात्र तो सर्व परमार्थासाठीं असणार. खुद्द ईश्वर दम न टाकतां चोवीसहि तास काम करीत असतो, अंगाला आळेपिळे देण्यापुरतीहि सवड घेत नाहीं. आपण त्याचे झालों–त्याच्यामध्यें मिसळून गेलों, कीं मग आपला उद्यमसुद्धां त्याच्याप्रमाणेंच अतंद्रित झाला पाहिजे. समुद्रापासून वेगळ्या पडलेंल्या बिंदूच्या बाबतींत आपण विश्रांतीची कल्पना करूं शकतों, पण समुद्रांत असणाऱ्या बिंदूला विश्रांति कोठची ? समुद्राला एका क्षणाची तरी विश्रांति आहे कुठें ? आपलेंहि तंतोतंत तसेंच आहे. ईश्वररूपी सागरांत आपण मिसळून गेलों कीं आपली विश्रांति गेली, विश्रांतीची आवश्यकताहि उरली नाहीं. हीच खरी विश्रांति; हीच खरी महान अस्वस्थतेंतील स्वस्थता. म्हणून खरी नम्रता ही आपल्याकडून जीवमात्राच्या सेवेप्रीत्यर्थ सर्वार्पणाची अपेक्षा करते.

या स्थितीचें वर्णन करणें कठिण आहे, पण ती अनुभवगम्य आहे. ज्यानें सर्वार्पण केलें आहे, त्याला ती अनुभवावयास मिळालेली असते. आपणां सर्वांनाहि अनुभवितां येण्याजोगी आहे. दुसरें–तिसरेंच कांहीं करीत असतां कधींकाळीं ती आपल्या हातीं लागून जाईल. तिच्याच मागें लागून तीं मिळणारी नाहीं. ४९

## बोधक प्रसंग

**बाळकोबा भावे:—**

१९३८ सालची सेवाग्रामची गोष्ट. एक बाल–विधवा दीर्घ कालापासून गांधीजीजवळ रहात असे. तिला चहा पिण्याची संवय होती. ही

संवय सोडण्याचा तिनें प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाहीं. चहा पिऊन ती चहाचे प्याले चांगलें धूत नसे असें दिसतें. कारण एके दिवशीं प्याले चांगले न विसळतां तिनें तसेंच ठेवून दिल्याची तक्रार बापूजींच्या कानीं आली. बापूजी चिडले. तसेच क्रोधाच्या आवेशांत रसोड्यांत तिच्याकडे गेले व रागावून कडकपणानें बोलले कीं, "तुला जर असें वागावयाचें असेल, तर तूं आश्रमांतून निघून जा." तीहि चिडली. वास्तविक तिचा अपराध असल्यामुळें तिनें चिडायला नको होतें. पण चिडून ती म्हणाली, "मी ही चाललें, आश्रम राहूं द्या तुमच्याजवळ." असें म्हणून ती मगन-वाडींत श्री. स्व. महादेवभाईजवळ तडक निघून गेली. त्यावेळीं या विधवा-बाईला आपली सख्खी बहीण समजून प्रो. भणसाळी आश्रमांत तिला कांहीं विषय शिकवीत असत. तेहि रागावले. सकाळची सहाची वेळ होती.

मी दुरून हा प्रसंग पहात होतों. हातांत चरखा व आपलें सर्व सामान घेऊन भणसाळी जायच्या तयारीनें गांधीजींचा निरोप घेण्यासाठीं आले व म्हणाले, "आपल्याकडून आम्ही अहिंसा शिकलों. आणि आज आपल्या तोंडून आपल्याला न शोभणारीं क्रोधयुक्त दुर्वचनें कशीं निघालीं?" ते पुढें म्हणाले, "मीं तिला सख्खी बहीण मानली आहे. तिला आश्रमांतून निघून जावयास आपण सांगितलें, मीदेखील जातों."

बापूजींनीं जबाब दिला, "तुम्ही शांत व्हा, जाऊं नका. जाण्याची गरज नाहीं. मी तोंड धुऊन तुमच्याचकडे येतों. तुम्ही आपल्या ठिकाणीं जाऊन बसा."

नंतर ते तोंड धुऊन त्यांच्याजवळ गेले व म्हणाले, "मीं तिला माफीचें पत्र लिहून पाठविलें आहे व तावडतोब परत येण्याविषयीं कळविलें आहे. क्रोधरूपी राक्षस माझ्या चित्तांत कधीं कधीं थैमान करतो. मी चुकीला पात्र आहें. मी महात्मा नसून अल्पात्मा आहें. तुम्हीं सर्वांनीं मला नेहमीं क्षमा करायची आहे." हें ऐकून भणसाळी खजील झाले व जाण्याचा बेत त्यांनीं सोडून दिला. ती विधवा बाईदेखील परत आली. ५०

**महादेव देसाई :—**

गांधीजी आत्मशुद्धीसाठीं १९३३ च्या मेमध्यें २१ दिवसांचें उपोषण सुरू करणार होते. उपोषणापूर्वी गांधीजींनीं आपली प्रकृति डॉक्टराकडून

तपासून घ्यावी, असें मत राजगोपालाचार्य व शंकरलाल बँकर यांनीं दिलें. तेव्हां गांधीजी म्हणाले, " वैद्यकीय तपासणी मी मान्य करूं शकत नाहीं. त्या तपासणीचा अर्थ, माझी श्रद्धाहीनता, असाच होईल. "

" याचा अर्थ तुम्ही आपलें कांहीं सोडावयास तयार नाहीं. आपल्या हातून चूक होणारच नाहीं, असा तुमचा दावा दिसतो. " राजाजी म्हणाले.

हे शब्द ऐकतांच गांधीजी चिडले व खवळून बोलले, " तुम्ही माझी श्रद्धा, माझी निष्ठा यानें ढासळूं शकणार नाहीं. या दिव्यांतून मी सुरक्षितपणें बाहेर पडेन असा मला विश्वास वाटतो. तेवढा तुम्हांला–आणि तुमच्यासारख्या मित्रांना–पुरेसा व्हावा. माझी श्रद्धा कमजोर करण्याचा प्रयत्न तुम्ही करूं नये. उपोषणास सुरुवात करण्यापूर्वीं मी माझी वैद्यकीय तपासणी करून घेण्यास संमति देऊं शकत नाहीं. "

मित्र गेले. गांधीजींच्या जीवाला क्षुब्ध होण्यास आपण कारण झालों, या विचारानें ते खिन्न झाले.

संध्याकाळीं नित्याप्रमाणें फिरावयास गेले असतांना, गांधीजींना अकस्मात् आपली चूक कळून आली. " मी माझ्या दोन प्रिय मित्रांवर मोठा अन्याय केला. " ते म्हणाले, " मानव किती दुबळा आहे–स्खलनशील आहे ! आत्मशुद्धीसाठीं योजलेल्या उपोषणाच्या प्रारंभींच, मी माझ्या जिवलग मित्रांवर रागवावें हें किती चमत्कारिक ! "

दुसरे दिवशीं सकाळीं गांधीजींनीं राजाजींना पत्र पाठविलें, तें असें:–

" तुम्ही मला प्राणाहून प्रिय आहां. तुम्हांला व शंकरलालांना काल मी फार दुखविलें. ' क्षमा करा ' असें मी म्हणून भागणार नाहीं. मी मागण्यापूर्वींच तुम्ही मला क्षमा केलेली आहे. पण काल मी गाढवाप्रमाणें जी गोष्ट नाकारली, तीच आतां मी पतकरतों. तुम्ही म्हणाल त्या वेळीं, तुम्ही सांगाल त्या डॉक्टराकडून, मी माझी प्रकृति तपासून घेण्यास तयार आहें. अर्थात् याला सरकाराची परवानगी लागेल. या तपासणीचा निष्कर्ष जाहीर करूं नये. कारण त्याचा राजकारणांसाठीं उपयोग केला जाण्याचा धोका आहे. वैद्यकीय तपासणी झाली, तरी तिचा परिणाम उपोषण सुरू करण्यावर कांहीं होणार नाहीं, हें मला सांगितलेंच पाहिजे. " ५१

प्यारेलाल:--

तें १९४६ साल होतें. सर्व राष्ट्रांवर दुष्काळाची छाया पसरली होती. ता. २२ सप्टेंबर रोजीं हिंदु पंचागाप्रमाणें गांधीजींचा ७७ वा वाढदिवस होता. तेव्हां एका गांधी-भक्ताच्या मनांत अशी कल्पना आली कीं, या वाढदिवसाच्या निमित्तानें आपण हरिजन मुलांना मेवामिठाई वाटावी.-आणि ती तेव्हांच अन्नमंत्री डॉ. राजेद्रप्रसाद यांचें हस्तें वाटावी.

ही योजना कळतांच गांधीजी खवळले. त्यांच्या रागाचा पारा एकदम वर चढला. त्यांनीं त्या कार्यकर्त्याचा कडकडून निषेध केला.

पुढें गांधीजींनीं दुहेरी प्रायश्चित घेतलें. एक तर स्वतःचा तोल सुटला म्हणून, आणि दुसरें त्या कार्यकर्त्यानें चूक केली म्हणून. त्यांनीं आपल्या रोजनिशींत लिहिलें. " मला क्रोध आला. भोंवतालीं वणवा पेटला असतांना चित्ताचें साम्य राखणें फार कठीण जातें. " एका निकटच्या स्नेह्याला ते म्हणाले, " माझ्या अंतःकरणांत आग पेटली आहे. तरी माझें चित्त शांत राहिलें पाहिजे. तसें कां होत नाहीं ? पुरेशीं अनासक्ती मजजवळ नाहीं कीं काय कुणास ठाऊक ! " ५२

## स्वदेशी

स्वदेशी-व्रत हें या युगांतील महाव्रत होय. जी गोष्ट आत्म्याचा धर्म आहे, परंतु अज्ञानामुळें किंवा अन्य कारणांनीं आत्म्याला जिची जाणीव उरलेली नाहीं, तिच्या पालनासाठीं व्रत घेण्याची जरूर पडते.

स्वदेशी हा आत्म्याचा धर्म आहे, पण त्याचा विसर पडला आहे. म्हणून त्याच्यासंबंधीं व्रत घेण्याची आवश्यकता उत्पन्न होते. आत्म्याच्या दृष्टीनें स्वदेशीचा अंतिम अर्थ सर्व तऱ्हेच्या बाह्य संबंधांपासून संपूर्ण मुक्ति हाच होय. देहसुद्धां आत्म्याला परदेशी आहे. कारण कीं इतर आत्म्याशीं ऐक्य साधण्याच्या आड देह येतो. देह हा आत्म्याच्या मार्गामध्यें विघ्नरूप आहे. स्वदेशीधर्म जाणणारा व पाळणारा इसम जीवमात्राबरोबर ऐक्य साधण्यासाठीं देहाचाहि त्याग करील.

हा अर्थ खरा असेल तर आपल्या जवळपास असलेल्या लोकांच्या सेवेमध्यें मग्न होऊन रहाणें, यांतच स्वदेशीधर्म आहे, हें कळण्यास आपल्याला

अडचण पडणार नाहीं. अशी सेवा केल्यानें दूरचे राहून जातात, किंवा त्यांना नुकसान पोंचते, असा भास होण्याचा संभव आहे, पण तो केवळ भासच. स्वदेशीची शुद्ध सेवा केल्यानें परदेशीचीसुद्धां शुद्ध सेवा घडतेच. जें पिंडीं तें ब्रह्मांडीं.

याच्या उलट दूरची सेवा करण्याचा मोह धरल्यास ती तर घडत नाहींच, आणि जवळच्यांची सेवाहि राहून जाते. माझ्या आधारावर असणाऱ्या कुटुंबीयांना अथवा गांववाल्यांना मी टाकलें कीं, त्यांची माझ्यावर जी भिस्त होती ती फसली. दूरच्यांची सेवा करायला मी सरसावलों, तर त्यांची सेवा करण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्यांना त्यांचा विसर पडतो. 'स्वदेशीचें पालन करतांना मृत्यु आला तरी तो बरा, पण परदेशी भयानकच आहे.' स्वधर्म म्हणजे स्वदेशी.

घोटाळा होतो तो स्वदेशीचा अर्थ न समजल्यामुळेंच. कुटुंबीयांविषयीं मोह ठेवून मी त्यांचे लाड करावे, त्यांच्यासाठीं धन चोरावें, इतर खोटें-नाटें करावें, ही स्वदेशी नव्हे. मीं फक्त त्यांच्या बाबतींतला आपला धर्म पाळावयाचा आहे. तो धर्म शोधीत व पाळीत असतां मला सर्वव्यापी धर्म सांपडून जातो. स्वधर्माच्या पालनानें परधर्मीयांना किंवा परधर्माला हानि पोंचतच नाहीं–पोंचतां कामाच नये. इतरांची हानि होत असेल तर आपण कल्पिलेला धर्म स्वधर्म नव्हे, तो स्वाभिमान आहे, अर्थात् त्याज्य आहे.

स्वदेशीमध्यें स्वार्थ नाहीं, किंवा असलाच तर तो शुद्ध स्वार्थ आहे. शुद्ध स्वार्थ म्हणजे परमार्थ; शुद्ध स्वदेशी म्हणजे परमार्थाची पराकाष्ठा.

स्वदेशी व्रताचें पालन करणारा इसम नित्य आपल्या सभोंवार नजर फिरवीत राहील, आणि जेथें जेथें शेजाऱ्यांची सेवा करण्याची संधि दिसेल, तेथें तो ती करील.

पूर्ण स्वदेशीमध्यें कोणाचा द्वेष नसतो. हा संकुचित धर्म नव्हे. हा प्रेमांतून, अहिंसेतून उत्पन्न झालेला सुंदर धर्म आहे. ५३

## बोधक प्रसंग

**जयरामदास दौलतराम:—**

१९३९ सालच्या डिसेंबरांतील गोष्ट. गांधीजी आपल्या सायंकालीन सहलीकरतां आश्रमाच्या दारांतून बाहेर पडतात, तोंच एक अभ्यागत

त्यांच्यासमोर उभा राहिला. त्यानें जमिनीवर कापडाचें गांठोडें ठेवलें आणि गांधीजींना सादर प्रणाम केला. गांधीजींनीं त्याला उलट प्रणाम केला व म्हटलें, 'मला तुमचें पत्र मिळालें; पण माझ्याकडून उत्तर आल्यावर तुम्ही याल असें मला वाटलें होतें.'

त्यावर आलेले गृहस्थ म्हणाले, "युद्ध सुरू झाल्यावर व्हाईसरॉयच्या भेटीनंतर तुम्ही जें हृदयद्रावक पत्रक काढलें, त्यामुळें मी अगदीं हादरून गेलों. मला तुमच्याकडे आल्याशिवाय व दोन दिवस घालविल्याशिवाय चैन पडेनासें झालें. म्हणून मीं हरद्वार सोडलें आणि तुमच्या उत्तराची वाट न पाहातां येथें आलों."

आलेले पाहुणे परचुरेशास्त्री होते. ते १९२२ सालीं गांधींबरोबर येरवडयाच्या तुरुंगांत होते. त्यांना दुर्दैवानें दुर्धर महारोग जडला होता. त्यांनीं अनेक उपचार केले व शेवटीं त्रासून ते हरद्वार येथें जाऊन राहिले होते.

दुसरे दिवशी पहाटेची प्रार्थना झाल्यावर गांधींनीं आश्रमांतल्या मंडळींना उद्देशून भाषण केलें. ते म्हणाले, "परचुरेशास्त्र्यांच्या रूपानें परमेश्वर माझ्या प्रामाणिकपणाची कसोटी पाहण्यास आला आहे. परचुरे-शास्त्र्यांना महारोग आहे म्हणून त्यांना 'जा' म्हणून सांगणें हें परमे-श्वराला व स्वतःच्या आत्म्याला डावलणें आहे. पण त्याबरोबरच आश्रमांतल्या मंडळींच्या आरोग्याचा मला विचार केला पाहिजे. परमेश्वरानें त्यांनाहि माझ्या स्वाधीन केलें आहे. तुम्ही सर्वजण हा धोका पत्करावयास तयार असल्याशिवाय मी परचुरेशास्त्र्यांना येथें कसें ठेवून घेऊं?"

आश्रमांतली मंडळी म्हणाली, 'आम्ही आमच्यांत परचुरेशास्त्र्यांना घ्यावयास तयार आहों.' हें ऐकून गांधीजींच्या छातीवरील ओझें दूर झालें.

सकाळपासून परचुरे आश्रमवासी झाले. गांधीजींनीं आपल्या झोपडी-शेजारींच परचुऱ्यांच्याकरतां एक नीटनेटकी झोपडी तत्काळ बांधून दिली. त्या झोपडीवर छपराकरतां पांढरी स्वच्छ खादी टाकली. त्यांतून रोग्यावर सूर्यानें किरणें टाकावींत अशी योजना. त्या दिवसापासून गांधीजींपुढें परचुऱ्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि रोग्याचा प्रश्न प्राधान्यानें नव्हता.

महात्माजी दररोज स्वतःच्या हातानें परचुऱ्यांना मालीश करीत. त्यांचा आहारहि त्यांनीं ठरविला होता. त्यांच्याकरतां तयार केलेलें अ

दिवसांतून तीनदां गांधीजी स्वतः तपाशीत. सकाळचें फिरणें संपल्यावर दररोज गांधीजी प्रथम परचुऱ्यांच्या झोंपडींत जात.

परचुरेशास्त्र्यांच्या झोपडींत डास जात. त्यांचा त्यांना त्रास होई. म्हणून बापूजींनीं साऱ्या झोपडीला पुरेल एवढी मोठी मच्छरदाणी करवून घेतली. ती त्या झोपडीवर महिनाभर होती. पुढें त्यांच्यासाठीं स्वतंत्र झोपडी बांधण्यांत आली. ती आतां काढून टाकलेली आहे. ५४

**घनश्यामदास बिर्ला:—**

बरेच वर्षांपूर्वीं दिल्लींत घडलेली गोष्ट आहे. एक स्त्री मृत्युपंथाला लागली होती. रोगाशीं झगडतां झगडतां बिचारीचें शरीर झिजून गेलें होतें. केवळ श्वास शिल्लक होता. तिनें जीवनाचा निरोप घेतला होता. 'रामनाम' घेत ती आपले शेवटचे दिवस घालवीत होती. पण अजून गांधीजींकडून अखेरचा आशीर्वाद घेणें राहिलें होते. त्या बाईनें विचारलें, " मला गांधीजींचें दर्शन होऊं शकेल कां ? जातां जातां मला त्यांचें शेवटचें दर्शन घडूं दे. "

गांधीजी दिल्लीच्या आसपासहि नव्हते. तरी मी आशा दाखविण्यासाठीं म्हटलें, ' पाहतों, तुमची इच्छा ईश्वर कदाचित् पुरी करील. '

आणि दोनच दिवसांनीं मला सूचना मिळाली कीं, गांधीजी कानपूरहून दिल्लीच्या वाटेनें अहमदाबादेकडे जात आहेत. त्यांची गाडी दिल्लीस पहाटे चार वाजतां पोचत होती आणि अहमदाबादेची गाडी पांचला निघणार होती. केवळ एका तासाचेंच अंतर मध्यें होतें; आणि बिचारी रोगीबाई दिल्लीपासून सहा मैलांवर होती. एका तासांत आजाऱ्याला पाहून स्टेशनवर परत येणें मुष्कीलीचें होतें.

दिवस थंडीचे होते. जोराचा वारा सुटला होता. त्यावेळीं मोटारगाड्या उघड्या असत. अशा उघड्या मोटारींतून गांधीजींना अगदीं पहाटें बारा मैलांचा प्रवास करणें धोक्याचें होतें.

गांधीजी गाडींतून उतरले. मी हलक्या आवाजानें विचारलें, " आपणाला थांबतां येणार नाहीं कां ? "

" थांबणें अशक्य आहे. " गांधीजींनीं उत्तर दिलें. मी हताश झालों.

रोग्याची किती निराशा होईल याची मला जाणीव होती. गांधीजींनीं फिरून विचारलें, "थांबायचें कां विचारतां ?"

मीं कारण सांगितलें. गांधीजी म्हणाले, "चला, आतां चला."

"पण एवढ्या थंडींत आणि असा जोरदार वारा सुटला असतां, या पहाटेच्या वेळीं, मोटारींतून मी तुम्हांस कसें नेऊं ?"

"त्याची चिंता नको. मला मोटारींत घाला. उगीच वेळ दवडूं नका." गांधीजींना मी मोटारींत बसविलें. थंडी आणि वरचा झोंबणारा वारा आपल्या शक्तीचें निष्ठुर प्रदर्शन करीत होता. ती रुग्णा शय्येवर पडून "रामनाम" जपत होती. गांधीजी तिच्या खाटेजवळ गेले. मीं म्हटले, "गांधीजी आले आहेत."

तिला तें खरेंच वाटेना. ती स्तंभित झाली. संभ्रमानें ती उठून बसण्याचा प्रयत्न करूं लागली, पण शक्ति कोठें होती ?

तिच्या नेत्रांतून न कळत दोन अश्रु ओघळले. मीं माझें कर्तव्य पार पाडलें असें मला वाटलें. त्या बाईच्या आत्म्याला किती सुख लाभलें, याची साक्ष तिचे नेत्र देत होते.

गांधीजींची गाडी सुटून गेली होती. त्यासाठीं मोटारीनें पुढील स्टेशनवर जाऊन गाडी पकडावी लागली. गांधीजींना त्रास झालाच, पण रोग्याला शांति मिळाली, या संतोषानें त्यांना तो जाणवला नाहीं. ५५

**प्रभाकर माचवे:—**

१९४१ सालीं माझी नियोजित पत्नी शरदिनी फार आजारी पडली. तेव्हां डॉ. सुशीला नायर तेथें नव्हत्या. गांधीजी दिल्लीला व्हाइसरॉयांच्या भेटीला गेले होते. तेथें त्यांना कळतांच, ट्रंक कॉलनें, त्यांनीं तिच्या प्रकृतीबद्दल चौकशी केली.

आले तेव्हां स्वत:च रोग्याचें औषधपाणी, निगा वगैरे त्यांनीं हातीं घेतलीं. 'बा'च्या खोलीलगतच तिची खाट टाकण्यांत आली. तेव्हां तिला लंघनचिकित्सा दिली होती. सर्व रात्र विव्हळण्यांत व ओरडण्यांत ती घालवी. त्या दिवशीं रात्रीं, गांधींच्या थोरपणानें मी अतिशय प्रभावित झालों.

रात्रीं एक–दीडचा सुमार असेल. मी जागा होऊन पाहतों, तों लीलावती बेहेन, कंदील घेऊन उभ्या व गांधीजी एका हातांत काठी व दुसऱ्या हातांत झोपेच्या औषधाचा डोस घेऊन उभे. शरदिनीपासून मी किंवा तिचे वडील फार तर वीस-पंचवीस पावलांच्या अंतरावर अंगणांत झोंपलों होतों. पण गांधीजी तर बरेच दूर होते. मग त्यांच्यापावेतों हिचें विव्हळणें पोंचलें कसें ?

दुसऱ्या दिवशीं सकाळीं लीलावतींनीं मला सांगितलें कीं, ते रात्रीं एक दीडपावेतों आकाशांत पाहात, कसला तरी विचार करीत जागत होते. सर्व सामसूम होतें. तेव्हां हिचें आर्त ओरडणें त्यांना ऐकूं आलें. ते स्वतः दवाखान्यांतून औषध घेऊन आले.

त्याच रात्रीं गांधींनीं 'भाषण–स्वातंत्र्याची ' घोषणा करण्याचा निश्चय केला हीता. ५६

**प्यारेलाल :–**

नोआखालींतील दौऱ्यांत बादलकोटाहून दोन मैल चालून आताकोरा येथें पोहोंचण्यास गांधीजींच्या पथकास तब्बल एक तास लागला. इतका रस्ता निरुंद नि निसरडा होता. तेथें एक जख्ख म्हातारे जोडपें रहात होतें. गांधीजींचें दर्शन घेण्याची त्यांना फार तळमळ होती, पण त्यांच्यापर्यंत जाण्याचें त्राण त्यांच्या अंगीं नव्हतें. ही गोष्ट गांधीजींच्या कानीं गेली. तेव्हां ते स्वतः त्या म्हाताऱ्याच्या झोपडींत संध्याकाळीं गेले. त्यांनीं त्या वृद्ध गृहस्थाचे गाल प्रेमानें कुरवाळले. म्हातारीनें कापराच्या दोन माळा आणल्या. एक तिनें व एक तिच्या पतीनें–त्या माळा गांधीजींच्या गळ्यांत घातल्या. ते दोघेहि आनंदानें डोलूं लागले.

त्या वृद्ध दांपत्यानें दोन शहाळीं आधीं आणून ठेवलीं होतीं. त्यांतील गोड पाणी त्यांनीं गांधीजींना पिण्यास दिलें. पण गांधीजींचा नियम असा होता कीं, सूर्यास्तापूर्वीं जेवण करावयाचें आणि त्यानंतर कोणतेंहि पोषक द्रव्य घ्यावयाचें नाहीं. पण त्या म्हाताऱ्यांच्या भक्तीपुढें गांधीजींचा पंचवीस वर्षांचा नियम विरघळून गेला. त्यांनीं तो 'नैवेद्य' प्रेमानें ग्रहण केला. ५७

**एस्. के. जॉर्ज:–**

त्रावणकोर संस्थानांतील मंदिर–प्रवेशाच्या जाहीरनाम्यानंतर १९३६ सालीं गांधीजींनीं दौरा काढला, तेव्हांची गोष्ट. त्यांना भेटण्या-

साठीं मी त्यांच्या निवासस्थानीं सकाळीं गेलों, पण भेट होऊं शकली नाहीं, तेव्हां मी महादेवभाईना सांगितलें, " माझी पत्नी आजारी आहे. त्यामुळें आम्हीं अद्याप गांधीजींना भेटूं शकलों नाहीं." तें मीं जी. रामचंद्रन् यांनाहि सांगितलें. तेव्हां ते म्हणाले, " मग पर्वतानें महमदाकडे गेलें पाहिजे."

पण तसें होणें बायबलांतील कथेविरुद्ध आहे. " गांधीजींनीं माझ्या झोपडींत पायधूळ झाडावी इतकी माझी योग्यता नाहीं." असेंहि मी म्हणालों.

त्या दिवशीं संध्याकाळीं गांधीजींची सभा फारच प्रचंड झाली. त्यानंतर मोठी मिरवणूक निघाली. पण तींत गांधीजींनीं भाग घेतला नाहीं. ते सभेंतून थेट आपल्या निवासस्थानीं गेले. संध्याकाळचें जेवण करीत असतांना त्यांनीं माझ्या पत्नीसंबंधी चौकशी केली आणि आम्ही कोठें राहतों, याचाहि तपास केला.

योगायोग असा कीं, गांधीजी या ' संस्थानी अतिथीगृहांत ' रहात होते, त्यांच्या शेजारीच आमचें घर होतें. हें कळतांच, जेवण संपतांच, हातांत काठी घेऊन, हे वृद्ध गृहस्थ आपल्या रुग्ण भगिनीच्या समाचारासाठीं तरातरां निघाले. रात्रीचे नऊ वाजले होतें. आम्ही कामें आटोपून विश्रांति घेत होतों. फक्त एक रॉकेलचा दिवा जागा होता. आम्हीं झोपलों नव्हतों. इतक्यांत माझ्या कानीं एक आवाज आला. "हा आवाज महादेवभाईचाच." मीं ओळखलें व तसें पत्नीला सांगितलें.

" केवळ महादेवच आला आहे, असें त्यांना वाटत आहे." दाराबाहेर महादेवभाई बोलत होते. मी बाहेर पाहिलें, तो फाटकापाशीं गांधीजी आणि त्यांची मंडळी उभी ! फाटकाला कुलूप लावलेलें होतें. तें उघडण्यासाठीं मी धांवत गेलों.

" हां, चोराला तुम्ही भितां म्हणावयाचें ! " गांधीजी चेष्टेनें म्हणाले. तेव्हां मी त्यांना रामचंद्रन्शीं माझें झालेलें बोलणें सांगितलें आणि बायबलमधील कथाहि सांगितली व म्हटलें, " आपण माझ्या घरीं यावें, अशी माझी योग्यता नाहीं. '

" वा ! असें कसें म्हणतां ! " असें म्हणून गांधीजींनीं मला खोडून काढलें, ते आंत आले. मी त्यांना दिवाणखान्यांत बसवूं लागलों, पण ते

म्हणाले, " मी तुम्हांला भेटायला आलों नाहीं–तुमच्या पत्नीला पाहाण्या-साठीं आलों आहें." असें म्हणून ते थेट माझ्या पत्नीच्या खोलीकडे गेले. तिच्या खाटेजवळ बसून त्यांनीं तिच्या आजाराची व औषधोपचाराची चौकशी केली.

गांधोजी अगदीं शांतपणें बसून राहिलें. त्यांच्या पाठीमागें कामाची कांहीं गर्दी आहे, असें त्यावेळीं वाटलें नाहीं. ५८

• • •

## : ४ : व्रत–पालन

माझें महात्मेपण व्यर्थ आहे. तें माझ्या बाह्य कृतीमुळें मिळालेलें आहे. त्या कृति राजकारणांतून उद्भवलेल्या आहेत; पण राजकारण हें माझ्या जीवनाचें निकृष्ट अंग आहे व तें क्षणभंगुर आहे. शाश्वत मूल्याचें माझ्या ठायीं कांहीं असेल, तर तें म्हणजे सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य याविषयींचा माझा आग्रह. तोच माझ्या जीवनाचा सत्यांश होय. १

स्वदेशी वृत्ति म्हणजे काय ? दूरच्यांना वगळून निकटच्या परिवाराचा उपयोग करून घेणें व त्या परिवाराची सेवा करणें. उदाहरणार्थ, धर्म घेऊं. वरील व्याख्येप्रमाणें मी माझ्या वाडवडिलांच्या धर्माशीं निगडित झालें पाहिजे. म्हणजेच निकटवर्ती धार्मिक परिस्थितीचा उपयोग मी करून घेतला असें होईल. तो धर्म सदोष असेल तर त्याचे दोष काढून मी त्याची सेवा केली पाहिजे. तसेंच राजकारणाच्या क्षेत्रांत, या भूमींतील स्वदेशी संस्थांमार्फत मीं माझें काम केलें पाहिजे. त्यांच्यांत कांहीं दोष असल्याचें सिद्ध झालें, तर ते दूर करून मी त्या संस्थांची सेवा बजावली पाहिजे. त्याचप्रमाणें आर्थिक क्षेत्रांतहि, माझ्याजवळच्या शेजाऱ्यानें उत्पन्न केलेल्या वस्तुच मी वापराव्या आणि त्यांचे उद्योगधंदे कार्यक्षम करून व त्यांच्या उणिवा भरून काढून मी त्यांची सेवा करावी.अशी स्वदेशी वृत्ति आचरणांत बिंबली तर ती स्वर्गसुख प्राप्त करून देईल. २

या खोलींत तुम्ही आणि मी बसलों आहोंत, हें जितकें सत्य आहे, याहूनहि अधिक ईश्वराचें अस्तित्व अधिक सत्यपूर्ण आहे. मी हवा–पाण्याशिवाय जगूं शकेन, पण ईश्वराशिवाय नाहीं, हें मी सिद्ध करून दाखवूं शकतों. तुम्ही माझे डोळे बाहेर ओढून काढा तरी मी मरत नाहीं. पण तुम्ही माझी ईश्वरावरील श्रद्धा उध्वस्त करा कीं मी मेलोंच ! ३

मानवाचें अंतिम साध्य ईश्वरी साक्षात्कार हें आहे. राजकीय, सामाजिक व धार्मिक अशा त्याच्या सर्व क्रिया ईश्वरी साक्षात्काराच्या अन्तिम ध्येयानें प्रेरित झालेल्या असल्या पाहिजेत. ईश्वराचा साक्षात्कार करून घेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्याला त्याच्या सृष्टींत पाहाणें व त्या सृष्टीशीं समरस होणें. यामुळें मानवमात्राची सेवा करणें हें त्या साक्षात्काराच्या प्रयत्नाचें एक अवश्य अंग ठरतें. सर्व मानवांची सेवा स्वदेशाच्या सेवेविना करतां येणार नाहीं. माझे देशबांधव हे माझे निकटचे शेजारी होत. ते इतके चेतनाशून्य, साहाय्यशून्य, साधनशून्य बनले आहेत कीं, त्यांची सेवा करण्यावरच मी माझी शक्ति केंद्रित केली पाहिजे. हिमालयाच्या गुहेंत मला ईश्वर सांपडेल असें मी माझ्या मनाला जर पटवून देऊं शकलों, तर मी तिकडे तत्काळ कूच करीन. पण मानवतेला वगळून अन्यत्र कोठें मला ईश्वर सांपडेल असें वाटत नाहीं. ४

अखिल मानवजातीशीं ऐक्य साधल्याविना मी आध्यात्मिक जीवन घालवूं शकत नाहीं. आणि त्यामुळेंच मला राजकारणांत भाग घ्यावा लागला. माझ्या दृष्टीनें धर्महीन राजकारण म्हणजे केवळ चिखल आहे. तो टाळला पाहिजे. माझ्या राजकीय व इतर सर्व क्रिया धर्मांतून निघालेल्या आहेत. ५

मी राजकारणांत भाग घेतांना दिसतों, याचें कारण इतकेंच कीं, सापाच्या वेटोळयाप्रमाणें राजकारणानें आजकाल आपल्याला वेढून टाकलें आहे; आणि तें इतकें करकचून कीं, त्यांतून सुटण्याचा आपण कितीहि प्रयत्न केला, तरी सुटका अशक्य होते. म्हणून त्या सापाशीं झुंज खेळण्याची मला इच्छा आहे.

राजकीय कार्यापेक्षां माझें सामाजिक कार्य कोणत्याहि प्रकारें कमी दर्जाचें व कमी प्रमाणाचें नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, राजकारणाचें सहाय्य घेतल्याशिवाय माझें समाज-सुधारणेचें कार्य फारसें पुढें जाऊंच शकत नाहीं असें मला आढळून आलें—आणि म्हणून मी राजकारणांत उतरलों—आणि तेंहि समाज-सुधारणेला पोषक ठरेल, इतक्या प्रमाणांतच. समाज-सुधारणेचें किंवा आत्म-शुद्धीचें हें कार्य तथाकथित निर्भेळ राजकारणापेक्षां मला शतपटीनें प्रिय आहे, हें मी स्वच्छपणें कबूल करतों. ६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ

खास दैवी अंश असा कांहीं माझ्या ठायीं असल्याचा दावा मी करीत नाहीं. मी केवळ सत्याचा नम्र शोधक आहें. तें सत्य शोधून काढावें असा माझा निर्धार आहे. ईश्वराचा साक्षात्कार होण्यासाठीं कितीहि त्याग करावा लागला, तरी तो मी भारी मानीत नाहीं. माझ्या साऱ्या कृति याच एका उद्देशानें चाललेल्या असतात—मग त्या कृति सामाजिक असोत, राजकीय असोत, भूतदयेच्या असोत कीं नैतिक स्वरूपाच्या असोत.

आणि माझी अशी समजूत आहे कीं, बड्या किंवा बलाढय व्यक्तीपेक्षां आपल्य दीनहीन लेकरामध्यें च ईश्वर पुष्कळ वेळा वास करतांना आढळतो. म्हणून मी त्या दीन-बांधवांच्या दशेस पोंचण्यासाठीं धडपडत असतों. त्यांची सेवा केल्याविना मी त्यांची दशा प्राप्त करून घेऊं शकत नाहीं. यासाठीं मला दलित समाजाच्या सेवेची तळमळ लागून राहिलेली आहे.

ही सेवा मी राजकारणांत उतरल्याशिवाय करूं शकत नाहीं, म्हणून मी राजकारणांत आहें. मी गुरु नाहीं, तर भारताची-आणि त्याद्वारें मानवतेची—नम्रपणें सेवा करूं इच्छिणारा व त्यासाठीं चुकतमाकत धडपडणारा असा सेवक आहें. ७

हिंदुस्थान माझें सर्वस्व होऊन राहील हें खरें, पण जगांतील अन्य राष्ट्रांच्या कल्याणाशीं सुसंवाद मी अवश्य ठेवीन. हिंदुस्थान व त्याचें स्वातंत्र्य मी तेव्हांच अबाधित राखूं शकेन, कीं जेव्हां अखिल मानव कुटुंबाविषयीं मी सद्भाव बाळगीन. हा सद्भाव या पृथ्वीतलावरील हिंदुस्थान-नामक अल्प भू-भागावर वस्ती करुन राहिलेल्या मानवी कुटुंबापुरतांच मर्यादित असतां कामा नये. इतर लहान लहान राष्ट्रांच्या मानानें हिंदुस्थान हा भलामोठा देश आहे; पण एकंदर जगाच्या किंवा विश्वाच्या मानानें हिंदुस्थान काय आहे ? ८

माझ्या तरुणपणीं जेव्हां मला राजकारणाची तोंडओळखहि नव्हती, तेव्हांपासून मी जातीजातींच्या हार्दिक ऐक्यांचें स्वप्न पाहात आलों आहे. तें स्वप्न " याचि देहीं याचि डोळां " खरें झालेलें मला पहावयास मिळालें तर, या माझ्या वृद्धावस्थेंतहि, लहान बालकाप्रमाणें मी आनंदानें उड्या मारीन.

असें स्वप्न साकार करण्यासाठीं आपल्या जीवाचें बलिदान करण्यास कोण सिद्ध होणार नाहीं ? मगच आपल्याला खरें स्वराज्य प्राप्त होईल.

ग्रा. क्र. १०२५

मग, कायद्यांच्या व भूगोलाच्या दृष्टीनें आपलीं दोन राज्यें अस्तित्वांत असलीं तरी, कोणीहि आपल्या दैनंदिन जीवनांत, हीं राज्यें वेगळीं आहेत असें मानणार नाहीं. हें दृश्य मला किती भव्य वाटतें ! त्यामुळेंच तें प्राप्त होईल कीं नाहीं याची शंका वाटते. पण तें प्राप्त होईपर्यंत, एकाद्या बालकाप्रमाणें, माझें समाधान होणार नाहीं. याच ध्येयासाठीं मी जगत आहें–आणि जगूं इच्छित आहें.–याहून दुसऱ्या कोणत्याहि हीन ध्येयासाठीं नव्हे.

भारतांत असो किंवा पाकिस्तानांत असो, असें नंदनवन अवतरेल. त्यांत कोणी रंक रहाणार नाहीं कीं बेकार असणार नाहीं. उच्च–नीच, लक्षाधीश मालक व उपासपोटी मजूर–असा भेदभाव राहाणार नाहीं तेथें उत्तेजक पेयें वा पदार्थ दिसणार नाहींत. स्त्री–पुरुषांना समान मान मिळेल आणि त्या उभयतांची शुद्धता व चारित्र्य यांचें संरक्षण जागरूकपणें केलें जाईल. स्वतःच्या पत्नीशिवाय इतर सर्व स्त्रिया माता, भगिनी किंवा कन्या, त्यांच्या त्यांच्या वयोमानानुसार, मानल्या जातील.

तेथें अस्पृश्यतेला थारा राहाणार नाहीं. सर्व धर्मांविषयीं समभाव, राहील. सर्वजण पोटासाठीं परिश्रम करतील–आणि तोहि अभिमानानें, आनंदानें व स्वेच्छेनें. ९

माझें राष्ट्र अत्यंत प्राचीन आहे. त्याचा इतिहास पुरातन व गौरवास्पद आहे. सांप्रत त्या राष्ट्रांत दोन महान् संस्कृती नांदत आहेत. इस्लाम व हिंदु या त्या संस्कृतीच्या जोडीला ख्रिस्ती संस्कृतीचे बरेच अनुयायी आणि पारशी संस्कृतीचे सर्वच्या सर्व अनुयायी तेथें नांदत आहेत. या सर्वांचें मनोमीलन होऊन हिंदुस्थान इंग्लंडप्रमाणेंच पूर्ण स्वतंत्र झाला, तर या दोन राष्ट्रांमध्यें सन्मानाची भागीदारी निर्माण होऊन त्यामुळें त्या दोन राष्ट्रांचें कल्याण होईल. अशा आशेचें स्वप्न उराशीं बाळगून मी येथें आलों आहें. १०

लोकशाहींत शेतकरीच सत्ताधारी असावा. प्रामाणिक व समर्थ अशा शेतकऱ्याला पुढें आणण्यांत मला आनंदच वाटेल. अशा शेतकऱ्याला इंग्रजी येणार नाहीं; पण त्याचा चिटणीस होण्यास मी पंडित जवाहरलालांना सांगेन. परदेशच्या वकिलांच्या गांठीभेटी, त्या शेतकऱ्याच्या वतीनें, जवाहरलाल घेतील व तसें करण्यांत त्यांनीं अभिमान मानावा असेंहि मी सांगेन.

असा शेतकरी पंतप्रधान आपल्याला रहायला राजवाडा मागणार नाहीं. तो शेणामातीच्या झोपडींत राहील व आकाशाखालीं झोपेल. दिवसांतून तो जेव्हां रिकामा असेल, तेव्हां तो आपल्या शेतांत काम करील. सारा नक्षाच एकदम बदलून जाईल. ग्रामपंचायतीच्या राज्यांत हिंदुस्थानांत सर्वांत जास्त महत्त्व कोणाचें असेल, तर तें शेतकऱ्याचें, हें उघडच आहे. ११

हिंदी राज्ययाल, स्वतःच्या बाबतींत व स्वतःच्या परिवाराचे बाबतींत, मद्यापासून पूर्ण मुक्त असला पाहिजे. त्याशिवाय देशांत दारूबंदी होणें जवळजवळ असंभवनीयच.

राज्यपाल व त्याचा परिवार यांच्या द्वारां सूत-कताई प्रगट झाली पाहिजे. खादी ही भारतांतील कोटचवधि मूक जनतेशीं समरस झाल्याची स्पष्ट निशाणी आहे–'निर्वाहासाठीं श्रम' ( Bread laboar ) करण्याची जरूरी पटल्याची खूण आहे–आणि संघटित हिंसेवर आजच्या समाजाची उभारणी झालेली जी दिसते, ती संघटित अहिंसेवर करण्याची आवश्यकता मान्य असल्याचें चिन्ह आहे.

राज्यपालानें झोंपडींत रहावें–तेथें सर्वांना सुलभ प्रवेश असावा. त्याचें काम उत्तम व्हावें, म्हणून त्याला निवांतपणा सहज मिळावा. ब्रिटिश गव्हर्नर हा अर्थातच ब्रिटिश सामर्थ्याचें प्रतीक होता. त्याच्या किल्लेवजा इमारती हिंदी राज्यपालानें नाना देशींच्या राजदूतांच्या सत्कारासाठीं राखून ठेवाव्यात. पण सर्वांची समानता राखणारें सर्वोदयी तत्त्वज्ञान हिंदी राज्यपालाच्या प्रत्येक कृतींतून उमटावयास हवें. देशी वा विदेशी–कोणतेंहि भारी किंमतीचें सामान त्यानें वापरतां कामा नये. 'साधी रहाणी व उच्च विचारसरणी' हें त्याचें ब्रीद असलें पाहिजे. केवळ प्रवेश–द्वार शृंगारण्यासाठीं हें ब्रीद-वाक्य उपयोगांत न आणतां, त्याप्रमाणें त्यानें आपलें दैनंदिन जीवन चालविलें पाहिजे.

राज्यपालाच्या जीवनांत कोणत्याहि प्रकारची अस्पृश्यता, जातिभेद, वंशभेद वा वर्णभेद मुळींच असतां कामा नये. पौरस्त्य वा पाश्चात्य धर्मातील व संस्कृतींतील जें जें सर्वोत्तम असेल, तें तें त्याच्या जीवनांतून प्रगट व्हावें. तो भारताचा नागरिक असेल–आणि म्हणूनच जगताचाहि नागरिक असेल. १२

हिंदुस्थानांतील एखाद्या मोठ्या शहरांत एखादा मोठा राजवाडा उभारला जात आहे असें जेव्हां जेव्हां माझ्या कानावर येतें, तेव्हां तेव्हां एकदम माझ्या मनांत चिंता उत्पन्न होते आणि मी म्हणतों, ‘ अरेरे, हा सारा पैसा शेतकऱ्यांकडून आलेला आहे. ’ हिंदुस्थानच्या लोकसंख्येपैकीं पाऊणशें टक्के लोक शेतकरी आहेत आणि तेच धान्याच्या एका ताटाच्या जागीं दोन ताटें काढूं शकतात. पण त्यांच्या श्रमाचीं जवळ जवळ सर्वच फळें जर आम्ही त्यांच्यापासून हिरावून घेऊं किंवा दुसऱ्यांना हिरावूं देऊं, तर आमच्यामध्यें स्वराज्याची भावना फारशी जागृत राहूं शकणार नाहीं. आमची मुक्तता या शेतकऱ्यांच्या द्वारांच होऊं शकेल—वकील, डॉक्टर किंवा श्रीमंत जमीनदार ती करूं शकणार नाहींत. १३

अस्पृश्यतेचा कलंक हिंदु समाजाच्या अंतःकरणावरून पुरा पुसला गेला, तर त्या घटनेचे परिणाम हिंदुस्थानांतील सर्व जातींवरच नव्हे, तर अखिल जगतावर झाल्याविना रहाणार नाहींत, अशी मला बालंबाल खात्री आहे. ही माझी खात्री दिवसादिवसाला दृढावत आहे. क्रोडो मानवां-विषयींची अस्पृश्यतेची भावना अंतःकरणांतून काढून टाकावयाची आणि दुसऱ्या कोटयवधि मानवाविषयीं तीच भावना बाळगावयाची—हें मला शक्य नाहीं. उच्चनीच असा भेदभाव हिंदूंच्या अंतःकरणांतून निघाला; तर त्या घटनेमुळेंच इतर जातीजातींतील मत्सर व अविश्वासहि नष्ट होतील—आणि जातींतील अंतर्गत द्वेषमत्सरहि नाहींसे होतील. यामुळेंच या प्रश्नावर मी माझ्या आयुष्याची होड घातली आहे. अस्पृश्यतेशीं मी जी ही लढाई खेळत आहें, ती केवळ स्पृश्य-अस्पृश्य हिंदूंची एकी निर्माण करण्यासाठीं नाहीं, तर हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती आणि इतर सर्व भिन्नभिन्न धार्मिक जमाती यांच्यामध्यें ऐक्य उत्पन्न व्हावें, यासाठीं आहे.

अस्पृश्यता-निवारण करणें म्हणजे अखिल जगतावर प्रेम व त्याची सेवा करणें. म्हणून तें अहिंसेचेंच एक अंग आहे. अस्पृश्यता घालविणें म्हणजे मानवामानवांतील भेदभावाची तटबंदी कोसळणें; एवढेंच नव्हे तर जीवमात्रांतील उच्चनीचता लयास नेणें. अशी तटबंदी जगांत सर्वत्र उभी असलेली आपल्याला आढळते. १४

खादीप्रभृति ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन झालें तर आपल्या सर्व राष्ट्रीय

जीवनाचीच पुनर्घटना होईल व बहुजन समाजाच्या अंतःकरणांत साधेपणा व कौटुंबिक वृत्ति यांचें ध्येय रुजेल. पृथ्वीवरील दुर्बल राष्ट्रांचें शोषण करून साम्राज्यशाही उभारण्याची हाव आपण धरणार नाहीं. त्याचप्रमाणें आरमारी व वैमानिक दलांनीं संरक्षिलेली उत्तुंग अशी भोगवादी संस्कृतीहि आपण स्वीकारणार नाहीं. तिच्यामुळें जगांतील शांततापूर्ण जीवन जवळ जवळ अशक्य झालें आहे.

उलट, आम्ही त्या साम्राज्यशाहीचें रूपांतर "राष्ट्रकुटुंबांत" करूं. त्यामुळें प्रत्येक राष्ट्रांतील सर्वोत्तम गुणांचा लाभ सर्व जगाला होईल व जगांतील दुर्बल राष्ट्रें किंवा वंश यांचें संरक्षण, पाशवी बलानें नव्हे, तर आत्मक्लेशानें केलें जाईल. १५

"खादी-तत्त्व" म्हणजे काय ? सकाळच्या वेळीं घराबाहेर पडतांना आपण जेव्हां खादीचे कपडे अंगांत घालतों, तेव्हां आपण मनांत हे चिंतिलें पाहिजे कीं, "दरिद्रनारायणाच्या भक्तीसाठीं, भारतांतील अन्नान्न करणाऱ्या कोट्यवधि बांधवासाठीं मी ही खादी परिधान करीत आहें." अशी वृत्ति आपल्या अंगीं एकदां बाणली, म्हणजे आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत पूर्ण साधेपणा, अभय, धीमेपणा व असीम श्रद्धा ओतप्रोत भरून राहील. सूत काततांना या गुणांची जरूरी असते. पृथ्वीतलावरील प्रत्येक मानवा-विषयीं बंधुभाव बाळगणें हा खादी-तत्त्वाचा अर्थ होय. ज्यामुळें आपल्या बांधवांची हानि होण्याचा संभव आहे, अशा प्रत्येक वस्तूचा संपूर्ण त्याग खादीधारी माणसानें केला पाहिजे. हें खादीतत्त्व आपण आपल्या लाखो देशबांधवांच्या अंतःकरणांत जर रुजविलें, तर आपल्या या भारतभूमीचें वैभव केवढें होईल ! १६

'नई तालीम' म्हणजे उद्योगद्वारां शिक्षण, असें वर्णन लोक करतात. आणि तें बरोबरहि आहे. पण त्यांत सत्याचा एक अंशच आहे. या नव्या शिक्षणाचें मूळ याहून खोलवर गेलेलें आहे.

मानवाच्या सर्व व्यवहारांत सत्य व प्रेम भरून राहिलीं पाहिजेत—मग ते व्यवहार वैयक्तिक जीवनांतील असोत कीं सार्वजनिक जीवनांतील असोत. जीवनाच्या सर्व क्रियामध्यें सत्य व प्रेम ओतप्रोत भरून रहावीं, या विचारांतून उद्योगद्वारां शिक्षणाची कल्पना स्फुरली. खेडुतांवरील

माझ्या प्रेमामुळें मला असें वाटलें कीं, खरें शिक्षण सर्वांना सुलभतेनें मिळालें पाहिजे आणि तें प्रत्येक शेतकऱ्याला दररोजच्या व्यवहारांत उपयुक्त ठरलें पाहिजे.

असें शिक्षण ग्रंथांतून मिळत नसतें–तें ग्रंथावर अवलंबून नसतें.

अशा शिक्षणाचा विशिष्ट धर्माशीं संबंध नसतो. तें धार्मिक म्हणावयाचेंच तर, ज्या विश्वात्मक धर्मापासून विशिष्ट धर्म निघाले, त्या विश्वात्मक धर्माचें म्हणतां येईल. हें शिक्षण जीवन–ग्रंथातूनच मिळतें. १७

प्रत्येक खेडयांत एक हातमाग व प्रत्येक घरांत एक चरखा १८

स्वदेशी व्रत ह्मणजे द्वेषाचें व्रत नव्हे. तें निःस्वार्थ सेवेचें तत्त्व आहे आणि त्याचें मूळ शुद्ध अहिंसेंत म्हणजे प्रेमांत आहे. १९

चरख्याचे ठायीं पुढील गुण आहेतः––

(१) ज्यांना फुरसद आहे व थोडया फार पैशांची गरज आहे त्यांना हुकमी धंदा मिळतो.

(२) तो हजारों लोकांना माहीत आहे.

(३) तो चालविण्याची कला सहज शिकतां येते.

(४) त्याच्यासाठीं जवळ जवळ कांहींच भांडवल लागत नाहीं.

(५) चरखा थोडया पैशांत व विनाआयास बनविला जातो. टकळीवरहि सूत काढतां येतें.

(६) दुष्काळाच्या दिवसांत चरख्यामुळें ताबडतोब मदत मिळते.

(७) परदेशी कापडापायीं हिंदुस्थानांतून द्रव्याचा जो ओघ बाहेर जात आहे, तो चरखा थांबवूं शकेल.

(८) यामुळें वाचलेले लाखों रुपये सत्पात्र अशा गरीबांना मिळतील.

(९) जनतेंतील सहकार्य वाढविण्याचें हें अत्यंत प्रभावी साधन आहे. २०

पुरुषापेक्षां स्त्रियांना ईश्वरानें अहिंसेची शक्ति अधिक प्रमाणांत दिलेली आहे. ती शक्ति मूक असते आणि म्हणूनच अत्यंत प्रभावी असते.

स्त्रिया जर आपला उच्च दर्जा ओळखतील, तर अहिंसा-मंत्राचा प्रसार त्या सहजच करतील.

हिंदुस्थानांतील स्त्री-पुरुष मृत्यूला धैर्यानें व अहिंसेनें तोंड देण्याचा गुण आपल्या अंगीं बाणवितील, तर ते शस्त्रास्त्रांना हंसत हंसत तुच्छ लेखतील आणि जनतेच्या हिताचें निर्भेळ स्वातंत्र्य हें आपलें ध्येय हस्तगत करतील, अशी माझी बालंबाल खात्री आहे. अवघ्या जगाला तो एक आदर्श होऊन राहील. या कामीं स्त्रिया नेतृत्व करूं शकतील. कारण त्या सहिष्णुतेच्या मूर्ति होत. २१

● ● ●

## : ५ : आश्रमांचा परिचय

### फिनिक्स वसाहत

दक्षिण आफ्रिकेंत सत्याग्रह चालवीत असतांना गांधीजींनीं जॉन रस्किन यांचें अन्टु धिस् लास्ट (सर्वोदय) हें पुस्तक वाचलें आणि त्यांतील तत्त्वें लगेच आचरणांत आणलीं. दहा दिवसांचे आंतच त्यांनीं १००० पौंड किंमत देऊन १०० एकर शेती विकत घेतली. तेथें एक छोटासा झरा होता, एक पडकी झोपडी होती आणि विपुल फळझाडें होतीं. त्यांतील कांहीं तर आंब्यांनीं व संत्र्यांनीं लकडलेलीं होतीं.

ही वसाहत डर्बनपासून १४ मैल दूर होती व फिनिक्स स्टेशनपासून २॥ मैल होती. १९०४ सालच्या मध्यावर ही वसाहत अस्तित्वांत आली. तिच्यावर पूर्वीं वस्ती नव्हतीच. खूप झाडझाडोरा माजलेला होता आणि सापांचा सुळसुळाट होता. १

दक्षिण आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याचे आंत सुमारें सहा मैलांवर ही वसाहत आहे. ती नाताळमध्यें आहे. या वसाहतीला 'फिनिक्स' हें नांव दिलें गेलें, तें जवळच्या स्टेशनावरून, हें उघडच आहे. पण त्याशिवाय ग्रीकांच्या पुराणकथामध्यें फिनिक्स नांवाच्या पक्ष्याचें वर्णन आहे. तो एकटा असतो व स्वतःच्या राखेंतून पुनः जन्म घेतो. त्याच्या अंगचें पावित्र्य, त्याग व अमरत्व हे गुण गांधीजींना प्रिय होते; म्हणूनही त्यांना आपल्या वसाहतीचें नांव 'फिनिक्स' हें योग्य वाटलें.

तेथें जमीन काळीभोर होती व पूर्वीं पडीत राहिलेली असल्यामुळें ती फार सुपीक होती. पावसाचें दुर्भिक्षहि तेथें नव्हतें. वर्षांतून सहा महिने बहुधा सतत पाऊस असे. अगदीं पाऊस नाहीं असे जेमतेम तीनच महिने असतील.

या वसाहतीच्या एका कोपऱ्यांत एक छोटीसी बाग होती. तींत आंबे, संत्री, मलबेरी इत्यादि फळांचीं झाडें [होतीं. बाकीच्या जमिनीवर गवत माजलेलें होतें. पश्चिमेच्या बाजूला एक मोठा झरा होता. तो बारमहा वहात असे. त्याच्या भोंवतीं दाट झाडी होती. त्या झाडांच्या फांद्यांना हिरवे हिरवे बारीक साप लोंबत असलेले दिसत. एक एका दिवसांत ५।५, ६।६ साप दृष्टीस पडत.

हिंवाळ्यांत थंडी कडाक्याची असे आणि उन्हाळाहि तसाच भयंकर असे. पिण्याच्या पाण्याची टंचाई, म्हणून पावसाचें पाणी सांठवून ठेवावें लागे. शेतीसाठीं दूरच्या ओढ्याहून पाणी बादल्यांतून आणावें लागे. विहिरी खणणेंहि त्या उंच जागीं शक्य नव्हतें.

आरंभीं गांधीजी व त्यांचे सहकारी तंबूंत रहात. रुस्तुमजी नांवाच्या सधन पारशी मित्रानें त्यांना पत्रे वगैरे बांधकामाचें सामान दिलें. लगेच कामास सुरुवात झाली. बोअर युद्धांत गांधीजींच्या बरोबर जीं हिंदी माणसें होतीं, त्यांत सुतार व गवंडी होते. त्यांच्या मदतीनें, एका महिन्याच्या आंत ७५ फूट लांब व ५० फूट रुंद, अशी एक इमारत गांधीजींनीं बांधली. तेथें छापखाना सुरू झाला. 'इंडियन ओपीनियन' हें साप्ताहिक वृत्तपत्र डर्बनहून फिनिक्सला नेण्यांत आलें.

छापखाना चालविण्यासाठीं एक ऑईल एंजिन बसविण्यांत आलें. पण गांधीजींचा भर हातानें काम करण्यावर. म्हणून छापण्याच्या यंत्राला हातानें फिरवितां येईल असें चाक जोडण्यांत आलें. शेतीहि हातानेंच करावयाची असा गांधीजींचा निर्धार होता. पहिल्याच दिवशीं रात्रीं ऑईल एंजिन काम देईना. तेव्हां गांधीजींनीं सुतारांना उठविलें आणि त्याचेकरवीं मुद्रण-यंत्र चालवून अंक छापावयास सुरुवात केली. स्वत: गांधीजींनींहि यंत्र चालविलें. त्यांचे सहकारी आळीपाळीनें रात्रभर काम करीत होते.

सकाळचे सात वाजले. अजून अंकाची छपाई पुष्कळच राहिली होती. पण आतां यंत्राचा रुसवा गेला होता. हात लावतांच तें चालू लागलें व भराभर पत्राच्या प्रती बाहेर पडूं लागल्या. आश्रमवासीयांचें स्वावलंबन व वक्तशीरपणा हे दोन्ही गुण या प्रसंगीं दिसून आले. पुढें कांहीं काळ, ऑईल एंजिन बाजूस ठेवून हातानेंच मुद्रण-यंत्र चालविलें जाऊं लागलें.

या वसाहतींत रहाणाऱ्यांचे दोन वर्ग होते—एक योजकवर्ग व दुसरा सेवकवर्ग. सेवक पगारी असत. योजकांना आपला चरितार्थ शरीर-श्रमावर चालवावा लागे. त्यासाठीं प्रत्येकाला छापखान्याभोंवतीं तीन एकर जमीन दिलेली होती. प्रत्येकाच्या जमिनीला वेगळें कुंपण नव्हतें. वाटा-पायवाटांनींच प्रत्येकाचें क्षेत्र आंखलें जाई. छोटचा शेतकऱ्याला साजेशीं, विटामातीचीं व गवताच्या छपराचीं घरें बांधण्याचीच आरंभीं कल्पना होती. पण पैशाच्या टंचाईमुळें, लोखंडी पत्र्यांच्याच इमारती उभारण्यांत आल्या.

एकादा रहिवासी घर सोडून गेला, तर तें विकलें जात नसे, तर दुसऱ्या रहिवाश्याला रहावयास दिलें जाई.

या वसाहतीवर प्रथम स्थाईक झाले, ते हिंदी व युरोपियन लोक ध्येयवादी होते. आपली वसाहत शक्य तितकी स्वयंपूर्ण करण्याकडे त्यांचें लक्ष होतें. जीवनाला आवश्यक अशा गरजा त्यांनीं जास्तींत जास्त कमी केल्या होत्या.

वसाहतीच्या पलीकडे इमारती नव्हत्या. दोन मैलांवर झुलू शेतकऱ्यांच्या कांहीं झोपडचा दिसत.

दोन महिन्यांचे आंत, आठ इमारती उभ्या राहिल्या. ओबड-धोबड लाकडाचे खांबावर लोखंडी पत्र्याच्या इमारती उभारल्या गेल्या. गांधीजींच्या खोल्या इतरांसारख्याच, फक्त जरा मोठचा. भोजन-गृहासाठीं एक मोठी खोली, झोपण्यासाठीं दोन खोल्या, एक लहानसें स्वयंपाकघर आणि एक साधें स्नानगृह—हें गांधीजींचें निवास-स्थान. उन्हाळचांत गांधीजी उघडचा माळच्यावर निजत. तेथें इतरहि लोक निजत. वाऱ्याचा उपद्रव होऊं नये म्हणून झापडें लावलेलीं होतीं. स्नानगृहाचे वर पत्र्यास भोंक पाडून व वर पाण्याचें पिंप ठेवून, 'तुषार-स्नाना'ची (Shower-Bath) सोय करण्यांत आली होती.

## वसाहतीचा हेतु

सफाईची व्यवस्था साध्री होती. प्रत्येक बंगल्यापाशीं एक संडास असे. त्यांतील बादली एका विशिष्ट जागीं नेऊन टाकण्याची जबाबदारी प्रत्येक बंगलेवाल्यावर असे. २

झुलु-युद्धांत हिंदी शुश्रूषा-पथक नेण्यापूर्वीं गांधीजींनीं आपलें कुटुंब या वसाहतीवर ठेवलें.

या वसाहतीला गांधीजींनीं आपल्याजवळ होती ती सारी संपत्ति दान केली व तिचा ट्रस्ट केला. ५१३० पौंड ४ शिलिंग ५ पेन्स—एवढी गांधीजींची त्यावेळीं मिळकत होती.

ट्रस्टचा हेतु त्यांनीं नमूद केला, तो असा होता —

"टॉलस्टॉय व रस्किन यांनीं आपल्या जीवनांत व ग्रंथांत जीं ध्येयें प्रकट केलीं, तीं अनुसरणें व पुरस्कारणें." ३

गांधीजींनीं १९१३ च्या सप्टेंबरांत फिनिक्स वसाहतीवर शाळा सुरू केली. या वेळीं त्या वसाहतीचें स्वरूप पुष्कळच सुधारलेलें होतें. भाजीपाला, फळफळावळ यांची लागवड बहुधा प्रत्येक रहिवासी करूं लागला होता. खिडक्यांना पडदे दिसूं लागले होते व घरांत खुर्च्याटेबलासारखें सामान आलें होतें. शाळेची इमारत एकाच खोलीची पण प्रशस्त होती. तींत १४ मुलें-मुली शिक्षण घेत होतीं. तीं ५ ते १७ वयाचीं होतीं.

प्रत्येक रविवारीं गांधीजींच्या निवास-स्थानीं सामुदायिक प्रार्थना होई. तींत पूर्व व पश्चिम यांचा सुंदर संगम साधला जाई. एक-दोन इंग्रज माणसें ऑर्गन वाजवीत. भजनाच्या संगीतांत गांधीजीहि भाग घेत. निरनिराळ्या धर्मांचीं १८ भक्ति-गीतें, तेथेंच छापून, लहानशी आश्रम भजनावलि तयार केलेली होती. प्रार्थनेच्या प्रारंभीं गांधीजी गीता किंवा बायबल यांतील उतारा वाचीत. ४

## चारित्र्यावर भर

कार्यकर्त्यांच्या प्रत्येक कुटुंबांत आठ मुलांपर्यंत रहाण्याची सोय करण्यांत आली. हेतु हा कीं, परक्या मुलांना घरच्या वातावरणांत राहिल्यासारखें वाटावें. पूर्वीं हिंदुस्थानांत 'गुरुकुलाची' जी पद्धत होती, त्यासारखी ही व्यवस्था होती. शाळेंत सर्व हिंदी मुलांना प्रवेश होता. जेवणाचे बाबतींत पंक्तिप्रपंच केला जात नसे. कार्यकर्त्यांचेंच अन्न मुलांना मिळे. अर्धी बाटली दूध, दोन औंस तूप, कणिकेची लापशी, भात, ताज्या भाज्या, ताजीं फळें, शेंगदाणे, साखर व ब्रेड असा मुलांचा आहार असे. सर्व मुलांना

एकच गण-वेश असे. प्रत्येकाचें शिरोभूषण त्याच्या संवयीप्रमाणें राही मुलांना बिछाने नव्हते. तुरुंगांतल्याप्रमाणें लाकडी फळ्यावर तीं झोपत शाळेला फी नसे. छापखान्यांत काम करणारे लोकच शाळेंत शिकवीत. ५

शाळेचा मुख्य उद्देश चारित्र्यसंवर्धन हा होता. ज्ञान अनेक प्रकारचें असतें. त्यांत कांहीं ज्ञान हानिकारकहि असतें. कांहीं माणसें शिक्षण घेतात, पण चारित्र्यशून्य बनतात. योजना आंखून शिक्षण न दिलें, तर कांहीं माणसें नास्तिक बनतात. पण या शाळेचा उद्देश नीतिभावना दृढ करणें व चारित्र्याचें संवर्धन करणें हाच होता.

विद्यार्थ्यांना मातृभाषा (गुजराती, हिंदी, शक्य तर तमीळ), इंग्रजी भाषा, गणित, इतिहास, भूगोल, वनस्पतिशास्त्र व सृष्टिशास्त्र हे विषय शिकविले जात. वसाहतींत जर्मन, इंग्रज, आफ्रिकन, चिनी, पारशी, मुस्लिम, यहुदी, हिंदु, पण नाना देशांचे, नाना धर्मांचे लोक होते. ते सर्व उच्चनीच-भाव मनांत न आणतां प्रेमानें व समभावानें वागत. निरनिराळया धर्मांबद्दल आदर व सहिष्णुता ठेवून स्वधर्माचें पालन करण्यावर सर्वांचा कटाक्ष असे.

शाळेचे प्रमुख अध्यापक म्हणजे गांधीजीच. ते कधीं कधीं कडेवर मूल घेऊनहि मुलांना शिकवीत व त्यांच्या वह्या तपाशीत.

विद्यार्थ्यांची रहाणी साधी असावी यावर गांधीजींचा फार भर. एके दिवशीं सकाळीं मुलें आंघोळ करीत होतीं. तेथें गांधीजी गेले ते हातांत केशकर्तन यंत्र घेऊनच. त्यांनीं एकएका मुलाला आपल्याजवळ बोलावलें व त्याच्या डोक्यावरचे केस कापले. "चैनींत जगण्याचें हें वय नाहीं. आपल्याला नव्या मार्गानें आपलें जीवन घालवावयाचें आहे. तसें करण्याची ज्याची तयारी नसेल, त्यानें आतांच येथून निघून जावें" असें ते म्हणाले.

गांधीजींनीं असा नियम घालून दिला होता कीं, ज्याला जेव्हां इच्छा होईल, तेव्हां त्यानें फळें तोडून खातां कामा नये. केवळ बागेंतील फळांनाच हा नियम लागू आहे असें नव्हे; तर जंगलांतील फळांनाहि. दिवसांतून तीन जेवणांत लागतील तितकीं फळें मागून घेतां येत. पण त्याव्यतिरिक्त फळ खाणें निषिद्ध, तें चौर्यच समजलें जाई. ६

## विद्यार्थ्यांचा दिनक्रम

पहाटे मुलांना उठविण्याचें काम गांधीजी करीत. मुख-मार्जन झाल्यावर मुलें कुदळी घेऊन बागेंत खणण्यास जात. गांधीजी सर्वांत जास्त परिश्रम करीत. स्वयंपाकघरावर देखरेखहि ते करीत.

गांधीजी गीता शिकवीत. मुलांची संख्या २५ ते ३० होती, दर शनिवारीं परीक्षा असत. महिन्यांतून साऱ्या विषयांची परीक्षा होई. परीक्षेंतील उत्तर-पत्रिका गांधीजी स्वतः तपाशीत. संध्याकाळीं प्रार्थनेसाठीं सारे एकत्र जमले, म्हणजे तेथें गांधीजी परीक्षेचा निकाल जाहीर करीत. चुकाहि सांगत. परीक्षेच्या वेळीं विद्यार्थ्यांवर कोणाची देखरेख नसे.

सकाळच्या शाळेची वेळ ९ ते ११ असे. नंतर अर्धा तास शेतांत खणण्याचें काम विद्यार्थ्यांना करावें लागे. भर उन्हांत हें शेतकाम करवून घेण्यापेक्षां सकाळच्या गारव्यांत तें घ्यावें, अशी विनंति एका विद्यार्थ्यानें एकदां गांधीजींना केली. त्यांनीं उत्तर दिलें, "वेळ बदलायला मी मुळींच तयार नाहीं. उन्हांत शेतांत काम करण्याची संवय तुम्हांला लागली पाहिजे. आज तुम्ही इथें शिकत आहां, पण जर उद्यां लढा सुरू झाला आणि तुम्हांला तुरुंगांत जावें लागलें, तर तुम्हांला सावलींत कोणी काम करूं देईल काय? तिथें तुम्हांला तापत्या उन्हांत मजुरासारखें बेगुमान काम करावें लागेल. त्यांत जर तुम्ही थकला आणि आपलें धैर्य सोडलें, किंवा तें सुटलें, तर तो तुमचा आणि माझा भयंकर अपमान ठरेल. तुमचीं वडील माणसें सकाळपासून रात्रीपर्यंत एकसारखीं कष्ट करतात, तें तुम्ही कसें विसरतां? त्यांना आपण कांहीं हातभार लावला पाहिजे. त्यानें त्यांचें काम हलकें होईल आणि तुम्हांलाहि काटकपणाची सवय लागेल."

दुपारीं ११-३० वाजतां मुलें स्नानास जात. नंतर भोजन. मग मोठीं माणसें छापखान्याच्या कामावर जात व विद्यार्थी स्वतः अभ्यास करीत. याच वेळीं गांधीजी 'इंडियन ओपिनियन'साठीं लेख लिहीत. ते पहाटें ३ वाजतां उठत, तरी दुपारीं भोजनोत्तर वामकुक्षी करीत नसत. दुपारीं तीन वाजतां विद्यार्थी छापखान्यांत जात, कंपोजिंग शिकत, इतर

कामेंहि करीत. तेंच त्यांचें शिक्षण. संध्याकाळचे पांच वाजले म्हणजे विद्यार्थी पुनः शेतांत कामास जात. सूर्यास्त होईपर्यंत ते काम करीत.

## नैतिक वातावरण

विद्यार्थ्यांना शासन करण्याची गांधीजींची विशिष्ट पद्धत असे. एकदां दोन मुलांना रस्त्यावर दोन नाणीं सांपडलीं. त्यांचा उपयोग काय करावयाचा? डर्बनला कोणी तरी जाऊन खाऊ आणावा अशी कल्पना विद्यार्थ्यांनीं काढली. एक शिक्षिकाहि त्या कटांत सामील झाली. पुढें गांधीजींच्या कानीं ही कुणकूण गेली. त्यांनीं चौकशी सुरू केली.

शेवटीं गांधीजींनीं देवदासला खोलींत बोलावलें व खोदखोदून विचारलें बाहेर विद्यार्थी कान टवकारून ऐकत होते. त्यांचे कानीं फाड्फाड् असा पांच चपराकांचा आवाज आला. बिचाऱ्या देवदासला शिक्षा झाली अशी विद्यार्थ्यांची कल्पना झाली. पण सत्य असें होतें कीं, गांधीजींनीं स्वतःच्या श्रीमुखांत मारून घेतलें होतें. विद्यार्थ्यांचा दोष हा गुरुचाच दोष त्यांनीं मानला.

सायंकाळीं प्रार्थनेनंतर गांधीजींनीं आपल्या भाषणांत या प्रकरणाचा उल्लेख केला आणि जाहीर केलें कीं, "विद्यार्थी व शिक्षक मला सत्य सांगत नाहींत, याचें मला दुःख होतें. सत्य समजलें नाहीं तर माझें जीवन मातीमोलाचें आहे. सत्य कळेपर्यंत मी अन्नपाणी वर्ज करणार."

याचा सर्वांवर विलक्षण परिणाम झाला. शिक्षिकेनें आपला अपराध कबूल केला. मुलांनींहि घडलें तें सांगितलें. गांधीजींचा उपवास एका दिवसानें सुटला. अशा नैतिक वातावरणांत ती शाळा चालू होती. ७

एकदां दोन मुलांनीं २० वर्षें वयाच्या एका मुलीची कुचेष्टा केली त्या वेळीं गांधीजी जोहान्सबर्ग येथें होते. त्यांना ही बातमी कळतांच कॅलनबॅकसह ते फिनिक्सला तांतडीनें गेले. 'माझ्यावर जणु वज्राघात झाला' असें गांधीजींना वाटत राहिलें.

"आपल्या मनाला किती वेदना होत आहेत हें या विद्यार्थ्यांना कसें पटवून द्यावें ? आणि त्यांना आपल्या अधःपाताची जाणीव कशी करून द्यावी? ' याचा विचार गांधीजींनीं केला. अखेर त्यांनीं निर्णय केला कीं, आपण सात दिवस उपवास करावा.

८

त्याप्रमाणें त्यांनीं उपवास केला आणि पुढें साडेचार महिने ते एक वेळेलाच जेवून राहिले. त्या मुलीनेंहि उपोषण केलें. तिनें दागदागिने टाकून दिले, सुतकांतल्यासारखा वेष घेतला आणि आपले केस कापून घेतले. प्रायश्चितच घेतलें हें तिनें! ८

"पुन: जर वसाहतींत असें चुकीचें वर्तन घडलें, तर मी १४ दिवसांचे पूर्ण उपोषण व १ वर्षाचें अर्धें उपोषण करीन. आणि तिसऱ्यांदा असाच प्रसंग ओढवला, तर मी २१ दिवस पूर्ण उपोषण करीन.' असें गांधीजींनीं सायं-प्रार्थनेच्या वेळीं जाहीर केलें.

आफ्रिकेंतून हिंदुस्थानांत आल्यावर गांधीजींनीं फिनिक्स वसाहतींतील कार्यकर्त्यांना प्रथम स्वामी श्रद्धानंदांचे कांगडी येथील गुरुकुलांत आणि नंतर डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचे 'शांति-निकेतनांत' ठेवलें. तेथें त्यांची व्यवस्था स्वतंत्र होती. त्यांना रहाण्यासाठीं स्वतंत्र खोल्या दिलेल्या होत्या. ते स्वत:चा स्वयंपाक निराळा करीत. दक्षिण आफ्रिकेंतील आपला दिनक्रम ते बोलपूर येथेंहि चालवीत होते. ९

## टॉल्स्टॉय फार्म

दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाचा लढा दीर्घकाल चालू राहिला व व्यापक स्वरूप धारण करूं लागला. त्यांत शेकडों स्त्री-पुरुष भाग घेऊं लागले. तेव्हां सत्याग्रहींची व त्यांच्या कुटुंबीयांची रहाण्याची सोय कोठें करावी, हा प्रश्न गांधीजींपुढें उभा राहिला. तेव्हां हर्मन कॅलनबॅक यांनीं आपली ११०० एकर जमीन, कांहींहि भाडें वा पट्टी न घेतां, ता. ३० मे १९१० रोजीं दान दिली.

कॅलनबॅक हे गांधीजींचे एक श्रीमंत स्नेही. ते जर्मन असून स्थापत्य-विशारद होते. दोघेहि टॉल्स्टॉयचे भक्त. त्या दोघांनीं या तात्पुरत्या वसाहतीला टॉल्स्टॉयचें नांव दिलें. प्रथम 'टॉल्स्टॉय वाडी' म्हणत, पण पुढें 'टॉल्स्टॉय फार्म' या नांवानें ती वसाहत ओळखली जाऊं लागली.

हा फार्म साधारणपणें दोन मैल लांब व पाऊण मैल रुंद होता. त्या फार्मवर सुमारें १००० फळझाडें होतीं आणि एक लहानसें घरहि होतें.

मोसम आला म्हणजे संत्रीं, अलबुखार इत्यादि फळांची तेथें रेलचेल असे.

दोन विहिरी व एक झरा यांपासून पाणी मिळे. जवळचें रेल्वेस्टेशन म्हणजे लॉली, तें फार्मपासून सुमारें एका मैलावर होतें, आणि जोहान्सबर्ग २१ मैलांवर होतें. ता. ४ जुलैपासून कांहीं सत्याग्रही फार्मवर रहाण्यास आले व तेथें काम करूं लागले. १०

या सत्याग्रहींत गुजरात, तामिलनाड, आंध्र व उत्तर हिंदुस्तान या प्रांतांतून आलेले लोक होते. त्यांत हिंदु, मुसलमान, पारशी व ख्रिस्ती – असे नाना धर्मांचे लोक होते. त्यांपैकीं सुमारें ४० तरुण होते, दोघेतिघे म्हातारे होते, ५ स्त्रिया होत्या आणि ३० मुलें होतीं–त्यांत ५ मुली होत्या.

या भिन्नधर्मीय सत्याग्रहींसाठीं वेगवेगळीं स्वयंपाकगृहें असणें योग्य नाहीं याची जाणीव त्या सत्याग्रहींना होती. गांधीजींचें काय? हवें असेल त्याला मांसाहारहि देण्यास ते तयार होते. पण मुसलमान व ख्रिस्ती सत्याग्रहींनीं आपखुशीनेंच सांगितलें, आम्ही शाकाहारच घेऊं. पाकगृहाचा ताबा ख्रिस्ती स्त्रियांनीं घेतला. त्यांना गांधीजी व इतर सत्याग्रही साहाय्य करीत.

अन्न अत्यंत साधें असे. दिवसांतून जेवण किती वेळां व कोणत्या वेळीं घ्यावयाचें तें ठरवून टाकलेलें होतें. सर्वांसाठीं एकच स्वयंपाकघर होतें आणि सर्वजण जेवणास एकाच रांगेंत बसत. आपापलीं भांडीं घासण्याचें व विसळण्याचें काम जो तो करी. सर्वांना लागणारीं भांडीं घासण्यासाठीं आळीपाळीनें गट पुढें येत. मद्यपान व धूम्रपान यांना पूर्ण बंदी होती.

इमारतींच्या बांधकामाचे नकाशे कॅलनबॅक यांनीं तयार केले. एक युरोपियन गवंडी सत्याग्रही लोकांना बांधकाम शिकवीत असे. एका गुजराती सुतारानें आपण मोफत काम करणार असल्याचें स्वयंप्रेरणेनें सांगितलें. त्यानें कमी दरानें काम करणारे इतरहि सुतार आणले. सत्याग्रहींनीं साध्या मजुरीचें सारें काम अंगावर घेतलें.

इमारती बांधून होईपर्यंत सुमारें दोन महिने सर्व सत्याग्रही तंबूत राहिले. जरूर त्या सर्व मापाचें लाकूड आणलें गेलें. खिडक्या-दारें फारशी करावयाचीं नव्हतींच. इमारती मुख्यत: लोखंडी पत्र्याच्याच होत्या. म्हणून त्या उभारण्यास फार काळ लागला नाहीं.

पुरुषांच्या खोल्या स्त्रियांपेक्षां निराळ्या होत्या. विवाहित पुरुषांनाहि आपल्या बायकांपासून दूर रहावें लागे. त्या फार्मवर असेपर्यंत त्यांना ब्रह्मचर्य पाळावें लागे. ११

तुरुंगापेक्षां फार्मवर सत्याग्रही जादा काम करीत. स्वयंपाकांत ज्यांची योजना झाली नसेल, त्या सर्व लहानथोरांनीं फळझाडांकडे व बागेकडे कांहीं वेळ लक्ष देणें सक्तीचें होतें. या ना त्या कामासाठीं प्रत्येकाला जोहान्सबर्गला जावें लागे. सामुदायिक काम असेल, तरच रेल्वेनें आणि तेंहि तिसऱ्या वर्गानें जावयाचें; नाहीं तर पायीं गेलें पाहिजे असा नियम होता. पहाटें दोन वाजतां उठावें व अडीच वाजतां चालूं लागावें, आणि सहा-सात तासांत जोहान्सबर्गला पोंचावें असा साधारणपणें नित्यक्रम असे. १२

## आश्रमीय जीवन

आरोग्याचे नियम फार्मवर कडकपणें अंमलांत आणले जात. सारी घाण मुद्दाम खणलेल्या खड्डयांत टाकली जाई. रस्त्यावर पाणी सांडलेलें खपत नसे. घाणेरडें पाणी बादल्यांत भरून झाडांना घालण्यांत येई. जेवणाचें खरकटें व भाज्यांचे देठ वगैरे खत म्हणून उपयोगांत आणलें जाई. घराजवळ एक चौरस खड्डा खणलेला असे. त्यांत मळ टाकला जाई व तो मातीनें झाकला जाई. १३

सत्याग्रही कुटुंबांना स्वावलंबी बनविण्यासाठीं फार्मवर लहानलहान उद्योगधंदे सुरू करण्यांत आले होते. एका जर्मन मठांत जाऊन कॅलनबॅक यांनीं वहाणा बनविण्याची विद्या हस्तगत केली आणि ती त्यांनीं गांधीजींना शिकविली. पुढें गांधीजींनीं ती कैक सत्याग्रहींना शिकविली. सत्याग्रही लोक वहाणा बनवूं लागले व त्या आपल्या मित्रांना विकूं लागले.

दुसरा धंदा कॅलनबॅकनीं सुरू केला, तो म्हणजे सुतारीचा. बाकापासून पेटयांपर्यंत लहानमोठया साऱ्या लाकडी वस्तु तेथें तयार होऊं लागल्या.

मुलांसाठीं एक शाळा जूनपासून सुरू करण्यांत आली. वर्ग फक्त दुपारीं २ ते ५ भरविले जात. कारण सकाळीं सर्वांना शारीरिक श्रम करावे लागत. शाळेंत गांधीजी व कॅलनबॅक हे शिक्षकाचें काम करीत. त्यांना कांहीं तरुण मदत करीत.

गांधीजी धार्मिक शिक्षण देत. त्यासाठीं त्यांनीं हिंदुधर्माचीं मूलभूत तत्त्वें लिहून काढलीं होतीं. मुस्लिम व पारशी धर्मांचे ग्रंथहि त्यांनीं अभ्यासिले. सर्व धर्मांविषयीं समभाव ठेवण्यास व भ्रातृभावानें एकत्र रहाण्यास ते

शिकवीत असत. या शाळेंतील पाठांचे आधारावरच गांधींनी 'नीति-धर्म' हें पुस्तक लिहिलें. १४

गांधीजी ज्या वर्गास शिकवीत, त्यांत नाना तऱ्हेचीं मुलें होतीं. ७ ते २० वर्षांपर्यंतचे मुलगे त्यांत होते आणि १२ वर्षांपर्यंतच्या मुली होत्या. गांधीजींनीं त्या वर्गाचे दोन विभाग केले. गुजराती विभागाला गुजराती भाषेच्या माध्यमांतून व इतरांना इंग्रजींतून ते शिकवूं लागले. तामीळ व तेलगू मुलांना मातृभाषा किंवा इंग्रजी येत असे, शिवाय डच भाषाहि थोडीथोडी कळे.

गांधीजींच्या अध्यापनाचें प्रधान अंग म्हणजे मनोरंजक कथा मुलांना सांगणें वा वाचून दाखविणें. ते त्यांना तमीळ व उर्दू या भाषाहि थोडयाफार शिकवीत. इतिहास, भूगोल व अंकगणित या विषयांचें सर्वसाधारण ज्ञानहि दिलें जाई. हिंदु मुलांना संस्कृत शिकविलें जाई-लेखनहि शिकविलें जाई. तशींच प्रार्थनेसाठीं भजनें. मुसलमान मुलामुलींना कुराणाचें शिक्षण दिलें जाई. या शाळेंत क्रमिक पुस्तक नसे.

शिक्षण-क्षेत्रांत गांधीजी अंतःकरणाच्या विकासाला किंवा चारित्र्याच्या संवर्धनाला अग्रस्थान देत. तेथें शारीरिक शिक्षा पूर्णपणें वर्ज्य होती. शिक्षकाच्या चारित्र्यानेंच विद्यार्थ्यांचें चारित्र्य घडतें असा गांधीजींचा विश्वास होता. १५

आश्रमामध्यें एक मुलगा खूप आडदांडपणा करी, खोटें बोले, कुणाला जुमानीत नसे, इतरांबरोबर भांडत असे. एके दिवशीं त्यानें फारच दंगा केला. गांधीजी फिकिरींत पडले. विद्यार्थ्यांना ते कधीं शिक्षा करीत नसत. या वेळीं त्यांना फार राग आला. ते त्याच्याकडे गेले व त्याची समजूत घालूं लागले. पण कांहीं केल्या त्याची समजूत पटेना. त्यानें गांधीजींना फसविण्याचाही प्रयत्न केला. गांधीजींनीं जवळ पडलेला रूळ उचलला आणि त्याच्या दंडावर मारला. मारतांना गांधीजी कांपत होते, हें त्याच्या लक्षांत आलें असावें. अशा तऱ्हेचा अनुभव गांधीजींच्या बाबतींत कोणाहि विद्यार्थ्याला यापूर्वी आला नव्हता. विद्यार्थी रडूं लागला. त्यानें गांधींपाशीं माफी मागितली. त्याला काठी लागून दुःख झालें, यासाठीं तो रडला असें नव्हे. मनांत आणता तर गांधींना भारी झाला असता, इतकी शक्ति त्याच्यामध्यें

होती. त्याचें वय सतरा वर्षांचें होतें व तो बांध्यानें मजबूत होता. पण त्या रुळांत त्याला गांधींजींचें दुःख दिसून आलें. या प्रसंगानंतर तो कधीं गांधींविरुद्ध गेला नाहीं. पण गांधींना मात्र तो रूळ मारल्याबद्दल पश्चात्ताप होत राहिला. त्यांना वाटे, "त्याला मारून आपण आपल्या आत्म्याचें नव्हे, तर आपल्या पशुतेचें आविष्करण केलें." १६

सह-शिक्षणाचाहि प्रयोग गांधींनीं तेथें केला. खोडकर म्हणून गाजलेल्या मुलांना, सात्त्विक तरुण मुलींबरोबर, एकाच स्थानीं, स्नानासाठीं ते पाठवीत. त्या वेळीं ते मुलांना आत्म-संयमाचें महत्त्व पूर्णपणें समजावून सांगत. स्नानाला मुलें-मुली एकत्र गटानें जात. एकएकटें जाण्यास मनाई होती. बहुतेक वेळीं गांधीजी स्वतः स्नानाच्या झऱ्यावर हजर असत.

एकदां एका तरुणानें दोन मुलींची चेष्टा केली. ती बातमी गांधीजींना कळली. गांधीजींचें चित्त कंपित झालें. त्यांनीं चौकशी केली, तेव्हां त्यांना कळून आलें कीं, बातमी खरी आहे. गांधीजींनीं त्या तरुणाची कानउघाडणी केली. पण तेवढ्यानें त्यांचें समाधान झालें नाही. पुनः त्या मुलींकडे कोणाहि तरुणानें पापी नजरेनें पाहूं नये, म्हणून त्यांच्या शरीरावर कांहीं खूण असावी असें गांधीजींना वाटलें. त्यामुळें इतर मुलींनाहि आपल्या शीलावर कोणी शितोडे उडविणार नाहीं अशी हमी मिळेल. मुलींना सुरक्षितपणा वाटेल व तरुणांची पापी दृष्टि निर्विषयी होईल अशी खूण काय असावी, याचा विचार करीत गांधीजी रात्रभर जागे होते.

सकाळीं त्यांनीं त्या मुलींना हळूच विचारलें, "तुमचे हे सुंदर व लांबसडक केस मला कापूं द्याल का?" मुली प्रथम ती सूचना ऐकूनच घेईनात. पण गांधीजींचा हेतु लक्षांत येतांच त्यांनीं आपले केस कापण्यास मान्यता दिली. मग गांधीजींनीं स्वतःच त्या मुलींचे केस कापले.

पुन्हा मुलींची तशी चेष्टा कधीं कोणी केली नाहीं.

उघड्या अंगणांत गांधीजी नेहमीं झोपत. आणि त्यांचे भोंवतीभोंवतीं मुलेंमुली झोपत. फार्मवर निजण्यासाठीं खाट कोणालाच नसे. सारे जमिनीवर झोपत. एक लाकडी उशी असे. खालीं एक व वर एक अशीं दोन कांबळीं प्रत्येकाला असत.

शक्य तितकी साधी रहाणी आश्रमांत असे. आश्रमीय मंडळीच एकमेकांचे केस कापीत. सारे सत्याग्रही कामकरी बनले होते. त्यांचा पोशाक युरोपियन कामकऱ्यासारखाच असे. तुरुंगांतल्यासारखा चड्डी व शर्ट यांचा. जाडयाभरडया निळया कापडाचे हे कपडे करीत आणि ते तेथील स्त्रियाच शिवून तयार करीत.

दिवसांतून तीनदां जेवण दिलें जाई. सकाळीं ६ वाजतां ब्रेड व कॉफी, दुपारीं ११ वाजतां भात, डाळ व भाजी, व संध्याकाळी ५॥ वाजतां दूध-पोळी किंवा ब्रेड व कॉफी असा आहार असे. तुरुंगांतल्यासारख्या थाळींतून अन्न वाढलें जाई. चमचे लाकडाचे असत व ते फॉर्मवरच बनविलेले असत.

संध्याकाळच्या भोजनानंतर साधारणपणें सात वाजतां सर्व आश्रमीय मंडळी प्रार्थना म्हणत. त्यांत भजनें असत, तीं हिंदी, गुजराती व इंग्रजी अशा नाना भाषांतील होतीं. रामायण, बायबल, कुराण इत्यादि धर्मग्रंथांतील उतारेहि कधीं कधीं वाचून दाखविले जात. रात्रीं ९ वाजतां सारेजण झोपीं जात. १७

एकादशीचा उपवास पुष्कळजण करीत, कांहींजण चातुर्मास्याचीं व्रतेंहि घेत. रमझानच्या दिवसांत, मुस्लिमबांधवांच्या मैत्रीसाठीं इतर आश्रमवासीहि दिवसांतून एकदांच, म्हणजे संध्याकाळीं जेवत, प्रत्येकाच्या धार्मिक उपासनेंत बाकीचे सारे भाग घेत. उपोषणाचें महत्त्व मनःसंयमनाचे दृष्टीनेंहि मानलें जाई.

फार्म शहरापासून दूर होता. तथापि अगदीं मामुली औषधेंसुद्धां फार्मवर ठेवलेलीं नसत. त्या काळींहि गांधीजींची निसर्गोपचारावर पूर्ण श्रद्धा होती. सुदैव असें कीं, डॉक्टराला पाचारण करण्याइतकें आजारीपण कोणालाच आलें नाहीं. गांधीजींनीं निसर्गोपचाराचे प्रयोग चालविलेच होते. त्यांनीं एका म्हाताऱ्याचा दमासुद्धां निसर्गोपचारानें बरा केला. निसर्गोपचारावरील त्यांचा विश्वास इतरांच्याहि अंतःकरणांत उत्पन्न होत होता. गांधीजींकडून निसर्गोपचार घेण्यासाठीं बाहेरचे रोगीहि मधून मधून फार्मवर जात.

फार्मवर सापांचा सुळसुळाट असे. त्यांना मारणें गांधीजी पाप मानीत. कॅलनबॅक यांनीं सापांच्या विविध जातींचा अभ्यास केला आणि विषारी साप कसा ओळखावा हें त्यांनीं इतरांना शिकविलें. १८

## कोचरब

गांधीजी आफ्रिकेंतून आपल्या सहकाऱ्यांसह हिंदुस्थानांत १९१५ च्या जानेवारींत आले. प्रथम स्वामी श्रद्धानंदांच्या हरद्वार येथील गुरुकुलांत त्यांनीं निवास केला व नंतर डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या शांति-निकेतन-मध्यें. त्यानंतर अहमदाबादजवळील कोचरब या खेड्यांत एक एकमजली बंगला भाड्यानें घेऊन ते राहिले.

ता. २५ मे १९१५ रोजीं आश्रमाची स्थापना झाली. आश्रमाचें नांव काय ठेवावें ? कोणी म्हणाले, 'सेवाश्रम' तर कोणी सुचविलें 'तपोवन;' पण गांधीजींनीं पसंत केलें 'सत्याग्रहाश्रम' हेंच नांव. कारण त्यांत आपलें साध्य व साधन दोन्हीहि सूचित होतात असें त्यांना वाटलें.

मातृभूमीची सेवा हें आश्रमाचें ध्येय होतें. ती सेवा यथासांग व्हावी म्हणून सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह इत्यादि व्रतें आश्रमांत पाळलीं जात होतीं.

आश्रमांत सुमारें २५ स्त्री-पुरुष होते. त्यांतहि १३ तमीळ होते; बाकीचे हिंदुस्थानच्या भिन्न भिन्न भागांतून आलेले होते. ते सारे एका कुटुंबाच्या भावनेनें रहात. सर्वांसाठीं एकाच स्वयंपाकघरांत अन्न शिजविलें जाई.

व्यवस्थापक, अंतेवासी व विद्यार्थी असे तीन विभाग आश्रमवासीयांचे असत.

### शरीर-श्रमावर भर

आश्रमांत हिंदी भाषेंतून आदेश दिले जात. बहुतेक सर्व हिंदी भाषांना आधारभूत असणारी संस्कृत भाषा सर्वांनीं शिकावी असा गांधीजींचा कटाक्ष असे. स्वतःच्या चरितार्थासाठीं सर्वांनीं शारीरिक श्रम करावे आणि आपल्या मानसिक व आध्यात्मिक गुणांचा विनियोग समाजहितासाठी करावा, असा त्यांचा आग्रह असे. आश्रमाच्या 'व्यवस्थापकांनीं कांहीं काळ तरी दररोज शेती करावी, कारण शेतीवरच बहुसंख्य मानवांची उपजीविका होते. हिंदुस्थानांतील दारिद्र्याचें एक प्रमुख कारण म्हणजे चरखा व हात-माग यांचा लोप होय, म्हणून व्यवस्थापकांनीं हातमागावर भर द्यावा अशी गांधीजींची शिकवण असे.

आश्रमांतील व्रतें घेतल्याखेरीज कोणाला व्यवस्थापक होतां येत नसे. अंतेवासींना व्रतें घ्यावीं लागत नसलीं, तरी त्याप्रमाणें वागावें लागे.

चार वर्षांवरील मुलांमुलींना विद्यार्थी म्हणून प्रवेश मिळे, पण त्यापूर्वी त्यांच्या आईबापांना त्यांच्यावरील आपला सारा ताबा सोडावा लागे. विद्यार्थ्यांना व्रताची दीक्षा दिली जाई. त्यांना धर्मतत्त्वें, शेती, हातमाग व साहित्य शिकविलें जाई. साहित्याचें अध्यापन मातृभाषेंतूनच होई. इतिहास, भूगोल, गणित, अर्थशास्त्र इत्यादि विषय शिकविले जात. संस्कृत, हिंदी व एक तरी द्रविड भाषा शिकणें अवश्य असे. उर्दू, बंगाली, तमीळ व तेलगू या चार लिप्या शिकविल्या जात. इंग्रजी 'दुसरी भाषा' म्हणून शिकविली जाई. सर्व अभ्यासक्रम दहा वर्षांचा आखलेला असे. विद्यार्थी सज्ञान झाला म्हणजे तो व्रतें घेऊन अंतेवासी बनू शके किंवा आश्रमांतून निवृत्त होई. सर्व अभ्यासक्रम समाप्त होईपर्यंत विद्यार्थ्यांना आईबापांची भेट घेण्यास परवानगी नसे.

सर्वांचे कपडे साधे असत; तसेंच अन्नहि. रोज तीनदां जेवण मिळे. मिरची-मसाला वर्ज्य. दूधतूप क्वचित्‌च—मांसाप्रमाणें तेंहि उत्तेजक असतें म्हणून. ताजीं व सुकीं फळें मात्र भरपूर देत.

सुट्टी अशी कधींच नसे. पण आठवड्यांतील दोन दिवस कार्यक्रमांत बदल असे. तेव्हां विद्यार्थ्यांना आपलीं वैयक्तिक कामें करतां येत. तसेंच एका वर्षांत तीन महिने विद्यार्थ्यांना प्रवास करण्यास मोकळीक मिळे. बहुतेक प्रवास पायींच असे.

फी नसे. पण आश्रमाचा खर्च भागण्यासाठीं पालकांनीं यथाशक्य देणग्या द्याव्या अशी अपेक्षा असे.

आश्रमांत पाहुणे येत, पण त्यांनाहि आश्रमाचे नियम पाळावे लागत. १९

## साबरमती

कोचरब येथून १९१८ सालीं गांधीजींनीं आपला आश्रम अहमदाबाद-जवळील साबरमती नदीच्या कांठीं नेला. त्यांना आपला आश्रम शहरापासून दूर पण शहराशीं संबंध ठेवतां येईल अशा अंतरावर पाहिजे होता. २०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें

या सत्याग्रहाश्रमाची जागा विकत घेण्यासाठीं व तीवर इमारती बांधण्यासाठीं गांधीजींना त्यांच्या मित्रांनीं दोन लाख रुपयांहून अधिक पैसे दिले. २१

आश्रमांत उद्योग हा प्रधान होता. कारण शारीरिक उद्यम करणें हा मनुष्याचा धर्म आहे. जो उद्यम करीत नाहीं. तो चोरीचें अन्न खातो. शिवाय आश्रमाचा उद्योग जितका स्वतःकरितां आहे, तितकाच परमार्थ साधण्याकरितां आहे. चरख्याला मध्यबिंदु बनविला आहे; कारण हिंदुस्थानच्या कोट्यवधि लोकांकरितां सर्वसाधारण जोडधंदा शेतीव्यतिरिक्त हाच म्हणतां येईल. त्यांत धर्म आणि अर्थ दोन्ही बरोबर संभाळले जातात. आश्रमाचें अस्तित्व केवळ देशसेवेसाठींच नाहीं, तर देशसेवेच्या द्वारा जगत्सेवा साधण्यासाठीं आहे; आणि जगत्सेवाद्वारा मोक्ष मिळविण्यासाठीं — ईश्वराचें दर्शन करण्यासाठीं आहे.

येईल त्या प्रत्येकाला आश्रमांत दाखल करून घेतां येणार नाहीं. आश्रम हा पंगुभवन नाहीं, अनाथालयहि नाहीं. तो सेवक आणि सेविका यांच्याकरितां, साधकांकरितां आहे. म्हणून ज्यांना शरीरानें काम करतां येण्याजोगें नाहीं त्यांच्यासाठीं तो नाहीं. तथापि ज्यांचीं अंतःकरणें सेवाभावानें स्निग्ध झालेलीं असतील, त्यांचें शरीर पंगु असलें तरी त्यांना आपण घेऊं. मात्र असे थोडेच लोक घेतां येतील. पण आश्रमांत जे आश्रमवासी म्हणून दाखल झाले असतील ते दाखल झाल्यानंतर पंगू झाले, तर त्यांना आपण कांहीं काढून टाकणार नाहीं. २२

खरोखर आश्रम धर्मशाळा आहे. धर्मशाळा याचे दोन अर्थ. दान म्हणून दिलेलें निवासस्थान आणि धर्म जाणण्याचें आणि जाणून त्याचें पालन करण्याचा प्रयत्न करण्याचें स्थान. त्यांतल्या दुसऱ्या अर्थीं तो धर्मशाळा आहे. पण सत्य म्हणजेच धर्म; म्हणून सत्याला शोधून त्याप्रमाणें चालण्याचा प्रयत्न करण्याची — म्हणजे सत्याचा आग्रह राखण्याची — शाळा म्हणजे सत्याग्रह-आश्रम.

सत्य शोधतांना जीवमात्राशीं ऐक्य साधावयाचें असतें, म्हणून आश्रम हा एक विशाल बनत जाणारें कुटुंब आहे. असें असूनहि तो त्यापेक्षां जास्ती आहे. कारण तो धर्माच्या अनुषंगानें आहे. त्याच्यावर धर्म अवलंबून नाहीं. शिवाय तो विद्यालय आहे आणि तसा तो असूनहि तसा नाहीं. कारण तो

कुटुंब आहे. त्यामुळें सामान्य शिक्षणाचे बाह्य नियम त्याला जड भरता-प्रमाणें वागूं देणार नाहींत. नियमाचा आत्मा संभाळण्यासाठीं नियमाच्या देहाला – बाह्य स्वरूपाला सोडावें लागेल. २३

धर्मशाळेंत उतारू कांहीं स्थिर राहात नाहींत. कुटुंबी जनहि स्थिर रहात नाहींत. आश्रमाच्या चौकटींत बसतील ते रहातील, न बसतील ते जातील. त्याचा हर्षशोक कसला? शिवाय आज तर आपल्या हातून दुसरें कांहीं होणार नाहींच. जे येतील आणि ज्यांच्यासाठीं आपण थोडा वेळ तरी देऊं शकूं त्यांना शक्ति आहे तेथवर ठेवून घ्यावें. पुष्कळसे आपणहूनच पळून जातील. आपले नियमच पुष्कळांना पळवून लावतील. येईल त्यानें मजुरी तर केलीच पाहिजे, पायखाने साफ केलेच पाहिजेत, अन्न हें औषध म्हणून खाल्लें पाहिजे. गूळहि मिळावयाचा नाहीं व गहूंहि पाहिजे तेव्हा मिळावयाचा नाहीं. आश्रम हा गरीब, कंगाल, भुकेनें मरणाऱ्या लोकांचा प्रतिनिधि आहे असें रोज सिद्ध करीत जाऊं, तर निरंतर सुरक्षित आणि सुखी राहूं. म्हणून आश्रमांत रोज साधेपणा वाढला पाहिजे, रोज नियम-पालन कडकपणें झालें पाहिजे. अग्नि आपल्या स्वरूपांत राहिला, तर त्याच्या सहवासांत टिकूं न शकणारे जीव त्याच्याजवळ राहूंच शकणार नाहींत. २४

गांधीजींनीं राष्ट्रीय शाळा व आश्रम यांचें एक रसोडें केल्यावर गांधीजी स्वतः रसोड्यांत जेवावयाला जात असत. पहिली घंटा झाल्यावर सर्वांनीं हजर रहावयाचें व दुसऱ्या घंटेला दरवाजे बंद व्हावयाचे, असा नियम होता. उशीरा आलेले मागाहून, तिसरी घंटा झाल्यावर, दरवाजा उघडल्यानंतर, दुसऱ्या पंक्तींत बसत. गांधीजी नेहमीं पहिल्या पंक्तीला हजर असावयाचे, त्यांत कधीं खंड पडला नाहीं. एके दिवशीं त्यांना कांहीं कारणा-मुळें उशीर झाला. गांधीजी अगदीं लगबगीनें येत होते; पण अगदीं जवळ आले, तोंच दुसरी घंटा झाली आणि रसोड्याचे दरवाजे बंद झाले. गांधीजींना पहातांक्षणींच आंतील माणसें दरवाजे उघडूं लागलीं. गांधीजींनीं मनाई केली व खालीं व्हऱ्हांड्यांत खाटेवर बसले, व तेथेंच त्यांनीं लिहावयाला सुरुवात केली. तिसरी घंटा वाजून दरवाजा उघडल्यावर गांधीजी वर गेले व दुसऱ्या पंक्तीला जेवावयाला बसले. २५

आश्रम ही एक मोठी पाठशाळा आहे. तींत शिक्षणासाठीं वेगळा खास वेळ काढून ठेवलेला नाहीं. साराच वेळ शिक्षणासाठीं आहे. आत्मदर्शनासाठीं – सत्यदर्शनासाठीं आश्रमांत रहाणारी प्रत्येक व्यक्ति शिक्षक असते आणि विद्यार्थीहि असते. ज्या विषयांत तीव्यक्ति निष्णात असेल, त्या विषयाची ती शिक्षक होईल आणि जो विषय त्या व्यक्तीला शिकावयाचा असेल, त्यामध्यें ती विद्यार्थी राहील. मोठ्यांत मोठें शिक्षण चारित्र्याचें आहे. जों जों आम्ही यम-नियमांचें पालन करण्यांत प्रगति करूं; तों तों आमची विद्या, सत्यदर्शनाची आमची शक्ति वाढत जाईल. २६

आश्रमांतील शिक्षणाची माझी कल्पना मुलांना स्वातंत्र्य देण्याची आहे. लहानांतील लहान मुलालाहि वाटलें पाहिजे की, मीदेखील कोणी तरी आहें. त्या मुलाची विशेष शक्ति कोणत्या गोष्टींत आहे, हें आम्ही जाणून घेतलें पाहिजे आणि मग त्या शक्तीचा पूर्ण विकास करण्यासाठीं सर्व साधनसामग्री पुरविली पाहिजे; मात्र त्याला अट ही कीं, त्या मुलानें आपल्या साऱ्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठीं केला पाहिजे. पुस्तकी ज्ञानाचा भार त्याच्या बुद्धीवर टाकणें हें आमचें ध्येय नाहीं. आश्रमांत रहाणारे पालक आपल्या मुलासाठीं जगतील, मुलापासून शिकतील व मुलांना शिकवतील. सर्व जीवन पाठशाला बनलें पाहिजे – शिक्षणरूप बनलें पाहिजे.

आतांपर्यंत आम्ही आमच्या आश्रमांत फारसें कांहीं साध्य केलें नाहीं. कारण आमचें आयुष्य तें किती? सोळा वर्षें! त्यांतील बारा वर्षें तर लढ्यांत गेलीं. लढतां लढतां आम्हांला अनुभव मिळाला, तर कांहीं वाईट नाहीं. १९३० सालच्या लढ्याचा प्रारंभ आश्रमाचा होम करूनच करण्यांत आला. आमच्या विकासाचा तो एक टप्पाच मानतां येईल. २७

आपल्या येथें चोऱ्या होतात, याचें कारण आपला गाफिलपणा आहे असें सिद्ध होत आहे. गाफिलपणा दोन प्रकारचा आहे; आपण सावध राहत नाहीं. पुष्कळ वेळां समजावून सांगितलें असतांनादेखील कोणी दागिने तर कोणी पैसे जवळ बाळगतात. चोर हे जगांत असणारच. त्यांच्यापासून वांचण्याचे तीन उपाय आहेत. पहिला, जवळ कांहीं न बाळगणें. हें पूर्णपणें होणें शक्य नाहीं. दुसरा, बाळगावयाचें झाल्यास तेवढ्यापुरतें सावधान

रहाणें व तिसरा, चोराला सरकारच्या दंडाचें (शिक्षेचें) भय दाखविणें व स्वत: त्याला शिक्षा करण्याच्या कामीं साहाय्यभूत होणें. आपण या तिसऱ्या उपायाचा त्याग केला आहे. पहिला उपाय आपला आदर्श आहे. दुसरा उपाय आपण सध्यां आजमावीत आहोंत. संग्रह शक्य तितका कमी करणें व जेवढा अनिवार्य असेल त्याचें चोर वगैरेपासून रक्षण करणें.

आश्रमांत शृंगार मुळींच नसावा याविषयीं गांधीजींचा कटाक्ष होता. जोंवर देशांत उपासमार चालू आहे तोंवर गुंजभर सोन्याची अंगठीदेखील जवळ बाळगून ठेवणें किंवा घालणें हें केवळ पाप आहे. कपडे पेहरणें ते लाज झांकण्यासाठीं आणि थंडीवाऱ्यापासून व उन्हापासून स्वत:चें संरक्षण करण्यापुरतेंच असावे. हा आदर्श गांठण्याचा सर्व स्त्रियांनीं प्रयत्न करावा. २८

## सेवाग्राम

"देश स्वतंत्र झाल्याशिवाय मी या आश्रमांत परत येणार नाहीं." अशी प्रतिज्ञा गांधीजींनीं साबरमती आश्रमांतून दांडी-यात्रेला निघण्यापूर्वीं ता. ११ मार्च १९३० रोजीं केली. १९३३ मध्यें बंधमुक्त झाल्यावर ते वर्धा आश्रमांत कांहीं काळ राहिले व नंतर तेथून पांच मैलांवर असलेल्या सेगांव या खेड्यांत ता. ३० एप्रिल १९३६ रोजीं ते रहावयास गेले. सेगांवला 'सेवाग्राम' हें नांव त्यांनीं ता. ५ मार्च १९४० रोजीं दिलें. त्या वेळीं सेगांवला जाण्याला धड रस्ता नव्हता कीं पोष्ट-तार ऑफिसहि नव्हतें.

गांधीजी सेगांवला गेले, ते अगदीं एकटे. बा किंवा महादेव कोणीहि नव्हते. तेथें गेल्यावर ते एका पिंपळाचे झाडाखालीं राहिले. हळुहळू घरें बांधलीं गेलीं. बापूजीसाठीं एक लहानशी झोपडी बांधण्यांत आली. तशीच दुसरी कस्तुरबासाठीं आणि तिसरी महादेवभाईसाठीं. साऱ्या आश्रमीयांसाठीं एक मोठा हॉल बांधण्यांत आला. नंतर दुग्धशाळा, मूलोद्योग शिक्षणाची शाळा, इत्यादि संस्था तेथें उदयास आल्या व साबरमती आश्रमापेक्षां सेवाग्राम आश्रम आकारानें व कार्यानें विशाल बनला.

स्थानिक ग्रामोद्योगी वस्तु वापरण्यासंबंधीं गांधीजींचा कटाक्ष असे. त्यांची झोंपडी बांबू, लांकूड, माती यांपासून बनविलेली होती. भिंती कामटयाच्या असून त्यावर पांढऱ्या मातीचा गिलावा केलेला होता. बापूजी बसत

त्याच्यासमोरच्या भिंतीवर मातीनें 'ॐ' काढलेला होता, व उजव्या बाजूच्या कोपऱ्यांत एका फळीवर 'हे राम' हीं अक्षरें होतीं. २९

शरीरश्रम केल्याशिवाय कोणालाहि जेवणाचा हक्क नाहीं, हा आश्रमाचा नियम येथेंहि पाळला जाई. त्यामुळें आश्रमांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीला एकदोन तास तरी आश्रमाचें घरकाम करावें लागे. दळणें, पाणी भरणें, स्वयंपाक करणें, सफाई करणें, एवढेंच नाहीं तर, संडास साफ करण्याचें कामहि आश्रमांत येणाऱ्या पाहुण्यांना देण्यांत येई. प्रत्येक आश्रमवासीयाला रोजनिशी ठेवावी लागे, ती गांधीजी तपासीत. ३०

सेवाग्रामच्या आश्रमांतील एका वहींत गांधीजींनीं ता. ६ जून १९३८ ते ता. २२ मार्च १९४५ या काळांत वेळोवेळीं आश्रमाविषयीं सूचना लिहून ठेवल्या आहेत किंवा पत्रद्वारें पाठविल्या आहेत. त्यांतील महत्त्वाच्या पुढें दिल्या आहेत :—

जेव्हां साबरमती आश्रम बंद केला, तेव्हां मीं सांगितलें होतें कीं, आपण सर्वजण 'चल आश्रम' बनलों आहोंत आणि आपण कोठेंहि गेलों, तरी आश्रमीय जीवन व त्याचे नियम हे आपण आपल्या सांगातीं घेऊनच जातों. म्हणून प्रार्थना जशीच्या तशी कायम आहे. सकाळीं उठण्याची वेळहि कायम राहिली आहे. अर्थात्, प्रसंगविशेषीं, तत्त्वें शाबूत ठेवून, इतर बाबतींत आपण बदल करूं शकतों. तसा बदल येथें केला आहेच. आम्ही या आश्रमांत जाणूनबुजून हरिजन नोकर ठेवले आहेत. कारण त्यामध्यें हरिजनांची सेवा करण्याची भावना आहे. आम्ही जरी नोकर ठेवले आहेत, तरी त्यांना आम्ही भाऊ मानून त्यांच्याशीं वागलें पाहिजे. म्हणून काबाडकष्टाचेंहि जें काम आम्ही करूं शकूं, तें आम्ही स्वत: केलें पाहिजे. जें आम्ही करूं शकणार नाहीं, तें कार्य दुसऱ्या सहकाऱ्यामार्फत केलें पाहिजे. त्यांच्याकडूनहि न होईल तरच तें हरिजनांकडून करवून घ्यावें.

आम्ही सेवक आहों, मालक नाहीं, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. ग्रामवासीयांच्या दयेवरच आम्ही राहूं शकतों. कोणाला शिवी देण्याचा किंवा कोणाला हात लावण्याचा आम्हांला अधिकार नाहीं.

ज्या खोलींत आपण बसतों, तिच्यामध्यें सौष्ठव कसें तें नाहींच. तिच्यांतील पुष्कळसें सामान मला निरुपयोगी दिसलें. तें तपासून हलविलें

पाहिजे. मी जेथें बसत होतों, तेथें असलेली केस अनावश्यक आहे. पेटीवर सर्व सामान ठेवतां येईल. आपला परिग्रह कमींत कमी राहिला पाहिजे. अकरा व्रतांत अपरिग्रहहि आहे, हें लक्षांत ठेवावें.

थुंकीहि मळ आहे. म्हणून आपण ज्या जागेवर थुकतों किंवा घाणेरडे हात धुतों, तेथें भांडीं कधींहि धुऊं नयेत.

नळांतून हातानें पाणी घेऊं नये; त्यानें अधिक पाणी खर्च होतें; आणि एका नळांतून एकाच वेळीं पुष्कळ माणसें पाणी घेऊं शकत नाहींत. म्हणून आपल्या तांब्यांत पाणी घ्यावें व त्यांतील पाण्यानें तोंड धुवावें. तो तांब्या स्वच्छ जागेवर ठेवण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

सर्वांनीं नियमितपणें सूत्र-यज्ञ करावा, याविषयीं आम्ही फार सावधान राहिलें पाहिजे.

खाण्याच्या बाबतींत प्रत्येक वस्तूला मर्यादेंत ठेवलें पाहिजे. गूळ, तूप, दूध, भाजी यांचें प्रमाण ठरलें पाहिजे. जेवणांत कांहीं बिघडलें असेल, तर जेवतांना त्यावर टीका करणें असभ्यपणाचें आहे; त्यांत हिंसा आहे. जेवण झाल्यावर चिठी लिहून आपली तक्रार कळवावी. एकादा पदार्थ कच्चा राहिला असेल, तर तो सोडून द्यावा. त्यामुळें थोडी भूक शिल्लक राहिली, तर कांहीं हानि नाहीं. सर्व कामें सावधान चित्तानें केलीं जावीं. आम्ही सर्व कुटुंब आहों अशी भावना ठेवणें आवश्यक आहे.

मीठसुद्धां जरूर तितकेंच घ्यावें. पाणीसुद्धां वाया घालवूं नये. आश्रमांतील प्रत्येक वस्तु आपली व गरिबाची आहे असें समजून सर्व जण वागतील अशी आशा मी करतों.

सेगांवात विषारी साप पुष्कळ आहेत. अद्याप सर्पदंशानें कोणी दगावला नाहीं, ही ईश्वराची कृपा समजा. तरी सावधानीनें वागणें हा आमचा धर्म आहे. सावधानपणें वागणाऱ्यालाच ईश्वर साहाय्य करतो. म्हणून माझा सल्ला असा आहे कीं, रात्रींच्या वेळीं शक्य तेव्हां कंदील घेऊन व जोडे घालून जावें.

ज्या कोणाला जेवणाचा खाडा करावयाचा असेल त्यानें स्वयंपाकघरांत आगाऊ वर्दी द्यावी, म्हणजे त्याच्या वाट्याचें अन्न वाया जाणार नाहीं

सर्वांनीं उकळलेलें पाणी प्यावें. पावसाळ्यांत आपल्या विहिरीच्या पाण्यांत फार गदळ साजतें. मलेरियापासून बचाव होण्यासाठीं सर्वांनीं रात्रीं हातापायांना रॉकेल लावून निजावें; तोंडालाहि लावणें अवश्य आहे. चावून-चावून खावें. शौचाला रोज साफ झालें पाहिजे.

सर्व आश्रमवासीयांनीं आपला एकहि क्षण रिकामा जाऊं देऊं नये. आश्रमांतील सर्व सेवाकार्यांत भाग घ्यावा आणि आश्रमाचें कांहीं काम उरलें नाहीं, तर सूत कांतावें किंवा कापसाच्या कांहीं कामांत वेळ घालवावा. रात्रीं ८ते ९ स्वाध्याय करतां येतो. कमींत कमी एक तास रोज सूत कांतावें. आजारीपणासारखें अनिवार्य कारण असेल, तरच कांतण्यांतून सुटी मिळेल.

कारणाशिवाय गप्पासप्पा करूं नयेत. उंच आवाजांत कोणी बोलूं नये. आश्रमांत नित्य परम शांति असावी. तशीच सत्याचीहि छाप सर्वांवर पडावी.

एकाचें दुसऱ्याशीं वागणें प्रेमाचें व मर्यादेचें असावें. आश्रमांत कोणी पाहुणे आले, तर त्यांच्याशी सभ्यतेनें वागावें. कोणी गरीबाच्या वेषांत आलें तरी त्याच्याशीं आदरानें वागावें. उच्च-नीच, राव-रंक हे भेदभाव असतां कामा नयेत. कोणी अनोळखी माणूस आश्रमांत आला तर तो कां आला हें विचारावें व जरूर तर त्याला व्यवस्थापकाकडे घेऊन जावें.

प्रत्येकानें जें कांहीं करावयाचें, बोलावयाचें, तें विचारपूर्वक करावें व बोलावें. त्यांत तन्मय होऊन, ध्यान देऊन तें करावें.

अन्न हें औषध समजून, शरीराचें आरोग्य राखण्यासाठीं खावें आणि शरीराचें रक्षणहि सेवेसाठींच करावें, या दृष्टीनें मनुष्यानें मिताहारी अथवा अल्पाहारी झालें पाहिजे. खातांना मच्मच् करूं नये. सावकाश खावें–ईश्वराचा अनुग्रह समजून खावें.

प्रत्येकानें आपलीं भांडीं चांगलीं स्वच्छ करावीं व नेमलेल्या जागीं ठेवावीं. सर्व कपडे खादीचे असावेत. इतर वस्तूहि शक्य तितक्या ग्रामोद्योगी - निदान स्वदेशी-असाव्यात. सर्वांनीं प्रत्येक वस्तु ठरलेल्या जागीं ठेवावी. कचरा कचऱ्याच्या जागीं असावा. पाण्याचाहि अपव्यय न व्हावा.

एका जागेवर बसून शांत चित्तानें दांत घासावे. दांत स्वच्छ झाल्यावर दांतवणाचे दोन भाग करून त्यांनीं जीभ साफ करावी व पुढें त्या दांत-

वणाच्या काडया धुऊन वाळवून सरपणासारख्या वापराव्या. कोणतीहि वस्तु वायां जातां कामा नये हा नियम. कागदाच्या मागील बाजूवरहि लिहावें. तसा उपयोग ज्यांचा होऊं शकत नसेल ते कागद जाळून टाकावेत. भाज्यांतील गदळ किंवा फुटलेल्या कांचेचे तुकडे निराळया जागीं ठेवावे.

रोज कमींत कमी एकदां तरी कच्च्या भाज्या खाण्यामुळें फार फायदा होतो, अशी माझी समजूत आहे. गाजर, कोबी, मुळे, टोमॅटो, पालक इत्यादि भाज्या खाल्ल्यातर त्यांतून क्षार मिळतो, दात मजबूत होतात व पचनशक्ति सुधारते. आश्रमांत कोणी रुचीसाठीं खात नाहींत—जगण्यासाठीं खातात. जगावयाचें तेंहि जगण्यासाठीं नव्हे, सेवेसाठीं म्हणून. एकाचें पाहून दुसऱ्यानें वागूं नये. एकानें भात घेतला म्हणून दुसऱ्यानें मागूं नये, कोणाला भात व रोटी दोन्हीहि नको असतील तर कोणाला दोन्हीहि हवीं असतील आणि तीं त्याला मिळतील. नियम एवढाच कीं, प्रश्न रुचीचा नाहीं.

मुख्य मुद्दा हा आहे कीं, आम्ही आमचें जीवन विचारमय केलें पाहिजे. काम कमी करावयाचें असेल तर करावें, पण जें करावयाचें तें शक्य तितकें पूर्ण करावें. आम्ही आमच्या जीवनाचें संगीत जर जमविलें आणि सेवाग्रामाला आदर्श बनविलें, तर आम्ही सर्व कांहीं साधलें असें होईल.

✦ ✦ ✦

: ६ :

# विधायक कार्यक्रम

गांधीजी व्यक्तीचें जीवन सेवेकरितांच मानीत असल्यामुळें व्यक्तिगत जीवन अधिकाधिक शुद्ध होण्याकरितां त्यांनीं व्रतांची साधना स्वीकारली होती. अशा जीवनसाधनेकरितां आश्रम ही त्यांनीं प्रयोगशाळा बनविली होती. आश्रमांत वैयक्तिक जीवन शुद्ध करीत जावें आणि तें लोकसेवेला अधिकाधिक लावावें असा त्यांचा प्रयत्न होता.

विधायक कार्यक्रम ही व्यापक प्रमाणावर लागूं केलेली जीवनसाधनाच गांधीजींनीं मानली. गांधीजींच्या कल्पनेचें स्वराज्य म्हणजे आत्मराज्य होतें. हें आत्मराज्य स्थापन करण्याकरितां लोकांनीं करावयाची जीवनसाधना म्हणजे विधायक कार्यक्रम होय. त्या विधायक कार्यक्रमासंबंधींचे त्यांचे विचार तपशीलवार त्यांनीं ' विधायक कार्यक्रम–त्याचें रहस्य व स्थान ' या स्वत:च लिहिलेल्या पुस्तकांत दिलेलें येथें समग्र दिले आहेत.

## उपोद्घात

विधायक कार्यक्रम हा पूर्ण स्वराज्य प्राप्त करण्याचा सत्याचा व अहिंसेचा मार्ग आहे. ही गोष्ट कार्यकर्ते व स्वयंसेवक यांनींच नव्हे तर सर्व वाचकांनीं नीट ओळखून घ्यावी. याची संपूर्ण अंमलबजावणी म्हणजेच पूर्ण

स्वराज्य होय. अगदीं पायापासून वरपर्यंत राष्ट्रनिर्मिति करण्यासाठीं योजलेल्या या समग्र विधायक कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास सर्वच्या सर्व चाळीस कोटि लोक पुढें सरसावले आहेत, अशी कल्पना करा. असें झालें तर परकीय सत्तेच्या हकालपट्टी सुद्धां सर्व अर्थांनीं युक्त असें संपूर्ण स्वातंत्र्य आपल्याला मिळेल याविषयीं कोणाला शंका घेतां येईल काय? टीकाकार जेव्हां माझ्या या विधानाचा उपहास करतात तेव्हां त्यांचा आशय इतकाच असतो कीं, हा कार्यक्रम पार पाडण्याच्या कामीं चाळीस कोटि लोक कधींहि एकमेकांशीं सहकार्य करणार नाहींत. त्यांच्या या उपहासांत बरेंच तथ्य आहे यांत शंका नाहीं. याला माझें उत्तर असें आहे कीं, हें सर्व खरें असलें तरीहि एवढा प्रयत्न करून पाहण्याजोगा आहे. उत्साही आणि निष्ठावान् कार्यकर्त्यांच्या एखाद्या मंडळानें जर हें काम अदम्य निश्चयाच्या बळानें अंगावर घेतलें, तर हा कार्यक्रम इतर कोणत्याहि कार्यक्रमाइतकाच अंमलांत आणण्यासारखा आहे; इतकेंच नव्हे, तर इतर बहुतेक कार्यक्रमापेक्षां जास्त सुलभपणें अंमलांत आणण्यासारखा आहे. तें कसेंहि असो, अहिंसेच्या पायावर रचलेला स्वराज्याचा कार्यक्रम जर हवा असेल, तर याच्याऐवजीं मजजवळ दुसरा कार्यक्रम नाहीं.

वैयक्तिक किंवा सामुदायिक सविनय कायदेभंग हा विधायक कार्याला साहाय्यक असतो आणि सशस्त्र बंडाची जागा तो पूर्णतया घेऊं शकतो. सशस्त्र बंडाकरितां शिक्षणाची जितकी जरूर असते तितकीच कायदेभंगासाठींहि असते. फक्त तिच्या पद्धति वेगळ्या असतात. दोन्ही बाबतींत प्रसंग उपस्थित झाला म्हणजेच प्रत्यक्ष कार्य करण्यांत येतें. सशस्त्र बंडासाठीं शिक्षण घेणें म्हणजेच हत्यारें कशीं वापरावीत हें शिकणें होय; व आतां यांत कदाचित् अणुबाँबपर्यंतहि जावें लागणार. कायदेभंगासाठीं हें शिक्षण विधायक कार्यक्रमाचें असतें.

म्हणून कार्यकर्त्यांनीं कायदेभंगाचे प्रसंग कधींहि मुद्दाम धुंडाळावयाचे नाहींत. प्रत्यक्ष विधायक कार्यालाच हाणून पाडण्याचा प्रयत्न होत असला तर मात्र त्यांनीं कायदेभंगासाठीं तयार रहावयाचें आहे. कायदेभंग कोठें करावा व कोठें करूं नये तें एक-दोन उदाहरणांवरून स्पष्ट दिसून येईल. आपल्याला माहीत आहे कीं, राजकीय क्षेत्रांतील करारांच्या मार्गांत अडथळे

आणण्यांत आलेले आहेत व आणतां येतातहि; परंतु एकमेकांशीं वैयक्तिक मैत्री जोडण्याच्या मार्गांत असे अडथळे आणतां येत नाहींत. अशा प्रकारच्या निःस्वार्थ व खऱ्या मित्रत्वाच्या संबंधांवरच राजकीय करार आधारले गेले पाहिजेत. अशाच तऱ्हेनें खादीचें केन्द्रीकरण झाल्यास तिला हाणून पाडणें सरकारला शक्य होईल; परंतु खादीची वैयक्तिक उत्पत्ति व वापर हीं कोणत्याहि सत्तेला थांबवितां येणार नाहींत. खादी तयार करणें व वापरणें या गोष्टी लोकांवर त्यांच्या इच्छेविरुद्ध लादावयाच्या नाहींत, परंतु स्वातंत्र्याच्या लढ्याची एक बाब म्हणून, समजून-उमजून व राजीखुषीनें त्यांनीं तिचा स्वीकार केला पाहिजे. खेड्यांना या कार्यक्रमाचे प्राथमिक घटक समजून तेथूनच हें काम करतां येण्यासारखें आहे. अशा कार्यक्रमांत-देखील जे पुढाकार घेतील त्यांच्या मार्गांत अडथळा येणें शक्य आहे. अशा लोकांना जगांत चोहोंकडे हालअपेष्टा व कष्टांच्या दिव्यांतून पसार व्हावें लागलेलें आहे. कष्ट सहन केल्याशिवाय स्वराज्य संभवत नाहीं. हिंसात्मक लढ्यांत सत्यालाच सर्वांत प्रथम व जास्तींत जास्त सहन करावें लागतें; अहिंसात्मक लढ्यांत त्याचा सतत विजय होत असतो. शिवाय, ज्या माणसांचें सरकारी तंत्र बनलेलें असेल, त्यांना शत्रु लेखावयाचें नसतें. त्यांना असें लेखणें हें अहिंसेच्या तत्त्वाशीं विरोधी आहे. आपण त्यांच्यापासून दूर झालें पाहिजे हें खरें; परंतु मित्रत्वाची भावना कायम ठेवून.

एवढे प्राथमिक विचार जर वाचकास पटतील तर त्याला विधायक कार्यक्रमांत पुष्कळ गोडी वाटेल. हा कार्यक्रम ज्याला राजकारण म्हणतात त्या राजकारणाइतका व व्यासपीठावरून चालणाऱ्या व्याख्यानबाजीइतकाच चित्ताकर्षक व त्यापेक्षां खचित जास्त महत्त्वाचा व उपयोगी आहे असें दिसून येईल.

## प्रास्ताविक

विधायक कार्यक्रमाचें वेगळ्या व अधिक अन्वर्थक भाषेंत वर्णन करावयाचें झाल्यास, सत्य आणि अहिंसात्मक साधनांनीं पूर्ण स्वराज्याची किंवा संपूर्ण स्वातंत्र्याची रचना करणें म्हणजे विधायक कार्यक्रम, असें म्हणतां येईल.

हिंसात्मक आणि म्हणूनच अनिवार्यपणें असत्यमय अशा साधनांच्या

द्वारां करण्यांत आलेल्या 'स्वातंत्र्य'–निर्मितीच्या प्रयत्नाचा आपल्याला चांगलाच दुःखद अनुभव आलेला आहे. हल्लीं चालू असलेल्या युद्धांत संपत्ति, माणसें आणि सत्य यांचा दररोज किती संहार होत आहे, तोंच पाहा ना.

सत्य आणि अहिंसात्मक साधनांच्या द्वारां संपादन केलेलें संपूर्ण स्वातंत्र्य म्हणजे वंश, वर्ण धर्म, यांच्या भेदाशिवायचें राष्ट्राच्या प्रत्येक घटकाचें–त्यांतील सर्वांत क्षुद्र घटकाचेंदेखील–स्वातंत्र्य होय.

हें स्वातंत्र्य कधींहि इतरांना वगळून केवळ स्वार्थावर किंवा तुसडे-पणावर अधिष्ठित झालेलें नसतें. त्यामुळें तें अन्तर्गत सहकार्य व बाह्य परस्परावलंबन यांचेशी पूर्णपणें सुसंगत असतें. अर्थात्, आपण काढलेली कोणतीहि रेषा जशा युक्लिडच्या तात्त्विक रेषेच्या मानानें अपूर्ण असाव-याचीच, त्याचप्रमाणें आपलें आचरण तत्त्वाच्या दृष्टीनें नेहमीं अपुरें पडणार हें ठरलेलेंच. म्हणून पूर्ण स्वराज्य हेंदेखील सत्य आणि अहिंसा या आपण जितक्या प्रमाणांत आचरण करूं, तितक्या प्रमाणांतच संपूर्ण असणार.

वाचकानें आपल्या मनःचक्षूंपुढें समग्र विधायक कार्यक्रमाची योजना एकवेळ आंखून पाहावी; म्हणजे माझ्याप्रमाणेंच त्यालाहि दिसून येईल कीं, या कार्यक्रमाची जर यशस्वीपणें अंमलबजावणी होऊं शकली, तर त्याचें पर्यव-वसान आपल्याला पाहिजे असलेल्या स्वातंत्र्यांतच होईल. हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य पक्षांमध्यें झालेल्या कराराला–माझ्या शब्दांत भाषांतरित करून सांगावयाचें म्हणजे, जातीय ऐक्य प्रस्थापित झाल्यानंतर झालेल्या कोणत्याहि कराराला–मान्यता देण्यांत येईल, असें खुद्द मि. ॲमरीनेंच म्हटलें नाहीं कां ? आणि जातीय ऐक्य ही तर विधायक कार्यक्रमांतील अनेक बाबींपैकीं एक बाब आहे. आपण ॲमरीच्या या म्हणण्यांतील सच्चे-पणाबद्दल शंका घेण्याची जरूर नाहीं. कारण, असें ऐक्य जर प्रामाणिकपणें म्हणजे अहिंसेनें, सिद्ध झालें, तर त्या ऐक्यांतच अशी शक्ति निर्माण झालेली असेल कीं, तें सर्व पक्षांना संमत अशा मागणीला मान्यता द्यावयास सरकारला भाग पाडील.

उलटपक्षीं, हिंसेच्या द्वारां प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्याची काल्पनिक किंवा तात्त्विक दृष्टया संपूर्ण अशीदेखील व्याख्या कोठें आढळांत नाहीं. कारण कीं, अशा स्वराज्यांत राष्ट्रांतील जो पक्ष हिंसेचा सर्वांत जास्त परि-

णामकारकपणें उपयोग करतो त्याचेंच वर्चस्व गृहीत धरलेलें असतें. त्यांत आर्थिक किंवा इतर प्रकारच्या संपूर्ण समानतेची कल्पनाच करतां येत नाहीं.

परंतु येथें माझा उद्देश फक्त स्वातंत्र्यप्राप्तीच्या अहिंसक प्रयत्नांत विधायक कार्यक्रमाची अंमलबजावणी करणें किती आवश्यक आहे एवढेंच वाचकांस पटवून देण्याचा आहे. त्यासाठीं वाचकानें स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं हिंसा कशी निरर्थक आहे याविषयींची माझी विचारसरणी स्वीकारण्याची आवश्यकता नाहीं. हिंसेवर अधिष्ठित झालेल्या योजनेंत राष्ट्राच्या क्षुद्रतम घटकाचें स्वातंत्र्य शक्य आहे असें वाचकानें वाटल्यास खुशाल मानावें; परंतु त्याबरोबरच राष्ट्रानें या रचनात्मक कार्यक्रमाची जर संपूर्ण अंमलबजावणी केली तर असें स्वातंत्र्य निश्चित मिळेल, ही गोष्टदेखील माझ्या या प्रयत्नानें त्याला मान्य करावीशी वाटली म्हणजे झालें.

आतां आपण या कार्यक्रमांतील वेगवेगळया बाबींचें परीक्षण करूं.

## १ जातीय ऐक्य

या ऐक्याच्या आवश्यकतेबद्दल सर्वांची एकवाक्यता आहे; परंतु हें ऐक्य म्हणजे केवळ राजकीय ऐक्य नव्हे, हें प्रत्येकाला माहीत नसतें. राजकीय ऐक्य हें बाहेरूनहि लादणें शक्य असतें. जातीय ऐक्य म्हणजे अभेद्य असें हार्दिक ऐक्य होय. असें ऐक्य घडवून आणण्यासाठीं पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे ही आहे कीं, प्रत्येक कॉंग्रेसवाद्यानें-स्वतः कोणत्याहि धर्माचा असला तरी–हिंदु, मुसलमान. ख्रिस्ती, पारसी, यहुदी, इत्यादि–थोडक्यांत म्हणजे प्रत्येक हिंदु व अहिन्दु–सर्वांचा प्रतिनिधि स्वतः बनलें पाहिजे.

हिंदुस्थानच्या कोटचवधि जनतेपैकीं प्रत्येक व्यक्तिशीं आत्मीयता बाळगून तिच्या सुखदुःखाशीं त्यानें समरस झालें पाहिजे. अशी आत्मीयता सिद्ध करण्यासाठीं प्रत्येक कॉंग्रेसवाद्यानें इतर धर्मांच्या माणसाशों वैयक्तिक मित्रत्वाचें नाते प्रयत्नपूर्वक जोडलें पाहिजे. त्याला स्वतःच्या धर्माविषयीं जितका आदर वाटत असेल तितकाच इतर धर्मांविषयीं त्यानें बाळगला पाहिजे.

अशा सुखमय परिस्थितींत ‘ हिंदु पाणी ’ व ‘ मुसलमान पाणी ’ किंवा ‘ हिन्दु चहा ’ व ‘ मुसलमान चहा ’ यासारख्या लज्जास्पद आरोळ्या

रेल्वे–स्टेशनांवरून आपल्या कानीं पडणार नाहींत. शाळा–कॉलेजांतून हिंदूंसाठीं व अन्यधर्मीयांसाठीं पाणी पिण्याच्या वेगळ्या खोल्या किंवा वेगळीं भांडीं असणार नाहींत; तसेंच जातीय शाळा–कॉलेजें व रुग्णालयें–देखील असणार नाहींत. अशा क्रान्तीचा प्रारंभ काँग्रेसवाद्यांनीं स्वतःच्या रास्त व शुद्ध आचरणाच्या मागें कोणत्याहि प्रकारचा राजकीय हेतु न बाळगतां करावयास पाहिजे. राजकीय ऐक्य त्यांच्या अशा वर्तनांतून आपोआपच निष्पन्न होईल.

सत्ता ही कायदेमंडळांच्या द्वारांच मिळूं शकते, असें मानण्याची आपल्याला दीर्घकालापासून संवय झालेली आहे. ही मान्यता म्हणजे आपल्या स्वतःच्या जडतेनें व इंग्रजांच्या मोहिनीनें ग्रासल्याकारणानें झालेली एक गंभीर चूक आहे असें मी मानीत आलों आहें. इंग्लंडच्या इतिहासाच्या वरपांगी अभ्यासानें आपल्याला असें वाटायला लावलें आहे कीं, पार्लमेंट हीच सर्व सत्तेचें निधान असून सत्ता तिच्यांतूनच हळूहळू जनतेपर्यंत झिरपत जातें. परंतु खरी गोष्ट अशी आहे कीं, सत्तेचें स्थान जनता स्वतःच असतें; आणि ती ज्यांना स्वतःचे प्रतिनिधि म्हणून निवडते त्यांना ती ( सत्ता ) तात्पुरती सोपविण्यांत येते. जनतेला सोडून पार्लमेंटची स्वतंत्र अशी सत्ता तर काय, परंतु अस्तित्वदेखील नसतें, हें साधें सत्य लोकांना पटवून देण्यासाठीं गेलीं एकवीस वर्षें माझा प्रयत्न चालू आहे.

सविनय कायदेभंग हें शक्तीचें भांडार आहे. कल्पना करा कीं, समस्त प्रजा कायदेमंडळाच्या कायद्याप्रमाणें वागण्याचा इनकार करीत आहे व अशा अनादराचे परिणाम भोगण्यास तयार झालेली आहे ! अशी प्रजा कायदेमंडळाच्या व राज्यकारभाराच्या सगळया तंत्राला बंद पाडील. पोलीस आणि लष्कर हीं कितीहि प्रबळ असलीं तरी त्यांचा उपयोग प्रजेंतील अल्पसंख्य लोकांना दडपण्यापुरताच होऊं शकतो. परंतु पराकाष्ठेचें दुःख सहन करण्यास पुढें आलेल्या समग्र जनतेच्या दुर्दम्य संकल्पशक्तीला पोलिसांचें किंवा लष्कराचें कसलेंहि दडपण वा जुलूम वांकवूं शकत नाहीं.

आणि कायदेमंडळाची कार्यपद्धति त्यांतील सभासद बहुसंख्यांच्या इच्छेस अनुसरून वागण्यास तयार असतील, तेव्हांच लाभदायी असते.

वेगळ्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे, ही पद्धत एकमेकाशीं मेळ व सलोखा असेल अशा ठिकाणींच कांहींशी कार्यक्षम ठरते.

येथें हिंदुस्थानांत पृथक्-मतदार-संघांमुळें एकमेकांशीं मेळ नसलेले असे कृत्रिम वर्ग उत्पन्न झाले आहेत; व अशा परिस्थितींत आपण कायदे-मंडळाची राज्यपद्धति चालविण्याची केवळ बतावणी करीत आलों आहोंत. या कृत्रिम व पृथक् समूहांना एका मंचावर आणून बसविल्यानें खरें जिवंत ऐक्य कधींहि निर्माण होऊं शकणार नाहीं. अशीं कायदेमंडळें आपलें कार्य कसेंबसें चालवूं शकलीं, तरी जे कोणी राज्यकर्ते असतील ते सत्तेचे टाकतील ते तुकडे घेण्यासाठीं भांडाभांडी करण्याची व त्यांची वांटणी करण्याची एक जागा, यापेक्षां त्यांचा जास्त उपयोग होणार नाहीं. हे राज्यकर्ते पोलादी दंडुक्यानें राज्य करतात, व परस्परविरोधी असलेले गट एकमेकांच्या नरड्याचा घोट घेणार नाहींत एवढी खबरदारी मात्र घेतात. अशा लाजिरवाण्या परिस्थितींतून पूर्ण स्वराज्य निर्माण होणें ही गोष्ट अशक्य कोटींतील आहे असें मला वाटतें.

कायदेमंडळांविषयीं माझीं अशीं कडक मतें आहेत, तरी मी अशा निर्णयावर आलों आहे कीं, निवडणुकींच्या प्रतिनिधिक संस्थांमधील जागांसाठीं जोंपर्यंत अनिष्ट उमेदवार उभे राहतात, तोंपर्यंत अशा संस्थांमध्यें प्रगति-विरोधी लोकांचा शिरकाव होऊं नये म्हणून, राष्ट्रीय महासभेनें आपले उमेदवार अवश्य उभे करावेत.

## २. अस्पृश्यता-निवारण

हिंदु धर्मावरील हा कलंक व शाप नाहींसा करण्याच्या आवश्यकते-विषयीं लांबलचक विवेचन करण्याची आतां इतक्या वर्षांनंतर जरूर नसावी. या बाबतींत कॉंग्रेसवाद्यांनीं पुष्कळ कार्य केलें आहे यांत कांहीं संशय नाहीं. परंतु मला कष्टानें असें म्हणावें लागतें कीं, पुष्कळ कॉंग्रेसवादी या प्रश्नाकडे केवळ राजकीय दृष्टीनें आवश्यक म्हणून पाहात आले आहेत. हिंदूंच्या पुरतें बोलावयाचें म्हणजे हें काम हिंदुधर्माच्या केवळ अस्तित्वासाठींदेखील अनिवार्यपणें जरूरीचें आहे, या दृष्टीनें त्यांनीं त्याच्याकडे पाहिलेलें नाहीं.

हिंदु कॉंग्रेसवाद्यांनीं जर या कामाचें महत्त्व ओळखून तें शुद्ध बुद्धीनें

आपल्या हातीं घेतलें, तर 'सनातनी' म्हणविणाऱ्या लोकांवर आतांपर्यंत त्यांना जो कांहीं प्रभाव पाडतां आला आहे त्यापेक्षां पुष्कळकच व्यापक प्रमाणांत तो पाडतां येईल. त्यांनीं या सनातन्यांच्याकडून लढण्याच्या आवेशानें जाऊं नये, परंतु त्यांच्या अहिंसेला शोभेल अशा रीतीनें म्हणजे मित्रत्वाच्या भावनेनें जावें. आणि हरिजनांच्याविषयीं बोलावयाचें म्हणजे, प्रत्येक सवर्ण हिंदूनें हरिजनांचें दुःख हें आपलें दुःख आहे असें समजून, ते जे समाजापासून दूर फेकले गेले आहेत, अशा त्यांच्या भयानक परिस्थितींत त्यांच्याशीं मैत्री केली पाहिजे.

हिंदुस्थानांत इतक्या राक्षसी पद्धतीनें व जबरदस्त प्रमाणांत हरिजनांना अलग ठेवण्यांत आल्याचें आपण पाहतों कीं, जगांत असलें वर्तन अन्यत्र क्वचितच कधीं दृष्टीस पडलें असेल. हें कार्य किती कठिण आहे तें मला स्वानुभवानें माहीत आहे. परतु स्वराज्याची इमारत रचण्याच्या महान कार्याचाच तो एक भाग आहे. आणि स्वराज्याचा मार्ग अगदीं उरावरच्या चढणीचा व अरुंद असा आहे. त्यांत पुष्कळ घसरगुंडीच्या चढणी आहेत— अनेक खोल दऱ्या आहेत. हा सर्व मार्ग न डगमगतां स्थिर पावलें टाकून आक्रमण केल्यानंतरच, आपल्याला स्वराज्य-मंदिराच्या शिखरावर जाऊन तेथील स्वातंत्र्याची ताजी हवा घेतां येईल.

## ३. दारूबंदी

जातीय ऐक्य आणि अस्पृश्यता-निवारण याप्रमाणेंच दारूबंदी हीदेखील कॉंग्रेसच्या कार्यक्रमांत १९२० सालापासून समाविष्ट झालेली आहे. तरी या अगदीं जिव्हाळ्याच्या सामाजिक व नैतिक सुधारणेच्या बाबतींत कॉंग्रेसवाद्यांनीं जितकें लक्ष घालावयास पाहिजे होतें तितकें त्यांनीं घातलेलें नाहीं. आपल्याला जर आपलें ध्येय अहिंसक प्रयत्नानें गांठावयाचें असेल, तर दारू, अफू इत्यादि मादक पदार्थांच्या व्यसनांमुळें जे लाखो स्त्रीपुरुष गांजले जात आहेत, त्यांचें भवितव्य भावी सरकारावर आपल्याला सोडतां येणार नाहीं.

या अनिष्टाचें निराकरण करण्याच्या कामीं वैद्य व डॉक्टर लोकांना सर्वांत जास्त व परिणामकारक कामगिरी करतां येईल. दारूबाज व अफूबाज यांना त्यांच्या व्यसनापासून सोडविण्याचे उपाय त्यांनीं शोधून काढले

पाहिजेत. ही सुधारणा घडवून आणण्याच्या कामीं स्त्रिया व विद्यार्थी यांना विशेष संधि मिळण्यासारखी आहे. प्रेमळपणानें सेवेचीं अनेक कामें करून त्यांना व्यसनी लोकांवर असा कांहीं प्रभाव पाडतां येईल कीं, त्यामुळें व्यसन सोडून देण्याच्या त्यांच्या विनंतीला मान देणें त्यांना भागच पडेल.

थकूनभागून आलेल्या कामगारांना जेथें आराम घेतां येईल, आरोग्य-दायक व स्वस्त फराळाचे पदार्थ मिळतील, आणि स्वतःच्या आवडीचे योग्य ते करमणुकीचे खेळ खेळतां येतील, अशीं विश्रांतीचीं व करमणुकीचीं गृहें काँग्रेस-समित्यांना उघडतां येण्यासारखीं आहेत. हें सर्व काम मनाला आकर्षक व हृदयाला करणारें आहे. स्वराज्याचा अहिंसक मार्ग हा अभिनव मार्ग आहे. यांत जुनी मूल्यें जाऊन त्यांच्या जागीं नवीन मूल्यें येतात.

हिंसात्मक मार्गांत अशा सुधारणांना कदाचित् वाव नसेलहि. त्या मार्गावर आस्था ठेवणारे लोक आपल्या उतावळेपणानें, किंवा वाटल्यास अज्ञानानें म्हणा, या सर्व गोष्टी मुक्तीच्या दिवसापर्यंत लांबणीवर टाकू पाहतात. चिरकाल टिकणारी व आरोग्यप्रद अशी मुक्ति आंतून-म्हणजे चित्तशुद्धीच्या द्वारां-उद्भवत असते ही गोष्ट ते विसरतात. विधायक कार्य करणाऱ्या लोकांना कायदेशीर दारूबंदीचा मार्ग प्रत्यक्ष तयार करतां आला नाहीं, तरी त्यांना तिचें काम सोपें व यशस्वी करतां येईल.

## ४ खादी

खादी हा एक वादग्रस्त विषय आहे. पुष्कळ लोकांना असें वाटतें कीं, खादीचा पुरस्कार करण्यांत मी वाऱ्याच्या विरुद्ध दिशेनें नांव हंकारीत आहें आणि स्वराज्याची नौका माझ्या हातून नक्कीं बुडणार आहे; तसेंच मी देशाला 'अंधकार-युगा'कडे मागें ओढून नेत आहें. या छोट्याशा निबंधांत खादीच्या पक्षाची मुद्देसूद मांडणी करण्याचा माझा विचार नाहीं. मी ती इतरत्र पुरेशा प्रमाणांत केलेली आहे. येथें केवळ प्रत्येक काँग्रेस-वाद्याला, किंबहुना प्रत्येक भारतवासीयाला, खादी-कार्याची प्रगति करण्याच्या कामीं काय करतां येईल एवढेंच मला दाखवावयाचें आहे.

खादी ही देशांतील सर्व जनतेच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या व समतेच्या प्रारंभाची सूचक आहे. 'पक्वान्नाची परीक्षा तें खाल्ल्यानें होत असते.' प्रत्येक स्त्री-पुरुषानें ही गोष्ट अजमावून पहावी; म्हणजे माझ्या म्हणण्यांत कित-

पत तथ्य आहे त्याची त्याला–किंवा तिला–स्वानुभवानें प्रचीति येईल. खादीचा स्वीकार करावयाचा म्हणजे तिनें सूचित होणाऱ्या सर्व गोष्टींचा स्वीकार केला पाहिजे. खादी म्हणजे सर्वव्यापी स्वदेशी मनोवृत्ति, जीवनाच्या सर्व गरजा हिंदुस्थानांतूनच––आणि त्याहि खेड्यांतील लोकांच्या श्रमाचा आणि बुद्धीचा उपयोग करून–भागविण्याचा कृतनिश्चय. आज चालू असलेल्या प्रवाहाला उलटा वाहायला लावण्याचा हा प्रश्न आहे. म्हणजे आज जीं हिंदुस्थान व ग्रेटब्रिटनमधील पांच–सात शहरें हिंदुस्थानांतील सात लक्ष खेड्यांचें शोषण व विनाश करून जगत आहेत, त्यांच्याऐवजीं तीं खेडीं बव्हंशीं स्वावलंबी व स्वयंपूर्ण होतील आणि स्वेच्छेनें दोन्ही पक्षांना लाभदायक होईल अशा तऱ्हेनें, हिंदुस्थानांतील शहरांच्या आणि बाहेरील जगाच्याहि उपयोगीं पडतील.

यासाठीं पुष्कळांच्या मनोवृत्तींत व आवडीनिवडींत क्रांतिकारक बदल होणें आवश्यक आहे. अहिंसात्मक मार्ग पुष्कळ बाबतींत सोपा असला तरी इतर अनेक बाबतींत तो अत्यंत कठीण आहे. एकूण एक भारतवासीयाच्या जीवनाशीं त्याचा जिव्हाळ्याचा संबंध येतो. त्याच्या अंतरंगांत जी शक्ति गूढपणें दडून राहिलेली आहे, त्या शक्तीची त्याला जाणीव करून देऊन तो त्याला उत्तेजित करतो आणि हिन्दी–मानवसमाज–रूपी सागराच्या प्रत्येक बिन्दूशीं आपण एकरूप आहोंत, असा अभिमान व जाणीव त्याच्या ठिकाणीं उत्पन्न करतो. आज युगानुयुगें ज्या प्राणहीन जड वस्तूला आपण चुकीनें अहिंसा समजत आलों आहोंत ती ही अहिंसा नव्हे. ती तर मानवजातीला आजपर्यंत माहीत असलेल्या शक्तीमध्यें सर्वांपेक्षां जास्त प्रभावी शक्ति शाहे, आणि तिच्यावरच मानवजातीच्या अस्तित्वाचा आधार आहे. याच शक्तीचें दर्शन कॉंग्रेसला व तिच्या द्वारा जगाला करून देण्याचा मीं प्रयत्न केला आहे. मला तर खादी ही हिन्दी जनतेच्या ऐक्याचें, तिच्या आर्थिक स्वातंत्र्याचें व समतेचें प्रतीक आणि म्हणूनच शेवटीं, जवाहरलाल नेहरूंच्या काव्यमय भाषेंत बोलावयाचें म्हणजे, ‘हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याचा पोषाख’ आहे असें वाटतें.

शिवाय खादी–मनोवृत्ति म्हणजे जीवनाला आवश्यक अशा वस्तूंच्या उत्पादनाचें व विभागणीचें विकेन्द्रीकरण होय. यासाठीं आतांपर्यंत आपण या सिद्धान्तांपर्यंत येऊन पोहोंचलों आहोंत कीं, प्रत्येक खेड्यानें स्वतःला

लागणाऱ्या सर्व वस्तु निर्माण करून, खेरीज शहराच्या गरजा भागविण्यासाठीं अमुक टक्के जादा वस्तु तयार कराव्यात.

मोठमोठाल्या यंत्रोद्योगांचें तर अवश्यमेव केन्द्रीकरण करून ते राष्ट्राच्या मालकीचे करावे लागतील. परंतु ही विराट राष्ट्रीय प्रवृत्ति मुख्यत्वेंकरून खेड्यांतच चालणार असल्यामुळें तिचा फारच थोडा अंश या मोठ्या उद्योगधंद्यांनीं व्यापला जाईल.

खादीमध्यें कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो तें स्पष्ट केल्यानंतर आतां काँग्रेसवाद्यांना खादीची प्रगति घडवून आणण्यासाठीं काय करता येण्यासारखें आहे व त्यांनीं काय केलें पाहिजे, त्याचें दिग्दर्शन मी केलें पाहिजे. खादीच्या उत्पादनांत कापसाची लागवड करणें, कापूस वेंचणें, कापूस रेचणें, तो साफ करणें, पिंजणें, पेळू करणें, कातणें, खळ देणें किंवा पाजणी करणें, रंगविणें, ताणावाणा करणें, विणणें आणि धुणें, इतक्या गोष्टींचा समावेश होतो. रंगण्याच्या क्रियेखेरीज करून या सर्व क्रिया केल्याच पाहिजेत अशा आहेत, यांतील एकूण एक क्रिया खेड्यांत उत्तम तऱ्हेनें होऊं शकते. सबंध हिंदुस्थानांत जीं अनेक 'खेडी चरखा संघा'नें व्यापलीं आहेत, त्या खेड्यांतून त्या आज अशा तऱ्हेनें प्रत्यक्ष चालू आहेत. 'चरखा संघा'च्या अगदीं शेवटच्या अहवालावरून आपल्याला खालीं दिलेले मनोरंजक आंकडे मिळतात:--

१९४० सालीं कमींत कमी १३,४५१ खेड्यांतून विखुरलेल्या २,७५,१४६ ग्रामवासीयांना-- यांतील १९,६४५ हरिजन व ५७,३७८ मुसलमान आहेत-- कांतणें, विणणें इत्यादि मजुरीबद्दल ३४,८५,६०९ रुपये मिळाले. कातणाऱ्यांत फार करून स्त्रिया होत्या.

तथापि कांग्रेसवाद्यांनीं खऱ्या मनोभावानें खादीचा कार्यक्रम हातीं घेतला असता तर जितकें कार्य झालें असतें, त्याच्या फक्त शंभराव्या हिश्शाइतकें हें झालेलें काम आहे. या मुख्य ग्रामोद्योगाचा व त्याबरोबरच त्याच्या आषंनुगिक हस्तव्यवसायांचा निष्कारण व निर्दयपणानें नाश करण्यांत आला. त्यावेळेपासून बुद्धि आणि प्रफुल्लितपणा यांचा खेड्यांतून लोप झाला आहे, खेडीं निष्प्राण व निस्तेज झालीं आहेत आणि खेड्यांतील लोकांची स्थिति त्यांनीं आबाळ केलेल्या त्यांच्या स्वतःच्या गुरासारखींच जवळ जवळ झालेली आहे.

काँग्रेसवाद्यांना जर खादीच्या बाबतींत काँग्रेसनें दिलेल्या हांकेचें निष्ठापूर्वक पालन करावयाचें असेल, तर खादीकार्याच्या योजनेंत त्यांना कोणता भाग घेतां येईल याविषयीं अ. भा. चरखा संघाकडून वेळोवेळीं ज्या कांहीं सूचना बाहेर पडतात त्यांचा त्यांनीं अमल करावा, येथें फक्त थोडेसे सर्वसामान्य नियम घालून देतां येतील.

१. स्वतःच्या मालकीची जमीन असलेल्या प्रत्येक कुटुंबानें निदान आपल्या कुटुंबाच्या उपयोगापुरती तरी कापसाची लागवड करावी. कापसाची लागवड करण्याचें काम सोपें आहे. बिहारमध्यें पूर्वीं शेतकऱ्यांना आपल्या शेतीच्या जमीनीपैकीं ३।२० भागांत निळीची लागवड कायद्याच्या सक्तीनें करावी लागे. ही सक्तीचीं लागवड निळीच्या परदेशी मळेवाल्यांच्या हितार्थ होती. तर मग आपल्याला आपल्या जमिनीच्या अमुक हिश्श्यांत राष्ट्रासाठीं कापसाची लागवड स्वेच्छेनें करण्यास काय हरकत आहे बरें ?

वाचकाच्या लक्षांत येईलच कीं, खादीच्या विकेंद्रीकरणाला तिच्या विविध क्रियांच्या सुरुवातीपासूनच प्रारंभ होतो. आज कापसाची लागवड अमुक एका भागांतच मोठ्या प्रमाणांत होतें, व तेथून तो कापूस हिंदुस्थानच्या दूरदूरच्या भागांत पाठवावा लागतो. महायुद्धापूर्वीं तो मुख्यत्वें ब्रिटनला व जपानला पाठविण्यांत येत असे. पूर्वी कापसाचें पीक हें एक रोकड नाण्याचें पीक होतें व अजूनहि आहे ( म्हणजे शेतकरी कापूस स्वतःच्या वापरासाठीं पिकवीत नाहीं; परंतु तो बाजारांत विकून रोकड पैसा मिळविण्यासाठीं पिकवितो. ) व त्यामुळें बाजारच्या तेजी-मंदीचा त्यावर परिणाम घडत असतो. खादीच्या योजनेत कापसाची लागवड या अनिश्चितपणापासून व जुगारापासून मुक्त होते. या योजनेंत शेतकरी आपल्याला हवें असेल तें पीक करतो. शेतकऱ्याला एवढें कळलें पाहिजे कीं, आपल्या स्वतःच्या गरजा भागविण्यासाठीं लागवड करणें हें आपलें पहिलें काम होय. एवढें त्यानें केलें म्हणजे बाजारभावाच्या मंदीमुळें स्वतःचें नुकसान होण्याचा संभव त्याला कमी करतां येईल.

२. प्रत्येक कातणाऱ्यानें, त्याच्याजवळ स्वतःचा कापूस नसेल तर, पुरेसा कापूस रेचण्यासाठीं विकत घ्यावा. हा कापूस त्याला हातचरख्याशिवायहि रेचतां येईल. फळीसळीचा उपयोग करून त्याला आपल्या हिश्शाचा

कापूस सहज रेचतां येईल. जेथें असें करणें अशक्य वाटत असेल, तेथें हात-चरख्यानें लोढलेला कापूस आणून तो पिंजावा, स्वतःपुरता कापूस फारशा आयासाविना लहानशा धनुकलीनें ( धनुष्यपिंजणीनें ) चांगला पिंजतां येईल. कामाचें विकेन्द्रीकरण ज्या मानानें जास्त, त्या मानानें त्याचीं साधनें जास्त साधीं व स्वस्त असणार. अशा तऱ्हेनें पेळू तयार झाले म्हणजे कांतण्याची क्रिया सुरू होते. कांतण्यासाठीं मी धनुष्यतकलीची आग्रहपूर्वक शिफारस करतों. मी ती पुष्कळ वेळां वापरलेली आहे. माझी तिच्यावरील गति जवळ जवळ रहाटाइतकीच आहे. रहाटापेक्षां या धनुष्यतकलीवर मी जास्त बारीक तार काढतों व त्या सुताचा कस म्हणजे मजबुती व समानताहि जास्त असते. परंतु माझ्याप्रमाणें हें कदाचित् सर्वांना सारखें लागू पडणार नाहीं.

धनुष्य-तकलीवर मी भर देतों त्याचें कारण, ती तयार करायला जास्त सोपी व जास्त स्वस्त असून राहाटाप्रमाणें तिची वारंवार दुरुस्ती करावी लागत नाहीं हें होय. राहाटाच्या दोन माळा कशा तयार कराव्यात, व त्या निसटून गेल्या म्हणजे पुनः कशा बसवाव्यात, किंवा रांहाट अडला किंवा नादुरुस्त झाला म्हणजे त्याला पुनः कसा चालू करावा हें सर्व कांतणाऱ्याला येत नसलें म्हणजे राहाट पुष्कळदां रिकामा पडून राहतो. शिवाय, कोटचवधि लोकांनीं जर एकदम कांतण्याचें मनावर घेतलें-आणि आजच्या परिस्थितींत तसें त्यांना करावें लागल्यास नवल नाहीं,–तर सर्वांची मागणी पुरवूं शकेल असें धनुषतकली हेंच एक साधन आहे; कारण तेंच एक हत्यार तयार करायला व वापरायला अत्यंत सोपें आहे. साध्या तकलीपेक्षांहि ती तयार करणें जास्त सोपें आहे. ती प्राप्त करण्याची सर्वात चांगली, सोपी व सवंग पद्धत म्हणजे स्वतः बनवून घेण्याची होय. खरोखरच, साधीं हत्यारें कशीं बनवावींत व वापरावींत हें प्रत्येक इसमानें शिकून घेतलें पाहिजे. सबंध राष्ट्र एकाचवेळीं कांतण्यापर्यंतच्या खादीच्या सर्व क्रिया जर करूं लागलें, तर त्याचा राष्ट्राच्या एकीकरणाच्या व शिक्षणाच्या दृष्टीनें केवढा परिणाम होईल त्याची कल्पना करा. श्रीमंत व गरीब यांच्यामधील या एकच प्रकारच्या श्रमाच्या स्नेहग्रंथीमुळें त्या दोघांमधील विषमता कमी होऊन त्यांच्यामध्यें किती समता प्रस्थापित होईल त्याचा विचार करा !

अशा तऱ्हेनें तयार झालेल्या सुताचा तीन प्रकारें विनियोग करतां येईल. दरिद्रनारायणाच्या प्रीत्यर्थ तें अ. भा. चरखासंघाला भेट म्हणून

देतां येईल; स्वतःच्या वैय्यक्तिक उपयोगासाठीं तें विणून घेतां येईल; किंवा त्या सुताच्या बदली मिळेल तितकी खादी विकत घेतां येईल. हें तर अगदीं स्पष्टच आहे कीं, सूत जितकें बारीक व चांगलें त्या मानानें त्याची किंमतहि जास्त. काँग्रेसवाद्यांनीं जर हें काम मन लावून केलें तर ते या कामीं लागणाऱ्या हत्यारांची सुधारणा करतील व पुष्कळ नवे नवे शोध लावतील. आपल्या देशांत शारीरिक श्रम व बुद्धि यांची फारकत झालेली आहे. त्यामुळें प्रगति खुंटून कोंडमारा झाला आहे. येथें सुचविल्याप्रमाणें जर या दोघांचें अविच्छेद्य कायमचें असें लग्न लागलें, तर त्याचा अपरिमित चांगला परिणाम होईल.

या राष्ट्रव्यापी यज्ञार्थ कांतण्याच्या योजनेंत सामान्य स्त्री किंवा पुरुष याकडून रोज या कामाप्रीत्यर्थ एका तासाहून जास्त वेळेची अपेक्षा मी बाळगलेली नाहीं.

## ५ इतर ग्रामोद्योग

या उद्योगांची भूमिका खादीहून वेगळी आहे. त्यांत ऐच्छिक श्रमासाठीं फारसा वाव नाहीं. प्रत्येक उद्योगांत माणसांच्या एका विशिष्ट संख्येच्याच श्रमाची जरूर पडणार. हे सर्व उद्योग खादीच्या अनुचरांसारखे आहेत. खादीशिवाय त्यांचें अस्तित्व संभवत नाहीं; व त्यांच्या अभावीं खादीची प्रतिष्ठा राहणार नाहीं.

दळणें, कांडणें, साबण, कागद व आगपेटचा तयार करणें, कातडीं कमावणें, तेल काढणें, इत्यादि आवश्यक ग्रामोद्योगांशिवाय खेडचांचें अर्थकारण संपूर्ण होणार नाहीं.

काँग्रेसवाद्यांना या उद्योगांत लक्ष घालतां येईल; आणि ते स्वतः जर ग्रामवासी असतील किंवा खेडचांत जाऊन कायमचे राहतील, तर ते या उद्योगांत नवीन जोम आणून त्यांना नवीन स्वरूप देतील. जेव्हां जेव्हां व जेथें जेथें मिळू शकतील त्या त्या वेळीं व त्या त्या ठिकाणीं फक्त खेडचांतून बनलेल्या वस्तु वापरण्यांत प्रतिष्ठा मानून त्याच वापरण्याचा सर्वांनीं निश्चय करावा. खेडचांत बनलेल्या वस्तूंना मागणी उत्पन्न झाली, तर आपल्या बहुतेक गरजा आपलीं खेडींच भागवितील यांत कांहीं संशय नाहीं.

आपली मनोवृत्ति ग्रामोन्मुख झाली म्हणजे आपल्याला पाश्चात्यांच्या नकलेच्या किंवा यंत्रांनीं बनविलेल्या वस्तु हव्याशा वाटणार नाहींत; परंतु ज्यांत दारिद्रच, उपासमार, आणि बेकारीचा मागमूस राहणार नाहीं, अशा भावी नवभारताचें दृश्य पुढें ठेवून त्याला साजेल अशा शुद्ध राष्ट्रीय अभिरुचीचा आपण परिपोष करूं.

## ६ ग्रामसफाई

बुद्धि आणि श्रम यांचा विच्छेद झाल्याकारणानें आपल्या खेडयांकडे आपलें अक्षम्य दुर्लक्ष झालेलें आहे. आणि त्यामुळें देशभर ठिकठिकाणीं जीं सुंदर खेडीं पसरलेलीं असावयाचीं, त्याऐवजीं आपल्याला उकरडे दृष्टीस पडतात. पुष्कळ खेडयांच्या जवळ जाऊन पोहोंचतांना जो अनुभव येतो, त्यानें मन कांहीं प्रफुल्लित होत नाहीं. त्यांच्या भोवतालीं अशी कांहीं घाण च त्रासदायक दुर्गंधी असते कीं, माणसाला पुष्कळदां डोळे मिटून नाक दाबून धरावेसें वाटतें. जर काँग्रेसवाद्यांपैकीं बहुसंख्य लोक आपल्या खेडयांतील असतील,—तसे ते असले तर पाहिजेतच,—तर त्यांना आपल्या खेडयांना सर्व प्रकारच्या स्वच्छतेचे आदर्श नमुने बनवितां आलें पाहिजे. परंतु खेडयांतील लोकांच्या रोजच्या जीवनाशीं आपण समरस होणें हें आपलें कर्तव्य आहे, असें त्यांनीं कधीं मानिलेलें नाहीं.

राष्ट्रीय किंवा सामाजिक स्वच्छतेची जाणीव असणें, हा आमच्यांत आवश्यक सद्गुण मानलेला नाहीं. आपण कशा तरी प्रकारचें स्नान करतों खरें, परंतु ज्या विहिरींत, तलावांत, किंवा नदींत किंवा ज्यांच्या कांठीं आपण स्नानादि धार्मिक विधि करतों, तीं घाण झालीं तर आपल्याला त्याची पर्वा नसते. या दोषाला मी एक मोठा दुर्गुण मानतों; आणि आमच्या खेडयांची व पवित्र नद्यांच्या पवित्र काठांची जी लाजिरवाणी स्थिति आहे, तिला आणि अस्वच्छतेमुळें जे नाना प्रकारचे रोग उद्भवतात, त्यांना हा आपला दुर्गुणच कारणीभूत आहे.

## ७ 'नई तालीम' किंवा वर्धा-शिक्षण

हा विषय नवीन आहे. परंतु राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी. मंडळाच्या सभासदांना या विषयाविषयीं इतकी कांहीं आस्था वाटली कीं, त्यांनीं

'हिंदुस्थानी तालिमी संघा'च्या संस्थापकांना आमच्या मान्यतेची सनद दिली; आणि हा संघ काँग्रेसच्या हरिपुऱ्याच्या अधिवेशनापासून आपलें काम करीत आहे. अनेक काँग्रेसवाद्यांना कार्य करण्याला हें एक विशाल क्षेत्र आहे. खेड्यांतील मुलांना शिकवून त्यांना आदर्श ग्रामिक बनविणें हा या शिक्षणाचा उद्देश आहे. या शिक्षणाची योजना मुख्यत्वें त्यांच्यासाठींच केलेली आहे. या योजनेला मूळ प्रेरणाहि खेड्यांतून मिळालेली आहे. काँग्रेसवाद्यांना स्वराज्याची इमारत अगदीं थेट पायापासून रचावयाची असल्यामुळें देशांतील मुलांची उपेक्षा करून त्यांचें भागणार नाहीं परकीय सत्तेनें नकळत परंतु अगदीं अचूकपणें शिक्षणाच्या क्षेत्रांत लहान मुलांपासून सुरुवात केली. हल्लींचें प्राथमिक शिक्षण म्हणजे एक फार्स आहे. कारण हिंदुस्थानांतील खेड्यांच्या, व तसें पाहिलें तर शहरांच्यादेखील, गरजांचा विचार केल्याशिवाय त्याची योजना करण्यांत आली आहे. 'वर्धा शिक्षण' हें, मुलें शहरांतील असोत किंवा खेड्यांतील असोत त्यांचा, भारतवर्षांत ज्या कांहीं सर्वोत्तम व चिरस्थायी गोष्टी असतील त्यांच्याशीं, सांधा जुळवून देतें. तें शरीर आणि मन दोहोंचा विकास साधतें, व मुलाला देशाच्या भूमीशीं निगडित राखतें आणि त्याच्या मनःश्चक्षूंपुढें भविष्य काळाचें भव्य चित्र उभें करतें. हा भविष्य काळ निर्माण करण्याच्या कामीं तो बालक किंवा बालिका आपल्या शालेय जीवनाच्या सुरुवातीपासूनच हातभार लावूं लागतात. काँग्रेसवाद्यांना हें काम अत्यन्त मनोरंजक वाटण्यासारखें आहे; आणि त्यामुळें जितका लाभ त्यांच्या संपर्कांत येण्याऱ्या मुलांना होईल, तितकाच त्यांना स्वतःलादेखील होईल.

## ८ प्रौढ शिक्षण

याची काँग्रेसवाद्यांनीं भयंकर हेळसांड केली आहे. जेथें अशी हेळसांड त्यांनीं केली नाहीं, तेथें निरक्षरांना केवळ लिहायला–वाचायला शिकवून समाधान मानलें आहे. प्रौढ शिक्षणाचें काम जर माझ्या हातीं आलें तर मी आपला देश किती महान व विशाल आहे याची प्रौढ विद्यार्थ्यांना जाणीव करून देण्यापासून त्यांच्या शिक्षणास आरंभ करीन. खेड्यांतील मनुष्याचें हिंदुस्थान त्याच्या खेड्यांतच सांठवलेलें असतें. तो कोठें बाहेरगांवीं गेला

म्हणजे स्वतःच्या खेड्याचाच ' आपलें घर किंवा वतन ' म्हणून उल्लेख करतो. त्याच्या दृष्टीनें हिंदुस्थान म्हणजे एक भौगोलिक नांव आहे. खेड्यांत किती अज्ञान माजलेलें आहे याची आपल्याला कांहीं कल्पना नाहीं. परकीय राज्य व त्याचे दुष्परिणाम यांची खेड्यांतील लोकांना कांहीं माहिती नाहीं. जें काय तुटपुंजें ज्ञान त्यांना सहजगत्या कोठून तरी मिळतें, त्यामुळें परकीयांचा दरारा वाटून ते गांगरून जातात. याचा परिणाम असा होतो कीं, परकीय लोक व त्यांची सत्ता यांविषयीं त्यांच्या मनांत भीति व द्वेष उत्पन्न होतो. यांतून स्वतःची कशी सुटका करून घ्यावी तें त्यांना कळत नाहीं. आपले स्वतःचे दोष आणि परकीय सत्ता झुगारून देण्याच्या आपल्या अंगच्या शक्तीच्या जाणीवेचा अभाव, यांमुळेंच परकीयांचें अस्तित्व या देशांत आहे हें त्यांना माहीत नाहीं. म्हणून माझ्या मतें प्रौढ शिक्षण म्हणजे प्रथम प्रौढांना खरें राजकीय शिक्षण तोंडानें देणें हें होय.

प्रौढ शिक्षणांत याची व्यवस्थित योजना करून ठेवलेली असली म्हणजे तें निर्भयपणें देतां येईल. मला वाटतें कीं, अशा प्रकारचें शिक्षण देण्याच्या कामीं सरकारनें अडथळा आणण्याचे दिवस केव्हांच निघून गेले आहेत; परंतु सरकारनें तसा अडथळा जर केलाच, तर आपल्या लोकांना गोळा करून, त्यांना तोंडीं शिक्षण देण्याच्या या प्राथमिक हक्कासाठीं, आपण सरकारशीं लढा दिला पाहिजे; कारण, याच्याशिवाय स्वराज्य संभवतच नाहीं. अर्थात् मी हें जें सर्व लिहिलें आहे त्यांत सर्व काम उघडपणें होईल असें गृहीत धरलेलें आहे. अहिंसेला भीतीचा—आणि त्यामुळें गुप्ततेचा—तिटकारा आहे. या मौखिक शिक्षणाच्या बरोबरच अक्षरज्ञानहि देण्यांत यावें. हें एक विशिष्ट लायकीचें काम आहे, या शिक्षणाचा काळ कमी करण्यासाठीं अनेक पद्धति अजमावल्या जात आहेत. येथें निर्दिष्ट केलेल्या कल्पनांना मूर्त स्वरूप देऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठीं कॉंग्रेसच्या कार्यकारी समितीनें तज्ज्ञांचें एक कामचलाऊ किंवा कायमचें मंडळ नेमल्यास चांगलें होईल. मी कबूल करतों कीं, या परिच्छेदांत मी जें कांहीं म्हटलें आहे, तें केवळ दिग्दर्शनापुरतें आहे. परंतु सर्वसामान्य कॉंग्रेसवाद्यानें त्या रस्त्यानें कसें जावें त्याची माहिती यांत दिलेली नाहीं. त्याचप्रमाणें ज्यांत

अमुक प्रकारच्या विशिष्ट ज्ञानाची अत्यन्त आवश्यकता आहे, असें हें काम करण्याची पात्रता प्रत्येक काँग्रेसवाद्याच्या अंगीं असणेंहि शक्य नाहीं. परंतु जे काँग्रेसवादी शिक्षक असतील, त्यांना येथें ज्या सूचना केल्या आहेत; तदनुसार शिक्षणक्रम आखण्याला अडचण पडूं नये असें वाटतें.

## ९ स्त्रियांची सेवा

स्त्रियांच्या सेवेचा मीं विधायक कार्यक्रमांत समावेश केला आहे. कारण कीं, हिंदुस्थानांतील स्त्रिया अंधःकारानें ग्रासलेल्या होत्या. त्यांतून अगदीं सहजगत्या, कोणाला खरें वाटणार नाहीं, इतक्या थोड्या वेळांत, सत्याग्रहानें त्यांना बाहेर काढलें आहे. हें काम इतर कोणत्याहि उपायानें शक्य झालें नसतें. स्वराज्याच्या लढ्यांत स्त्रियांना आपल्या बरोबरीनें भाग घेतां यावा, असा प्रयत्न करणें आपलें कर्तव्य आहे, असें काँग्रेसवाद्यांना अजून पटलें नाहीं. सेवेच्या कार्यामध्यें स्त्री ही पुरुषाची खरोखरीची मदतनीस झाली पाहिजे, या गोष्टीची जाणीव त्यांना अद्याप झाली नाहीं. ज्या रूढि व कायदे पुरुषांनीं घडविले होते, व जे घडविण्यांत स्त्रियांचा कांहीं भाग नव्हता, अशा रूढींच्या व कायद्यांच्या खालीं स्त्रियांना चुरडून टाकण्यांत आलें आहे. अहिंसेच्या पायावर अधिष्ठित झालेल्या जीवनाच्या योजनेंत, पुरुषालास्वतःचें भवितव्य घडविण्याचा जितका अधिकार पोहोचतो, तितकाच स्त्रीलाहि स्वतःचें भवितव्य घडविण्याचा अधिकार असणार.

परंतु अहिंसक समाजांत कोणताहि हक्क प्राप्त होण्याच्या पूर्वी अगोदर विशिष्ट कर्तव्य बजावलेलें असावें लागतें. यावरून असें फलित होते कीं, सामाजिक आचाराचे नियम स्त्रीपुरुषांनीं एकमेकांच्या सहकार्यानें व सल्ल्यानें घडविले पाहिजेत. ते कधींहि बाहेरून लादतां येणार नाहींत. स्त्रियांशीं वागण्याच्या बाबतींत या सत्याचें संपूर्ण आकलन पुरुषांना झालेलें नाहीं. स्त्रिया या आपल्या मित्र व सहकारी आहेत असें समजण्याच्याऐवजीं, आपण स्त्रियांचे प्रभु आणि मालक आहोंत, असें ते मानीत आले आहेत. हिंदुस्थानांतील स्त्रियांना हात देऊन वर आणण्याचा अग्र–अधिकार काँग्रेसवाद्यांचा आहे. आपल्याला स्वतंत्र होतां येईल किंवा केव्हां तरी स्वतंत्र व्हावयाचें आहे, याची जाणीव नसलेल्या प्राचीन काळच्या गुलामासारखीच कांहींशी स्त्रियांची स्थिति आहे. जेव्हां स्वातंत्र्य प्रत्यक्ष येऊन थडकलें, तेव्हां

कांहीं काळपर्यंत त्या गुलामाला अगदीं असहाय वाटलें. आपण पुरुषांचे गुलाम आहोंत असें मानण्याची शिकवण स्त्रियांना देण्यांत आलेली आहे. त्यांना स्वतःच्या संपूर्ण प्रतिष्ठेची (दर्जाची) जाणीव व्हावी आणि पुरुषांच्या बरोबरीनें काम करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं यावें, असा प्रयत्न करणें हें काँग्रेसवाद्यांचें कर्तव्य आहे.

एकदां मनाचा निश्चय झाला तर ही क्रांति सोपी आहे. काँग्रेस-वाद्यांनीं आपल्या घरापासूनच या क्रांतीस सुरुवात करावी.

बायका म्हणजे बाहुल्या किंवा उपभोग्य वस्तु आहेत असें न समजतां, त्या सेवेच्या समान क्षेत्रांत सन्माननीय सहकारी आहेत असें समजून, त्यांच्याशीं तदनुरूप वर्तन ठेवावें. हा उद्देश पार पाडण्यासाठीं ज्यांना शाळा-कॉलेजांतील शिक्षण मिळालेलें नाहीं, त्यांनीं स्वतःच्या पतींपासून जें कांहीं शिक्षण मिळण्यासारखें असेल तेवढें घ्यावें. हेंच म्हणणें जरूर त्या फेरफारा-सह माता व कन्या यांसहि लागू पडतें.

हिंदुस्थानच्या स्त्रियांच्या असहाय स्थितीचें हें एक एकांगी चित्र मीं येथें रेखाटलें आहे, हें येथें सांगण्याची आवश्यकता नसावी. मला या गोष्टीची पूर्ण जाणीव आहे कीं, खेड्यांतून सामान्यतः स्त्रिया यत्किंचितहि न दबतां, पुरुषांशीं बरोबरीच्या नात्यानें वागतात; आणि कांहीं बाबतींत तर त्यांच्यावर वर्चस्व देखील गाजवितात. परंतु एखाद्या निष्पक्ष परकीय मनुष्याला असेंच वाटेल कीं, कायदा व रूढि या दोन्ही दृष्टींनीं आपल्या येथील स्त्रियांचा दर्जा सर्व बाबतींत अगदीं हीन आहे, आणि त्यांत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणें आवश्यक आहे.

## १० आरोग्य आणि स्वच्छतेचं शिक्षण

विधायक कार्यक्रमांत ग्रामसफाईचा एक स्वतंत्र बाब म्हणून समावेश केल्यानंतर आरोग्याच्या व स्वच्छतेच्या शिक्षणाला वेगळें स्थान देण्याची काय जरूर, असा प्रश्न वाचकाकडून येणें शक्य आहे. ग्रामसफाईबरोबरच हा विषय घेतां आला असता खरा, परंतु विधायक कार्यक्रमाच्या वेगवेगळ्या मुद्द्यांत ढवळाढवळ करायची माझी इच्छा नव्हती. केवळ ग्रामसफाईचा उल्लेख केल्यानें त्यांत आरोग्याचा व स्वच्छतेचा समावेश होऊं शकत नाहीं. स्वतःच्या आरोग्याचें रक्षण करण्याची कला, आणि स्वच्छतेचें ज्ञान हा एक

स्वतंत्र अभ्यासाचा आणि तदनुसार वर्तन करण्याचा विषय आहे. कोणत्याहि सुव्यवस्थित समाजामध्यें नागरिकांना आरोग्याच्या व स्वच्छतेच्या नियमांचें ज्ञान असतें व त्यांचें तें पालनहि करतात.

मनुष्यजातीला ज्या अनेक व्याधींनीं ग्रासलें आहे, त्यांपैकीं बहुतेक रोगांना कारण आरोग्याच्या व स्वच्छतेच्या नियमांचें अज्ञान व उपेक्षा हीं होत. ही गोष्ट आतां निःसंदिग्धपणें सिद्ध झालेली आहे. आपल्या येथें जें मृत्यूचें फारच मोठें प्रमाण आहे, त्याचें मुख्य कारण आपल्या लोकांच्या शरीरांना कुरतडून खाणारें दारिद्र्य आहे यांत तिळमात्र शंका नाहीं; परंतु लोकांना जर आरोग्याच्या व स्वच्छतेच्या बाबतींत योग्य शिक्षण दिलें, तर हें प्रमाण बरेंच कमी करतां येण्यासारखें आहे.

'निरोगी शरीरांत निरोगी मन (वास करतें)' हा मानवजातीसाठीं कदाचित् पहिला नियम असावा. या नियमांतील सत्य स्वतःसिद्ध आहे. मन आणि शरीर यांच्यांमध्यें अनिवार्य असा संबंध आहे. आपलीं मनें जर निरोगी झालीं तर आपण सर्व प्रकारच्या हिंसेचा त्याग करूं, आणि मग स्वाभाविकपणेंच आरोग्याच्या नियमांचें पालन करूं, म्हणजे आपलीं शरीरें अनायासें निरोगी होतील. म्हणून विधायक कार्यक्रमाच्या या बाबीकडे कोणताहि काँग्रेसवादी दुर्लक्ष करणार नाहीं अशी मी आशा बाळगतों. आरोग्याचे आणि स्वच्छतेचे मूलभूत सिद्धांत फार साधे व सहज शिकून घेण्यासारखे आहेत. अडचण काय ती ते पाळण्याच्या बाबतींत येते. कांहीं नियम येथें देतों :

१ अत्यन्त शुद्ध विचार मनांत आणीत जा आणि सर्व रिकामटेकडचा व मलिन विचारांची हकालपटी करा.

२ रात्रंदिवस स्वच्छ व ताजी हवा घ्या.

३ शारीरिक व मानसिक श्रमांत समतोलपणा राखा.

४ ताठ उभे रहा, ताठ बसा आणि आपल्या एकूण एक कामांत व्यवस्थित आणि निर्मळ राहा. हीं सर्व कामें तुमच्या आन्तरिक स्थितीची-निदर्शक होऊं द्यां.

५ आपल्या मानव-बांधवांच्या सेवेसाठीं जगण्याकरितां खा. स्वतःच्या स्वाद-तृप्तीसाठीं खाऊं–जगूं नका. एवढयासाठीं तुमचें मन व शरीर यांना

सुस्थितींत ठेवण्यासाठीं आवश्यक असेल इतकाच तुमचा आहार असावा. मनुष्य जशा प्रकारचा आहार घेतो तसा होतो.

६ तुमचें पाणी, अन्न आणि हवा हीं सर्व स्वच्छ व शुद्ध असलीं पाहिजेत आणि केवळ स्वतःपुरती स्वच्छता बाळगून तुम्ही समाधान न मानतां, जी त्रिविध स्वच्छता तुम्हांला स्वतःच्या बाबतींत पाळावीशी वाटेल, त्या त्रिविध स्वच्छतेचा प्रचार आपल्या भोंवतालीं तुम्ही करा.

## ११. प्रान्तीय भाषा

आपल्या मातृभाषेपेक्षां इंग्रजी भाषेविषयीं आपण जास्त प्रेम बाळगूं लागलों. त्यामुळें सुशिक्षित आणि राजकीप दृष्टचा जागृत असे वरचे वर्ग आणि सामान्य जनता हीं एकमेकांपासून फार दुरावलीं आहेत. त्यामुळें हिंदुस्थानांतील भाषांना दारिद्रच आलें आहे. एखादा गहन तात्त्विक विचार मातृभाषेंत व्यक्त करण्याचा वृथा प्रयत्न आपण करूं लागलों म्हणजे आपण अगदीं गटंगळ्या खाऊं लागतों. शास्त्रीय पारिभाषिक शब्द आपल्यापाशीं नाहींत. याचा परिणाम अत्यंत भयंकर झाला आहे. सामान्य जनता आधुनिक विचारापासून वेगळी पडून दूरच्या दूर राहते. हिंदुस्थानांतील महान भाषांच्या या उपेक्षेमुळें हिन्दुस्थानची जी हानि झाली आहे, तिचें बरोबर माप आपल्याला आज काढतां येणार नाहीं; कारण कीं, आपण या घटनेच्या फारच नजीक आहोंत. परंतु एवढी गोच्ट मात्र सहज समजण्यासारखी आहे कीं, हें नुकसान जर आपण भरून काढलें नाहीं, तर जनतेचीं मनें बंधनांत जखडलेलींच राहतील व स्वराज्याच्या उभारणीच्या कामीं तिला कोणतीहि भरीव कामगिरी करतां येणार नाहीं. संपूर्ण स्वातंत्र्याच्या चळवळींत प्रत्येक व्यक्तीनें प्रत्यक्ष काम करून भाग घ्यावा, ही गोष्ट अहिंसेवर उभारलेल्या स्वराज्यांत अंतर्भूत झालेली आहेच. स्वराज्याच्या चळवळींतील प्रत्येक पाऊल व त्याचें रहस्य काय आहे, हें समजल्याशिवाय जनतेला हें काम संपूर्णपणें करतां येणार नाहीं. आणि लोकांना त्यांच्या भाषांतून प्रत्येक पाऊल नीट समजावून सांगितल्याशिवाय हें अशक्य आहे.

## १२. राष्ट्रभाषा

याशिवाय, आपल्याला अखिल भारतीय दळणवळणा-साठीं हिन्दुस्थानांतील भाषांपैकीं जास्तींत जास्त लोकांना जी भाषा येते व समजते,

व जी इतरांना सहज शिकतां येण्यासारखी आहे, अशा एका भाषेचीं जरूर आहे. ही भाषा निर्विवादपणें हिन्दीच होय.

उत्तर हिन्दुस्थानाकडील हिंदु व मुसलमान या दोघांना ही भाषा समजते व बोलतां येते. उर्दू लिपींत ती लिहिली असली म्हणजे तिला उर्दू म्हणतात. कॉंग्रेसनें १९२५ मध्यें कानपूरच्या बैठकींत मंजूर केलेल्या प्रसिद्ध ठरावांत, या अखिल भारतीय भाषेला 'हिंदुस्थानी' हें नांव दिलेलें आहे. आणि त्यावेळेपासून निदान तात्त्विक दृष्टचा तरी हिंदुस्थानी ही राष्ट्रभाषा मानली जाते. मी ' तात्त्विक दृष्टचा ' म्हणतों याचें कारण असें कीं, कॉंग्रेसवाद्यांनीं-देखील या भाषेचा पाहिजे तसा व्यवहारांत उपयोग केला नाहीं. १९२० सालापासून सामान्य जनतेच्या राजकीय शिक्षणाच्या दृष्टीनें हिंदुस्थानच्या प्रांतीय भाषाचें महत्त्व, त्याचप्रमाणें राजकीय दृष्टीनें जागृत झालेल्या हिंदी लोकांना सहज बोलतां येईल आणि कॉंग्रेसच्या अखिल भारतीय सभा-संमेलनांतून हजर राहणाऱ्या वेगवेगळ्या प्रान्तांतील कॉंग्रेसवाद्यांना समजेल, अशा एका अखिल भारतीय राष्ट्रभाषेचें महत्त्व स्वीकारण्याचा एक प्रयत्न बुद्धिपुरस्सर सुरू झालेला आहे. राष्ट्रभाषा आपल्याला उर्दू व नागरी या दोन्ही लिपींत लिहितां आली पाहिजे आणि तिचीं हीं दोन्हीं स्वरूपें समजून बोलतां आलें पाहिजे.

पुष्कळ कॉंग्रेसवाद्यांनीं कानपूरच्या ठरावाची अमलबजावणी केली नाहीं, असें मला मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. त्यामुळें कॉंग्रेसवादी इंग्रजींत बोलण्याचा आग्रह धरीत आहेत व स्वतःच्या सोयीसाठीं इतरांना इंग्रजींत बोलण्यास भाग पाडीत आहेत असें, माझ्या मतें, लाजिरवाणें दृश्य आपल्या दृष्टीस पडतें. इंग्रजीनें आपल्यावर जी मोहिनी टाकली आहे, तिचे पाश अजून तुटले नाहींत. या मोहिनींत गुरफटल्यामुळें आपण हिंदुस्थानची त्याच्या ध्येयाप्रत होणारी प्रगति खुंटवीत आहोंत.

इंग्रजी भाषेच्या शिक्षणाप्रीत्यर्थ आपण जितकीं वर्षे खर्च करतों, तितके महिने तरी हिंदुस्थानी भाषा शिकण्यासाठी खर्च करण्याची आपण तसदी घेतली नाहीं, तर सामान्य जनतेविषयीचें आपलें प्रेम अगदींच वरकांती म्हटलें पाहिजे.

## १३. आर्थिक समानता

आर्थिक समता ही अहिंसक स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे. आर्थिक समतेसाठीं झटणें म्हणजे भांडवलवाले आणि कामगार यांजमधील सनातन भांडण मिटविणें होय. याचा अर्थ असा कीं, एका बाजूला ज्या मूठभर श्रीमंत लोकांच्या हातांत राष्ट्राच्या संपत्तीचा फार मोठा भाग केन्द्रित झालेला आहे त्यांची संपत्ति कमी करणें, आणि दुसऱ्या बाजूस अर्धपोटी व नग्न राहणाऱ्या कोटयवधि लोकांची संपत्ति वाढविणें होय.

मूठभर श्रीमंत आणि कोटयवधि बुभुक्षित लोक यांच्यामधील अफाट अंतर जोंपर्यंत कायम आहे, तोंपर्यंत अहिंसात्मक राज्यपद्धति अशक्य आहे. स्वतंत्र हिंदुस्थानांत नव्या दिल्लीचे राजवाडे आणि जवळच काबाड-कष्ट करणाऱ्या गरीब मजुरांच्या कंगाल झोंपडया यांजमधील विषमता एक दिवससुद्धां टिकणें अशक्य आहे; कारण त्यांत गरिबांना देशांतील श्रीमंतांतल्या श्रीमंत लोकांच्या बरोबरीनें सत्ता भोगावयास मिळेल. श्रीमंत लोकांनीं संपत्तीचा अणि तिच्यामुळें प्राप्त होणाऱ्या सत्तेचा स्वेच्छेनें त्याग करून, सर्वजनांच्या हितासाठीं इतरांना तिचे अंशभागीं न केलें, तर केव्हां तरी एक दिवस हिंसक आणि रक्तपाताची क्रांति घडून येणार हें निश्चित समजावें.

माझ्या ट्रस्टीपणाच्या सिद्धान्ताचा पुष्कळ उपहास करण्यांत आला आहे, तरी मी त्याला चिकटून राहिलों आहें. त्या स्थितीला जाऊन पोहोंचणें कठीण आहे हें खरें आहे. अहिंसेचेंहि असेंच नाहीं कां? परंतु १९२० सालींच आपण ही उरावरची चढण चढून जाण्याचा निश्चय केला. हा पुरुषार्थ करून पाहाण्यासारखा आहे असें आपल्याला आढळून आलें आहे. हा पुरुषार्थ करीत असतांना अहिंसा कशा रीतीनें काम करते याचें रोज वाढतें आकलन आपल्याला होत जावें हें जरूरीचें आहे. काँग्रेसवादी मंडळीं या कामीं चिकाटीनें प्रयत्नपूर्वक संशोधन करतील आणि अहिंसा कां व कशासाठीं पाळावयास पाहिजे याचीं कारणें स्वतःच्या मनाशीं विचार करून ठरवतील अशी अपेक्षा आहे. समाजांत विद्यमान असलेल्या विषमता अहिंसेच्या किंवा हिंसेच्या मार्गानें कशा रीतीनें नाहींशा करतां येतील त्याचा त्यांनीं आपल्या मनाशीं विचार करून पाहावा. मला वाटतें कीं, हिंसेच

मार्ग आपल्या परिचयाचा आहे. समानता स्थापन करण्याच्या कामीं तो कोठेंहि यशस्वी झालेला नाहीं.

हा अहिंसक प्रयोग अजून प्रयोगाच्या अवस्थेंतच आहे. प्रत्यक्ष वस्तु-पाठ म्हणून दाखवितां येईल असें फारसें साधन अजून आपल्यापाशीं नाहीं. एवढें मात्र निश्चित आहे कीं, कितीहि हळू हळू कां होईना, ही पद्धत समानतेच्या दिशेनें काम करूं लागली आहे, आणि अहिंसा ही हृदय-परिवर्तन करण्याची प्रक्रिया असल्याकारणानें हें हृदयपरिवर्तन जर झालें तर तें कायमचेंच होईल. अहिंसेच्या पायावर उभारलेल्या समाजाला किंवा राष्ट्राला आपल्या इमारतीवर बाहेरून किंवा आंतून होणाऱ्या हल्ल्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य असलें पाहिजे. राष्ट्रीय महासभेंत श्रीमंत कॉंग्रेसवादीहि आहेत; त्यांनीं या बाबतींत पुढाकार घेऊन मार्ग दाखवायला पाहिजे. आपल्या या लढ्यामुळें प्रत्येक काँग्रेसवाद्याला आपलें अंतःकरण अगदीं खोलवर तपासून पाहाण्याची संधि मिळत आहे. समानता जर कधीं काळीं आपल्याला सिद्ध करावयाची असेल, तर तिचा पाया आतांच घातला पाहिजे. महत्त्वाच्या अशा मोठमोठ्या सुधारणा स्वराज्य मिळाल्या-नंतर घडून येतील असें ज्यांना वाटत असेल, ते अहिंसक स्वराज्याच्या अगदीं प्राथमिक स्वरूपाच्या कार्याच्या बाबतींत स्वतःची प्रतारणा करून घेत आहेत. हें स्वराज्य कांहीं कोणे एके दिवशीं सुप्रभातीं एकाएकीं आभाळांतून पडणार नाहीं. परंतु आपण सर्वांनीं मिळून स्वकष्टानें एक एक वीट रचून त्याची इमारत उभारावयाची आहे. या दिशेनें आपण बराच पल्ला गांठला आहे; परंतु अजून पुष्कळ लांब व कंटाळवाणा मार्ग बाकी आहे. तो चालल्यानंतरच आपल्याला स्वप्रभेनें देदीप्यमान अशा स्वराज्याचें भव्य दर्शन घडेल. म्हणून 'आर्थिक समानता सिद्ध करण्याच्या कामीं मी काय कामगिरी केली आहे,' असा प्रश्न प्रत्येक कॉंग्रेसवाद्यानें आपल्या मनाला विचारून पाहावा.

## १४. शेतकरी

हा कार्यक्रम कांहीं संपूर्ण नव्हे. स्वराज्याची इमारत ही एक प्रचंड इमारत आहे. ती रचण्याला ऐंशी कोटी हातांनीं काम करावयाचें आहे

यांत सर्वांत मोठी संख्या शेतकऱ्यांची आहे. खरें सांगावयाचें म्हणजे यांतील फार मोठा भाग ( जवळ जवळ ८० टक्के ) शेतकऱ्यांचा असल्या कारणानें शेतकरी म्हणजेच काँग्रेस अशी स्थिति असावयास पाहिजे. परंतु आज अशी स्थिति नाहीं. स्वतःच्या अंगच्या अहिंसक शक्तीची जाणीव जेव्हां शेतकऱ्यांना होईल, तेव्हां जगांतील कोणतीहि सत्ता त्यांच्यापुढें टिकूं शकणार नाहीं.

सत्तेसाठीं चालेलल्या अहमहमिकेच्या राजकारणांत शेतकऱ्यांचा उपयोग करण्यांत येऊं नये. असा उपयोग करणें मी अहिंसात्मक पद्धतीशीं विरोधी मानतों. शेतकऱ्यांना संघटित करण्याची माझी पद्धत ज्यांना माहीत करून घ्यावयाची असेल, त्यानीं चंपारण्यांतील लढ्याचा अभ्यास केल्यास त्यांना बरीच माहिती मिळेल. त्या लढ्यांतच सत्याग्रहाचा पहिला प्रयोग हिंदुस्थानांत झाला. त्याचा काय परिणाम झाला तें सर्व देशाला माहीत आहे. ती एक सामुदायिक चळवळ बनली होती आणि आरंभापासून शेवट-पर्यंत संपूर्णपणें अहिंसक राहिली होती. तींत वीस लाखांवर शेतकऱ्यांच्या हिताचा प्रश्न होता. एका शतकापासून शेतकऱ्यांना सहन कराव्या लागत असलेल्या एका विशिष्ट अडचणीच्या मुद्यावर लढा केंद्रित झाला होता. या अडचणीचें निवारण करण्यासाठीं कित्येक हिंसक बंडें पूर्वीं झालीं होतीं. शेतकऱ्यांना दडपून टाकण्यांत आलें होतें. अशा ठिकाणीं अहिंसात्मक उपाय सहा महिन्यांतच संपूर्णपणें यशस्वी झाला. राजकीय जागृतीसाठीं कोणताहि प्रत्यक्ष प्रयत्न न करतांच चंपारण्यांतील शेतकरी राजकीय दृष्ट्या जागृत झाले. आपल्या अडचणींच्या निवारणाच्या कामीं अहिंसा कशी कार्यक्षम होते, याचा प्रत्यक्ष पुरावा मिळाल्यानें ते काँग्रेसकडे आकर्षित झाले, आणि बाबू ब्रिजकिशोरप्रसाद व बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या नेतृत्वाखालीं गेल्या सविनय कायदेभंगाच्या लढ्यांच्या प्रसंगीं त्यांनीं चांगली कामगिरी करून दाखविली.

याशिवाय खेडा, बारडोली व बोरसद येथील शेतकऱ्यांच्या चळ-वळींचा वाचकानें अभ्यास केला, तर त्यापासूनहि त्याला चांगला बोध मिळेल. या सर्व चळवळींच्या यशाचें रहस्य, शेतकऱ्यांच्या स्वतःच्या व त्यांना प्रत्यक्ष सोसाव्या लागणाऱ्या अडचणीखेरीज इतर कोणत्याहि राजकीय हेतूंसाठीं त्यांचा उपयोग न करण्याच्या निश्चयांत सांठविलेलें आहे. एखाद्या

विशिष्ट अन्यायानिमित्तानें त्यांची संघटना करण्याची गोष्ट त्यांना पटते. मग त्यांना अहिंसेवर प्रवचनें द्यावी लागत नाहींत. स्वतःच्या तक्रारींचा एक परिणामकारक इलाज म्हणून त्यांना अहिंसेचा उपयोग करण्याचें प्रथम शिकूं द्या. तें त्यांना समजतें. आणि मग जेव्हां त्यांना सांगण्यांत येतें कीं, तुम्ही जो इलाज वापरीत होता तो अहिंसक होता, तेव्हां तें चटकन त्याला अहिंसक म्हणून ओळखूं लागतात.

या कार्याविषयीं ज्यांना तळमळ असेल अशा काँग्रेसवाद्यांनीं वरील दृष्टान्तांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास शेतकऱ्यांसाठीं व शेतकऱ्यांमध्यें काम कसें करतां येईल हें त्यांना कळून येईल. कित्येक काँग्रेसवाद्यांनीं शेतकऱ्यांची संघटना करण्यासाठीं ज्या पद्धतीचें अवलंबन केलें आहे, तिच्यामुळें त्यांचें कांहींच हित साधलें नाहीं; उलट तिच्यामुळें त्यांचें कदाचित् नुकसानच झालें असेल. तें कसेंहि असो, त्यांनीं अहिंसक पद्धति वापरलेली नाहीं हें खास. यांपैकीं कांहीं कार्यकर्ते 'आमचा अहिंसेवर विश्वास नाहीं' असें प्रांजळपणें कबूल करतात; त्यांच्या या निखालसपणाबद्दल त्यांना श्रेयच दिलें पाहिजे. मात्र अशा कार्यकर्त्यांना माझा एवढाच सल्ला आहे कीं, त्यांनीं काँग्रेसचें नांव वापरूं नये किंवा काँग्रेसवादी म्हणूनहि काम करूं नये.

शेतकरी आणि मजूर यांची अखिल भारतीय पायावर संघटना करण्याच्या चढाओढीपासून मी कां दूर राहिलों आहें हें वाचकांच्या आतां लक्षांत येईल. सर्व कार्यकर्त्यांनीं एकाच दिशेनें जोर देऊन काम केलें, तर किती चांगलें होईल बरें! परंतु आपल्या देशासारख्या अवाढव्य देशांत असें होणें कदाचित् अशक्य असेल. एवढें मात्र खरें कीं, अहिंसेंत जबरदस्तीला वाव नाहीं. शांतपणें केलेला युक्तिवाद आणि अहिंसेच्या प्रयोगाचें प्रत्यक्ष दर्शन या दोन गोष्टीच इच्छित परिणाम घडवून आणतील, असा विश्वास बाळगला पाहिजे.

मला वाटतें कीं, मजुरांच्याप्रमाणेंच शेतकऱ्यांच्या विशिष्ट प्रश्नांचा अभ्यास करून काम करणारें एक खातें काँग्रेसनें आपल्या देखरेखीखालीं चालविणें आवश्यक आहे.

## १५. मजूर

अहमदाबाद येथील 'मजूर महाजन' (गिरणी कामगार संघ) ही अखिल हिन्दुस्थानाला अनुकरण करण्यासारखी नमुनेदार संस्था आहे.

तिची उभारणी मात्र शुद्ध अहिंसेच्या पायावर झालेली आहे. तिच्या आजपर्यंतच्या कारकीर्दींत तिला कधीं पीछेहाट करण्याचा प्रसंग आलेला नाहीं. कोणत्याहि प्रकारची धामधूम किंवा अवडंबर केल्याशिवाय ती उत्तरोत्तर जास्त बळवान होत गेली आहे. या संस्थेजवळ आज स्वतःच्या मालकीचें हॉस्पिटल, गिरणी–कामगारांच्या मुलांसाठीं स्वतःच्या शाळा, प्रौढांसाठीं वर्ग, स्वतःच्या मालकीचा एक छापखाना आणि खादी भांडार आणि राहण्याची जागाहि आहे. बहुतेक सर्वच कामगार मतदार आहेत आणि निवडणुकीचा परिणाम त्यांच्या मतांवर अवलंबून असतो. प्रांतिक महासभा-समितीच्या सांगण्यावरून त्यांनीं मतदारांच्या यादींत आपलीं नांवें नोंदविलीं. राष्ट्रीय महासभेच्या पक्षापक्षीच्या राजकारणांत, या संघानें कधींहि भाग घेतलेला नाहीं. शहर म्युनिसिपालिटीच्या धोरणावरहि या संघाचा प्रभाव पडत असतो. संपूर्णपणें अहिंसात्मक असे संप अत्यंत यशस्वी करून दाखविण्याचें श्रेय या संस्थेला द्यावें लागतें. येथील गिरणीमालक आणि कामगार यांच्यामधील परस्पर–संबंधांत फार करून स्वेच्छेनें पंचामार्फत न्यायनिवाडा करविण्यांत येत असतो. माझें जर चाललें, तर मी हिन्दुस्थानांतील सर्व मजूर–संस्थांचें काम अहमदाबादच्या ‘मजूर महाजन’च्या धर्तीवर व्यवस्थित करून देईन. या महाजनानें “अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस”च्या क्षेत्रांत घुसण्याचा कधींहि प्रयत्न केला नाहीं, त्याचप्रमाणें त्या काँग्रेसच्या प्रभावापासून तो अलिप्त राहिलेली आहे. असा एक दिवस उगवण्याची मला आशा आहे कीं, जेव्हां ट्रेड युनियन काँग्रेसला अहमदाबाद मजूर महाजनची पद्धत स्वीकार्य वाटेल आणि अहमदाबाद येथील संस्थेला अखिल भारतीय युनियनची एक घटक संस्था म्हणून ती मान्यता देईल. परंतु याची मला घाई नाहीं. योग्य वेळ आली म्हणजे ही गोष्ट आपोआप घडून येईल.

## १६. आदिवासी

रानीपरज (रानांतील प्रजा) या शब्दाप्रमाणेंच ‘आदिवासी’ हा शब्द-देखील नव्या बनावटीचा आहे. रानीपरज हा शब्द काळीपरज या शब्दासाठीं योजिलेला आहे. ( काळी परज याचा अर्थ काळी प्रजा असा होतो. परंतु या लोकांचा वर्ण इतर कोणत्याहि वर्णापेक्षां जास्त काळा नाहीं. ) हा

शब्द मला वाटतें श्री. जुगतराम दवे यांनीं बनविलेला आहे. त्याचप्रमाणें भिल्ल, गोंड इत्यादि डोंगरांतील जाती किंवा देशांतील मूळचे राहणारे लोक यांच्यासाठीं वापरण्यांत येणाऱ्या आदिवासी या शब्दाचा अक्षरशः अर्थ 'देशांतील मूळचे निवासी' असा होतो; आणि तो मला वाटतें, श्री. ठक्करबापा यांनीं बनविलेला आहे.

आदिवासी लोकांची सेवा हीदेखील विधायक कार्यक्रमाचें एक अंग आहे. या कार्यक्रमांत त्याचा अनुक्रम जरी सोळावा आला आहे, तरी त्यांचें महत्त्व मात्र जरासुद्धां कमी नाहीं. आपला देश इतका विशाल आणि त्यांतील मानवजाति इतक्या विविध प्रकारच्या आहेत कीं, आपल्यांपैकीं सर्वांत जास्त वाकबगार माणसाला देखील वेगवेगळ्या मानवजाति व त्यांच्या अवस्था यांजविषयीं जें कांहीं जाणण्यासारखें असतें तें सर्व माहीत करून घेतां येत नाहीं. ही गोष्ट जसजशी आपल्या प्रत्ययास येते, तसतसें, राष्ट्राच्या प्रत्येक घटकाला आपण इतर प्रत्येक घटकाशीं निगडित आहोंत, आपण सर्व एक आहोंत, याची जिवंत व स्पष्ट जाणीव झाल्याखेरीज आपण एक अखंड राष्ट्र आहोंत असा दावा सांगून तो सिद्ध करणें, हें किती कठिण आहे, तें आपल्याला कळूं लागतें.

सबंध हिन्दुस्थानांत आदिवासीयांची एकूण संख्या दोन कोटींच्या वर आहे. ठक्करबापांनीं किती तरी वर्षांपूर्वी गुजरातमधील भिल्ल लोकांत काम सुरू केलें. १९४० च्या सुमारास श्री. बाळासाहेब खेर यांनीं ठाणें जिल्ह्यांत आदिवासीयांच्या या अतिआवश्यक सेवाकार्यांत स्वतःच्या नेहमीच्या उत्साहानें उडी टाकली.

हिन्दुस्थानाच्या इतर भागांतून असे कित्येक कार्यकर्ते आहेत, परंतु कार्याच्या मानानें ते फारच थोडे आहेत. खरोखरच, "पीक तर पुष्कळ आलें आहे; परंतु कापणी करणाऱ्या मजुरांचीच वाण आहे." ही सर्व सेवा केवळ माणुसकीच्या स्वरूपाचीच सेवा नव्हे, तर भरीव राष्ट्रीय सेवा असून आपल्याला खऱ्या स्वातंत्र्याच्या जवळ नेणारी आहे, ही गोष्ट कोणाला नाकबूल करतां येईल ?

## १७. महारोगी

महारोगी हा शब्दच घृणास्पद असा आहे. महारोग्यांचें वसतिस्थान म्हणून हिन्दुस्थानचा नंबर फक्त मध्य-आफ्रिकेच्या खालोखाल असेल. तथापि आपल्यापैकीं श्रेष्ठ म्हटल्या जाणाऱ्या इसमांइतकेंच हे महारोगी-देखील समाजाचें अंग आहेत. परंतु होतें असें कीं, वरच्या पायरीवरच्या लोकांना सेवेची सर्वांत कमी जरूर असूनहि त्यांच्यावरच आपणा सर्वांचें लक्ष केन्द्रित झालेलें असतें; आणि ज्यांच्याकडे वास्तविकपणें पुष्कळच लक्ष देण्याची जरूर आहे, अशा महारोग्यांच्या नशिबीं केवळ बुद्धिपुरस्सर केलेली उपेक्षाच येते. या उपेक्षेला मला हृदयशून्य म्हणावेसें वाटतें, आणि अहिंसेच्या दृष्टीनें ती खरोखरच तशी आहे. आपल्याकडे फार करून मिशनरी लोकांनींच महारोग्यांविषयीं काळजी वाहून त्यांची सेवा केलेली आहे, त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावयास पाहिजे. केवळ निःस्वार्थ प्रेमाचें कार्य म्हणून हिंदी इसमानें चालविलेली महारोग्यांची एकमात्र संस्था वर्ध्यास श्री. मनोहर दिवाण यांची आहे. श्री. विनोबा भावे यांच्या प्रेरणेनें व देखरेखेखालीं तिचें काम चालू आहे.

हिन्दी राष्ट्राच्या धमन्यांतून जर खरोखरच नवजीवन वाहत असतें व सत्यमय आणि अहिंसक साधनांच्या द्वारां शक्य तितक्या कमी वेळांत स्वातंत्र्य प्राप्त करण्याची तळमळ आपल्याला वाटत असती, तर ज्याची कोणी काळजी वाहत नाहीं किंवा ज्याचा कोणाला पत्तादेखील नाहीं, असा एकदेखील महारोगी किंवा भिकारी हिंदुस्थानांत आढळला नसता.

विधायक कार्यक्रमाच्या या सुधारलेल्या आवृत्तींत रचनाकार्याच्या सांखळींतील एक दुवा म्हणून महारोग्याला व त्याच्या सेवेला मी मुद्दाम करीत आहें. कारण महारोग्याची हिन्दुस्थानांत जी स्थिति आहे तीच स्थिति, आपल्या भोवतालीं एक दृष्टिपात करून पाहिल्यास, आधुनिक सुधारलेल्या जगांत आपली आहे असें दिसून येईल. महासागराच्यापलीकडे आपल्या देशबांधवांची स्थिति कशी काय आहे तिचा तपास घ्या, म्हणजे माझ्या या विधानांतील तथ्य आपल्याला पटेल.

## १८. विद्यार्थी

विद्यार्थ्यांना मीं शेवटीं राखून ठेवलें आहें. त्याच्याशीं मी नेहमीं गाढ संपर्क साधीत आलों आहें. ते मला ओळखतात व मी त्यांचें हृद्गत जाणतों. त्यांनीं माझें पुष्कळ काम केलेलें आहे. कॉलेजांतून बाहेर पडलेले पुष्कळ विद्यार्थी आज माझे माननीय सहकारी आहेत. भविष्यकाळची आशा त्यांच्यावर आहे हें मी जाणून आहें. असहकारितेची चळवळ ऐनभरांत होती, त्या वेळीं त्यांना आपलीं शाळा-कॉलेजें सोडून देण्यास सांगण्यांत आलें होतें. कॉंग्रेसच्या हांकेला ओ देऊन ज्यांनीं शाळा–कॉलेजें सोडलीं, असे कित्येक अध्यापक आणि विद्यार्थी राष्ट्रकार्याला चिकटून राहिले आहेत आणि त्यामुळें त्यांच्या देशाला व त्यांना स्वतःला पुष्कळ लाभ झालेला आहे. अनुकूल वातावरणाच्या अभावीं विद्यार्थ्यांना शाळा–कॉलेजें सोडण्याचा आदेश पुनः देण्यांत आला नाहीं. परंतु अनुभवाअंतीं असें दिसून आलें आहे कीं, प्रचलित शिक्षण जरी व्यर्थ व अस्वाभाविक आहे, तरी त्याची मोहिनी अशी कांहीं प्रबळ आहे कीं, देशांतील तरुणांना तिच्या तावडीतून सुटतां येत नाहीं. कॉलेजांतील शिक्षणानें त्यांना करीयर (प्रतिष्ठित जीवनाचें साधन) उपलब्ध होतें. पांढरपेशांच्या समाजांत प्रवेश करण्याचा तो एक परवाना आहे. रूढ चाकोरींतून गेल्याशिवाय इतर मार्गानें त्यांची क्षम्य अशी ज्ञानपिपासा तृप्त होऊं शकत नाहीं. मातृभाषेचें स्थान पटकावून बसलेल्या सर्वथा परकीय अशा भाषेचें ज्ञान प्राप्त करण्याच्या पायीं किती तरी अमूल्य वर्षें फुकट दवडावीं लागतात, त्याचें त्यांना कांहीं वाटत नाहीं. असें करण्यांत पाप आहे याची त्यांना कधीं जाणीव होत नाहीं. आधुनिक विचारसंपत्ति आणि आधुनिक शास्त्रें यांचा परिचय करून घेण्याच्या दृष्टीनें, देशी भाषा निरुपयोगी आहेत, असें त्यांनीं व त्यांच्या शिक्षकांनीं आपल्या मनाशीं पक्कें ठरवून टाकलेलें आहे. जपानी लोकांचें कसें काय चाललें असेल त्याचें मला नवल वाटतें. कारण मला असें माहीत आहे कीं, त्यांचें सर्व शिक्षण जपानींतूनच देण्यांत येतें. शिवाय चीनच्या सेनापतींना इंग्रजी येत असलें, तरी फारच थोडें येत असेल.

परंतु आपले विद्यार्थी असे असले, तरी या युवकयुवतींमधूनच राष्ट्राचे भावी पुढारी निर्माण व्हावयाचे आहेत. दुर्दैवानें त्यांच्यावर नाहीं नाहीं

तसल्या वातावरणाचा प्रभाव पडत असतो. अहिंसेचें आकर्षण त्यांना क्वचितच वाटतें. ' ठोशास ठोसा ' किंवा 'एकास दोन ठोसे' हा न्याय सहज पटण्यासारखा आहे. याचा परिणाम क्षणिक असला तरी तात्काल होतांना दिसतो. पशुपशूंतील किंवा मानवी प्राण्यामधील युद्धाच्या वेळीं आपल्या दृष्टीस पडणारा हा पाशवी शक्तींचा कधींहि न संपणारा चुरशीचा सामना आहे. अहिंसेच्या यथायोग आकलनासाठीं धिम्मेपणानें संशोधन करण्याची-आणि त्याहिपेक्षां जास्त धिम्मेपणाने आणि कष्ट सहन करून आचरण करण्याची जरूर असते. विद्यार्थ्यांना आपल्याकडे ओढून घेण्यासाठीं राजकीय पक्षांच्या चाललेल्या स्पर्धेत मी पडलों नाहीं. याचीं कारणें शेतकरी आणि मजूर यांच्याबाबतींत जीं मीं सांगितलीं तींच होत. परंतु विद्यार्थी या शब्दाचा जास्त व्यापक अर्थ केल्यास मी स्वतःच त्यांचा एक विद्यार्थी-बंधु आहे. पण माझें विद्यापीठ त्यांच्याहून वेगळ्या प्रकारचें आहे. माझ्या युनिव्हर्सिटींत येऊन माझ्या संशोधनकार्यास येऊन मिळण्याचें त्यांना माझें कायमचें आमंत्रण आहे. तींत दाखल होण्यास शर्तीं खालीलप्रमाणें आहेत:—

१. विद्यार्थ्यांनीं पक्षापक्षीच्या राजकारणांत भाग घेऊं नये. ते विद्यार्थी आहेत, संशोधक आहेत, राजकारणी पुरुष नव्हत.

२. त्यांनी राजकीय संपाचें अवलंबन करूं नये.

त्यांचे उपास्य वीर-पुरुष असावेत; परंतु आपल्या वीर पुरुषां-विषयीं आपली भक्ति दर्शविण्याचा मार्ग त्यांच्यांतील उत्तम अंशाचें अनुकरण करणें, हा असावा. त्या वीरांना कैदेंत टाकलें, किंवा ते वारले किंवा त्यांना फांशी जरी देण्यांत आलें, तरीसुद्धां संप करणें हा नसावा. त्यांचें दुःख असह्य असेल आणि सर्व विद्यार्थ्यांना सारख्याच तीव्रतेनें तें वाटत असेल, तर अशा प्रसंगीं आपल्या आचार्यांच्या संमतीनें शाळा-कॉलेजें बंद ठेवण्यांत यावींत. विद्यार्थ्यांचें म्हणणें आचार्यांनीं जर ऐकलें नाहीं, तर त्यांना आपल्या संस्था सभ्यतापूर्वक सोडून जाण्याची व संचालकांना पश्चात्ताप होऊन ते त्यांना परत बोलावीपर्यंत परत न येण्याची मोकळीक आहेच. कोणत्याहि कारणानें अधिकाऱ्यांविरुद्ध किंवा संपांत सामील न होणाऱ्या विद्यार्थ्यांविरुद्ध त्यांनीं जबरदस्तीचा प्रयोग करतां कामा नये. त्यांना असा आत्मविश्वास असावयास पाहिजे कीं, जर आपल्यांत एकी

असेल आणि आपलें वर्तन प्रतिष्ठित असेल, तर आपला विजय खात्रीनें होणार.

३. त्यांनीं सर्वांनीं सशास्त्र रीतीनें व पद्धतशीरपणें यज्ञार्थ सूत कांतलें पाहिजे. त्यांचीं साधनें नेहमीं नीटनेटकीं, स्वच्छ, व्यवस्थित आणि कार्य-क्षम स्थितींत असलीं पाहिजेत. शक्य असल्यास तीं त्यांनीं स्वतः तयार करण्यास शिकावें, त्यांचें सूत स्वाभाविकपणेंच उत्तम प्रकारचें असेल. सूत कांतण्या-विषयींच्या साहित्याचा त्यांनीं अभ्यास करावा व त्यांतील आर्थिक, सामाजिक, नैतिक व राजकीय रहस्यें समजून घ्यावींत.

४. त्यांनीं सर्व कपडेलत्ते खादीचेच वापरावेत; आणि विलायती किंवा यंत्राच्या साहाय्यानें तयार झालेल्या तत्सम देशी वस्तु न वापरतां खेडेगांवात तयार झालेल्या वस्तुच वापराव्यात.

५. त्यांनीं 'वंदे मातरम्' हें गीत किंवा राष्ट्रीय ध्वज इतरांवर जबरदस्तीनें लादू नये. त्यांनीं राष्ट्रीय ध्वजांकित गुंड्या किंवा बिल्ले स्वतः खुशाल वापरावेत, परंतु इतरांवर तसें करण्याची बळजबरी करूं नये.

६. तिरंगी झेंड्याचा संदेश आपल्या जीवनांत प्रयत्नपूर्वक उतरवून जातिनिष्ठतेला किंवा अस्पृश्यतेला आपल्या अंतःकरणांत त्यांनीं थारा देऊं नये. इतर धर्माच्या विद्यार्थ्यांबरोबर, तसेच हरिजनांबरोबर, ते आपले आप्तेष्ट आहेत. अशा भावनेनें त्यांनीं खरी मैत्री जोडावी.

७ आपले शेजारीपाजारी जखमी झाले तर त्यांस प्राथमिक उपचाराची मदत करण्याचा त्यांनीं नेम धरावा; आसपासच्या खेड्यांत जाऊन तेथें साफसुफीचें व भंग्याचे काम करावें, आणि खेड्यांतील मुलांना आणि प्रौढांना शिकवावें.

८. त्यांनीं राष्ट्रभाषा हिंदुस्थानी तिच्या हल्लींच्या दुहेरी स्वरू-पांत–या भाषेच्या दोन शैली व दोन लिपीसह–शिकून घ्यावी. म्हणजे उर्दू किंवा हिंदी यांपैकीं कोणी कोणत्याहि भाषेंत बोललें किंवा नागरी किंवा उर्दू यांपैकीं कोणत्याहि लिपींत कोणीं लिहिलें, तरी त्यांना नवख्यासारखें वाटणार नाहीं.

९. ते जें कांहीं नवें शिकतील त्या सर्वांचें त्यांनीं आपआपल्या मातृ-

भाषेंत भाषांतर करावें; आणि भोंवतालच्या खेड्यांतून आपल्या साप्ताहिक फेरीच्या वेळीं त्यांनीं त्याचा लोकांत प्रसार करावा.

१०. त्यांनीं कोणतीहि गोष्ट गुप्तपणें करूं नये; आपल्या सर्व व्यवहारांमध्यें त्यांचें वर्तन संशयातीत आणि उघडपणाचें असावें. त्यांनीं शुद्ध व संयमी जीवन घालवावें, सर्व भीतीचा त्याग करावा, त्यांनीं आपल्या दुर्बल सहाध्यायांचें संरक्षण करण्यास नेहमीं तत्पर असावें; आणि आपले प्राण धोक्यांत घालूनदेखील अहिंसक वर्तनानें दंगे शांत करण्याला तत्पर राहावें आणि स्वराज्याच्या शेवटच्या लढ्याचा प्रसंग येईल, तेव्हां त्यांनीं आपल्या संस्था सोडून देऊन, जरूर पडल्यास, आपल्या देशाच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ स्वतःचें बलिदान द्यावें.

११. आपल्याबरोबर शिकत असलेल्या विद्यार्थी–भगिनींशीं वागतांना त्यांचें वर्तन अत्यंत शुद्ध आणि सभ्यपणाचें असावें.

विद्यार्थ्यांसाठीं हा जो कार्यक्रम मीं आंखून दिला आहे,त्याची अंमलबजावणी करण्यासाठीं त्यांनीं पुरेसा वेळ काढला पाहिजे. ते पुष्कळ वेळ आळसांत फुकट घालवितात हें मला माहीत आहे. वेळेची कडक काटकसर केल्यास त्यांना पुष्कळ तास वांचवतां येतील. परंतु कोणाहि विद्यार्थ्यांवर फाजिल ताण पडावा अशी माझी इच्छा नाहीं. एवढ्यासाठीं सर्व देशप्रेमी विद्यार्थ्यांना मला असा सल्ला द्यावासा वाटतो कीं, त्यांनीं या कार्यक्रमाप्रीत्यर्थ एक वर्ष घालवावें; व तें एकाच वेळेला न घालवितां आपल्या अभ्यासाच्या समग्र कालांत थोडा थोडा वेळ करून घालवावें. अशा रीतीनें राष्ट्रकार्यास दिलेलें एक वर्ष फुकट गेलें नाहीं असें त्यांना दिसून येईल. त्यांच्या मानसिक, नैतिक आणि शारीरिक संपत्तींत या प्रयत्नामुळें भर पडेल आणि स्वतःच्या विद्यार्थीदशेंतहि स्वातंत्र्याच्या चळवळीला भरीव मदत केल्याचें त्यांना श्रेय मिळेल.

## सविनय कायदेभंगाचें स्थान

मी या पुस्तकेंत जागजागीं म्हटलेंच आहे कीं, या विधायक कार्यक्रमांत सबंध राष्ट्राचें सहकार्य मिळवितां आलें, तर शुद्ध अहिंसात्मक प्रयत्नाच्या द्वारां स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं सविनय कायदेभंगाची आवश्यकता अनिवार्य राहणार नाहीं. परन्तु असें सद्भाग्य राष्ट्रांना किंवा

व्यक्तींना क्वचितच लाभतें. एवढ्यासाठीं राष्ट्रव्यापी अहिंसात्मक प्रयत्नांत सविनय कायदेभंगाचें स्थान कोणतें आहे तें जाणणें आवश्यक आहे. सविनय कायदेभंगाचीं तीन निश्चित कार्यें आहेत:

१. एखाद्या स्थानिक अन्यायाच्या निवारणासाठीं त्याचा यशस्वीपणें प्रयोग करतां येतो.

२. एखाद्या विशिष्ट अन्यायाचें किंवा अनिष्टाचें निवारण करणें हा हेतु असला तरी, त्याच्या तसल्या परिणामाकडे लक्ष न देतां, त्या अन्यायाच्या किंवा अनिष्टाच्या बाबतींत स्थानिक लोकांच्या भावना किंवा सदसद्विवेकबुद्धीला जागृत करण्यासाठीं आत्मबलिदान म्हणून त्याचा प्रयोग करतां येतो. चंपारण्यांत मी जो सविनय कायदेभंग केला तो अशाच प्रकारचा होता. त्यावेळीं परिणामाकडे माझें बिलकुल लक्ष नव्हतें; एवढेंच नव्हे, तर लोकदेखील कदाचित् उदासीन राहतील असें मला पक्कें वाटत होतें. परंतु प्रत्यक्ष परिणाम वेगळाच घडला. त्याला आपआपल्या रुचीप्रमाणें परमेश्वराची कृपा किंवा सद्भाग्य मानावें.

३. विधायक कार्यक्रमामध्यें प्रजेकडून संपूर्ण सहकार्य मिळालें नाहीं तर त्याच्याऐवजीं १९४१ मध्यें जसा केला होता तसा कायदेभंग करतां येतो. तो जरी स्वातंत्र्याच्या लढ्याप्रीत्यर्थ केलेला व त्या लढ्याचाच एक अंश होता, तरी एका विशिष्ट मुद्यावर, म्हणजे भाषणस्वातंत्र्याच्या प्रश्नावर, बुद्धिपुरस्सर केंद्रित करण्यांत आला होता. सविनय कायदेभंगाचा प्रयोग एखाद्या मोघम वस्तूसाठीं–उदाहरणार्थ स्वातंत्र्यासाठीं–कधींहि करतां येणार नाहीं. ज्याच्यासाठीं सविनय कायदेभंग करावयाचा तो मुद्दा निश्चित, स्पष्ट समजण्याजोगा आणि प्रतिस्पर्ध्याला मान्य करतां येईल असा त्याच्या आटोक्यांतला असला पाहिजे. या पद्धतीचा प्रयोग योग्य तऱ्हेनें झाला, तर तिचें पर्यवसान अंतिम ध्येयाच्या प्राप्तींत झालेंच पाहिजे.

सविनय कायदेभंगाचें क्षेत्र किती विशाल आहे व त्यानें काय काय साधण्याजोगें आहे याचें मी येथें परीक्षण केलेलें नाहीं. विधायक कार्यक्रम आणि सविनय कायदेभंग यांचा परस्पर संबंध काय आहे, हें वाचकांस कळण्यास पुरें होईल, इतकें विवेचन मी येथें केलें आहे. वर सांगितलेल्या उदाहरणांपैकीं पहिल्या दोहोंच्या बाबतींत व्यापक विधायक कार्यक्रमांची आवश्यकता, त्याचप्रमाणें शक्यताहि, नव्हती परंतु स्वातंत्र्यप्राप्तीसाठींच

सविनय कायदेभंगाची प्रत्यक्ष योजना करावयाची असेल, तेव्हां पूर्व तयारीची आवश्यकता असते. त्याप्रमाणें जे लोक लढयांत गुंतले आहेत त्यांच्या दृश्य आणि ज्ञानपूर्वक केलेल्या प्रयत्नाचें त्याला पाठबळ मिळावयास पाहिजे. अशा तऱ्हेनें सविनय कायदेभंग हे लढवय्यांना उत्तेजित करणावें आणि प्रतिस्पर्ध्यांना आवाहन देणारें असतें. एवढयावरून वाचकाला स्पष्ट कळून आलें असेल कीं, स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं केलेल्या सविनय कायदेभंगांत विधायक कार्याच्या रूपानें कोटयवधि लोकांचें सहकार्य मिळालें; नाहीं तर तो कायदेभंग म्हणजे एक अविचारी साहसकर्मच ठरेल, आणि तो केवळ निरुपयोगी न होतां नुकसानकारकहि होईल.

## उपसंहार

हा कांहीं राष्ट्रीय महासभेच्या वतीनें किंवा तिच्या मुख्य कार्यालयाच्या सूचनेवरून लिहिलेला निबंध नाहीं, सेवाग्राम येथे कित्येक सहकाऱ्यांशीं झालेल्या चर्चेंतून या निबंधाची निर्मिति झालेली आहे. विधायक कार्यक्रम आणि सविनय कायदेभंग यांचा परस्पर संबंध काय आहे आणि विधायक कार्यक्रमाची अंमलबजावणी कशी करावी, हें दर्शविणाऱ्या माझ्या लेखणींतून उतरलेल्या एखाद्या लिखाणाची त्यांना आवश्यकता भासत होती. या छोटयाशा चौपडयाच्या द्वारां मी ती उणीव भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे. तो संपूर्ण आहे असें म्हणण्याचा माझा उद्देश नाहीं; परंतु या कार्यक्रमाची अंमलबजावणी कशी करतां येईल याचें पुरेसें सूचन यांतून मिळेल.

येथें सांगितलेल्या बाबीपैकी एखाद्या बाबींचा स्वातंत्र्याच्या चळवळीचा भाग म्हणून उल्लेख केलेला पाहून तिचा उपहास करण्याची चूक वाचकानें करूं नये. पुष्कळ लोक लहानमोठ्या अनेक गोष्टी, त्यांचा अहिंसेशीं किंवा स्वातंत्र्याशीं संबंध जोडल्याशिवाय, करीत असतात. त्यामुळें त्यांचें मूल्य मूळच्या अपेक्षेप्रमाणेंच मर्यादित असतें. एखादा इसम सामान्य नागरिक म्हणून आपल्यापुढें वावरला तर आपल्याला त्याचें कांहीं महत्त्व वाटत नाहीं; पण तोच मनुष्य जर सेनापति या नात्यानें पुढें आला तर तो मोठा मनुष्य म्हटला जातो आणि लाखों लोकांचे प्राण त्याच्या मर्जीवर अवलंबून असतात. त्याचप्रमाणें एखाद्या गरीब विधवेच्या हातांतील

सुताचा राहाट तिला एखादी क्षुद्र दिडकी मिळवून देतो; परंतु तोच राहाट जवाहरलालसारख्यांच्या हातांत असला म्हणजे हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याचें एक साधन बनतो. चरख्याला जी प्रतिष्ठा मिळाली आहे, ती त्याला जें कार्य आणि स्थान आपण नेमून दिलें आहे, त्यामुळें मिळालेली आहे. त्याचप्रमाणें विधायक कार्यक्रमाला जें कार्य व स्थान आपण नेमून दिलें आहे, त्यामुळेंच त्याला एवढी प्रतिष्ठा व अमोघ शक्ति प्राप्त झाली आहे.

निदान माझें तरी असें मत आहे. तें एखाद्या वेडचा माणसाचें मत असूं शकेल. जर हें मत कॉंग्रेसवाल्यांना पटलें नाहीं, तर त्यांनीं मला रज द्यावी. कारण विधायक कार्यक्रमावांचून मी कायदेभंगाचा लढा चालविणें, हें पक्षाघात झालेल्या हातानें चमचा उचलण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३०८ वि: निबंध
क्रमांक ९२२० नों: दि: २२।३।६०

## : ७ : अंतिम साधना

### अहिंसा

ता. ६ मे रोजीं कायदे-आझम जिनांशीं बोलतांना गांधीजींनी सांगितलें कीं ' हिंदुस्तान दुभंग करण्याचा विचारच मला सहन होत नाहीं आणि ती गोष्ट चुकीची आहे अशी जोंवर माझी खात्री आहे तोंवर मी माझी त्या गोष्टीला संमति कशी देऊं शकेन ? हिंदुस्तानची फाळणी ही हिंदूंनाच नव्हे तर मुसलमानांना सुद्धां हानिकारक आहे. ' ' हिंदुस्तान अभंग राहिला पाहिजे असें माझें दृढ मत आहे; इंग्रजांनी आपली सत्ता सोडून दिल्यानंतरच, आपण एकत्र राहायचें कीं विभक्त व्हायचें तें लोकांनीं आपापसांत ठरवायचें आहे.' ' हिंदुस्तान सोडून जाण्याची तयारी करायला आपल्याला इतके महिने लागतील हें ब्रिटिशांचें म्हणणें मला पटत नाहीं. त्या मुदतींत सर्व पक्ष ब्रिटिश मंत्रिमंडळाकडे आणि व्हाइसरॉयकडे आपले डोळे लावून बसतील. आपण ब्रिटिशांना शस्त्रांच्या बळावर पराभूत केलेलें नाहीं; नैतिक बळावर आपण त्यांना जिंकलें आहे. म्हणून ब्रिटिश सत्ता आणि ब्रिटिश फौज इतका काळ येथें राहणें हें उपकारक होण्याऐवजीं विघ्नरूपच होईल, कारण प्रत्येकजण मग मदतीकरितां तेवढा काळ ब्रिटिशांनीं निर्माण केलेल्या लष्करी यंत्रणेकडेंच पाहात राहील. बंगाल, बिहार, पंजाब आणि सरहद्द प्रांत याठिकाणीं असेंच घडलें. हिंदु आणि मुसलमान आपापल्या बाजूनें म्हणूं लागले. " ब्रिटिश लष्कर आम्हांला पाहिजे. " हें मानहानीचें दृश्य आहे...जातीजातींतल्या ज्या मारामाऱ्या येथें दिसत आहेत त्या ब्रिटिश येथें असल्यामुळें आहेत. ब्रिटिश जर येथें न राहातील, तर त्या अग्नीमधून आम्हांला जावें लागेल खरें, पण तो अग्नि आम्हांला अधिक शुद्ध करील." १

गांधीजींच्या चित्तांत ही आग पेटलेली होती. तरीहि ते आपली अवस्था स्थितप्रज्ञासारखी राखण्याचा एकसारखा प्रयत्न करीत होते. त्यांची ही साधना पूर्वीपासून सुरूंच होती, पण आतां तिला अधिक धार चढली होती. ‘ गीतेच्या दुसऱ्या अध्यायांच्या शेवटीं वर्णन केल्याप्रमाणें स्वत:वर स्वामित्व ठेवल्यानें जें सामर्थ्य लाभतें तें माझ्या शब्दांत नाहीं,ही माझी कमजोरी मला कबूल केली पाहिजे, त्याकरितां अवश्य असणारी तपश्चर्या माझ्यांत नाहीं.ईश्वरानें ती स्थितप्रज्ञ अवस्था मला द्यावी अशी माझी प्रार्थना आहे. ’ पराकाष्ठेचा प्रयत्न असूनहि त्यांची शांति ढळूं लागली होती. मधून मधून ते रागावत, पण पुढच्याच क्षणीं जागृत होऊन स्वत:ला संभाळीत. परिस्थितीचा ताण एवढा होता कीं खरोखर त्यांच्यासारखा कसलेला योगी असल्यामुळेंच मनाचा समतोलपणा शक्य तितका राखून परिस्थितीवर मात करण्याचा ते प्रयत्न करींत होते. पुढच्या एका घटनेवरून त्यांच्या मनाची अवस्था कळून येऊं शकते. २

नौआखलींतील परिस्थिति अधिक चिघळत चालली होती. मुसलमानांचे हिंदूंच्यावरील अत्याचार वाढत होते. गांधीजींनीं आपल्या निकटच्या सेवकांना तेथें निरनिराळ्या केंद्रांत ठेवलें होतें आणि दोन्ही जमातींत परस्पर-सौहार्द उत्पन्न करण्याचा आटोकाट प्रयत्न चालू होता. परंतु सुहरावर्दीचें मंत्रिमंडळ बंगालमध्यें सत्तारूढ होते आणि असे अनेक पुरावे मिळत होते कीं सरकारी यंत्रच या जातीय आगींत तेल ओतीत होतें, आणि कार्यकर्त्यांच्या मार्गांत अनेक अडचणी आणल्या जात होत्या. या सर्व हकीकती गांधीजींच्या कानावर घातल्या जात होत्या आणि गांधीजींचा सुहरावर्दीशीं त्याबाबतींत पत्रव्यवहारहि सुरूं होता. परंतु नौआखलींतील परिस्थितींत फरक पडण्याचें चिह्न नव्हतें. एकतर तेथील आपलें वास्तव्य आवरावें किंवा तेथील काम स्थानिक कार्यकर्त्यांच्या सुपूर्द करावें असे गांधीजींच्या सेवकांना वाटूं लागलें होतें. ३

अशा स्थितींत कलकत्त्याला जाऊन मुख्य मंत्री सुहरावर्दी यांना भेटणें गांधीजींना आवश्यक वाटलें. या सुमारास बंगालच्या मुस्लीम लीगनें (ज्यांत सुहरावर्दी हे प्रमुख होते) एक नवीनच योजना पुरस्कृत केली होती, आणि शरच्चंद्र बोस यांचाहि तिला पाठिंबा असल्याचें बोललें जात होतें.

हिंदुस्तानची फाळणी होतांना हिंदुस्तान, पाकिस्तान आणि संयुक्त सार्वभौम बंगाल असे तीन विभाग करावेत अशी ही योजना होती. गांधीजींनीं सायंकाळच्या प्रार्थनेनंतरच्या भाषणांत सांगितलें कीं " बंगालची विभागणी व्हावी कीं नाहीं हें बंगालच्या हिंदु-मुसलमान लोकांनीच ठरवायचें आहे; पण जर बंगालची फाळणी झालीच तर तिला बहुसंख्य मुसलमान कारणीभूत आहेत. विशेषत: सत्तेवर असलेलें मुस्लीम सरकार त्याला जबाबदार आहे, असें मी बिनदिक्कत म्हणेन. मी जर बंगालचा मुख्य मंत्री सुहरावर्दी असेन तर मी माझ्या हिंदु बांधवांना आर्जवपूर्वक मागचें सर्व विसरून जायला सांगेन. ' आपण दोघेहि बंगालचे संतान आहोंत, आपली भाषा, पूर्वापार चालत आलेली आपली संस्कृति दोघांची एक आहे आणि आपणां दोघांनाहि तिचा अभिमान आहे. बंगालची फाळणी व्हावी असा विचार मनांत येऊं देण्यापूर्वी माझ्या शरीराची फाळणी करा, ' असें मी हिंदूंना हात जोडून म्हणेन. बंगालविषयीं जर सुहरावर्दींना इतकें मनापासून प्रेम असेल तर त्यानें फत्तरासारखें हिंदूंचें अंत:करण असलें तरी तें विरघळेल. पण आज हिंदूंच्या मनावर भीतीचा आणि संशयाचा जबरदस्त पगडा बसला आहे. नौआखलींत आणि कलकत्त्यांत जें चाललें आहें तें मी विसरूं शकत नाहीं. बिहारच्या हिंदूंना आणि बंगालच्या मुसलमानांना मी सांगेन कीं तुम्ही तुमच्या अल्पसंख्य दुसऱ्या धर्मबांधवांच्या मनांतली भीति आणि शंका दूर करा."

सुहरावर्दी गांधीजींना भेटण्यासाठीं आले. त्यांनीं आपल्या ' नव्या बंगाल 'चें गोंडस चित्र त्यांच्यापुढें उभें केलें. पण गांधीजी त्यांना म्हणाले, ' भूतकाळ इतका अन्यायांनीं भरलेला असतांना लोकांना या नव्या सूचनेविषयीं विश्वास कसा वाटावा ? मागचे अन्याय तुम्हांला दूर करावे लागतील. ' सुहरावर्दींनीं आपल्या उत्तम कारभाराचें खूप समर्थन केलें.

परंतु त्यांच्या काळच्या कारभाराचे अनेक पुरावे गांधीजींच्या हातीं देण्यांत आले होते. तसें एक पत्र प्रो. निर्मलकुमार बसू यांनीं तेथेंच सुहरावर्दींच्या हातीं दिलें. त्यांत पोलिस अधिकारीच मुसलमान दंगेखोरांना कसें उत्तेजन देत आहेत हें सप्रमाण दाखविण्यांत आलें होतें. सुहरावर्दींनीं तो पुरावा मान्य केला. गांधीजींच्या परवानगीनें दुसरीहि एक भयंकर केस

त्यांनीं सुऱ्हावर्दीपुढें मांडली. प्रो. जदुनाथ सरकार ह्यांच्या मुलाचा खून करण्यांत आला होता आणि त्याला सात दिवस होऊन गेले होते तरी पोलिसांनीं त्याची दखलहि घेतली नव्हती.

"या घटनेच्या बाबतींत निरनिराळ्या बोलवा आहेत हें तुम्हांला माहीत आहे का? या खुनांत माझाहि हात असल्याचा एकानें आरोप केला आहे..." सुहरावर्दी निर्मलबाबूंना सांगूं लागले.

त्या दोघांचें हें बोलणें गांधीजी स्तब्ध राहून ऐकत होते. सुहरावर्दींचे हे उद्‌गार ऐकतांच ते मध्येंच एकदम बोलले, "हो, हो, त्या खुनालाच तुम्ही जबाबदार आहांत असें नाहीं तर बंगालमध्यें जी जी जीवहत्या झाली, मग ती हिंदूची असो कीं मुसलमानांची असो, त्या प्रत्येकीची जबाबदारी तुमच्यावर आहे."

सुहरावर्दीसाहेब एकदम दचकलेच असावेत, पण लगेच त्यांनीं गांधींना प्रत्युत्तर केलें, "मुळींच नाहीं, त्याला जबाबदार तुम्हीच आहांत, कारण तुम्हीच मुसलमानांना इन्साफ केलेला नाहीं."

गांधीजी भडकले; लोकांदेखत त्यांच्या मनाचा इतका तोल गेलेला क्वचितच कोणी पाहिला असेल. ते संतापून म्हणाले, "मूर्खासारखें कांहीं तरी बोलूं नका!" पण लगेच त्यांनीं स्वतःला आवरलें आणि ते शांत झाले. ४

सुहरावर्दी पुन: संयुक्त सार्वभौम बंगालबद्दल बोलण्याकरितां गांधीजीं-कडे आले. आपलें म्हणणें कोणीहि हिंदु विश्वासानें ऐकूनच घेत नाहीं अशी त्यांनी कबुली दिली. तेव्हां गांधीजींनी आपला सहकार्याचा हात पुढें करून खुल्या दिलानें एक सूचना त्यांच्यापुढें मांडली. ते म्हणाले, "मी तुमचा सेक्रेटरी म्हणून काम करतों; तुम्ही राहाल तेथेंच तुमच्या घरांत राहतों आणि हिंदू लोक निदान तुमचें म्हणणें तरी काय तें सबूरीनें ऐकून घेतील असा कसून प्रयत्न करतों. आहे तुमची तयारी?"

सुहरावर्दी कांहींच बोलले नाहींत. त्यांनीं त्यांचा निरोप घेतला. मोटरींत बसतां बसतां ते निर्मलबाबूंना म्हणाले, "काय ही वेडगळ सूचना! तिचा गूढार्थ कळून घ्यायला मला दहा वेळां विचार करावा लागेल."

निर्मलबाबूंनीं परत येऊन सुहरावर्दी जातां जातां जें बोललें तें गांधीजींना सांगितलें. गांधीजींनीं लगेच पुढील पत्र सुहरावर्दींना पाठविलें:—

" फाळणीसंबंधीं बंगालमधील परिस्थितीचा गंभीरपणा मला जाणवतो. तुमच्या मनांत जें आहे त्या बाबतींत तुम्हांला जर मनापासून आस्था असेल आणि तुमच्या बाबतींत माझ्या मनांत जे संशय आहेत ते सर्व जर तुम्ही दूर केलेत आणि बंगाल हा बंगाली लोकांकरितांच-मग ते हिंदू असोत कीं मुसलमान असोत-अहिंसक मार्गानीं कायम ठेवायचा असा तुमचा सतत प्रयत्न राहणार असेल तर मी तुमचा बिनपगारी खासगी चिटणीस म्हणून काम करायला अगदीं खुषीनें तयार आहें, आणि हिंदु व मुसलमान हे दोघे भाई भाई म्हणून पुन: राहूं लागेपर्यंत मी तुमच्याच घरांत राहायलाहि तयार आहें. " ८

शहीद सुहरावर्दीकडून या पत्राला उत्तर मिळालें नाहीं. पण काळाचा तडाखा जबरस्त असतो. हिंदुस्तानाबरोबरच बंगालची फाळणीहि निश्चित झाली. शहीद सुहरावर्दींचें मुस्लीम लीगमधील स्थान डळमळलें. दोन बंगालचे दोन मुख्य प्रधान वेगळे होणार हें निश्चित झाले.

यावेळीं कलकत्त्यांतील परिस्थिति, जी १९४६ पासून अत्यंत बिघडलेली होती, ती तशीच राहिली होती. लूट, मारामाऱ्या, आगी, स्त्रियांवर अत्याचार सुरूंच होते. हिंदू मुसलमानांच्या वस्तींत फिरूं शकत नव्हते, मुसलमान हिंदूंच्या वस्तींत पाय टाकूं शकत नव्हते. कलकत्ता शहरांत हिंदूंची वस्ती बहुसंख्य होती आणि म्हणून मुसलमान भयभीत झालेले होते.

यावेळीं गांधीजी कलकत्त्याला आले होते. नौआखलींतील परिस्थतीसुद्धां बिघडलेलीच होती, आणि म्हणून गांधींजीनी तिकडे जाण्याचें ठरविलें होतें. यावेळीं सुहरावर्दी कराचींत होते. कलकत्ता सोडून गांधीजी नौआखलींत जाणार हें समजतांच ते तांतडीनें त्यांना भेटण्यासाठीं आले आणि यावेळीं तरी त्यांनी कलकत्ता सोडून जाऊ नये, तेथें खरी शांतता प्रस्थापित होईपर्यन्त त्यांनीं तेथेंच राहावे अशी त्यांनीं त्यांना गळ घातली. गांधीजींनी पूर्वीचीच सूचना पुन: त्यांना केली. ' दंग्यांच्या भागांत आपण एकाच घरांत पोलिसांचें संरक्षण न घेतां एकत्र राहूं या, एकत्र लोकांना भेटूं या, त्यांना समजावून सांगूं या कीं फाळणी झालीच आहे तर आतां भांडणें सुरूं ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जर ही माझी सूचना तुम्हांला कबूल असली तर मी नौआखालीकडे माझें जाणें अनिश्चत काळापर्यन्त

लांवणीवर टाकून तुम्ही म्हणाल तितके दिवस येथें राहायला तयार आहें.'

परंतु या सूचनेचा एकदम स्वीकार सुहरावर्दींना करणें शक्य झालें नाहीं. नुकतीच तीन महिन्यांपूर्वीं ही सूचना त्यांनीं 'वेडगळपणाची' म्हणून धुडकावून लावली होती. यावेळीं त्यांनीं ती धुडकावून लावली नाहीं. एक रात्र आणि अर्धा दिवस त्यांनीं तिच्यावर विचार केला आणि शेवटीं गांधीजींच्या सूचनेचा मोकळ्या मनानें स्वीकार केला. यापुढें ते दोघे एकाच घरांत राहणार होते, जोडीनें फिरणार होते, एकमेकांपासून कांहींहि मनांत चोरून ठेवणार नव्हते. गांधीजींनीं हें जाहीर भाषणांत लोकांना सांगितलें आणि लोकांनीं आपल्या तक्रारी कोणालाहि न भितां आम्हां दोघांपुढें मांडाव्यात असें आवाहन केलें. 'मि गांधीं' चे 'प्रिय बापूजी' झाले, आणि 'मि. सुहरावर्दी' 'आपला प्रिय शहीद' बनले.' ६

## ब्रह्मचर्य

"...सत्याग्रही सेनापतीच्या शब्दांत शक्ति असली पाहिजे—असंख्य शस्त्रांस्त्रांमुळें येणारी शक्ति नव्हे, तर जीवनशुद्धि, अखंड जागरूकता आणि सतत ध्यास यांमुळें येणारी शक्ति. अशी शक्ति ब्रह्मचर्याच्या पालनाशिवाय लाभणें शक्य नाहीं. जीव निर्माण करण्याला कारणीभूत होणाऱ्या वीर्याचा संग्रह करणें आणि तें उन्नत मार्गाकडे लावणें यामध्यें सर्व शक्तीचा उगम आहे. ही वीर्यशक्ति पापी किंवा इतस्ततः भटकणाऱ्या, अस्ताव्यस्त, अनिष्ट अशा विचारांनीं सतत आणि नकळतसुद्धां क्षीण होत असते. आणि विचार हेंच वाणीचें आणि कृतीचें मूळ असल्यामुळें, वाणी आणि कृति ही विचारासारखीच बनते. म्हणून पूर्णपणें संयमांत असलेला विचार हीच एक फार मोठी बलवती शक्ति आहे आणि ती स्वयंप्रभावी आहे... मनुष्य हा जर ईश्वराची प्रतिकृति असेल, तर त्याला नेमून दिलेल्या मर्यादित क्षेत्रांत त्यानें एखाद्या गोष्टीची इच्छा करण्याचा अवकाश कीं ती घडतेच. अशी शक्ति आपलें वीर्य उधळून टाकणाऱ्याला प्राप्त होणें अशक्य आहे."

'ही शक्ति माझ्यांत कां नाहीं?' गांधीजींनीं स्वतःलाच प्रश्न केला. उत्तर आलें: 'अहिंसेच्या संशोधनाकरितां अवश्य असणारा विचार-

क्रियेवरील अंकुश मला मिळवितां आलेला नाहीं. माझ्यामधली अहिंसा जर सांसर्गिक आणि संक्रामक व्हायची असेल तर मला माझ्या विचारांवर अधिक ताबा ठेवतां आला पाहिजे. माझ्या नेतृत्वाला अपयश येत आहे याचें कारण माझ्या साधनेंत कुठें तरी उणीव असली पाहिजे. ७

ही उणीव म्हणजे आदर्श ब्रह्मचर्याच्या पालनांतील तर उणीव नसेल? सनातनी लोकांच्या व्याख्येप्रमाणें 'ब्रह्मचाऱ्यानें स्त्रीकडे कधीं पाहातां कामा नये, तिला स्पर्श तर मुळींच करतां कामा नये.' परंतु गांधीजींना ही व्याख्या मुळींच मान्य नव्हती. ८

" जे पुरुष स्त्रीला स्पर्श करण्यांत पाप मानतात, कारण त्या स्पर्शानें आपल्यांत विकार उत्पन्न होतील अशी त्यांना भीति वाटते, असे पुरुष ब्रह्मचारी असले तरी मी त्यांना ब्रह्मचारी मानीत नाहीं. दुसरी गोष्ट, मनुष्य म्हातारा झाला म्हणून कांहीं तो निर्विकारी झाला असें नाहीं. तो निर्विकारी अशामुळें आहे कीं त्याची शक्तीच म्हातारी झाली आहे, ब्रह्मचर्याच्या पालनानें कांहीं तो निर्विकारी झालेला नाहीं. आणि मन हें तर शेवटच्या श्वासापर्यंत म्हातारें होत नाहीं. परंतु मी मात्र अनेक प्रयोग केल्यानंतर आणि अनुभव घेतल्यानंतर असें निश्चितपणें सांगतों कीं सच्चा ब्रह्मचारी मीच आहे. ज्याला प्रत्येक स्त्री आई, बहीण किंवा मुलीप्रमाणें झाली तो त्यांच्या स्पर्शानें विकारी कसा बनेल ? त्याच्या समोर अप्सरे-सारख्या स्त्रिया येऊन उभ्या राहिल्या तरी काय झालें ! तरीहि माझें सांगणें आहे कीं माझा स्वतःबद्दलचा हा दावा खरा आहे कीं खोटा हें मृत्यूनंतरच सिद्ध होईल. मृत्यूच्या अगोदर तें सांगतां येणार नाहीं. कारण. क्षणांत मनुष्याच्या मनांत बदल होऊं शकतो. मन इतकें चंचल आहे. मी जर रोगानें आजारी पडून मेलों तर समजा कीं, मी या पृथ्वीवर एक दांभिक किंवा रावणासारखा राक्षस होतों. परंतु जर रामनाम घेत घेत मी गेलों तरच मला खरा ब्रह्मचारी, खरा महात्मा समजा." ९

गांधीजींची अहिंसेच्या साधनेची कसोटी ज्या परिस्थितीच्या उदरांतून हिंदुस्तानचें स्वातंत्र्य जन्माला आलें त्या परिस्थितींत अतिशय कडकपणें होऊं लागली होती. एका पत्रांत त्यांनीं लिहिलें आहे; '....प्यारेलाल वगैरे आपल्या कामांत मग्न आहेत. मृत्यूशीं खेळ चालला आहे....माझें

शरीर काम देत आहे, तरी माझी परीक्षा होत आहे. माझी अहिंसा आणि सत्य दोन्हीं मोतीं जोखण्याच्या ताजव्याहूनहि अधिक बारीक–म्हणजे ज्यांत केसाच्या शंभराव्या भागाचें सुद्धां वजन होऊं शकतें अशा–ताजव्यावर तोललीं जात आहेत. अहिंसा आणि सत्य अपूर्ण ठरणेंच शक्य नाहीं, परंतु मी जो त्यांचा प्रतिनिधि बनलों आहें, त्या माझी अपूर्णता सिद्ध व्हायची असेल तर भलें होवो. आणि जर ती सिद्ध झाली तर मला एवढी आशा अवश्य आहे कीं ईश्वर मला उचलून घेऊन जाईल आणि कोणा दुसऱ्या शरीरामार्फत हें काम करवून घेईल.... चि. मनूला तिचे वडील जयसुखलाल तिच्या इच्छेअनुसार माझ्याकडे सोडून गेले आहेत. ती माझ्यासोबत मृत्यूलासुद्धां आलिंगन द्यायला तयार होऊन आली आहे....' १०

" माझ्या जुन्या जीवनाचा एक अध्याय संपला आहे आणि आतां नवा सुरू होत आहे. एक धाडसी आणि अभूतपूर्व असा प्रयोग करण्याचा मी विचार करीत आहें, त्याची ' उष्णता फार प्रचंड असेल. ' ज्यांना हें समजलें आहे आणि जे आपापल्या स्थानीं राहून काम करायला तयार असतील, त्यांनींच माझ्याजवळ राहावें. "११

मनू गांधी ही गांधीजींची नात–पुतणी. ती त्यांना स्वतःच्या नातीसारखीच. लहानपणींच तिची आई निवर्तली होती. आगाखान पॅलेसमध्यें कस्तुरबा कैदेत असतांना त्यांनीं मनूला आपल्या सेवेकरितां बोलावून घेतलें होतें. मनू त्यावेळीं दुसऱ्या एका तुरुंगात होती. तेथून तिला आगाखान पॅलेसमध्यें आणण्यांत आलें. तिनें अद्भुत भक्तीनें बा ची सेवा केली, कस्तुरबांच्या रूपानें तिला आपली आई परत मिळाली. मृत्युशय्येवर असतांना बां नी तिला गांधीजींकडे सोपविलें. १२

मनूनें त्यासंबंधीं लिहिलें आहे: " आतां बा जवळ झोपायला कुठून मिळणार ? गेले कित्येक दिवस मी रात्रीं जवळ जवळ बांच्यापाशींच झोपत असें. आज एकटी पडले...मी रडत होते. रात्रीं दोन अडीच वाजतां बापूजी जागे झाले. मला आपल्याजवळ बोलावून अतिशय ममतेनें म्हणाले, ' बा नें तुझी माझ्यापाशीं पुष्कळ वेळां प्रशंसा केली होती. बा कुठें गेली नाहीं. तूं अशी रडत राहशील तर तुझें माझ्यापाशीं रोज गीता शिकणें व्यर्थच होईल. तुझ्याविषयीं बा ला फार फार आशा होती. तुझ्या

आईच्या जागीं बा तुला मिळाली, आणि बा च्या ऐवजीं आतां मी तुला आहे. तूं मला तुझी आई समज. आतां सकाळीं उठून पुष्कळ काम करावयाचें आहे. बा चें नांव घेऊन झोपून जा. तूं झोपलीस तर मलाहि झोप येईल.' बापूंच्याजवळ मला केव्हां झोप आली कळलेंच नाहीं." १३

अशा रीतीनें गांधीजी मनूची आई बनले. मनूच्या वडिलांनाहि त्यांनीं तसें सांगितलें.

मनू गांधी नौआखलीच्या धर्मयात्रेंत गांधीजींच्या बरोबर राहिली होती. आपल्या वचनाप्रमाणें गांधीजी तिची सर्वतोपरी आई बनले होते. ते तिच्या खाण्यापिण्याची, न्हाण्याधुण्याची, प्रकृतीची, तिच्या मानसिक विकासाची काळजी घेत होते, इतकेंच नव्हे तर केव्हां केव्हां तिची वेणी-फणीहि करीत होते. मुली आईपाशीं आपलें अंतःकरण मोकळें करतात. मनूला आपल्यापाशीं स्वतःचें मन उघडें करण्याचा कसलाहि संकोच वाटूं नये अशी आपली वागणूक ठेवण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता. मनूचें वय यावेळीं १९ वर्षांचें होतें, परंतु तिला लग्नाची बिलकुल ओढ नव्हती. हें वास्तविक तिच्या वयाच्या मुलीला एक प्रकारें अनैसर्गिकच होतें. त्याचें कारण काय? गांधीजी तें जाणून घेऊं इच्छीत होते. १४

मुलींचीं लग्नें सनातनी रूढीप्रमाणें त्या वयांत येतांच व्हावीत याच्या-विरुद्ध गांधीजी होते. मुलींना संपूर्ण स्वातंत्र्य असावें आणि त्यांना वाटलें तर त्यांनीं जन्मभर ब्रह्मचारिणीहि राहावें असें त्यांचें मत होतें. परंतु खोट्या लाजाळूपणानें मनांतील इच्छा दाबून ठेवणें हें ते वाईट समजत होते. या बाबतींत मनूच्या मनाची भूमिका काय आहे? आपण जर तिची आई आहों आणि तिलाहि तसें वाटतें तर त्या भावनेची येथें परीक्षा आहे. तिला आपलें मन आपल्यापाशीं मोकळें करण्याचा संकोच वाटणें म्हणजे आपल्या आईपणांत कमतरताच सिद्ध झाली, आणि याचबरोबर ती आपल्या स्वतःच्या ब्रह्मचर्याची, म्हणजे स्त्री–पुरुष–भेदाच्या अतीत झाल्याची, कसोटीच आहे असें त्यांनीं मानलें. मुलीचें मन जर पूर्ण निरागस असेल तर आपल्या आईजवळ झोपतांना तिला कसलीच अडचण वाटत नाहीं. मनू म्हणते तसें जर खरोखर तिचें मन नसेल, तर तें त्यायोगें आपल्याला समजेल. म्हणून ते तिला आपल्याच अंथरुणांत झोपवूं लागले. १५

या प्रयोगानें तिच्यांत आणि आपल्यांतहि जर कांहीं अशुद्धता असेल तर ती उघडकीला येईल. तशी अशुद्धता जर दोघांतहि नसेल तर रोजच्या रोज तिची सत्यप्रियता, धैर्य आणि सुज्ञपणा हीं वाढत गेली पाहिजेत. तिचें जीवन म्हणजे नियमित, सुव्यवस्थित आणि आत्मसंयमी जीवनाचा कित्ताच बनलें पाहिजे. तिच्यामध्यें आजपर्यंत नसलेली विचारक्रियेंतील स्पष्टता आणि भाषेंतील निश्चितपणा तिच्यांत आला पाहिजे, तिचें मन उत्साहयुक्त, दक्ष आणि नित्य ताजेतवानें राहिलें पाहिजे. तिची झोंप, शांत, निवांत आणि लहान मुलासारखी अगदीं स्वाभाविक असली पाहिजे. निश्चयांत निश्चलपणा आणि पक्केपणा आला पाहिजे आणि स्वभाव सम, शांत बनला पाहिजे. चेहेऱ्यावर नेहमीं प्रसन्नपणा असला पाहिजे. मनाला किंवा शरीराला थकवा येतां कामा नये, आजार येतां कामा नये. आणि सर्वांत महत्वाचें म्हणजे तिच्यांत आसक्तीची किंवा आपलपोटेपणाची भावना, मत्सर किंवा हेवा नसला पाहिजे, त्याऐवजीं कर्तव्याविषयीं शुद्ध एकनिष्ठ भक्तिभाव असला पाहिजे. १६

गाँधीजींच्या या पद्धतीला जसें निदानात्मक महत्व होतें तसेंच उपचारात्मकहि महत्त्व होतें. पूर्ण ब्रह्मचारी जो असेल तो स्वतः कामवासनेपासून किंवा स्त्री–पुरुष–जाणीवेपासून पूर्ण मुक्त असतो, इतकेंच नव्हे तर तो ज्या स्त्री-पुरुषांच्या संपर्कात येतो त्यांच्यांतहि तीच मानसिक अवस्था निर्माण करतो. आपल्यांत जर अवश्य ती शुद्धता असेल तर मनूमध्येंहि तिला माहीत नसलेलीहि जी कांहीं अल्पस्वल्प अशुद्धता उरली असेल ती नाहींशी होऊन ती उन्नत होईल. पूर्ण ब्रम्हचाऱ्याच्या सान्निध्यांत विकारमात्र पळून गेले पाहिजेत असें गांधीजींचें म्हणणें होतें. त्यांचें स्वतःचें जीवन या सिद्धान्ताचें साक्षात् दर्शन होतें. तरुण मुली आणि स्त्रिया मुक्त मनानें, भय किंवा लज्जा न बाळगतां, त्यांच्याशीं वागत, त्यांना आपल्या मनांतल्या गोष्टी सांगत, इतकेंच नव्हे तर कधी कधीं त्यांच्या अंथरुणांतहि विनासंकोच झोपत. १७

नौआखलीचा 'महायज्ञ' चालू असतांना गांधीजींची हीसुद्धां साधना चालू होती, नव्हे, त्या यज्ञाप्रीत्यर्थच ही साधना होती. हातीं

घेतलेल्या महान् कार्यांत गुंतलेले असतांना या गोष्टीकरितां वेळेची आणि मनाची उधळपट्टी तुम्हांला करवते तरी कशी, असें मित्रांनी त्यांना विचारलें. मनूशीं बोलतांना ते एकदां म्हणाले, "या मंडळींना वाटतें कीं माझ्या मोहग्रस्ततेचें हें लक्षण आहे. त्यांच्या अज्ञानाचें मला हंसूं येतें. त्यांना समजत नाहीं. तुझ्याकरितां खर्च होणारा माझा वेळ आणि शक्ति कारणीं लागत आहे असें मी मानतों. तुझी आई बनून हिंदुस्तानाच्या करोडो कन्यांपैकीं एक जरी मी तयार करूं शकलों, तरी त्यानें स्त्रीजातीची मी एक अद्वितीय सेवा केल्यासारखी होईल. पूर्ण ब्रह्मचारी झाल्यानेंच मनुष्य स्त्रीची सेवा करूं शकतो." १८

गांधीजींनीं स्वतः ब्रह्मचर्याचें व्रत १९०६ सालींच घेतलें होतें व तें आयुष्यभर त्यांनीं धर्मबुद्धीनें पाळलें. विवाहित ब्रह्मचर्याचा त्यांनीं घालून दिलेला आदर्श सनातनी समजुतींहून क्रांतिकारी होता. "विवाह करणें हें पाप नाहीं, परंतु आजकाल आम्ही त्याला पापाचें साधन बनविलें आहे. विवाह करण्याचा अर्थ हा आहे कीं स्त्री आणि पुरुष दोघांनीं एकत्र येऊन जगाचें जें जीवनचक्र सुरू आहे तें चालू ठेवण्यांत, म्हणजेच जगाचें दुःख दूर करण्यांत, सहाय्यक व्हावें. विषयवासनेचें पोषण करणें, पुष्कळ मुलांना जन्म देणें, तीं वाटेल तिकडे भटकत राहिलीं तरी त्यांच्याकडे लक्ष न पुरविणें, पति-पत्नींनीं आपसांत झगडत राहणें, एकमेकांवर संतापत राहणें आणि दोघांचींहि शरीरें नाजूक होणें, हा विवाहाचा अर्थ नाहीं. म्हणून विवाह करण्यापूर्वीं मी सर्व मुलींना अगोदर पूर्ण विचार करायला सांगतों. विवाह झाल्यानंतर ब्रह्मचर्याचें पालन करणें कठीण जातें. ब्रह्मचर्याचें पालन करून दोघेहि जर विचारपूर्वक जीवन घालवूं लागतील तर ते किती उन्नत होतील ! मी इतका चढलों तो कांहीं बॅरिस्टर झालों म्हणून नाहीं चढलों, किंवा बाचीसुद्धां आज इतकी पूजा होते ती माझी पत्नी होती म्हणून होत नाहीं; तर आम्ही दोघांनी ब्रह्मचर्याचें पालन केलें हें त्याचें कारण आहे. त्यांतसुद्धां बा जर दृढ राहिली नसती तरीहि आम्ही इतके चढूं शकलों नसतों. लोकांनीं मला जें महात्मापद दिलें आहे त्याचें सारें श्रेय बा ला आहे. ब्रह्मचर्याचें पालन करणें म्हणजे निर्विकार होणें. जो निर्विकार झाला त्याच्यांत क्रोध, मोह, असत्य, हिंसा, खोटेपणा, परिग्रह वगैरे असूंच शकत

नाहीं. नव्हे, मी म्हणेन अशा माणसांत हे अवगुण प्रवेशच करूं शकत नाहींत. ह्या सर्वांबरोबर जर त्याच्या मनांत राम रमत असला तर तो कधीं आजारी पडणार नाहीं, इतकेंच काय, त्याला फोडसुद्धां व्हायचा नाहीं, आणि हंसत हंसत रामाचें नांव घेत तो मित्राप्रमाणें मृत्यूला भेटेल.'' १९

हा ब्रह्मचर्याचा आदर्श ते स्वत:मध्यें आणि इतरांमध्यें उभा करूं इच्छीत होते. परंतु त्यांच्या या प्रयोगाचा त्यांच्या आजूबाजूच्या सेवकांना, मित्रांना आणि सहकाऱ्यांनाहि धोका जाणवूं लागला. कित्येकांना गांधीजींच्या-विषयीं नाहीं तरी मनूविषयीं चिंता वाटूं लागली, किशोरलालभाईसारखे सूक्ष्मदर्शी सहकारीसुद्धां असहकार करून दूर झाले. गांधीजींना अर्थात्‌च त्याचें अतिशय दु:ख झालें, परंतु तरीहि त्यांनीं आपला आत्मपरीक्षणाचा प्रयोग सोडला नाहीं.

अर्थात् गांधीजींचा हा प्रयोग अगदीं उघडा होता. ते झोपत असत उघड्यावर, आकाशाखालीं. ह्या प्रयोगांसंबंधीं संबंधित लोकांत आणि आजूबाजूला कानगोष्टी, गुप्त चर्चा होऊं लागल्या. तेव्हां गांधीजींनीं स्वत: त्यासंबंधीं ' हरिजन ' मध्यें लिहिलें, जाहीर सभेमध्येंहि त्यासंबंधीं सांगून लोकांना विश्वासांत घेतलें. ' मी सुरूं केलेल्या यज्ञाचा हा प्रयोग हें एक अभिन्न अंग आहे, या प्रयत्नांत तुमचे मला आशीर्वाद मिळूं देत. ' २०

अर्थात् आपल्या खाजगी जीवनाविषयीं जें त्यांनीं सांगितलें, त्याचें कोणी अंध अनुकरण करूं नये अशी त्यांनीं एका प्रार्थनासभेंत सावधगिरीची सूचनाहि दिली. ' माझ्यांत कांहीं अतिमानुष शक्ति आहेत असें नाहीं. मी जें करतों तें सर्वांनीं करण्याकरितां आहे, पण त्यासाठीं मी पाळीत असलेलीं पथ्यें त्यांनीं पाळलीं पाहिजेत. तीं जर पाळलीं नाहींत तर माझ्या कृतीचें अनुकरण करणाऱ्या ढोंगी लोकांचा अध:पात झाल्यावांचून राहणार नाहीं. मी जें करीत आहे तें धोक्याचें आहे यांत शंका नाहीं, पण जर मी सांगितलेल्या शर्ती कडकपणें पाळल्या गेल्या तर त्यांत धोका राहात नाहीं. ' २१

ठक्करबापांनीं विचारलें, " हा तुमचा प्रयोग इथे यावेळीं का ? "

त्यांना समजावून देण्याच्या ओघांत गांधीजी म्हणाले, " हा प्रयोग नाहीं, माझ्या यज्ञाचे हें अभिन्न अंग आहे. प्रयोग सोडून देतां येतो, धर्म सोडून देतां येत नाहीं, मग लोकमत किती का त्याविरुद्ध जाईना. मी

आत्मशुद्धि मिळविण्याच्या प्रयत्नांत आहें. पंच यम हे माझ्या जीवनाचे आधारस्तंभ आहेत. ब्रह्मचर्य हा त्यांतला एक आहे आणि ते सर्व परस्परावलंबी आहेत. त्यांतला एक जर मोडून पडला तर सारे मोडून पडले समजा. असें असल्यामुळें ब्रह्मचर्याच्या बाबतींत जर मी चालढकल करीत वागायचें म्हटलें तर त्यानें माझ्या ब्रह्मचर्याची धारच बोथट नाहीं का होऊन जाणार? आणि त्यामुळें माझ्या सत्याच्या आचारांत भ्रष्टता नाहीं का येणार? नौआखलींत आल्यापासून मी स्वतःला विचारीत आहे कीं ‘माझ्या अहिंसेचा प्रभाव गुदमरत आहे तो कशामुळें? अहिंसेच्या जादूचा परिणाम कां होत नाहीं? ब्रह्मचर्याच्या बाबतींत मी चालढकल करीत असल्यामुळें तर असें होत नाहीं? जर ही कसोटी होणें अवश्यच असेल तर मी त्यापासून पळून जाणें योग्य होईल काय? या विचारानें माझ्या मनाचा निश्चय झाला. ज्या ईश्वराच्या एकाकी मार्गावर मीं पाऊल ठेवलें आहे, त्या मार्गावर मला ऐहिक सोबत्यांची गरज नाहीं. त्यांना माझा खुशाल पतित म्हणून धिक्कार करूं द्या. माझा महात्मा म्हणून आदर करणाऱ्यांचे डोळे उघडतील. हजारों हिंदू आणि मुसलमान स्त्रिया माझ्याकडे येतात, त्या मला माझ्या आया–बहिणी–मुलीसारख्या आहेत. पण जर कधीं त्यांच्यापैकीं कोणाला माझ्या अंथरुणांत घेऊन झोपण्याचा प्रसंग निर्माण झाला तर मी त्याला कांकूं करणार नाहीं, कारण मी ब्रह्मचारी आहें असा माझा दावा आहे. त्या कसोटीला मी जर माघार घेतली तर मी भ्याड आणि लफंगा ठरेन.”

‘ठक्करबापा सहा दिवस गांधीजींच्याजवळ राहिले होते. जातांना ते मनूला सांगून गेले कीं, पहिल्या प्रथम माझ्या मनांत जरी शंका उत्पन्न झाल्या होत्या, तरी सहा दिवसांच्या निकट संगतीनें गांधीजी करीत असलेल्या आचारांत कांहीं अधर्म किंवा अयोग्य आहे असें मला वाटत नाहीं.’ २२

● ● ●

## : ८ : प्रेरक विचार

उद्यांचें जग हा अहिंसेवर अधिष्ठित असा समाज होणार, झाला पाहिजे. तें एक दूरचें ध्येय, एक अव्यावहारिक मनोराज्य वाटेल. परंतु तें मुळींच अशक्य नाहीं. कारण तें इथें आणि ह्या क्षणापासून अंमलांत आणतां येतें. त्या भावी, अहिंसक, जीवनपद्धतीचा अंगीकार दुसऱ्याची वाट पहावी न लागतां एका व्यक्तीला करणें शक्य आहे. आणि एका व्यक्तीला जर तें शक्य आहे तर समग्र व्यक्तिसमूहांना, समग्र राष्ट्रांना नाहीं? आपलें उद्दिष्ट आपल्याला पूर्णपणें सिद्धीस नेणें शक्य नाहीं असें वाटून पुष्कळदां मनुष्य आरंभच करायला कचरतो. आपल्या प्रगतीच्या मार्गांतील सर्वांत मोठी धोंड नेमकी हीच मनोवृत्ति आहे आणि प्रत्येकानें जर नुसतें मनावर घेतलें तर ती तो दूर करूं शकतो.

अहिंसक पद्धतीवर समाजाची रचना करणें वा तो चालवणें शक्य नाहीं असें म्हणण्याची सध्यां चाल पडली आहे. पण या मुद्द्यावर माझें भांडण आहे. कुटुंबांत बाप जेव्हां आपल्या अपराधी मुलाला चपराक लगावतो तेव्हां मुलगा उलट हात उगारायचें मनांत आणीत नाहीं. मुलगा बापाची आज्ञा पाळतो ती चपराकीच्या निवारक परिणामामुळें नव्हे तर त्या माराच्या मुळाशीं असलेलें बापाचें प्रेम मुलाला कळत असतें आणि तें आपण दुखावलें असें त्याला वाटत असतें म्हणून होय. समाजाचें नियमन ज्या पद्धतीनें होतें वा व्हायला पाहिजे तिचें हें तात्पर्य होय. जें कुटुंबाच्या बाबतींत सत्य आहे तेंच समाजाच्या बाबतींतहि सत्य असलें पाहिजे. कारण समाज म्हणजे एक विशाल कुटुंबच होय. १

विनाशाचीं यंत्रें ज्यांच्या ताब्यांत आहेत ते मनुष्य जातीचे मान्य

नेते जर त्यांचा उपयोग करण्याचें पूर्णपणें सोडून देतील, अर्थात् तसें करण्याचा पूर्ण अर्थ लक्षांत घेऊन सोडून देतील, तर कायमची शांति प्राप्त करून घेणें शक्य आहे. सर्व अनर्थांचें मूळ, माझ्या मतें, जित्या जागत्या ईश्वरावर जिवंत श्रद्धा नसणें हेंच आहे.

या पृथ्वीवरील अनेक देशचे लोक जे येशूला 'शांतीचा युवराज' म्हणून वर्णितात आणि ज्याच्या उपदेशावर आपली श्रद्धा असल्याचें अभिमानानें सांगतात ते प्रत्यक्ष आचरणांत मात्र त्या श्रद्धेचा लवलेशहि दाखवीत नाहींत हें मनुष्यजातीचें परम दुर्भाग्य होय. कळकळीचे ख्रिस्ती धर्म-गुरु देखील येशूच्या उपदेशाचें क्षेत्र कांहीं निवडक व्यक्तींपुरतेंच मर्यादित करतात हें पाहून खरोखर दुःख होतें.

मनुष्य जातीचे मूलभूत सद्गुण निकृष्टतम माणसाला देखील अंगीं बाणवून घेणें शक्य आहे असें मला लहानपणापासून शिकविण्यांत आलें आहे आणि त्याची सत्यता मला आपल्या अनुभवावरून दिसून आली आहे. ही जी निःसंदिग्ध सार्वत्रिक शक्यता तेंच मानवाचें मानवेतर ईश्वरी सृष्टीहून वैशिष्टच आहे. असा परमोच्च त्याग जर एकाहि राष्ट्रानें कसलीहि अट न घालतां केला तर आपल्यापैकीं पुष्कळांना आपल्या हयातींतच पृथ्वीवर दृश्य शांति स्थापन झाल्याचें दिसून येईल. २

मी कांहीं आदर्शाच्या कल्पना-तरंगांत रमणारा नव्हें. माझा दावा मी एक व्यवहारकुशल आदर्शवादी असल्याचा आहे. अहिंसाधर्म हा कांहीं केवळ ऋषिमुनींसाठीं कल्पिलेला नाहीं: तितकाच तो सामान्य माणसाठींहि आहे. हिंसा हा जसा पशु-जातीचा धर्म आहे तसा अहिंसा हा आपला मनुष्य-जातीचा धर्म आहे. पशूमध्यें आत्मतत्त्व सुप्त असतें आणि शारीरिक बळावेगळा दुसरा धर्म तो जाणतच नाहीं. मानवाची प्रतिष्ठा त्याच्यापासून उच्चतर धर्मानुवर्तित्वाची, आत्मबलानुसारित्वाची अपेक्षा करते.

म्हणून मी हिंदुस्थानला तपाचा वा आत्मक्लेशाचा प्राचीन धर्म सादर करण्याचें धाष्टर्च केलें आहे. कारण सत्याग्रह आणि तदुत्थ असहकार व सविनय प्रतिकार हें दुसरें कांहीं नसून तपोधर्माचीं वा स्वतः कष्ट सहन करण्याच्या धर्माचीं दुसरीं नांवें मात्र होत. सार्वत्रिक हिंसेमध्यें अहिंसेचा धर्म शोधून काढणारे ऋषिमुनि हे न्यूटनहून मोठे प्रतिभावंत होते. ते स्वतः

वेलिंग्टनहून मोठे योद्धे होते. ते धनुर्विद्यापारंगत असल्यामुळें शस्त्रास्त्रांचें वैयर्थ्य त्यांनीं ओळखलें आणि त्रस्त जगाला त्यांनीं शिकविलें कीं त्याची सुटका व्हायची ती हिंसेच्या द्वारां नव्हे तर अहिंसेच्या द्वारांच होय.

आणि म्हणून हिंदुस्थाननें अहिंसा धर्माचा आचार करावा असें जें मी प्रतिपादितों आहें तें तो दुर्बळ आहे म्हणून नव्हे. त्यानें आपल्या शक्तीचीं व सामर्थ्याची जाणीव ठेवून अहिंसेचें आचरण करावें अशी माझी अपेक्षा आहे. आपल्या सामर्थ्याच्या प्रतीतीसाठीं त्याला कसल्याहि शस्त्रास्त्रांच्या शिक्षणाची गरज नाहीं. त्याची गरज आहे असें जें आपल्याला भासतें त्याचें कारण आपण म्हणजे केवळ मासाचा गोळा अशीच जणूं आपण कल्पना करतों हें होय. आत्म्याचा नाश कधींहि होऊं शकत नाहीं, तो समस्त शारीरिक दुर्बलतांवर मात करून विजयी होऊं शकतो आणि समस्त जगाच्या एकवटलेल्या भौतिक सामर्थ्याला तोंड देऊं शकतो. हा असा आत्मा आपल्या ठायीं आहे हें हिंदुस्थाननें ओळखावें अशी माझी अपेक्षा आहे. राम केवळ एक मनुष्य आपल्या वानरसेनेसह समुद्राच्या कल्लोळांनीं परिवेष्टित आणि म्हणून सुरक्षित मानलेल्या लंकेंत राहणाऱ्या दशमुख रावणाच्या मस्तवाल सत्तेला तोंड देतो याचा अर्थ काय ? आत्मबळाचा शारीरिक सामर्थ्यावर विजय असाच त्याचा अर्थ होत नाहीं का ? हिंदुस्थाननें तरवारीचा सिद्धांत स्वीकारला तर त्याला तात्कालिक वा क्षणिक विजय मिळूं शकेल. परंतु मग हिंदुस्थान जो माझ्या हृदयाचें गौरवस्थान आहे तो तसा राहणार नाहीं. मी हिंदुस्थानला वरलेलों आहें. कारण माझ्याजवळ जें कांहीं आहे त्या सर्वांबद्दल मी त्याचाच ऋणी आहें. माझा असा दृढ विश्वास आहे कीं जगांत करावयाचें विशिष्ट कार्य देवानें त्याला सोंपविलेलें आहे. युरोपचें अंधाअनुकरण करण्यासाठीं त्याचा जन्म नाहीं. हिंदुस्थान शस्त्रग्रहण करील तो क्षण माझ्या कसोटीचा असेल. त्या कसोटीवर मी उणा वा कच्चा शाबीत होणार नाहीं. अशी मला आशा आहे. माझ्या धर्माला भौगोलिक मर्यादा नाहींत. त्यावर माझी जिवंत श्रद्धा असेल तर ती माझ्या हिंदुस्थानवरील प्रेमाचाहि अतिक्रम करील. माझें जीवत अहिंसाधर्माच्या द्वारां हिंदुस्थानच्या सेवेला वाहिलें आहे. आणि अहिंसा हेंच हिंदुधर्माचें मूळ होय अशी माझी श्रद्धा आहे. ३

मनुष्याच्या प्रवृत्तीचें समग्र क्षेत्र ही एक अविभाज्य अशी पूर्ण वस्तु आहे, ती एक बंदी वस्तु आहे. तुम्हांला त्याचे केवळ सामाजिक, केवळ आर्थिक, केवळ राजकीय आणि केवळ धार्मिक असे हवाबंद कप्पे पाडतां येणार नाहींत. मानवी प्रवृत्तिव्यतिरिक्त कुठलाहि धर्म मला ठाऊक नाहीं. धर्म हा इतर सर्व प्रवृत्तींना नैतिक अधिष्ठान देतो. त्याच्याशिवाय त्या निरधिष्ठान होतील आणि जीवन म्हणजे अर्थहीन गोंगाट आणि गडबड यांचा नुसता एक गुंता होऊन बसेल. ४

सत्य आणि अहिंसा ही आम्ही केवळ एक वैयक्तिक आचरणाची बाब करतां कामा नये, तर ती आपल्याला समूह, समाज आणि राष्ट्रें यांच्या आचरणाची बाब करावयाची आहे. निदान तें माझें एक स्वप्न आहे. तें प्रत्यक्षांत आणण्याचा प्रयत्न करीत मी जगेन आणि मरेन. रोजच्या-रोज नवनवीन सत्यें शोधून काढायला माझी श्रद्धा मला बळ देते. अहिंसा हा आत्म्याचा गुण आहे म्हणून तो प्रत्येकानें आणि जीवनाच्या प्रत्येक गोष्टींत आचरावयाचा आहे. तो जर सर्व क्षेत्रांत आचरतां येत नसेल तर त्याची व्यावहारिक किंमत शून्य होय. ५

माझें घर चोहोंबाजूंनीं कोटबंद आणि खिडक्या लावलेल्या असाव्या अशी माझी इच्छा नाहीं. देशोदेशींच्या संस्कृतींचे वारे माझ्या घरावरून स्वच्छंद वहावेत अशी माझी इच्छा आहे. परंतु त्यांत वाहून वा उडून जाण्याचा मी इनकार करतों. मी अन्य लोकांच्या घरांत आगंतुकासारखा, भिकाऱ्यासारखा वा गुलामासारखा राहूं इच्छीत नाहीं. माझा धर्म हा बंदीखान्यासारखा नाहीं. ईश्वराच्या सृष्टींतील लहानाहूनलहान जीवाला त्यांत स्थान आहे, परंतु वंश, धर्म, संप्रदाय वा रंग यांच्या अभिमानाला, उद्दामपणाला त्यांत थारा नाहीं. ६

प्रार्थना हें माझ्या जीवनाचें तारक तत्त्व आहे. ती नसती तर मी कधींचाच पागल झालों असतों. आयुष्यांत सार्वजनिक आणि खासगी अत्यंत कडू अनुभव मला पुरेसे आले आहेत, हें माझ्या आत्मकथेवरून तुम्हांला कळेल. त्यांनीं मला क्षणभर निराशेंत लोटून दिलें होतें आणि तींतून मी जी आपली सुटका करून घेऊं शकलों ती प्रार्थनेमुळेंच होय. आतां सत्य हें जसें माझ्या जीवनाचें अंग बनलें होतें, तशी कांहीं प्रार्थना नव्हती. निव्वळ

मराठी ... अनुक्रम २६३०८ वि: १८३ निबं
क्रमांक १२७० नों: दि: २२।३।६०

गरजेंतून ती आली. माझी अशी गत झाली होती कीं, तिच्यावांचून मला समाधान मिळूंच शकलें नसतें. आणि जसजशी ईश्वरावरील माझी श्रद्धा वाढत गेली तसतशी प्रार्थनेची आतुरताहि अनिवार होत गेली. तिच्याशिवाय ज़ीवन नीरस आणि शून्य वाटूं लागलें. दक्षिण आफ्रिकेंत ख्रिस्ती उपासनेला मी हजर राहत असें; परंतु ती माझ्या मनाची पकड घेऊं शकली नाहीं. प्रार्थनेंत त्यांच्याशीं मी मिसळूं शकलों नाहीं. ते ईश्वरापाशीं मागणें मागत; परंतु मला तें जमेना. मी तिऱ्हाइतासारखा राहीं. ईश्वर आणि प्रार्थना यांविषयींच्या अश्रद्धेपासून नास्तिकतेपासून मी सुरुवात केली आणि आयुष्यांत बऱ्याच काळानंतर शेवटीं मला जीवनांत शून्यता अशी वाटेनाशी झाली. पण त्या भूमिकेवर शरीराला जसें अन्न तसें आत्म्याला प्रार्थना अपरिहार्य वाटूं लागली. वस्तुतः शरीराला अन्नाची तितकी गरज नाहीं, जितकी प्रार्थनेची आत्म्याला आहे. कारण पुष्कळदां शारीरिक स्वास्थ्यासाठीं अनशन वा उपवास आवश्यक असतो; परंतु प्रार्थनेचा उपवास म्हणून कांहीं वस्तु नाहीं...राजकीय क्षितिजावर धडधडीत निराशाच मजकडे रोखून पहात असतांनाहि माझी मानसिक शांति कधीं ढळली नाहीं. खरें म्हणजे माझ्या शांतीचा हेवा करणारे लोक मीं पाहिले आहेत. ती शांति प्रार्थनेपासून येते हें मी तुम्हांला सांगूं इच्छितों. ७

प्रार्थना म्हणजे धर्माचा साक्षात् प्राण आणि सारच होय असें मी मानतों. आणि म्हणून प्रार्थना ही मनुष्याच्या जीवनाचा जिव्हाळा व्हायला पाहिजे.

म्हणून आपला दिवस प्रार्थनेनें सुरू करा आणि ती इतकी प्राणवान् करा कीं संध्याकाळपर्यंत ती तुम्हांला सोडणार नाहीं. आणि प्रार्थनेनेंच दिवसाची समाप्ति करा म्हणजे रात्र तुमची स्वप्न व स्वप्नभय यांपासून मुक्त अशी शांतींत जाईल. प्रार्थनेच्या स्वरूपाबाबत चिंता करूं नका. तें कसेंहि असो. परमात्म्याशीं आपला संवाद घडवून आणील असें तें असावें. मुखांतून प्रार्थनेचे शब्द बाहेर पडत असतांना मन तेवढें भटकूं देऊं नका.

दररोज सकाळीं त्या दिवसासाठीं पुढीलप्रमाणें संकल्प करणें हें आपलें पहिलें काम असावें.

जगांतील कुणालाहि मी भिणार नाहीं.

एक ईश्वराचें भय बाळगीन.

कुणाचाहि मी द्वेष करणार नाहीं.

कुणाचाहि अन्याय मी सहन करणार नाहीं.

असत्याला मी सत्यानें जिंकीन.

आणि असत्याचा प्रतिकार करतांना सर्व कष्ट मी सहन करीन. ८

आपण सर्वजण समान विचार कधीं करणार नाहीं आणि सत्यहि आपण सर्वदा अंशत: आणि भिन्न दृष्टिकोणांतूनच पाहणार हें लक्षांत घेतां परस्परांविषयीं सहिष्णुवृत्ति बाळगणें हाच वागणुकीचा सुवर्ण नियम होय. प्रत्येकाची सदसद्‌विवेकबुद्धि ही समान नसते. त्यामुळें वैयक्तिक आचरणाचें मार्गदर्शक तत्त्व म्हणून जरी ती योग्य असली तरी आपलें वैयक्तिक आचरण सर्वांवर लादणें म्हणजे सदसद्‌विवेकबुद्धीच्या प्रत्येकाच्या स्वातंत्र्यांत असह्य ढवळाढवळ करणेंच होय. अत्यंत प्रामाणिक माणसांमध्येंदेखील प्रामाणिक मतभेदाला भरपूर वाव राहील. म्हणून कोणत्याहि सभ्य समाजांत वागणुकीचा एकमात्र संभवनीय नियम म्हणजे परस्परांविषयीं सहिष्णुता हा होय. ९

श्रद्धा हें असें नाजुक फूल नाहीं कीं थोडेसेंहि वादळी वारें आलें कीं तें झडून जाईल. श्रद्धा ही हिमालय पर्वतासारखी आहे. तो कधीं ढळायचा नाहीं. हिमालयाला कोणतेंहि वादळ त्याच्या पायापासून उखडून टाकूं शकणार नाहीं. ईश्वर आणि धर्म यांच्या ठायीं तशी श्रद्धा तुमच्यापैकीं प्रत्येकानें संपादन केली पाहिजे, असें मी इच्छितों.

खवळलेल्या सागरांतून श्रद्धाच माणसाला सुरक्षित बचावून नेते. ती श्रद्धा, जी पर्वताला हलवते आणि समुद्राला एका उडींत ओलांडते. ती श्रद्धा म्हणजे हृदयस्थ परमात्म्याचें जितें आणि जागतें भान याहून वेगळें कांहीं नाहीं. ती श्रद्धा ज्यानें संपादन केली त्याला मग कशाची गरज राहत नाहीं. शरीरानें तो व्याधिग्रस्त असला तरी तो आत्म्यानें निरोगी असतो. भौतिक दृष्टीनें तो दरिद्री असला तरी तो आध्यात्मिक संपत्तींत लोळत असतो. १०

जीवनाच्या समरांत तर्कबुद्धि आपल्याला अमुक एका मजलीपर्यंत घेऊन जाते; परंतु ऐन मोक्याच्या वेळीं ती आपल्याला मधेंच सोडून देते, धोका देते. श्रद्धा तर्कांच्या अतीत आहे. जेव्हां क्षितिज काळें कुट्ट होऊन

जातें आणि आपली मानवी बुद्धि चारीमुंडे चीत होते तेव्हां श्रद्धा आपल्या सोळा कलांनीं प्रकाशते आणि आपल्या सोडवणुकीला धांवून येते. ह्या असल्या श्रद्धेची आपल्या तरुण वर्गाला आवश्यकता आहे. आणि जेव्हां मनुष्य आपला बुद्धीचा सर्व गर्व सोडून ईश्वरी शक्तीला सर्व भावें शरण जातो तेव्हांच ती प्राप्त होते. ११

चरख्यावरील माझी श्रद्धा दिवसेंदिवस वाढत आहे. आणि चरख्याचा सूर्यच इतर ग्रामोद्योगांच्या उपग्रहांना प्रकाशित करूं शकेल हें मला अधिकाधिक स्पष्ट दिसत आहे. पण आणखी एक पाऊल पुढें जाऊन मी म्हणतों कीं ज्याप्रमाणें विशाल सूर्यमालेंत आपण नवनवे तारे आणि गृह शोधीत जातों त्याप्रमाणें रोज आपण नवनवे हस्तोद्योग वा ग्रामोद्योग शोधीत गेलें पाहिजे. परंतु ह्यासाठीं चरख्याला आपण खराखुरा जीवन-दायी सूर्य बनविलें पाहिजे. १२

मी तुम्हांला एक ताईत वा तोडगा देतों. जेव्हां जेव्हां तुम्ही संशयांत पडाल किंवा जेव्हां तुम्हांला स्वार्थ ग्रासून टाकील तेव्हां तुम्ही पुढें दिलेला उपाय करून पहा.

तुमच्या पाहण्यांत आलेल्या एखाद्या अत्यंत दरिद्र आणि असहाय अशा माणसाचा चेहरा डोळ्यांसमोर आणा. आणि तुम्ही करायचें योजिलेलें काम त्याच्या कांहीं उपयोगीं पडेल का असा प्रश्न आपल्याला करा. त्यापासून त्याला कांहीं लाभ होणार आहे का ? त्यापासून आपल्या जीव-नाचा व भवितव्याचा तो स्वामी बनायला कांहीं साहाय्य होणार आहे का ? दुसऱ्या शब्दांत बोलायचें तर त्यामुळें, भुकेल्या आणि आध्यात्मिक दृष्टयाहि उपासमार झालेल्या आपल्या लक्षावधि देशबांधवांना स्वराज्य वा आत्म-राज्य जवळ येणार आहे का ?

तेव्हां मग तुम्हांला दिसून येईल कीं तुमचे संशय वा शंका आणि तुमचा स्वार्थ उडून गेला आहे. १३

माणसाचें सौंदर्य त्याच्या चारित्र्यांत वा शीलांत असतें, जनावराचें त्याच्या शरीराच्या आकृतींत असतें. उदाहरणार्थ, एखादी गाय घेतली तर तिची चामडी, वा केस, वा पाय अथवा शिंगें यांवरून ती किती चांगली आहे असें आपण म्हणूं शकूं; उलट माणसाच्या बाबतींत तो पांच

फूट सहा इंच उंच आहे म्हणून चांगला आहे अथवा चार फूट सहा इंच आहे म्हणून वाईट आहे असें आपण म्हणत नाहीं. माणसाबाबत त्याच्या चांगले-वाईटपणाची कसोटी त्याचें अंतःकरण आहे, त्याचें रूप वा त्याची सांठविलेली संपत्तिहि नव्हे. इथें आश्रमांत आपण हृदयाचे सद्‌गुण संपादणें हें आपलें नैतिक कर्तव्य मानिलें आहे. आपण खातोंपितों आणि चुना-वाळूचीं घरें बांधतों. आपल्याला ह्या गोष्टी करणें भाग आहे म्हणूनच आपण त्या करतों; आपण कांहीं मातीच्या घरांचा तिरस्कार केलेला नाहीं. परंतु ऐषआरामाच्या वा विलासाच्या जीवनाची आपल्याला लाज वाटली पाहिजे. आपली संपत्ति जर आपण वाढवूं लागलों तर लाजेनें आपलें तोंड आपण लपविलें पाहिजे. सेवेसाठीं संपत्तीचा संग्रह अर्थात् करायला हरकत नाहीं. तो देखील अगदीं अनिच्छेनेंच आपल्याला करावा लागतो. परंतु कित्येकजण लोभ वा हाव हाच आपला धर्म मानून संपत्तीचा संग्रह करीत असतात तें योग्य नव्हे. आपलें बाह्य जीवन जितकें जितकें आपण उपकरणसमृद्ध करूं तितकी आपल्या नैतिक प्रगतीला आपण हानि पोंचवूं आणि खऱ्या धर्माला अपाय करूं. १४

जेव्हां आपण सोन्याच्या संग्रहापेक्षां सत्याचा संग्रह अधिक दाखवूं, सत्ता आणि संपत्ति यांच्या भपक्यापेक्षां अधिक निर्भयता दाखवूं आणि स्वार्थाच्या प्रेमापेक्षां अधिक उदारता वा दातृत्व दाखवूं तेव्हांच आपलें राष्ट्र हें खरेखुरें आध्यात्मिक राष्ट्र होईल. आपलीं घरें, राउळें आणि देवळें यांच्यांतून संपत्तीच्या निशाण्या तेवढ्या जर आपण झाडून काढल्या तर सेनेचें दुःसह ओझें वहावें न लागतां कितीहि शत्रुसेना जरी एकवटल्या तरी त्यांना माणसाला तोंड देतां येईल. १५

ईश्वर आणि पैसा या दोहोंचीहि सेवा तुम्हांला करतां यायची नाहीं. हें एक आर्थिक प्रमेय असून त्याचें स्थान परमोच्च आहे. आपली निवड आपण केली पाहिजे. पाश्चात्त्य राष्ट्रें त्या राक्षसाच्या भौतिक वादे-श्वराच्या पायदळी कण्हत आहेत. त्यांची नैतिक वाढ खुंटली आहे. ते आपली प्रगति आज पौंड, शिलिंग, पेन्समध्यें मापत आहेत. अमेरिकेची संपत्ति हें प्रमाण होऊन बसलें आहे. इतर राष्ट्रें त्याचा हेवा करतात. आपल्या पुष्कळ देशबांधवांना मी असें बोलतांना ऐकलें आहे कीं, आम्हीं

अमेरिकेची संपत्ति मिळवूं; परंतु तिची पद्धति आणि प्रकार टाळूं. असा प्रयत्न जर करण्यांत आला तर मी असें म्हणायचें धाडस करतों कीं, तो आधींच अपेशी ठरला म्हणून समजा. एकाच क्षणीं आपण सुज्ञ, नेमस्त व चौताळलेले असूं शकत नाहीं. आमच्या नेत्यांनीं आम्हांला नैतिक दृष्टीनें परमोच्च व्हायला शिकवावें असें मी इच्छितों. १६

● ● ●

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २६३०८ वि: निबंध
क्रमांक १२९० नों दि: २२।३।६

# REFERENCES

---


*Afb–At the feet of Bapu,* by Brijkrishna Chandiwala. Ed. - 1954.

**Amb–All Men are Brothers* Ed–1959

*Bch–Bombay Chronicle*

**Blm–Bapu's Letters to Mira* Ed–1949

**BP –This was Bapu,* by R. K. Prabhu, Ed. –1954

*Dd–Delhi Diary* Ed. 1948

**Et–The Epic of Travancore,* Mahadeo Desai —1937.

*Gde–Gandhiji's " Do or Die "* Mission by Sachindra Lal Ghosh. The book corporation Calcutta Ed. – I

*Gkh-Gandhiji as we know him,* by Chandrashekhar Shukla, Vora & co. Bombay Ed–1945

*Glw–Gandhiji – His Life and work* by Tendulkar & others. K. B. Dhavale, Bombay Ed – 1945.

*H – Harijan,* Edited by M. K. Gandhi.

*Ifm–I Follow The Mahatma* by K. M. Munshi.

*Igl–Incidents of Gandhiji's Life* by Chandrashekhar Shukla. Vora & Co. Bombay.

*Kd–Khadi* Ed–1955

**Lp–The Last Phase.* by Pyarelal Ed – 1949

*Lti–Light of India* by M. S. Deshpande Ed–1950.

*Lmg–Life of Mahatma Gandhi,* by Louis Fischer. Jonathan cape, London, Ed – 1951.

**Met–My Experiments With Truth,* by M. K. Gandhi. Ed – 1958.

*Mcg–My Childhood with Gandhiji — by Prabhudas Gandhi. Ed–1957.

*Mdc–My Dear Child, — by M. K. Gandhi, Ed – 1956

Mgj–Mahatma Gandhi, — by Stanlel Jones Hodder Stoughton, London. Ed-1948.

Mmg–The Mind of Mahatma Gandhi — by R. K. Prabhu and W. R. Rao. Oxford University Press Ed – 1945.

Mr–My Religign — Ed–1955

Mtm – Mahatma, — by D. G. Tendulkar. V. K. Jhaveri & D. G. Tendulkar Bombay Ed– 1951.

*Ntv–Nation's Voice — Ed–1958

*Pp–Pilgrimage for Peace, — by Pyarelal. Ed – 1950

*Slg–Selections from Gandhi, — by NirmalKumar Bose Ed – 1948.

*Smg–Seven Months With Mahatma Gandhi, — by Krishnadas. Ed – 1951

Ss–Self–Restraint V. Self–Induloence, — Ed–1958

*Ssa–Satyagraha in South Africa — by M. K. Gandhi. Ed – 1950.

*Std–To the Students, — by M. K. Gandhi. Ed 1958.

Twb This was Bapu

*Yi–Young India, — Edited by M. K. Gandhi.

---

*Published by Navajivan Publishing House AHMEDABAD

## हिंदी

| | | | |
|---|---|---|---|
| ★ | अेच– | अेकला चलो रे– | मनु गांधी |
| ★ | बा-छा– | बा और बांपूकी शीतल छायामैं | मनु गांधी |
| ★ | बापूक | बापूकी कलमसे | म. गांधी |
| ★ | मदेडा | महादेवमाईकी डायरी | महादेव देसाई |
| ★ | मं.प्र | मंगल प्रभांत | म. गांधी |
| | मंप्रभा | मंगल प्रभात | ( हिंदी साप्ताहिक) |
| ★ | सआइ | सत्याग्रह आश्रमका इतिहास | म. गांधी |

## गुजराती

| | | | |
|---|---|---|---|
| ★ | गांसा | गांधीजीनी साधना | रावजीभाई पटेल |

## मराठी

| | | | |
|---|---|---|---|
| ★ | आश्रसू | आश्रमवासियांना सूचना | म. गांधी |
| ★ | आस्त्रि | आश्रमांतील स्त्रियांस | म. गांधी |
| | गांधीजी | गांधीजी | जुगतराम दवे |
| | गांजीक | गांधी–जीवन–कथा | दा. न. शिखरे |
| | गांसादि | गांधीजींच्या सानिध्यांत | प्रभाकर दिवाण |
| | गांस्मृ | गांधी–स्मृति | कुंदर दिवाण |
| | प्रदी | प्रसाद–दीक्षा | सं. काका कालेलकर |
| | बाओद | बापूजींचीं ओझरतीं दर्शनें | आ. कालेलकर |
| | बापू | बापू | घनश्यामदास बिडला |
| ★ | बामाआ | बापू माझी आई | मनु गांधी |
| ★ | मं.प्र | मंगल प्रभात | म. गांधी आ.१९४९ |
| | चिस्मृ | चिर–स्मृति | त्र्यं. र. देवगिरींकर |

———

# संदर्भ-सूचि

## प्रकरण १ लें

| पृष्ठ | उतारा | ग्रंथ | पृष्ठ | मूळ आधार | तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | MMG | २२ | Y. I. | ११-१०-१९२८ |
| १-२ | २ | MMG | २३-२४ | Y. I. | ५-३-१९२५ |
| २ | ३ | LP(I) | ५९९ | H२ | २-६-१९४७ |
| २-३ | ४ | MET | ५१ | | |
| ३ | ५ | SSA | १८६ | | |
| ४ | ६ | SSA | १०४-१०५ | | |
| ४-५ | ७ | MTM | ८७ | Y I. | १३-१०-१९२१ |
| ५ | ८ | MTM | ८४ | Y. I. | १३-१०-१९२१ |
| ५ | ९ | IG L | १४७ | | |
| ५-६ | १० | MET | ३७०-७१ | | |
| ६ | ११ | MMG | २२ | Y. I. | ११-१०-१९२८ |
| ६ | १२ | MET | ३७०-७१ | | |
| ६-७ | १३ | MR | ६६ | B. th | ९-८-१९२४ |
| ७ | १४ | DD | ५४ | | |
| ७ | १५ | बामाआ | ४० | | |
| ७-८ | १६ | MTM-IV | १८८-८९ | | |
| ८ | १७ | MTM-II | ३१२ | | |
| ८ | १८ | MET | २०३ | | |
| ८-१० | १९ | SSA | २०८-९ | | |
| १० | २० | गांसा | ३०७-८ | | |
| १० | २१ | MTM-VI | १९८-२०४ | | |
| १०-११ | २२ | y. i. | ५-११.१९३१<br>१९-२-१९२५ | | |
| ११ | २३ | MTM-I<br>SLG | २९९,<br>१८ | | |
| ११ | २४ | | | Y. I. | ११-८-१९२० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | २५ | | | Y. I. | २९-५-१९२४ |
| १२ | २६ | MTM-VI | १८८ | | |
| १२-१३ | २७ | PP | ६८ | | |
| १३-१४ | २८ | MR | १०८ | | |
| | | BLM | २५७ | | |
| १४ | २९ | MR | ११०-१११ | H | २१-११-१९३६ |
| १४ | ३० | MET | २३३ | | |
| १५ | ३१ | MET | २४३ | | |
| १५ | ३२ | MET | १५३ | | |
| १६ | ३३ | SLG | २३८ | Y. I. | ४-५-१९२१ |
| १६-३४ | | H | | | ३-७-१९३७ |
| १६ | ३५ | आस्त्रि | ९९ | | |
| १६-३६ | | आस्त्रि | ११६ | | |
| १६ | ३६ | SLG | १४ | | |
| १६-१७ | ३७ | STD | २४-२५,२७-२८ | | |
| १७ | ३८ | SLG | ३७ | Y. I. | १७-७-२४ |
| १७ | ३९ | SLG | ३७ | Y. I. | १७-७-२४ |
| १७-१८ | ४० | AMB | ८२ | | |
| १८ | ४१ | MET | XV | | |
| १८-१९ | ४२ | MET | ३७१ | | |

## प्रकरण २ रें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | १ | मदेडा | III | २८४ |
| २०-२१ | २ | MDC | | ८४ |
| २१ | ३ | GLW | | २६ |
| २१ | ४ | IGL | | २८ |
| २१ | ५ | AFB | | ४९ |
| २१-२४ | ६ | सआइ | | ३-७ |
| २४ | ७ | STD | | ४३ |
| २४ | ८ | STD | | ४३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २४-२५ | ९ | AFB | ३४ |
| २५-२६ | १० | सआइ | ७-९ |

प्रकरण ३ रें

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | १ | MET | २८७ |
| २७ | २ | आचार्य विनोबाकृत श्लोक | |
| २७-२९ | ३ | मंप्र | ९७-१०२, ३८-३९, ३४-३५ |
| २९-३० | ४ | बाओद | ४३-४४ |
| ३०-३१ | ५ | MTM-III | २४३ |
| ३१ | ६ | H | ६-५-१९३३ |
| ३१-३२ | ७ | LP-I | ५२५ |
| ३२-३४ | ८ | मंप्र | ९-१३ |
| ३४-३६ | ९ | MET | २० |
| ३६-३७ | १० | MET | ८०-८१ |
| ३७-३९ | ११ | हस्तलिखित आठवणीवरून | |
| ३९-४० | १२ | IFM | ८-९ |
| ४० | १३ | IGL | ६७ |
| ४१-४३ | १४ | मंप्र | १५-२१ |
| ४३-४३ | १५ | PP | ५४ |
| ४४-४६ | १६ | MTM—IV | ३२९-३० |
| | | PP | ६१-६२ |
| ४६ | १७ | LP-II | ७५६ |
| ४६-४८ | मंप्र | | २२-२९ |
| ४८-४९ | १९ | MET | ५०-५१ |
| ४९-५० | २० | MET | ७५ |
| ५०-५१ | २१ | मंप्र | ३०-३७ |
| ५१ | २२ | बाओद | ३३-३४ |
| ५१-५३ | २३ | मंप्र | ३९-४४ |
| ५३-५४ | २४ | LP-II | ७६ |
| ५४ | २५ | LP-II | ३६१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५४-५५ | २६ | बाछा | ५४-५५ |
| ५५-५८ | २७ | मंप्र | ४५-५५ |
| ५८-६० | २८ | MET | १६०-६१ |
| ६०-६१ | २९ | GEW | २०९ |
| ६१-६ | ३० | AFB | ८७-८८ |
| ६२-६३ | ३१ | BP | ८०-८१ |
| ६३-६४ | ३२ | { वाओद | ८१ |
| | | LMG | ३२७ |
| ६५ | ३३ | मंप्र | ५२-५६ |
| ६५-६८ | ३४ | SSA | १६६-७० |
| ६८-६९ | ३५ | IGL | ९९-१०० |
| ६९ | ३६ | बाअेद | ९९ |
| ७०-७१ | ३७ | मंप्र | ५७-६३ |
| ७१-७३ | ३८ | MET | २९२-२९३ |
| ७३-७५ | ३९ | हस्तलिखित आठवणीवरून | |
| ७५-७६ | ४० | H | ९-४-१९३८ |
| ७६-७७ | ४१ | MTM-II | ३९९-४०० |
| ७७-७८ | ४२ | मंप्र | ६४-६९ |
| ७८-७९ | ४३ | LP-I | ५०९ |
| ७९-८० | ४४ | बामाआ | २९-३० |
| ८०-८१ | ४५ | LP-I | १४०-१४१ |
| ८१-८३ | ४६ | मंप्र | ७०-७४, ८० |
| ८३-८४ | ४७ | LP-II | ९३-९६ |
| ८४-८६ | ४८ | LP-II | ४४३-४४ |
| ८६-८७ | ४९ | मंप्र | ८२-८७ |
| ८७-८८ | ५० | हस्तलिखित आठवणीवरून | |
| ८८-८९ | ५१ | BP | ८८-८९ |
| ९० | ५२ | LP-I | ३४७ |
| ९०-९१ | ५३ | मंप्र | ८९-९६ |
| ९१-९३ | ५४ | IGL | ८९-९१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३-१४ | ५५ | बापू | | | १३९-४१ |
| १४-१५ | ५६ | गांजीक | | | १५३-४ |
| १५ | ५७ | LP-I | | | ५०९ |
| १५-१७ | ५८ | IGL | | | ५८-५९ |

## प्रकरण ४ थें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | १ | SS | ६७ | Y. I. | २५-२-१९२६ |
| १८ | २ | LTI | ११३ | Y. I. | २१-६-१९१९ |
| १८ | ३ | MMG | २७ | H | ८-१०-१९३८ |
| १९ | ४ | MTM | १०८-१०९ | | |
| १९ | ५ | MMG | ७१ | H | २४-१२-१९३८ |
| १९ | ६ | SLG | ४५ | Y. I. | १२-५-१९२०<br>६-८-१९३१ |
| १०० | ७ | SLG | ४६-४७ | Y. I. | ११में९-१९२४ |
| १०० | ८ | SLG | १७२ | H | २९-९-१९४० |
| १००-०१ | ९ | LTI | २५८-५९ | H | १४-१-१९४६ |
| १०१ | १० | NTV | ११-१२ (गोलमेज परिषदेंतील भाषण-१९३१) | | |
| १०१-०२ | ११ | DD | २१० | | |
| १०२ | १२ | LP-II | ६४२ | H | २४-८-१९४७ |
| १०३ | १३ | STD | १७ (बनारस हिंदु विद्यापीठांतील भाषण-१९१६) | | |
| १०३ | १४ | MR | १५३ | | |
| १०३-१०४ | १५ | KD | १५ | Y. I. | २९-६-१९२१ |
| १०४ | १६ | KD | ११४ | Y. I. | २२-९-१९२७ |
| १०४-१०५ | १७ | DD | २५३ | | |
| १०५ | १८ | | | | |
| १०५ | १९ | | | | |
| १०५ | २० | | | | |
| ०५-०६ | २१ | LP-II | १०४ | | |

**प्रकरण ५ वें**

| | | | |
|---|---|---|---|
| १०७ | १ | MET | २२२ |
| १०७-१०९ | २ | MCG | ३६-,३८,८८,९१ |
| ११० | ३ | MCG | १५६ |
| ११० | ४ | MCG | १६१ |
| ११०-१११ | ५ | MCG | ५० |
| १११ | ६ | MCG | १०९, ११८, १०८ |
| ११२-११३ | ७ | MCG | ११२, ११४-१५ |
| | | MET | २५२ |
| ११३-१४ | ८ | MTM:I | १८३-८४ |
| ११४ | ९ | IGL | ११९ |
| ११४-११५ | १० | MTM-I | १४२-४६ |
| ११५ | ११ | SSA | २३६ |
| ११६ | १२ | MET | २४६ |
| ११६ | १३ | SSA | २४० |
| ११६-७ | १४ | MET | २४० |
| ११७ | १५ | MET | २४७ |
| ११७-१८ | १६ | MET | २५० |
| ११८-१९ | १७ | SSA | २४४ |
| ११९ | १८ | MET | २४४ |
| १२०-२१ | १९ | MTM-I | २०७-१२ |
| १२१ | २० | MTM-I | २६२ |
| १२२ | २१ | MTM-II | २८५-८६ |
| १२२ | २२ | प्रदी | १५ |
| १२२-२३ | २३ | प्रदी | ८९ |
| १२३ | २४ | प्रदी | ९० |
| १२३ | २५ | बाळकोबा भावे यांच्या हस्तलिखितांतून | |
| १२४ | २६ | मदेडा-१ | २७९ |
| १२४ | २७ | मदेडा-१ | २८२-३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२४–२५ | २८ | आस्त्रि | ९० |
| १२५ | २८ | आस्त्रि | ५९ |
| १२५–२६ | २९ | गांसादि | १९ |
| १२६ | ३० | गांसादि | ३६ |

**प्रकरण ६ वें--स्वतंत्र पुस्तकाचा सारांश**

**प्रकरण ७ वें**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | L. A. | 217–218 | H 1, | 3-12-'38 |
| 2 | M R | 75 | H. P. 153 | 18:6-'38 |
| 3 | M R | 72–73 | Y. I. P. 3, 4 | 11-10'20 |
| 4 | M R | 122 | H. P. 393 | 24-12-'38 |
| 5 | M R | 122 | H. P. 23 | 2-3-'40 |
| 6 | L A | 93 | Y. I. | 1-6-'21 |
| 7 | M R | 94 | Y. I. P. 274 | 24-9-'31 |
| 8 | L A | 136–137 | Y. I. | 23-1-'30 |
| 9 | L A | 89 | Y. I. | 23-9-'26 |
| 10 | L A | 130 | H. 1,<br>Y. I. | 26-1-'34<br>24-9-'25 |
| 11 | L A | 129 | Y. I. | 21-6-29 |
| 12 | L A | 216 | H. 1. | 19-2-38 |
| 13 | M R | 52 | T.W.B. P. 48 | 1958 |
| 14 | A S | 102 | Maniben's Notes | 1926 |
| 15 | A M B | 171 | | |
| 16 | M T I | 240 | | |

REFBK-0010238
REFBK-0010238
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
90238